
# मेहता मराठी ग्रंथजगत

दीपावली २०२३

पृष्ठे १६० । किंमत ₹ १००

## साहित्य आणि मिथके




# शिवाजी सावंत




सहा वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर
नव्या दमात, नव्या जोषात,
त्याच आकर्षक रूपात व मांडणीत

## मृत्युंजय • छावा • युगंधर

पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीस आले आहेत...







₹ ६४० ₹ ७५० ₹ ७५०

# मेहता मराठी ग्रंथजगत


दीपावली २०२३
वर्ष तेविसावे
किंमत ₹ १००



संपादक
अखिल मेहता

संस्थापक संपादक
शंकर सारडा

संपादन साहाय्य
प्रतीक येतावडेकर

मुखपृष्ठ व मांडणी
यशोधन लोवलेकर

संपादक-मुद्रक-प्रकाशक
अखिल मेहता
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड टेलिफोनभवनसमोर, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४,२४४७५४६२






या अंकात दिलेल्या लेखांमधील मते त्या त्या लेखकाची असून
संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


**संपादकीय** / ६

## लेख

**सुधा मूर्ती यांच्या साहित्यातील मिथक**
लीना सोहोनी / १०

**मिथके आणि कन्नड साहित्य**
उमा वि. कुलकर्णी / १६

**पौराणिक कथा आणि कादंबरीतील फरक**
देवदत्त पटनायक / २०

**‘अथ’ ते ‘इति’**
स्वाती चांदोरकर / २२

**धर्म आणि लोकसाहित्य**
डॉ. मुकुंद कुळे / २६

**व्याल भारतीय मिथकातील प्राणी**
केतन पुरी / ३२

**ज्ञानेश्वरी आणि महाभारताची अभिजातता**
मंजुश्री गोखले / ३८

**महाभारतातील मिथकांशी दुर्गाबाईंचा संवाद!**
डॉ. शोभा नाईक / ४६

**लोकसाहित्याचा ठसठशीत दागिना सरोजिनीआक्का**
सदानंद कदम / ५२

**रा. चिं. ढेरे लोकसंस्कृतीचा वस्तुनिष्ठ भाष्यकार**
डॉ. रमेश जाधव / ५६

**लोकसाहित्यातून लोकजागर**
प्रा. सुहास निर्गुण / ६२

## बालकथा

**गोष्ट एका अपूर्ण गोष्टीची**
उत्कर्षा मिसाळ / ६६

**भक्त प्रल्हाद आणि बटाटेवडे**
राजीव तांबे / ६८

**पुस्तकांच्या पानांतून / ७१**

**कल्पवृक्षाची कन्या** / ७२

**दोन शिंगे असलेला ऋषी** / ७६

**त्रिशंकू** / ८२

**गरुडजन्माची कथा** / ८५

**कालचक्राचे रक्षक** / ९०

**उत्तुंग** / ९५

**राधेय** / १०२

**उत्तरकांड** / १०८


**कुरुक्षेत्रानंतर...** / ११५

**महाभारतातील पितृवंदना** / १३२

**सचित्र रामायण** / १४७

**सचित्र महाभारत** / १५२

**दिनविशेष** / १५४



# साहित्य आणि मिथके



माणूस आपल्या दैनंदिन कामात व्यस्त असतो. हा निसर्गनियमच आहे. मात्र यातून थोडी उसंत वा मोकळा वेळ मिळाल्यास तो स्वत:साठी वेळ देतो. या वेळात तो स्वत:साठी जगत असतो. आपले छंद, आवडीनिवडी जोपासण्याकडे त्याचा जास्त ओढा असतो. दैनंदिन कामाच्या वेळापत्रकातून तोचतोपणा आलेला असतो, त्याला पर्याय म्हणून मनोरंजनाची साधने निर्माण करण्यास व त्याचा आनंद घेण्यास माणूस कधीही आनंदाने तयार असतो.

राजेरजवाड्यांचा काळ ते आताचा आधुनिक काळ, मनुष्याने मनोरंजनाला कायमच प्राधान्य दिलेलं आहे. राजदरबारी भाट किंवा विदूषक यांच्या माध्यमातून राजघराण्यातील लोकांचं मनोरंजन केलेलं आपण ऐकलेलं असतं. त्यातून अकबराच्या दरबारी असणाऱ्या नवरत्नांपैकी एक बिरबल व कृष्णदेवराय यांच्या दरबारी असणारा तेनालीराम या व्यक्तिरेखा आपल्याला चिरपरिचित आहेतच. मध्ययुगीन काळात होऊन गेलेल्या या व्यक्ती आजही आपण विसरू शकत नाही.

एखादी गोष्ट आपल्याला समजते, मग ती कथा असो गोष्ट असो, वा एखादं गाणं असो. ते आधीच्या पिढीतील लोकांकडून संक्रमित होऊन आपल्यापर्यंत येत असतं. पिढी दर पिढी हे आदानप्रदान झालेलं पाहायला मिळतं. या प्रकारचं समृद्ध असं साहित्य आपल्या भारतात आपल्याला पाहायला मिळतं. देशाच्या विविध प्रदेशांतील प्रथा-परंपरांनुसार या साहित्याचा बाज वेगळा असा दिसून येतो. या प्रकारच्या साहित्यालाच 'लोकसाहित्य' असं संबोधलं जातं.

लोकांनी लोकांच्या मनोरंजनासाठी निर्मिलेलं साहित्य म्हणजेच 'लोकसाहित्य' अशी सहजसोपी व्याख्या आपण करू शकतो. या साहित्याचा आस्वाद आपण कळत-नकळत घेत आलेलो असतो. या साहित्यात अनेक प्रकार आपल्याला पाहायला मिळतात. 'लोकसाहित्य' हा मानवी भावजीवनाचा एक हळवा कोपरा आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

लोकसाहित्य आणि मिथक यांचा फार जवळचा संबंध आहे. मिथकातून आपल्याला नैतिक, धार्मिक, सांस्कृतिक संदेश दिलेला पाहायला मिळतो. साहित्य आणि मिथक हे एक अजोड असं समीकरण असलेलं या निमित्तानं पाहायला मिळतं.

एखादी गोष्ट आपल्याला एखाद्याला सांगायची असेल तर आपण ती गोष्ट जशी आपल्याला माहिती आहे तशी सांगायचा प्रयत्न करत असतो; त्यात नकळतपणे काही नव्या गोष्टी आपल्याकडून सांगितल्या जातात आणि ती गोष्ट पुढे तशीच सांगितली जाते. हे होत असताना दुसरी व्यक्ती त्या गोष्टीत काही नव्या गोष्टी वाढवते व ती गोष्ट पुढे सांगितली जाते, असं एक वर्तुळ त्यामध्ये सातत्याने पूर्ण होताना आपल्याला पाहायला मिळतं.

या सर्व साहित्याचा विचार करताना सहज जरी आपण

पाहिलं तरी लोककथा, ओव्या, पुराणं, उखाणे, पाळणे, अंगाईगीते, पोवाडे इत्यादी गोष्टी आपसूकच नजरेसमोर येतात. लोकसाहित्याचा आवाका हा खूप मोठा असून, त्याला विविध शाखांच्या माध्यमातून अनेक प्रकारे धुमारे फुटलेले पाहायला मिळतात. गावखेड्यांत, देशावर, प्रदेशातल्या तळागाळापर्यंत या प्रकारचं साहित्य विखुरलेलं पाहायला मिळतं, याचं संपादन-संकलन करून ते जतन करण्याचा प्रयत्न हा वेळोवेळी झालेला आपण पाहत आलो आहोत.

दुर्गाबाई भागवत, डॉ.सरोजिनी बाबर, डॉ.रा.चिं ढेरे, गंगाधर मोरजे इ. ठळकपणे आठवणारी प्रातिनिधिक स्वरूपातील नावं. या लोकांनी स्वत:ला या साहित्यासाठीच वाहून घेतलं होतं. संशोधक लोकांमुळेच आपल्यासमोर या लोकसाहित्याचं अनोखं दालन खुलं झालं.  एखादं व्रत अंगीकारावं आणि त्याचं पालन करावं अशा प्रकारचा विचार करणाऱ्या या मंडळींमुळे या साहित्याचा ऊहापोह झालेला दिसून येतो.

अलीकडच्या काळातही या लोकसाहित्याचा वापर करून अनेक लोकांनी नवं साहित्य वाचकांसमोर ठेवलेलं आपण पाहतो. मिथक साहित्य, लोकसाहित्य याची भुरळ समकालीन वाचकांना आहेच; मात्र त्याहीपेक्षा जास्त भुरळ समकालीन लेखकांनासुद्धा आहे, हे इथं आवर्जून नमूद करावंसं वाटतं. 'मिथक' हे साहित्याचं एक महत्त्वाचं अंग असून, त्याचा संदर्भ घेऊन अनेक साहित्यकृती निर्माण केलेल्या आपण पाहतो.

या शास्त्राचा समकालीन तसेच अर्वाचीन साहित्य यावर असलेला अमीट असा ठसा याची चर्चा या निमित्ताने झालेली पाहायला मिळते. 'सुधा मूर्ती यांच्या साहित्यातील मिथक', 'मिथके आणि कन्नड साहित्य', 'धर्म आणि लोकसाहित्य, 'अथ ते इति', 'ज्ञानेश्वरी आणि महाभारताची अभिजातता' इत्यादी लेख, सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, रा. चिं. ढेरे या लोकसाहित्याच्या अभ्यासकांवरील लेख, तसेच दोन बालकथा या सर्व लेखांमुळे या वर्षीचा दिवाळी अंक वाचनीय तर आहेच; तसाच तो संग्राह्यही झाला आहे. 'मिथक' ही एक व्यापक संकल्पना आहे आणि त्या संकल्पनेला विविध अंगांनी भिडण्याचा प्रयत्न आम्ही या वेळच्या दिवाळी अंकातून केला आहे.


'भारतीय साहित्यातील मिथक' या अनोख्या विषयावरील अंक आपल्या हाती देताना आम्हाला खूप आनंद होतोय. 'मिथक' या विषयावरील कदाचित हा पहिलाच अंक असावा. वाचनीय लेख, आकर्षक मांडणी यांची अनोखी मेजवानी यामुळेच या दिवाळीत मिळणार आहे.

नुकत्याच झालेल्या फ्रँकफुर्ट बुक फेअरला आम्ही हजेरी लावली. त्या बुक फेस्टिव्हलची पूर्वी असणारी क्रेझ काही प्रमाणात कमी झाली आहे हे जाणवलं. हा ब्रेक्झिटमुळे झालेला परिणामही असू शकतो. यामुळे इंग्रजी भाषेलाच दिले जाणारे महत्त्व हे एक प्रमुख कारण म्हणता येईल. फ्रँकफुर्ट बुक फेअरला समांतर भरवले जाणारे लंडन बुक फेअर या दोहोंमधील स्पर्धा हेही एक कारण असावं.

पुस्तकांचे राईट्सची जी देवाणघेवाण होते, त्यामध्ये एक पोकळी निर्माण झाली आहे. ती भरून काढण्याची भारतीय प्रकाशकांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. प्रादेशिक भाषांतील पुस्तके या निमित्ताने जगभरात पोहोचतील. येणाऱ्या काळात भारतीय साहित्य, विशेषत: प्रादेशिक साहित्याला चांगले दिवस येणार आहेत, हे इथे नमूद करावेसे वाटते. येत्या काही दशकांत भारतीय साहित्य भारतीय भाषांचा पर्यायाने भारताचा गौरव होणार आहे, असा विश्वास वाटतो.

येणाऱ्या काही वर्षांत फ्रँकफुर्ट बुक फेअर हे जगभरातील प्रादेशिक भाषांसाठी असलेले बुक फेअर अशी ओळख निर्माण होईल.

आमच्या सर्व वाचकांना, वितरकांना, हितचिंतकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!!!



# साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



## प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.



**सर्वोत्कृष्ट कादंबरी**

**₹ ३०,०००**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**

**₹ २०,०००**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :


- १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.
- पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण
- माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.


या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# शिवाजी सावंत यांची साहित्यसंपदा




























साहित्यात ज्याचा उल्लेख ‘मिथक’ असा केला जातो, त्या खरंतर पारंपरिक कथा किंवा आख्यायिका असतात. त्या मौखिक परंपरेने पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या असतात आणि कोणत्याही भाषेतील साहित्याचा फार मोठा व महत्त्वपूर्ण भाग या मिथककथांनी व्यापलेला असतो. या सामान्यत: देव-देवतांविषयीच्या किंवा अलौकिक स्वर्गीय प्राण्यांविषयीच्या कथा असून, त्या नैसर्गिक घटना, प्रथा, विधी आणि जगाची उत्पत्ती किंवा विशिष्ट संस्कृतीचा उगम व विकास यांविषयीचे स्पष्टीकरण देतात. जगभरातील विविध संस्कृतींना मिथककथांची कित्येक पिढ्यांची मोठी परंपरा असते.

मिथकांमध्ये बहुतेक वेळा प्रतीकात्मक घटक असतात आणि ते घटक फार महत्त्वाचा नैतिक, धार्मिक किंवा सांस्कृतिक संदेश देतात. मिथककथा एकीकडे आबालवृद्धांचं



# सुधा मूर्ती यांच्या साहित्यातील मिथक

लीना सोहोनी

मनोरंजनही करतात तर त्याच वेळी त्यांतून आपल्याला सखोल मानवी अनुभवाचा आणि श्रद्धेचाही मागोवा घेता येतो.

अलीकडच्या भारतीय बालसाहित्यात मिथककथा लेखनात विख्यात लेखिका सुधा मूर्ती यांचं मोलाचं योगदान आहे. त्यांनी वाचकांना आकर्षित करणाऱ्या साध्या; पण आकर्षक लेखनशैलीत या पारंपरिक मिथककथांची मालिका लिहिली आहे. रामायणातील कथा, महाभारतातील कथा, त्रिमूर्तींच्या कथा, महाभारतातील स्त्रिया, श्रीकृष्णाच्या कथा अशा विविध मिथककथांचं त्यांनी पुनरुज्जीवन करून त्या त्यांच्या प्रवाही आणि प्रत्ययकारी शैलीत एकंदर पाच खंडांमध्ये सादर केल्या आहेत. त्यांच्या मिथककथांच्या निवडीतून भारतीय संस्कृती आणि लोकपरंपरांबद्दलचं त्यांचं सखोल आकलन दिसून येतं.

(सुधा मूर्ती यांनी जेव्हा या मिथककथांची मालिका लिहिण्याचा संकल्प सोडला, त्या सुमारास माझी आणि त्यांची बंगळुरूमध्ये भेट झाली होती. त्यावेळी आमची या विषयावर सविस्तर चर्चा झाली होती. त्यानंतर त्यांच्या या कथामालिकेच्या अनुवादाचं काम करण्यास जेव्हा मी सुरुवात केली, तेव्हाही अनेकदा आमचा फोन व ई-मेलवरून संपर्क होत असे व त्यांमधील काही घटकांविषयी चर्चा होत असे.)

या मिथककथांचं सर्वांत मोठं वैशिष्ट्य असं की या सर्व कथा तुम्ही-आम्ही न ऐकलेल्या, जनसामान्यांना परिचित नसलेल्या अशा कथा आहेत. सध्याच्या धकाधकीच्या आणि अतिरिक्त स्पर्धेच्या युगात आपण सर्वांनी भोगवादी आणि विलासी जीवनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. माध्यमांच्या अतिक्रमणाबरोबर पाश्चात्त्य संस्कृतीचं आपल्या जीवनावर सावट आलेलं आहे. तरुण पिढीसमोर आदर्श नाहीत. आई-वडिलांना मुलांसाठी पुरेसा वेळ देता येत नाही आणि एकत्र कुटुंबपद्धती लयाला जाऊन विभक्त कुटुंबपद्धती उदयाला आलेली आहे. या संक्रमणाच्या काळात सर्वांचीच स्थिती काहीशी गोंधळल्यासारखी झाली आहे. तरुण आई-वडिलांना आपल्या मुलांवर संस्कार तर करायचे आहेत; पण संस्कार म्हणजे नेमकं करायचं तरी काय, हेच त्यांना उमगत नाहीये. अशा या काळात लहान मुलांना या बोधकथा कुणीतरी सांगण्याची गरज होती. या दृष्टीने सुधा मूर्ती यांच्या बोधप्रद मिथककथा फार मोठी कामगिरी बजावत आहेत.

त्याविषयी बोलताना सुधा मूर्ती असं म्हणतात, ‘की आपल्या परंपरागत लोकवाङ्मयाच्या सागरात आपल्याला अपरिचित अशी हजारो कथामौक्तिकं सापडतील. त्यांमधून मी केवळ थोड्याशाच कथा निवडून त्या या कथासंग्रहामध्ये समाविष्ट करू शकले.’ म्हणूनच या कथा जरी केवळ मुलांसाठी लिहिण्यात आलेल्या असल्या, तरी समाजाच्या विविध स्तरांतील आणि विविध वयोगटांतील वाचकांमध्ये या मिथककथा अल्पावधीतच लोकप्रिय झाल्या आहेत. त्या एकाच वेळी ज्ञानवर्धकही आहेत आणि आनंददायीसुद्धा आहेत. सुमारे तेरा भारतीय भाषांमध्ये अनुवादित झालेल्या या कथा सर्वच प्रांतांमध्ये सारख्याच लोकप्रिय झालेल्या आहेत.

सुधा मूर्ती यांची लेखनशैली सहजस्वाभाविक आणि भावगर्भ आहे, त्यामुळे वाचकांशी त्यांचं नातं जोडलं जातं. त्या सर्वांना आपल्यातल्याच एक वाटतात. सुरुवातीला आपण त्यांच्या या पाच मिथक कथासंग्रहांचा थोडक्यात आढावा घेऊ.



**१) सर्पाचा सूड :** महाभारतातील युद्धाविषयी तर पुष्कळ माहिती सर्वत्र उपलब्ध आहे; परंतु या युद्धाच्या आधी युद्धाच्या दरम्यान किंवा युद्धाच्या नंतरही असंख्य कथा घडलेल्या आहेत. सुधा मूर्ती यांनी या पुस्तकातून सांगितलेल्या गोष्टी सर्वश्रुत नसल्यामुळेच त्यांचं हे वेगळेपण वाचकाला मंत्रमुग्ध करतं. आपल्या पुरातन धर्मग्रंथांमधून जी तत्त्वं सांगितलेली आहेत, तीच सुधा मूर्तींनी या कथांमधून विस्ताराने मांडलेली आहेत. त्या म्हणतात, ''या तत्त्वांबाबत कोणतीही शंका न विचारता त्यांचा जसाच्या तसा स्वीकार करायचा असतो, असं त्याकाळी लहान मुलांना सांगण्यात येत असल्यामुळे मी त्याविषयी कुणालाही प्रश्न विचारणं बंद केलं होतं; पण काही कथा मला त्यावेळीसुद्धा मुळीच पटल्या नव्हत्या. मी मोठी झाल्यावरही काही प्रश्न माझ्या मनात वारंवार उमटत असत. मग मी या कथांचा माझ्यापुरता जो अन्वयार्थ लावलेला आहे तो बरोबर आहे का, मला पडलेले प्रश्न बरोबर आहेत का, हा प्रश्न मी स्वत:लाच विचारत असे.''

काही काळानंतर सुधा मूर्तींच्या असं लक्षात आलं, की पुराणातील कथासुद्धा इतिहासावरच आधारित असतात; पण त्या तपशीलाच्या दृष्टीने अगदी बिनचूक नसतात. कदाचित जुन्या काळी या सर्व कथा मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेल्या असल्यामुळे त्यांमध्ये थोडे-थोडे बदल घडून येत असतील. एकदा ही शक्यता गृहीत धरल्यावर मग त्या गोष्टींमधला अतिरंजितपणा, अवास्तवपणा इत्यादीकडे दुर्लक्ष करून आपण त्यातलं फक्त सार तेवढं घ्यायचं असतं, असं मी ठरवलं. उदाहरणार्थ, रामायणातील रावणाला दहा मस्तकं होती, हे सर्वांना माहीत आहे; पण ही दहा मस्तकं म्हणजे खरंतर त्याची कुशाग्र बुद्धी आणि वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची क्षमता यांचं प्रतीक आहे, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. कधीतरी या मिथकांमध्ये मानवाप्रमाणे बोलणाऱ्या, मानवी इच्छा-आकांक्षा, विकार इ. असलेल्या प्राण्याचा 'सर्प' असा उल्लेख करण्यात आलेला असतो, ती नागा जमातीतील खरीखुरी व्यक्ती असू शकते.

**२) गरुडजन्माची कथा :** ब्रह्मदेवाला कोणे एकेकाळी पाच मस्तकं होती, हे सर्वसामान्यांना माहीत नसतं. भगवान शंकराने आपल्या जटांमध्ये चंद्रकोर का धारण केली, याविषयीही लोकांना फारशी माहिती नसते. देवसुद्धा दानवांची किंवा मानवांची कधीतरी फसवणूक करतात, ती का, याचीही कुणालाच कल्पना नसते; पण आपणा सर्वांना एक गोष्ट निश्चितच माहीत असते : ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींचं चराचरात अस्तित्व असून हे जग आणि आपली मानव जात अस्तित्वात आहे, ती केवळ त्यांच्यामुळेच!

भारतात ईश्वराच्या तीन रूपांना एकत्रितपणे 'त्रिमूर्ती ' असं म्हणतात. हे तीन देव म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश. हे तिघं मिळून विश्वाच्या एकात्मतेचं प्रतीक आहेत; परंतु तरीही प्रत्येकाला एक स्वतंत्र ओळख आहे. सुधा मूर्ती म्हणतात, ''हे जरी खरं असलं, तरीही माझ्या मनात एक प्रश्न उठतो. आपल्याकडे शंकराची आणि विष्णूची त्यांच्या अनेक अवतारांमधील रूपांची असंख्य देवालयं आहेत; पण ब्रह्माचं मंदिर भारतात सहसा कुठे आढळून येत नाही. असं का बरं? राक्षस किंवा असुर हे सतत अमरत्व मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. कधीतरी त्यासाठी देवांचीसुद्धा फसवणूक करतात; पण त्यांचे ते प्रयत्न कधीच यशस्वी होत नाहीत. हे का बरं? 'पार्वती' ही आपल्याकडे शक्ती म्हणून लोकप्रिय आहे. शक्ती हे स्त्रीचं दैवी रूप आहे आणि दुर्गा ही तर दुष्टांचं निर्दालन करणारी वीरांगना. मग ही नाजूक, कोमल, सुंदर अशी पार्वती शक्तीची देवता किंवा वीरांगना म्हणून कशी काय प्रसिद्ध झाली असेल?''

संपूर्ण भारतात सगळीकडे या तीनही देवतांची उपासना केली जाते; परंतु या देवतांबद्दलच्या अनेक सुरस आणि चमत्कृतिपूर्ण कथा अजूनही फारशा कुणाला माहीत नसतात. प्राचीन युगातील या तीन अत्यंत शक्तिशाली देवतांविषयीच्या अद्‌भुतरम्य कथा सुधा मूर्तींनी 'गरुडजन्माची कथा' या पुस्तकातून वाचकांसमोर उलगडल्या आहेत. या कथासंग्रहातील प्रत्येक कथा तुम्हा-आम्हा सर्वांना एका वेगळ्याच मंतरलेल्या विश्वात घेऊन जाते. त्या कथा ज्या कालखंडात घडतात तेव्हाच्या व्यक्ती मनोवेगाने दूरदूरच्या प्रदेशात भ्रमंती करू शकत असत. यातले प्राणी उडू शकत असत आणि इथे पुनर्जन्म तर नेहमीच होत असे. लेखिका सुधा मूर्ती वाचकांना हाताला धरून या अनोख्या, अज्ञात प्रदेशात घेऊन जातात.

**३) त्रिशंकू :** कोणे एकेकाळी अस्वलं बोलायची, चंद्र हसायचा आणि समुद्रातील माशांच्या पोटात लहान बाळं सापडायची. त्या काळी सहस्रबाहू असलेला माणूससुद्धा होता.

'त्रिशंकू' या कथासंग्रहातील कहाण्या श्री भगवान विष्णूंच्या दोन अवतारांच्या आहेत. प्रभू रामचंद्र आणि श्रीकृष्ण हे ते दोन अवतार! खरंतर या दोन्ही अवतारांच्या अक्षरश: अगणित कथा उपलब्ध आहेत; पण त्यातल्या कित्येक कथा आजच्या तरुण पिढीच्या कधी कानावरही पडलेल्या नाहीत. कित्येक कथा विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या आहेत. सुधा मूर्तींनी या पुस्तकातून अशाच सुरस आणि चमत्कृतिपूर्ण कथा लिहिल्या आहेत. यात मनुष्यप्राण्यांबरोबर देवता आणि राक्षसही आहेत. यातले प्राणी माणसांसारखे बोलतात आणि देव-देवता सर्वसामान्य माणसांना मोठे-मोठे वरही देतात.

राम आणि कृष्ण या दोघांनाही लोक विष्णूचा अवतार मानतात. भगवान विष्णू तर सर्व विश्वात भरून राहिलेले

आहेत; पण हेच भगवान विष्णू जेव्हा पृथ्वीवर दोन वेगवेगळ्या कालखंडात मनुष्यरूपात (श्रीराम आणि श्रीकृष्ण म्हणून) पृथ्वीवर प्रकट झाले तेव्हा त्या दोघांच्याही स्वभावधर्मात आणि प्रकृतीत मात्र जमीन-अस्मानाचं अंतर होतं. राम आणि कृष्ण यांच्यामध्ये एक फरक असा आहे, की कृष्णाची आपल्या मनातील प्रतिमा एका स्वच्छंदी प्रियकराची आहे. श्रीरामांच्या बाबतीत मात्र तसं नाही. श्रीकृष्ण आबालवृद्धांसकट सर्वांचाच लाडका होता. तो एक मर्त्य मानव असला तरी त्याच्या सहवासात आलेल्या सर्वांना तो देवासारखा भासायचा; परंतु राम आणि कृष्ण यांच्याकडे केवळ देव म्हणून न बघता त्यांच्यातील माणूसपण कसं होतं, यावर प्रकाशझोत टाकण्याच्या इच्छेतून सुधा मूर्ती यांनी खोलवर संशोधन केलं आणि तेच सगळं संशोधन त्यांनी या पुस्तकाच्या रूपाने आपल्यापुढे ठेवलं.

**४) कल्पवृक्षाची कन्या :** ब्रह्मा,विष्णू आणि महेश म्हणजेच त्रिमूर्ती. असुरांचा पाडाव करण्यासाठी अनेकदा देव-देवता यांच्याकडेच मदतीसाठी धावून जात असत, ही गोष्ट बऱ्याच लोकांना माहीत नसते. या जगातील पहिलं प्रतिरूप (ज्याला आज आपण क्लोन म्हणतो) सर्वांत प्रथम एका स्त्रीने निर्माण केलं होतं, ही गोष्टसुद्धा आपल्यापैकी बऱ्याच लोकांना माहीत नसते. भारतामध्ये पुराणात स्त्रिया संख्येने कमी आढळतात, हे जरी खरं असलं, तरी त्यांच्या अंगची शक्ती, क्षमता, ऊर्जा आणि गूढता यांचं जुन्या ग्रंथांमध्ये पानोपानी वर्णन केलेलं आढळतं. त्यांनी राक्षसांचं निर्दालन करून आपल्या भक्तांचं रक्षण केल्याच्या कथा तर अगणित आहेत. 'कल्पवृक्षाची कन्या' या कथासंग्रहामध्ये पार्वतीपासून ते अशोकसुंदरीपर्यंत आणि भामतीपासून मंदोदरीपर्यंत अनेक निर्भय आणि मनमोहक स्त्रिया आपल्या भेटीला येतात. या स्त्रियांनी आपले पती असणाऱ्या देवांच्या रक्षणासाठी राक्षसांशी युद्धं केली, त्यांचं निर्दालन केलं. या स्त्रिया त्यांच्या कुटुंबाचा आधारस्तंभ तर होत्याच; पण त्या स्वतःच्या नशिबाच्या शिल्पकारही होत्या. सुधा मूर्ती यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून काळाच्या पडद्याआड गेलेल्या या स्त्रियांना परत जिवंत केलं आहे. त्या स्त्रियांविषयी या पुस्तकातून जाणून घेताना आपल्याला आपल्या स्वत:च्या आयुष्यावर सखोल परिणाम घडवून गेलेल्या काही स्त्रियांची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही, हे नक्की.

या पुस्तकाविषयी बोलताना सुधा मूर्ती म्हणतात, ''पुराणातील स्त्रियांविषयी एक पुस्तक लिहिण्याच्या विचाराने मी संशोधन सुरू केलं खरं; पण पदरी निराशाच आली. या स्त्रियांच्या कार्याविषयी, त्यांनी निभावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकांविषयी वर्णन करून सांगणारं फारसं साहित्यच अस्तित्वात नाही. पुराणकालीन स्त्रियांपैकी सर्वांत लोकप्रिय स्त्रिया म्हणजे महाभारतातील द्रौपदी आणि रामायणातील सीता. तसंच आणखी एक देवी म्हणजे पार्वती. सर्व कलांमध्ये निपुण असणारी, असुरांचा नि:पात करून आपल्या भक्तांचं रक्षण करणारी. खरंतर आपल्या देशात वाहणाऱ्या सर्व नद्यांना आपण देवीची रूपं मानतो. तरीसुद्धा या काळातील पुरुषांच्या पराक्रमाच्या कथाच जास्त प्रचलित आहेत. त्यामानाने स्त्रियांच्या धैर्याच्या आणि शौर्याच्या, साहसाच्या कथा फार प्रचलित नाहीत. मी लहानपणापासून ज्या गोष्टी ऐकत लहानाची मोठी झाले, त्यांच्यातील काही गोष्टींचं, तसंच गेल्या कित्येक वर्षांपासून मी ज्या गोष्टी वाचत आले, त्यांचं इथे पुनर्कथन करून त्याद्वारे या पुस्तकातून मी काही प्रभावशाली स्त्रियांचं आयुष्य उजेडात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.''

**५) दोन शिंगे असलेला ऋषी :** एका लहानशा कबुतराला दिलेलं वचन पाळण्यासाठी ज्या राजाने तलवारीने आपल्या शरीराचं मांस कापून देण्यास पुढे-मागे पाहिलं नाही, अशा राजाविषयी आपण कुणी कधी ऐकलेलं नाही. असं एक सिंहासन, जे त्याच्यावर बसणाऱ्या प्रत्येक शासनकर्त्याला उत्कृष्ट न्यायनिवाडा करण्याची क्षमता प्रदान करतं, अशा सिंहासनाविषयी तरी आपण कधी ऐकलं आहे का? असा एक शिल्पकार, ज्याला दोन्ही हात नसतानासुद्धा त्याने उत्कृष्ट कलाकृतींची निर्मिती केली, अशा शिल्पकाराविषयी- सुद्धा आपण कधीच ऐकलेलं नाही. देवादिकांचे आपापसातले भांडणतंटे असोत, नाहीतर महान ऋषी-महर्षींच्या हातून घडलेले प्रमाद असोत, लोककल्याणकारी राजे असोत, नाहीतर सामान्यांतील सामान्य माणसांच्या अंगांतील सद्‌गुण असोत... सुधा मूर्तींनी भारतीय पुराणातल्या या तुम्हाआम्हाला फारशा परिचित नसलेल्या कथा 'दोन शिंगे असलेला ऋषी' या पुस्तकाद्वारे आपल्यासमोर ठेवल्या आहेत.

या पुस्तकाविषयी सुधा मूर्ती म्हणातात, ''ही पाच पुस्तकांची मालिका लिहिण्यास सुरुवात करण्याआधी मी भारतातील विविध राज्यांमध्ये आणि विविध भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या रामायण-महाभारत आणि भागवत या ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. वरकरणी त्या सर्वांमध्ये बराच फरक असला तरी त्या सर्वांमधला धागा मात्र समान आहे. पुराणांतील सर्व कथांमध्ये ज्या व्यक्तिरेखा येतात, त्यापैकी मध्यवर्ती व्यक्तिरेखांबरोबर ज्या उपव्यक्तिरेखा येतात, त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात घडलेल्या काही कथांचाही समावेश या पुस्तकांमध्ये आहे. त्या कथांमधून त्या व्यक्तिरेखांचा जीवनविषयक दृष्टिकोन आपल्याला कळतो. या पाचही पुस्तकांमध्ये रामायण- महाभारत आणि पुराण यांमधील विविध प्रकारच्या कथांचा समावेश आहे. तरीसुद्धा अशा आणखी कितीतरी कथा आहेत, ज्यांचा समावेश मला या पुस्तकांमध्ये करता आला नाही.''

या कथा प्रकाशात आणण्याच्या प्रयत्नात, सुधा मूर्तींनी या विषयावर प्रथम खूप संशोधन केलं आणि त्यांतील व्यक्तींच्या जीवनातून स्वत: प्रेरणा घेतली. सुधा मूर्तींच्या संग्रहातील रामायण आणि महाभारताच्या कथा अनेक कारणांमुळे मुलांच्या मनावर खोलवर परिणाम करतात. एकतर त्यांची भाषा गोष्टीवेल्हाळ आणि आकर्षक आहे, ज्यामुळे मुलांना कथांमधील पात्रं आणि घटनांविषयी उत्सुकता वाटते; त्यामुळे त्या कथा लक्षवेधी ठरतात आणि मुलांना वाचनाची गोडी लागते.

दुसरं म्हणजे, सुधा मूर्ती अनेकदा या महाकाव्यांमधून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रूपात प्रकट होणाऱ्या नैतिक मूल्यांवर भर देतात. या कथांद्वारे, त्या प्रामाणिकपणा, शौर्य, करुणा आणि ज्येष्ठांचा आदर करणे यासारखे महत्त्वपूर्ण धडे देतात. ही मूल्यं योग्य वयात जर लहान मुलांच्या मनावर बिंबवण्यात आली, तर त्यांना पुढील आयुष्यात योग्य काय आणि अयोग्य काय, चांगलं काय आणि वाईट काय यांतला फरक आपोआपच समजू लागतो.

याव्यतिरिक्त, सुधा मूर्ती यांच्या कथांमध्ये 'रामायण' व 'महाभारत' या महाकाव्यांमधील पात्रांना अनेकदा गुंतागुंतीच्या परिस्थितींना सामोरं जावं लागतं, त्यांच्या समोरील अनेक विकल्पांतून त्यांना सारासार विचार करून योग्य निवड करावी लागते. ती करत असताना अनेकदा त्यांची द्विधा मन:स्थिती होते. नेमकी काय निवड केली असता त्याचे काय परिणाम होऊ शकतात, हे मुलांना त्यातून आपसूक समजू लागतं आणि ती मुलं पुढील आयुष्यात गंभीरपणे विचार करण्यास आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सज्ज होतात.

शिवाय, सुधा मूर्तींच्या या कथा मुलांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख करून देतात. या कथांद्वारे मुलांना पिढ्यान् पिढ्या आलेल्या परंपरा, चालीरीती आणि श्रद्धांची ओळख होते. पुस्तकांमधून घडणाऱ्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक पैलूंच्या या दर्शनामुळे त्यांचा दृष्टिकोन व्यापक होण्यास मदत होते. आपल्याला किती मोठा समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे, याची त्यांना जाणीव होते. एकूणच, सुधा मूर्ती यांच्या मिथककथा मुलांच्या मनात जीवनमूल्यं रुजवून, त्यांच्यातील समीक्षात्मक वृत्तीला चालना देतात; त्याचप्रमाणे त्यांच्या सांस्कृतिक जाणिवा प्रगल्भ करतात.

◆◆◆



मुलगा हवा या अट्टहासापायी एखादी उधळते जीवन... तर अजाणतेपणाने लावून दिलेल्या लग्नाने एखादीची होते होरपळ... तर भावंडांच्या शिक्षणासाठी एखादी स्वत:च्या जीवनाचा करते यज्ञ... वास्तवतेचं परिमाण लाभलेल्या आणि हेलावून टाकणाऱ्या कथांचा संग्रह

उद्ध्वस्त


लक्ष्मण माने

किंमत : ₹ ४६०







₹ ४९५




₹ ५४५




₹ ५५०




₹ ६००


मिथक कथा, इतिहास आणि
समकालीन वास्तवाला
समांतर कथात्म बांधणीत
अलवार गुंफणाऱ्या दमदार कादंबऱ्या...




# अश्विन सांघी
## यांचे साहित्य





₹ ६५०




₹ ५५०




₹ ५९९



मिथके हा लोकजीवनामधून जन्मलेला एक साहित्यप्रकारच म्हणावा लागेल. जेव्हा भाषा लिखित स्वरूपात विकसित झाली नव्हती, तेव्हा ती म्हणी आणि वाक्प्रचारांच्या मार्गानं विकसित होत गेली आणि कथा-कविता-लोककथा आणि लोकगीतांच्या मार्गानं व्यक्त होत राहिल्या. जसं भाषेचं सत्त्व, म्हणी आणि वाक्प्रचारांमध्ये संकलित झालं, तसंच समाजाचं शहाणपण आणि संवेदनशीलता मिथकांमधून संकलित होत गेली. या कथा-कविता ऐकत-ऐकवत विकसित होत राहिल्या. जगातल्या सर्व महान महाकाव्यांचं मूळ अशाच काही लोककथांमध्ये आहे, असं मानणारा विद्वानांचा एक मोठा वर्ग आहे. या कथा त्या-त्या समाजाच्या अंत:सत्त्वाविषयी भरभरून बोलतात, कधी त्या काळातलं तिथलं समाजजीवन दर्शवतात. कधी आजच्या जीवनाशी असलेली भूतकाळाची नाळ शोधून दाखवतात.

मिथकं कधीच लोप पावत नाहीत, हेही एक त्यांचं वैशिष्ट्य आहे. या तोंडून त्या तोंडी जाताना त्यावर अनेक पुटं चढत जातात आणि एक काळ असा येतो की,आधुनिक काळाशी जोडून घेताना हे पापुद्रे ओरबाडून काढले जातात आणि त्यातून आणखी एक मिथक तयार होतं.

मिथकांचे स्थूलमानानं तीन प्रकार मानले जातात-१. लोकजीवन दर्शवणारी, २. इतिहासावर आधारलेली ३. पुराणग्रंथांवर आधारलेली. अगदी अलीकडच्या काळापर्यंत ही मिथके लोकांच्या तोंडून पुढच्या पिढीपर्यंत जात असल्यामुळे सतत वाढत असतात. एका काळचं वास्तव कालांतरानं छोटी मिथक-कथा बनते. त्यावर अनेक प्रज्ञावंतांच्या आणि जनसामान्यांच्या प्रतिभेचे थर चढतात आणि त्यांतून अतिशय व्यामिश्र आणि अद्‌भुत  मिथक बनतं. या मिथकांना इतके कंगोरे असतात की, त्यामुळे छोटीशी कथाही संकीर्ण बनते. अशा संकीर्ण कथांचा वास्तवाशी संबंध जोडून घेण्याचा मोह भल्या-भल्या लेखकांनाही पडतो आणि त्यातून अनेकदा अतिशय आशयघन असं आधुनिक साहित्य निर्माण होतं. 'भारता'पासून टप्प्याटप्प्यानं बनलेलं 'महाभारत' हे त्याचं उत्तम उदाहरण म्हणता येईल.

आठ ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणाऱ्या कन्नड भाषेनं आपलं हे मिथकाचं धन उत्तम रीतीनं सांभाळलं आहे असं दिसतं.



# मिथके आणि कन्नड साहित्य

उमा वि. कुलकर्णी

आजही कन्नडमधील आधुनिक म्हणवले जाणारे लेखक मिथकांची कास धरताना दिसतात. तसेच बी.जयश्रीसारखी एखादी नाट्य-दिग्दर्शिका मिथकांमधली कथा आणि जानपद गाणी घेऊन आपली नाट्यसृष्टी समृद्ध बनवताना दिसते. दक्षिण कन्नड जिल्ह्यातील भुताराधनेवर आधारित 'कांतारा' सारखा चित्रपट बनवून कन्नड सिनेमाही आपला मिथकावरचा विश्वास दाखवून देतो.

तशी कन्नड साहित्याला मिथकांचा वापर करायची दीर्घ परंपराही आहे. अगदी सुरुवातीच्या काळात (हळेगन्नड) जैन मंडळींनी कन्नडमध्ये रचना करायला सुरुवात केली, तेव्हाच त्यांनी सनातन परंपरा नाकारत पौराणिक कथांमधील इतर कमी महत्त्वाच्या पात्रांना महत्त्व देऊन वेगळ्या प्रकारे मांडणी करायला प्रारंभ केला आणि साहित्य-परंपरेनं त्याला मान्यता दिली. त्यामुळे पारंपरिक साहित्यात ज्यांना खलनायक म्हणून चित्रित केलं, त्यांना, उदा. दुर्योधन, कर्ण, रावण यांना  नायक करायचे प्रकार तेव्हापासून केले गेले.

कर्नाटकाची लोककलांची परंपरा अतिशय सशक्त आहे. तिथल्या जवळ-जवळ सगळ्या विद्यापीठांमध्ये त्या परंपरांची पाठराखण केलेली आहे. आपापल्या प्रदेशातल्या लोककथा आणि लोकगीतं एकत्र करून ठेवायची कामगिरी तिथे अजूनही केली जाते. विशिष्ट प्रदेशातील लोककथांचे संग्रह तिथे सतत प्रकाशित केले जातात. लोकगीतं आणि लोकनाट्ये ध्वनिमुद्रित करून ठेवतात.

इंग्लिश साहित्याची कास सोडून आधुनिक कन्नड भाषेत निर्माण होणाऱ्या साहित्यानंही या मिथकांकडे कुतूहलानं पाहिलं आहे. गेल्या शतकाच्या सुरुवातीला टी.पी.कैलासम् नावाचे एक नाटककार होऊन गेले. त्यांनी 'महाभारता'तल्या कर्ण आणि एकलव्य यांना मध्यवर्ती ठेवून नाट्यरचना केल्या. सुमारे २५-३० वर्षांपूर्वी हैदराबादच्या 'पंचधारा' या त्रैमासिकाचा एक संपूर्ण अंक 'कैलासम्' यांच्यावर केला होता. त्यात त्यांच्या इतर सर्व नाटकांचा परिचय होता. आधुनिक पाश्चात्त्य साहित्याचा परिचय असणाऱ्या या नाटककारानं पुराणातील विषय 'अस्तित्ववादी' पद्धतीनं मांडले. कर्ण आणि एकलव्यासारखी पात्रे संपूर्ण पुराणकथेच्या पार्श्वभूमीवर न पाहता त्यांनी त्यांच्या वैयक्तिक पातळीवर ठेवून, त्यांच्या वैयक्तिक सुख-दु:खांना आजच्या समाजकारणाशी जोडून नाटकाची मांडणी केली. याच काळाच्या आगेमागे आलेल्या आणखी एका सुप्रसिद्ध नाटककाराचं नाव श्रीरंग. त्यांना आद्यरंगाचार्य म्हणूनही ओळखलं जाई. त्यांनीही आपले सामाजिक विचार मांडण्यासाठी काही प्रयोग केले. 'स्वर्गाला तीन दरवाजे' अशा

अर्थाचं एक नाटक मला पाहिल्याचं आठवतं. यात तीन अंकांत पुराणकाळ, इतिहासकाळ आणि वर्तमानकाळात घडणारे काही प्रसंग मांडले होते. तिन्ही अंकांत एक झाड आणि त्याखाली बसलेला भिकारी कायम होते. तो भिकारी समोरच्या दृश्यावर भाष्य करतो. समाजातली पुरोहितशाही, राजेशाही आणि राजकारणीशाही यांच्या वर्चस्वामुळे दबला जाणारा सामान्य माणूस हा त्या नाटकाचा विषय होता.

अगदी अलीकडे सगळ्यांना सुपरिचित नाव म्हणजे गिरीश कार्नाड. त्यांचा जन्म आणि शिक्षण उच्चभ्रू समाजात झालं, पुढील शिक्षणही परदेशात झालं; पण बालपणाचा काही काळ 'शिरशी'सारख्या डोंगर-दऱ्यांतल्या छोट्या गावात गेला. तिथे घडलेल्या मिथक-नाट्याचा प्रभाव त्यांनी आयुष्यभर बाळगला. त्यांनी मिथकांची ताकद जितकी जोखली होती, तितकी इतर कुठल्याही भारतीय लेखकानं जोखली असेल, याविषयी शंका आहे. परदेशात वास्तव्य आणि इंग्रजीचा प्रभाव असतानाही त्यांनी आपली नाटकं आपल्या मातृभाषेत, म्हणजे कन्नडमध्ये लिहिली. डाव्या विचारसरणीचा त्यांच्यावर पुरेपूर प्रभाव असला तरी त्यांचे नाटकाचे विषय लोककथा, पुराणकथा आणि इतिहासातून आलेले आहेत. 'नागमंडल', 'हयवदन' ही नाटकं लोककथांवर आधारलेली आहेत; 'ययाति', 'अग्नि' आणि 'पाऊस' हे पुराणकथेवरचं आहे, आणि 'तुघलक', 'तलेदंड', 'टिपूचं स्वप्न' ही नाटकं इतिहासावर बेतलेली आहेत. पारंपरिक मूल्यांचं खंडन करण्यासाठी पुरोगामी कार्नाडांनी इथल्याच परंपरेचा आधार घेतला आहे. चंद्रशेखर कंबार यांनीही आपली नाटकं मिथकांमधून कथाविषय निवडून लिहिली आहेत. 'जोकुमारस्वामी,' 'श्रीचाफा' ही त्यातली काही नाटकं. 'जोकुमारस्वामी'च्या निर्मितीमागे 'कसेल त्याची जमीन' ही तत्कालीन घोषणा होती, असं समीक्षक म्हणतात. ही घोषणा प्रभावीपणे पुढे आणण्यासाठी लेखकानं शंकराच्या या पुत्राविषयी दक्षिण भारतात सांगितल्या जाणाऱ्या एका ग्रामीण पूजाविधीचा आधार घेऊन तिचा इतर कथानकाशी संबंध जोडला आहे.

इंग्लिशमध्ये दमदार लेखन करणारे ए.के.रामानुजन् हे या दोघांनाही आदराच्या स्थानी होते आणि त्यांचा कन्नडच नव्हे, भारतीय लोकसाहित्याचा मोठा अभ्यास होता. त्यांनी या दोघांनाही एक लोककथा सांगितली. कार्नाडांनी त्यावर 'नागमंडल' लिहिलं आणि कंबारांनी 'श्रीचाफा'. एकाच लोककथेवर दोन ज्ञानपीठ पुरस्कारविजेत्या प्रतिभावान लेखकांनी आपापल्या पद्धतीनं कशी निर्मिती केली आहे. एका मिथकानं दोन आधुनिक लेखकांच्या प्रतिभेला डिवचलं आहे. त्यातून दोन उत्तम नाटकं कशी जन्मली आहेत, ते अभ्यासण्यासारखं आहे. त्याचबरोबर लोककथेचं सामर्थ्यही जाणून घेता येतं.

खंडकाव्य किंवा कवितांच्या क्षेत्रातही मिथकांचा वापर केलेला आहे. त्यातील दोन महाकाव्यांना तर आंतरभारतीय पातळीवरील पुरस्कारही मिळाले आहेत. के.व्ही.पुट्टप्पा यांना त्यांच्या 'रामायणदर्शनम्' साठी कन्नडमधील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. तसेच वीरप्पा मोईली यांना त्यांच्या 'रामायण महान्वेषणम्' या काव्यासाठी 'सरस्वती सन्मान' मिळाला आहे. या दोन्ही ग्रंथांमध्ये 'रामायणा'च्या कथेचा आधुनिक दृष्टीने अन्वयार्थ लावण्यात आला आहे.

कथात्म साहित्यातही कन्नड लेखकांनी बरंच लेखन केलं आहे. इतिहासकाळातील कथेवरील एक गाजलेली कादंबरी म्हणजे के.व्ही.अय्यर यांची 'शांतला' ही कादंबरी. होयसळसम्राट विष्णुवर्धन आणि त्याची पत्नी शांतला यांच्यावरची ही कथा आहे. राजा विष्णुभक्त वैष्णव आणि राणी जैन असून दोघंही आपापल्या धर्माचं पालन करतात, असं कथानक यात मांडलं आहे. हळेबिडु-बेलूर येथील नृत्यांगनांच्या मूर्ती शांतलेच्या आहेत, असं मानलं जातं. त्यावरच ही कादंबरी आधारित असून, देशासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या 'गरुड' या केसरियाच्या जवळ जाणाऱ्या प्रथेचाही यात वापर केलेला आहे. या दोन्ही संकल्पनांना इतिहासात किती साक्ष मिळते, या- पेक्षा समाजात काय कथा सांगितली जाते, याचा आधार घेतलेला आढळतो. या कादंबरीचा मराठी अनुवाद कन्नडचे दुसरे ज्ञानपीठ पुरस्कारविजेते कवी डॉ.द.रा.बेंद्रे यांनी केला आहे.

तिसरे ज्ञानपीठ पुरस्कारविजेते डॉ.शिवराम कारंत हे अत्यंत प्रगत विचाराचे लेखक. त्यांनी 'सरसम्मान समाधी' या त्यांच्या अगदी सुरुवातीच्या काळात लिहिलेल्या कादंबरीत एका रूढप्रथेचा वापर केला आहे. गावालगतच्या एका मास्तीगल्लविषयी (सरसम्मा या महासतीच्या नावानं असलेला कोरीव घडीव दगड) काही श्रद्धा आहेत. त्या पंचक्रोशीत अशी श्रद्धा आहे, की या शिळेचं पूजन केलं तर आपल्या संसारात सुख-शांती मिळते आणि संसार बहरतो; पण लेखकाला या सरसम्माचं भूत किंवा आत्मा भेटतो आणि आपलं जीवन किती क्लेशमय होतं, आणि त्यामुळे आपल्याला आत्महत्या करावी लागली हे ती सांगते. इथे लेखकानं मिथक वापरून त्या परंपरेचं खंडन केलं आहे. तसंच त्यांच्या 'मुकज्जीची स्वप्ने' या ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कादंबरीत मुकज्जीला कारंतांनी एक अशी शक्ती बहाल केली आहे, की एखादी वस्तू हातात घेतल्यावर त्या वस्तूचा संपूर्ण भूतकाळ मुकज्जीला समजतो. या मिथकाचा वापर करून कारंत त्यांच्या मनातली विविध काळातली 'देव' ही संकल्पना अतिशय बुद्धिवादी पद्धतीनं विशद करून सांगतात. इथे मिथकाची ताकद लक्षात येते.

सर्व भारतीय भाषांमध्ये मोठ्या प्रमाणात वाचले जाणारे आजचे मोठे कादंबरीकार डॉ.एस.एल.भैरप्पा हे होत. यांनीही आपल्या साहित्यात सुरुवातीला सांगितलेल्या तीनही प्रकारच्या

मिथकांचा वापर केला आहे. त्यांच्या साहित्य अकादमी पुरस्कारविजेत्या 'दाटू' ('जा ओलांडुनि') या कादंबरीत ते भारतीय जाती-व्यवस्थेतली क्लिष्टता सांगण्यासाठी, 'मारम्माची कथा' सांगतात आणि वर्तमानात त्याच कथेची व्यामिश्रता कशी वाढली आहे, ते सांगतात. गावाबाहेरच्या वस्तीवर ब्राह्मण गेला की, त्याच्यावर शेणाचे गोळे मारले जातात, अशी या भागातली प्रथा आहे; कारण कधीकाळी एका ब्राह्मण मुलीशी एक अंत्यज मुलगा काहीसं फसवून लग्न करतो आणि कालांतरानं तिला आपली 'चूक' लक्षात आल्यावर ती आपल्या झोपडीला आग लावते आणि पती-मुलांसहित जळून मरते. पुढच्या काळात हिची त्या समाजाकडून 'मारम्मा' म्हणून पूजा केली जाते; तसंच पती म्हणून रेडा आणि मुलांचं प्रतीक म्हणून बकऱ्यांचा बळी दिला जातो. या कथेतली संकीर्णता लेखकानं या कादंबरीत ताकदीनं वापरली आहे.

भैरप्पांनी 'सार्थ' या कादंबरीत आठव्या शतकातली अखिल भारतीय पातळीवरच्या इतिहासाची पुनर्निर्मिती केली आहे. तत्कालीन समाज उभा करण्यासाठी त्यांनी अनेक पात्रं उभी केली आहेतच, त्याचबरोबर शंकराचार्य, कुमारील भट, भारतीदेवी यांसारखी ऐतिहासिक पात्रं पुनर्निर्मित केली आहेत. या सर्व पात्रांच्या मदतीनं लेखक आठव्या शतकातल्या भारतातली धार्मिक क्लिष्टता दाखवून देतो.

'आवरण' या अतिशय गाजलेल्या कादंबरीत भैरप्पांनी आजच्या कथानकात एक ऐतिहासिक कादंबरी रचली आहे. या कादंबरीत भैरप्पांनी मुघल काळ, रजपूत वातावरण आणि त्या पार्श्वभूमीवर काशी-विश्वनाथ मंदिराच्या विध्वंसाचं चित्रण केलं आहे. तसंच 'पर्व' आणि 'उत्तरकांड' या कादंबऱ्यांमध्ये 'महाभारत' आणि 'रामायण' या पौराणिक ग्रंथांमध्ये मांडलेल्या कथानकाची पुनर्मांडणी केली आहे. इतिहास असो वा पुराणकथा; या कथांची पुनर्निर्मिती करताना भैरप्पा अतिशय परिश्रम घेतात. मुळातला काहीतरी एक धागा अभ्यासातून पकडून तिला आपल्या प्रतिभेची जोड देतात आणि आपली साहित्यनिर्मिती करतात.

एकंदरीत मिथकांचा आपल्या साहित्यात वापर करताना साहित्यिकांचे वेगवेगळे दृष्टिकोन दिसतात. गिरीश कार्नाड, कारंत हे अत्यंत पुरोगामी विचाराचे लेखक अनेकदा असलेल्या परंपरा खोडून काढण्यासाठी मिथकांचा वापर करतात. कार्नाड आणि भैरप्पांनी लोककथेतलं सामर्थ्य ओळखून जीवनाची क्लिष्टता समजावण्यासाठी मिथकांचा वापर केला आहे.

आणखी एक गोष्ट बऱ्याच साहित्यिकांनी केली आहे. पौराणिक मिथकांवर कालांतरांने अनेक पुटं चढत गेलेली दिसतात. ती पुटं खरवडून काढायचे प्रयत्न भैरप्पांनी आपल्या 'पर्व', 'उत्तरकांड' मध्ये केले आहेत आणि त्यायोगे आणखी एकेक मिथक तयार केलं आहे.

अशा प्रकारे 'मिथक-कथा' कधीच नष्ट होत नाही, तिचं स्वरूप बदलत राहतं, या उक्तीचा अनुभव हे आधुनिक काळातले लेखकही देत राहतात आणि साहित्यक्षेत्र संपन्न करत राहतात.

◆◆◆


लक्ष्मण माने यांनी सुप्रिया सुळे यांना
लिहिलेल्या पत्रांतून उलगडलेलं
यशवंतराव चव्हाण यांचं व्यक्तिमत्त्व

यशवंतराव चव्हाण
आठवणी-आख्यायिका

लक्ष्मण माने
किंमत : ₹ ३९०

ebook available



मी स्वत:ला पौराणिक कथाकार म्हणवतो; पण पौराणिक कथांचा आकृतिबंध लोकांना कळत नसल्याचं मी पाहिलं आहे. जे पुस्तकं वाचतात आणि साहित्यात रस घेतात त्यांना विज्ञान आणि विज्ञानकथांबद्दल माहिती असते. ते विज्ञान वेगळं आणि विज्ञानकथा वेगळी. इतिहास आणि ऐतिहासिक कथा यातील फरक त्यांना कळतो. बाजीराव पेशवे, तानाजी ही ऐतिहासिक पात्रं आहेत; पण जेव्हा बॉलीवूड त्यांच्यावर चित्रपट बनवतं तेव्हा ती एक काल्पनिक कथा बनते, ज्याचा इतिहासाशी काहीही संबंध नाही; पण टीव्हीवर जे दिसतं ते वास्तव आहे असं सर्वसामान्यांना वाटायला लागतं. त्यामुळे हळूहळू बॉलीवूड लोकांना दाखवतं की हेच बाजीराव पेशव्यांचं जीवन होतं आणि हेच तानाजीचं जीवन होतं. ते हेच सत्य मानू लागतात. पडद्यावर जो काही अलाउद्दीन खिलजी दिसतो, तो पद्मावतचा अलाउद्दीन खिलजी म्हणून आपण स्वीकारायला लागतो.

जेव्हा पौराणिक कथांचा विचार केला जातो, तेव्हा पौराणिक कथा आणि पौराणिक कथांवर आधारित कादंबऱ्यांमध्ये फरक करणं अधिक कठीण आहे; कारण इंग्लिशमध्ये 'मिथ' या शब्दाचा अर्थ कल्पना करणे किंवा खोटं बोलणं असा होतो, असं अनेकांना वाटतं. दक्षिणपंथी लोकांना वाटतं, की मायथॉलॉजी हा शब्द मिथ्या या संस्कृत शब्दापासून आला आहे. हे खरं नाही. 'मायथॉलॉजी' हा इंग्रजी शब्द आहे. आणि हा शब्द ग्रीक भाषेतून आला आहे. मिथॉसचा अर्थ आहे आख्यान. आणि लोगोस म्हणजे शास्त्र. तर पौराणिक कथा हे मुळात आख्यानशास्त्र आहे; पण ही जी पौराणिक आख्यानं आहेत, ती कादंबरीपेक्षा खूप वेगळी आहेत.


पौराणिक कथा म्हणजे काही लोकांचं सत्य. जे काही वैज्ञानिक सत्य आहे ते सर्व लोकांसाठी सत्य आहे. वैज्ञानिक सत्याची सुरुवात संशयाने होते आणि ते पुरावे आणि निकषांवर आधारित असते; परंतु श्रद्धेचे सत्य हे भक्तीवर आधारित असते, यात शंका नाही. म्हणून विश्वासाचं सत्य हे काही लोकांचं सत्य आहे आणि आपण त्याला मिथॉस (ग्रीक शब्द) किंवा मिथक म्हणतो. ते कल्पनारम्य कादंबरीपेक्षा वेगळं आहे; कारण काल्पनिक कादंबऱ्या हे कोणाचंच सत्य नाही. बॉलीवूडचे चित्रपट कोणाचंच सत्य नाही. ही लेखकाची कल्पनाशक्ती आहे. हे एका समाजाचं सत्य नाही.

जगात देव आहे, असं काही लोक मानतात. काही लोकांचा देवावर विश्वास नाही. या दोन्ही गोष्टी पुराणात येतात;

# पौराणिक कथा आणि कादंबरीतील फरक

देवदत्त पटनायक





कारण कोणी आस्तिकतेवर विश्वास ठेवतो तर कोणी आत्मवादावर विश्वास ठेवतो. काही लोक म्हणतात, की आम्ही नास्तिक आहोत, आमचा देवावर विश्वास नाही, आमचा विज्ञानावर विश्वास आहे. तर जगात विविध प्रकारच्या समजुती आहेत. आणि श्रद्धेतून निर्माण होणाऱ्या कथांना पुराणकथा म्हणतात. आणि त्या कथांमधून विविध प्रकारच्या समजुती जगात पसरतात. जसं, मध्यपूर्वेतील अरबी आणि पर्शियन देशांत ज्याप्रमाणे एकेश्वरवाद प्रचलित झाला, त्याचप्रमाणे भविष्यसूचक परंपरा रूढझाली, येथून ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम धर्म निर्माण झाला. आणि जगभर पसरला. भारतात बहुदेववाद आहे आणि पुनर्जन्मावर श्रद्धा आहे. त्यामुळे इथून हिंदू, जैन आणि बौद्ध धर्म निर्माण झाले. त्यांच्या अनेक कथा लिहिल्या गेल्या. पुनर्जन्म, कर्म, धर्म, भ्रम आणि मोक्ष याविषयीच्या चर्चा कथांच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतात.


रामायण आणि महाभारत या महाकथा आहेत. पुराण आहे. रामायण आणि महाभारताला इतिहास म्हटलं जातं; पण इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ काही वेगळा आहे. हा इतिहास इतिहास नाही. असा इतिहास अशा कादंबऱ्यांना किंवा त्या महाकाव्यांना म्हटलं गेलं आहे, जिथे लेखक प्रसंगात उपस्थित असतो. म्हणजेच वाल्मीकीजी रामायणात सहभागी होतात, म्हणूनच त्यांची निर्मिती असलेल्या रामायणाला इतिहास म्हणतात. महाभारतात व्यासांची उपस्थिती असते, ती अंबिका आणि अंबालिका यांच्या निमित्ताने, म्हणून महाभारत ही त्यांच्या मुलांची कथा आहे. ते त्यात भाग घेतात, म्हणूनच आपण या महाकाव्याला इतिहास म्हणतो.


पुराणात ऋषिमुनी जेव्हा प्राचीन कथा सांगत असतात, तेव्हा ते या घटनांमध्ये सहभागी झालेले नाहीत, त्यांनी या कथा ऐकल्या आहेत. म्हणूनच आपण त्याला पुराण म्हणतो. हिंदू धर्माच्या कथा. आपण त्यांना दोन भागांत विभागू शकतो. जी कथा युगात म्हणजेच काळामध्ये असते, जसे द्वापार युगात श्रीकृष्णाची कथा असते, त्रेतायुगात रामाची कथा असते आणि कलियुगात कल्कीची कथा असते; पण जेव्हा आपण शिव आणि शक्तीबद्दल बोलतो तेव्हा ती युगात नसते, कालातीत असते. म्हणजे यात वेळेची देवाण-घेवाण होत नाही. या कथांना आपण शाश्वत कथा म्हणू शकतो, ज्या कालबद्ध नसतात, ज्यांचा काळ, स्थळ आणि गुणवत्तेशी संबंध नसतो; परंतु त्या कालातीत असतात. इथे शिवपुराणाची कथा येईल, विष्णुपुराणाची कथा येईल; पण जेव्हा आपण अवतारांबद्दल बोलतो तेव्हा ते युगाशी संबंधित असतात.


आता, कथांची ही जी रचना आहे आणि स्थापत्य आहे, पाश्चात्त्य कथांमध्ये किंवा अरबी आणि पर्शियन कथांमध्ये आढळत नाही. भारतात आपण दिगंबर परंपरा पाहतो आणि पाश्चिमात्य देशांमध्ये आपल्याला पैगंबर परंपरा दिसते. पैगंबर परंपरेत, पैगंबर देवाचा संदेश घेऊन येतात. दिगंबर परंपरेत, जेव्हा आपण देवाबद्दल बोलतो, तेव्हा आपण म्हणतो की तो अंतरात्मा आहे, आत आहे.  हे भारताचं सत्य आहे. हे संपूर्ण जगाच्या बाबतीत खरं नाही.


तर मिथक म्हणजे काही लोकांचं सत्य, ज्याद्वारे आपण जगाला एक अर्थ देतो. माणसाला अर्थ हवा असतो. जीवन कुठे सुरू होतं, कुठे संपतं, त्याचा अर्थ काय होतो, मृत्यूनंतर काय होतं, या प्रश्नांची उत्तरं पाहताच पौराणिक कथांचा जन्म होतो. आणि हे पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे. आपण त्याला कल्पनारम्य म्हणू शकत नाही; कारण ते संस्कृती जोडण्याचं काम करतं.

◆◆◆





काही काही व्यक्तिरेखा ह्या आपल्या बालवयापासून ते आपल्या मृत्यूपर्यंत आपल्याला सोबत करत असतात. अगदी अत: ते इति पर्यंत! आपल्या वयाच्या प्रत्येक टप्प्यावर त्या व्यक्तिरेखा बदलत जातात. आपली आई, लहानपणातली आई ही आपलं विश्व असते. जरा मोठे होतो, तेव्हा ती आपली सवंगडी असते. अजून मोठे होतो तर जीवनाला शिस्त शिकविणारी (लावणारी) गुरू होते, मग मैत्रीण होते आणि सर्वांत शेवटी आपल्या मुलांची आज्जी होते. ह्याच क्रमाने वडीलसुद्धा!

असं एक-एक नातं घेऊ शकतो आपण. काही काही वेळा आपली भावंडं ह्या भूमिका निभावतात. काही वेळा कुणी परकं व्यक्तिमत्त्व...

पण ह्या सर्व व्यक्तिरेखा प्रत्यक्ष असतात. त्यांना आपण बघू शकतो, स्पर्श करू शकतो, संवाद साधू शकतो.

ह्या जीवनाच्या प्रवासात एक व्यक्तिरेखा अशी नक्कीच असते; जी असते; पण तिला आपण बघू शकत नाही, स्पर्श करू शकत नाही, जाणवू शकत नाही, संवाद असतो; पण तो एकतर्फी असतो. त्या व्यक्तिरेखेला कुणी श्री गणपती म्हणतं, कुणी भोलेनाथ, कुणी देवी लक्ष्मी, तर कुणी कृष्ण!

कृष्ण!

जाणीव, सृष्टीचं, जगाचं भान येता-येता ओळख झालेली एक मूर्ती, एक व्यक्तिरेखा, एक सखा. मला आठवतं, असेन पाच-सहा वर्षांची, आई-बापूंनी कृष्णाचा एक चित्रपट दाखवला होता. लहानसा कृष्ण! त्याच्या अंगठ्याचा स्पर्श होतो आणि नदीला आलेला पूर शांत होतो. मग रांगणारा कृष्ण, लोणी खाणारा, मडकी फोडणारा, उखळाला बांधलेला, रंगपंचमी खेळणारा, राधेला सतावणारा, आणि निखळ सर्वस्वाने प्रेम करणारी राधा, आणि तितकंच प्रेम करणारा कृष्ण, कालियामर्दन करणारा... !आणि बासरी वाजवून जीवमात्रांना प्रसन्न करणारा, आनंद देणारा कृष्ण! राधेसाठी बासरी वाजवणारा कृष्ण!





ते वय असं होतं की त्या कृष्णासाठी काहीही करायची तयारी असणारं. मोराचं पीस वहीत जपून ठेवणारं मन!

मग ते मन थोडं मोठं झालं. त्या मनाला कादंबरी मिळाली, 'मृत्युंजय!'

एकदा, दोनदा.. दहादा..!

आणि मग कर्ण झाला ते एक व्यक्तिमत्त्व. त्या काळात मनाला पूर्ण वेढून टाकणारं!

आणि मग अनेक प्रश्न...

का केलं असं कृष्णाने? त्याला माहिती होतं ना, की कर्ण 'राधेय' नाही तर 'कौंतेय' आहे! मग का नाही त्याने कर्णाला ते आधीच सांगितलं? इतका अपमानित होत राहिला कर्ण आणि कृष्ण का गप्प राहिला तेव्हा?

आणि मग गप्पच राहायचं होतं तर शेवटपर्यंत गप्प राहायचं होतं. युद्धाच्या आधी का भेटावं त्याने कर्णाला? का सांगावं त्याच्या जन्माचं रहस्य? अशी कशी आणि असलीकसली ही परीक्षा घेतली त्याने कर्णाची? आणि कर्ण तरी असा कसा? त्याने अगदी नम्रतेने नमस्कार केला कृष्णाला आणि नकार दिला. नाहीच गेला तो आपल्या जन्मदात्रीकडे; फार उशीर झाला होता.

जीव तुटत होता ते वाचताना. जणू अनुभवत होते. जणू त्या क्षणी मी पण तिथे साक्षी होते.

परतून जाणाऱ्या, मान खाली घालून जाणाऱ्या कर्णाला बघत राहिले. वाळूवर उमटत जाणारी त्याची पावलं, त्याच वाळूचे काही कण त्याच्या अश्रूंनी भिजलेले मी बघितले. मी अगदी असाहाय्य होऊन कळवळून कृष्णाकडे बघितलं तर त्याच्या डोळ्यांच्या कडाही ओलावलेल्या दिसल्या आणि कर्णाकडे तो अभिमानाने बघतो आहे, हेही दिसलं.

दुसऱ्याच क्षणी कृष्ण पाठ फिरवून कर्णाच्या दिशेच्या विरुद्ध दिशेने जाऊ लागला. वाटलं, जावं त्याच्या मागे धावत, गाठावं त्याला.. खडसून जाब विचारावा!

'मृत्युंजय' मिटून टाकलं होतं मी त्या पानावर.

वाटलं, हे पाठ फिरवून निघून जाणं, पुन्हा कधीही परतून त्या जागी न जाणं हे कृष्णाचं ब्रीद होतं का?

गोकुळातून असाच बाहेर पडला होता ना! काय झालं असेल त्यावेळी यशोदेला? आणि जन्मल्याजन्मल्या पुत्रत्याग करावा लागलेल्या देवकीला? की ह्या दोघी हे जाणून होत्या, की त्या एक कर्तव्य करण्यासाठी अवतरल्या होत्या. ते कर्तव्य पूर्णत्वाने पार पाडलं दोघींनी आणि त्यांनीसुद्धा कधी कृष्णाला काही विचारल्याचं आठवत नाही मला.

सर्वकाही ठीक झालं, कंसाची हत्या झाली, मग कृष्ण देवकीकडे का नाही गेला? गेला असेल तर कधी? किती काळासाठी? कुठेच तसा उल्लेख कुणी केलेला ऐकिवात नाही. हे माझं अल्प ज्ञान आहे.

पण, जसा देवकीचा उल्लेख वाचनात, ऐकिवात नाही तसाच पुढे पुन्हा कृष्ण गोकुळात गेला आहे हेही ऐकिवात, कुठे वाचनात नाही. गेला होता का? की एकदा पाठ फिरवली की फिरवली.

मग 'राधेय' भेटीला आलं.

# 'अथ' ते 'इति'

स्वाती चांदोरकर



त्यातही तो होताच. पुन्हा त्याला बघू लागले. एका वेगळ्या दृष्टीने! कारण ती दृष्टी आता वेगळ्या लेखकाने दिलेली होती. प्रसंग सगळे तसेच, तेच! पण शब्दांची ठेवण भिन्न; मात्र रणनीती तीच. महाभारत!

कित्येक जण ह्या दोन भावंडांच्या वादात सामील झालेले. काही सकारण काही अकारण! काही नाइलाजाने.

आणि राखणकर्ता कृष्ण !

राधेय भेटीला आलं तेव्हा वय अजून पुढे सरकलं होतं. ते वाचताना मी कुठेही, कुठल्याही प्रसंगाला साक्षी नव्हते. त्यामुळे हुरहूर कमी होती. अस्वस्थता कमी होती. 'राधेय' पेक्षा जास्त आघात करणाऱ्या 'मृत्युंजय'ला कोवळ्या वयात अनेकदा भेटून आल्यामुळे त्याचा ठसा मनावर जास्त खोल उमटला होता.

इथे तेव्हा नाही मी कृष्णाला काही जाब विचारला.

कृष्ण पुढेही भेटत राहिला. हरे कृष्ण मंदिरातून. कधी मीरेच्या भक्तीतून. राधेबरोबर नृत्य करणारा आणि मीरेच्या भक्तीला सामावून घेणारा.

मग भेटला तो 'महाभारत' मालिकेतून. भव्य कृष्ण! त्याची गीता, त्याची रणनीती! त्याचं मार्दव, आणि त्याचं कठोर होणं.

कृष्णाला व्यक्तिरूपात सादर केलं गेलं! आणि शब्दांपेक्षा दृश्यं मनावर ------ जास्त उमटतात. त्यात कुटिल नीती भरभरून होती, आणि कर्ण म्हणजे तर...!

स्त्री ही युद्धाला कारक का ठरावी? मग ते महाभारत असो की रामायण!

'गीता' किती समजली माहिती नाही; पण कृष्ण मनात पुन्हा खुसखुसू लागला.

**कृष्णकिनारा!!**

प्रेमातच पडले ह्या पुस्तकाच्या. माझ्या मनात जे-जे प्रश्न निर्माण होत होते, ते प्रत्यक्ष राधा, कृष्णाला विचारत होती. इथे पुन्हा मी साक्षी झाले.

वयस्कर राधा आणि वयस्कर कृष्ण! यमुनेच्या तीरी. चांदण्यात वाळूवर पावलांचे ठसे उमटवत!!

अनेक प्रश्न आणि कृष्ण नाही देऊ शकत आहे उत्तरं. का नाही आलास पुन्हा गोकुळात? तुला कधीच यशोदेची आठवण आली नाही? का वाट बघितलीस द्रौपदीने हाका मारेपर्यंत? आधीच कसा नाही धावलास? की तुझा अहंकार तुला तसं करू देत नव्हता? का नाही युद्ध थांबवलंस कृष्णा?

आणि मीसुद्धा बरोबर चालत राहिले त्या तीरावर, चांदण्यात. उत्तरांची अपेक्षा करत.

राधा रिकाम्या पदरानेच परतली. तिच्या पदरात कृष्ण, उत्तरांचं दान नाही टाकू शकला.

ती निघून गेली; तशी मी पण परतले.

द्रौपदीकडे पोचले, कुंतीकडे पोचले आणि मग रुक्मिणीकडेसुद्धा गेले.

कृष्णाच्या आयुष्यातल्या या चार महत्त्वाच्या स्त्रिया!

कृष्णाने या सर्वांसाठी सर्वकाही करूनही अतृप्त राहिलेल्या.

अश्वत्थामाच फक्त भळभळणारं रक्त घेऊन फिरत नाहीये, तर ह्या चौघींच्या प्रश्नांना भाळी घेऊन कृष्णही तसाच फिरत आहे.

त्याला किनारा मिळाला आहे का?

त्याला त्या किनाऱ्यावर एकटाच सोडून दिला आहे.

मी पण!

आणि तरीही त्याची 'गीता' आज प्रत्येकजण उराशी घेऊन आहे. त्यातल्या एखाद्या तरी श्लोकाचा उल्लेख केला जात आहे. शपथा घेतल्या जात आहेत.

म्हणजे हा कृष्ण काही वेगळाच आहे; जो माझ्या परिचयाचा नाही.

**पर्व-**

अतिशय रोखठोक. इतकं की कधी युद्धभूमीवर दिवस सरल्यावर काय काय होतं, हे कुठेही कधीही वाचनात न आलेलं इथे वाचनात आलं. त्यातली दाहकता शब्दांतून जाणवत होती, मग प्रत्यक्षात तिथे किती दाह झाला असेल! मानसिक, शारीरिक, वैचारिक!

अनेकांना प्रश्न की, का लढतो आहोत आपण?

आणि कृष्ण? सर्वांना उभारी देणं, सांत्वन करणं, आणि स्वतः शांत राहणं!

पर्व! माझ्या जीवनाचं तिसरं पर्व सुरू झाल्यावर हातात आलं. ह्या वयापर्यंत आपण केव्हा साक्षी व्हायचं आणि केव्हा तटस्थ व्हायचं, हे समजून चुकलं होतं. आता अस्वस्थता नाही, जे घडून गेलं आहे त्यावर भाष्य करावं, अथवा चर्चा करावी, ऊहापोह करावा, असं काही उरलं नाही.

हो, हे घडून गेलं आहे.

कृष्ण गोकुळातून बाहेर पडला आहे, तो पुन्हा तिथे न जाण्यासाठी.

सांदीपनींच्या आश्रमात राहिला आहे, विद्यार्जन केलं आहे. तिथूनही बाहेर पडला आहे, ते पुन्हा तिथे न जाण्यासाठी.

यादवांचं राज्य प्रस्थापित केलं आहे, आणि त्यांचा मृत्यूही आधीच माहिती असलेला तो, ते टाळू न शकणारा, त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी.

'गीता' सांगण्यासाठी. धर्म-अधर्म समजवण्यासाठी.

हातांतली बासरी कधीच गळून गेलेली आहे. त्यातून पुन्हा स्वर न उमटवण्यासाठी

आणि एका पारध्याकडून स्वत:च्या अंगठ्यात बाण घुसवून घेण्यासाठी. इहलोकाचा निरोप घेण्यासाठी!

कृष्ण!

**कृष्णायन-**

आता आहेत काही शेवटच्या घटका! अंगठ्यात रुतलेला बाण काढू देत नाहीये तो.

वाट बघतो आहे. सगळे फार दूरवर राहिले आहेत. कधी समजणार त्यांना की तो एका वृक्षाखाली घायाळ होऊन बसला आहे. जिवाला थांबवून. येणार आहेत भेटायला...

रुक्मिणी, द्रौपदी, अर्जुन, राधा?

इथे आहे मी साक्षीला... पुन्हा एकदा, शेवटचं.

प्रभासक्षेत्र !

आणि इथे मी त्याच्याच बरोबरीने बघत आहे द्वारकेतला त्याचा महाल, रुक्मिणीचं हरण, सत्यभामेची लाडिक गोडी, तिचा रुसवा, राधेचं लटकं रागावणं, यशोदेने उखळाला बांधून ठेवणं, अनेक रंगांनी गोपिकांना रंगवून टाकणं, सुदाम्याचं प्रेम, द्वारकेतून सुवर्ण रथातून बाहेर पडणारे आनंदी यादवगण, ज्यांना ठाऊकही नव्हतं की, ते त्यांच्या मृत्यूच्या वाटेवर जात आहेत, दुखऱ्या नजरेने बघणारा कर्ण, त्या नजरेत एकच प्रश्न, कृष्णा, आत्ताच का? यशोदामातेचा हंबरडा, कुरुक्षेत्र आणि अंगठ्यातून उठणाऱ्या वेदना, समोर जरा पारधी भयाने गोठलेला. अश्रूंचा महापूर!

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मण:।

शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मण: !!

आणि मग त्याने घेतलेला अखेरचा निरोप!!

मी त्याला तिथेच सोडून आले, पुस्तक बंद करून.

आता मला कृष्णाबद्दल काहीही आठवायचं नाही. बालपणापासून ते आत्ता ह्या वयापर्यंत तो सतत भेटत आला आहे. माझे सर्व प्रश्न आजही तसेच आहेत; पण उत्तरांची अपेक्षा नाही; कारण माझ्या बुद्धीची तितकी झेप नाही.

माझ्या वयाच्या प्रत्येक पडावावर कोणत्या ना कोणत्या लेखकांनी, ह्या पुस्तकांनी कृष्णाला माझ्यावर लादलं आहे.

मला एक समजलं आहे की, राधेसारखं प्रेम करायची कुवत नाही आणि मीरेसारखी भक्ती करायची पात्रता नाही.

आज कृष्ण म्हटलं, की त्याचीही अनेक रूपं आहेत हेच मनात आहे. त्याच्या वयाच्या प्रत्येक पडावावर तो भिन्न आहे. कुणाला गोकुळातला कृष्ण आवडतो, तर कुणाला राजनीती करणारा कृष्ण आवडतो, तर कुणाला गीतेतून उपदेश करणारा कृष्ण आवडतो, तर कुणाला मीरेचा कृष्ण आवडतो.

मला कुठला कृष्ण आवडतो?

मला बासरी वाजवणारा कृष्ण आवडतो. त्या सुरांना निर्माण करणारा, बेभान करवणारा कृष्ण आवडतो. भेटला आहे तसा कृष्ण मला. कधी वर्णनांतून, कधी कुणाच्या वादनातून.

माझं सर्वांत आवडतं वाद्य बासरी आहे. अशी बासरी, जिला ठेक्याची साथ नाही. जी आपली आपण एकटीच असते. ह्या बासरीत कुठेही गाठ नाही, तिला जोडकाम नाही, भाव व्यक्त करणारे ओठच तिला बोलकं करू शकतात, आणि हळुवार फुंकर घातली, की तिच्यातून उमटणारे सप्तसूर कुणालाही मोहित करून जातात. एक फुंकर व्यथेला दूर करते तर तीच फुंकर जर स्वरही देऊ लागली तर मग व्यथा व्यर्थ होऊन जाते.

मला बासरी आवडते. मला बासरी वाजवणारा कृष्ण आवडतो. मी त्या कृष्णाची भक्त आहे.

नाही मला समजत गीता, ना मला समजत युद्ध, ना राधेचा विरह, ना मीरेची भक्ती, ना द्रौपदीचं कृष्णा असणं...

मला समजतो तो एकच कृष्ण!

कधीही प्रत्यक्ष न ऐकलेला; पण माझ्या मनात कळत्या वयापासून अव्याहत उमटत राहणारा त्याच्या बासरीचा नाद!! निनादत राहणारा कृष्ण!

काही काही व्यक्तिरेखा बालपणापासून ते आपल्या मृत्यूपर्यंत आपल्याला सोबत देत असतात. अगदी अत: ते इति ...!!

◆◆◆


चिंतन आणि भावनांची साधलीय छानशी लय...
जीवनाचे विविध रंग शोषते 'ब्लॉटिंग पेपर'

ब्लॉटिंग पेपर




स्वाती चांदोरकर
किंमत : ₹ ३३०

ebook available



# धर्म आणि लोकसाहित्य

डॉ. मुकुंद कुळे

धर्म ही एकूणच मानवी अस्तित्वाला व्यापून राहिलेली, पण अदृष्ट अशी गोष्ट आहे. विशिष्ट वस्तूने किंवा विशिष्ट कृतीने धर्माला कधी निर्देशांकित करता येत नाही; मात्र प्रत्यक्ष जगताना आचार-विचार, नीतिनियम, नैतिक-अनैतिक, श्रद्धा-परंपरा, संस्कृती-विकृती अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर धर्म अनुभवता येतो. किंबहुना, धर्माचरण म्हणून त्याकडे निर्देश तरी केला जातो. अर्थात परंपरेने चालत आलेल्या धर्माचं पालन प्रत्येकजण अशा पद्धतीने व्यक्तिगत पातळीवर करीत असला तरी, जोपर्यंत या सगळ्या कृति-उक्तिरूपांना समूहभावाची-समूहमनाची प्रेरणा मिळत नाही, तोपर्यंत या साऱ्याची धर्म म्हणून प्रतिष्ठापना होत नाही; कारण समूहाच्या पाठबळाशिवाय धर्म शून्य होऊन जातो. आज नवीन ट्रेन्ड म्हणून गुढी पाडव्याला निघणाऱ्या प्रभातफेऱ्या असोत, सण-उत्सवांच्या निमित्ताने एकत्र येऊन रस्त्यावर काढल्या जाणाऱ्या मोठमोठ्या संस्कार-भारती रांगोळ्या असोत, किंवा अगदी दिवाळीतल्या प्रात:कालीन मैफिली असोत, या साऱ्या क्रिया म्हणजे धर्माला दिलेलं सामूहिक-सामाजिक पाठबळच आहे; कारण त्याशिवाय धर्म उभाच राहू शकत नाही. वैयक्तिक आयुष्यात प्रत्येकजण कितीही धर्माचं पालन-आचरण करत असला, तरी त्याच्या जगण्याला अर्थवत्ता प्राप्त होते, ती तो समूहात सामील झाल्यावरच. इथे दिवंगत विदुषी दुर्गा भागवत यांचं एक मत विचारात घेण्यासारखं आहे. त्या म्हणतात, की-धर्माचे मूलस्रोत दोन प्रकारचे असतात. पहिला उगम, म्हणजे आकलन होण्याची आवश्यकता. जे काही आहे, ते समजून घेण्याची इच्छा व प्रेरणा. दुसरा उगम म्हणजे धर्माचं सामाजिक स्वरूप. धर्मात सामाजिकता अभिप्रेतच असते. धर्मभावनेच्या बुडाशी सामाजिकता असतेच असते. समाजाभिमुखता, समाजप्रवणता हा धर्माचा प्रधान गुण आहे. (धर्म, 'धर्म आणि लोकसाहित्य', दुर्गा भागवत, पृष्ठ-१) यावरून समाज, समूह आणि त्यातून निर्माण होणारी सामाजिकता किंवा सामूहिकता ही धर्माच्या निर्माणासाठी आवश्यक असते, हेच सिद्ध होतं. शेवटी धर्म हा व्यक्ती-व्यक्ती मिळून बनलेल्या समूहाचंच नियमन करत असतो.

म्हणजेच समूह आणि धर्माचा अन्योन्य संबंध आहे. एकमेकांच्या अस्तित्वासाठी आजवर हे दोन्ही घटक एकमेकांना साथ देत आलेले आहेत. म्हणूनच धर्माचा विचार करताना आपल्याला त्याचा सामूहिक-सामाजिक अंगानेच विचार करावा लागेल. शेवटी धर्म ही एक सामाजिक-सांस्कृतिक घटना आहे. तिचा सुटा-सुटा विचार करून चालणार नाही. धर्माचा मागोवा घ्यायचा तर तो समाजशास्त्रीय अंगानेच घ्यावा लागेल. प्रसिद्ध दिवंगत विचारवंत भास्कर लक्ष्मण भोळे तर 'समाजविमर्श' या पुस्तकातील, 'धर्माचे समाजातील बदलते स्वरूप' या लेखात म्हणतात की-'धर्माचा समाजशास्त्रीय विचार न करता जर आपण धर्म, ईश्वर, श्रद्धा, धर्मभावना इत्यादींवर सरसकट हल्ला चढवला, तर त्याचा उफराटा परिणाम होण्याचीच शक्यता अधिक असते. धर्मचिकित्सेसाठी धर्माचे समाजशास्त्रीय आकलन ही पूर्वअट



असते. कारण धार्मिक वर्तन हा माणसाच्या सामाजिक वर्तनाचा एक अविभाज्य भाग असतो, हे मत आता सर्वमान्य झाले आहे. धर्माचा उदय आणि विकास, त्याचे आदिम स्वरूप आणि आविष्कार, कर्मकांडे व तत्त्वज्ञान यांची जडणघडण, नैतिक धारणांशी असलेला त्याचा संबंध, याचा सविस्तर ऊहापोह डरखाइम, मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञांनी केलेला आहे. त्याचा इत्यर्थ असा की, एक सामाजिक घटना, याच दृष्टीनं धर्माचा विचार केला पाहिजे.'

असं असलं तरी आजच्या काळात, किंवा एकूणच कुठल्याही काळात एक सामाजिक घटना म्हणून धर्माचा विचार करताना, हा धर्म म्हणजे नेमका कुठला, वैदिक की अवैदिक, असा प्रश्न निश्चितच निर्माण होतो; कारण आज ज्याचा आपण धर्म म्हणून उल्लेख करतो, तो वैदिक किंवा हिंदू धर्म आहे आणि तो मुख्यतः अभिजनांचा आहे. वैदिक काळातच वैदिक आणि वैदिकेतर असे भेद निर्माण झालेले होते. वैदिकेतरांना त्या काळी मुख्यतः 'लोक' या अभिधानाने सूचित केलं जात होतं. कालांतराने जरी परस्पर सहवास-साहचर्यामुळे वैदिक आणि वैदिकेतर यांच्यातील संस्कृतिविशेषांची सरमिसळ झालेली असली, आणि त्यातूनच एक प्रकारे आजचा वैदिक किंवा हिंदू धर्म उन्नत पावलेला असला, तरी आजही मोठ्या प्रमाणावर या दोन्ही समूहांच्या आपापल्या धर्माचरणामागच्या धारणा आणि प्रेरणा वेगळ्या आहेत, असं मला वाटतं. विशेषत:, आजही आपण जेव्हा 'लोकसाहित्य' असं म्हणतो, तेव्हा विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक जीवनशैली असलेल्या समूहाचं समग्र जीवनच आपल्याला अभिप्रेत असतं. आणि या जीवनाचा शोध घेताना तिथे व्यापक अर्थाने आजचा वैदिक किंवा हिंदूधर्म असला, तरी त्याच्या जगण्याच्या तळाशी सूक्ष्मरूपाने लोकधर्मच असतो; कारण लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या अंतर्गत ज्यांचं जगणं येतं, त्या आदिवासी किंवा अनागर समूहांना आजही आपल्या तथाकथित धर्माची विशेष माहिती नसते. ते आपल्या निसर्गसंवादी लोकधर्माचंच आजही पालन करत असतात. त्यांच्या प्रत्येक कृतीत आजही आदिम काळात त्यांच्या मनात निर्माण झालेल्या भावनांचंच प्रतिबिंब पडलेलं आपल्याला दिसतं. म्हणजेच आज अतिशय उन्नत पावलेला वैदिक धर्म या समूहांचं भावनिक किंवा सांस्कृतिक उन्नयन करू शकलेला नाही. म्हणूनच आज जेव्हा आपण धर्म आणि लोकसाहित्याचा एकत्रित विचार करतो, किंवा त्यांच्या आंतरसंबंधांची तपासणी करतो, तेव्हा लोकसाहित्याची आजच्या तथाकथित धर्माशी सांगड घालण्याऐवजी ती लोकधर्माशी घातली पाहिजे; कारण जगाच्या पाठीवर कुठलाही लोकधर्म हा आदिम प्रेरणांतून निर्माण होत असतो. त्या लोकधर्मातूनच एक प्रकारे नंतरच्या काळात उन्नत धर्माची स्थापना होत असते. दुर्गा भागवत म्हणतात, त्याप्रमाणे समाजाच्या वाटचालीत अतिप्राचीन काळापासून धर्मकल्पनांची बीजे आढळतात. निसर्गाचा अन्वयार्थ लावताना माणसाच्या मनात ज्या श्रद्धांचा व भावनांचा उदय झाला,

त्यांनाच पुढे धर्मकल्पनांचे रूप आलेले दिसते. म्हणजेच आजही लोकसाहित्याचा धर्माशी घनिष्ठ संबंध असला, तरी लोकसाहित्यातील शाब्द व शाब्देतर कृतींतून ज्या धर्माचं दर्शन घडतं, तो धर्म म्हणजे लोकधर्म असतो. तेव्हा लोकसाहित्याचा धर्माशी असलेला संबंध तपासताना, तो लोकधर्माशी असलेला संबंध तपासावा लागतो आणि त्यातून ग्रामीण किंवा आदिवासी बांधवांचं जगणं आजही लोकधर्माला खेटून असल्याचंच दिसतं. यामागच्या कारणांचा शोध घेताना आदिम काळातील मानवाच्या जीवनशैलीचा विचार करावा लागतो; कारण त्यांच्या मनात रुजलेलं लोकधर्माचं बीज आदिम काळातील आहे आणि ते यात्वात्मक स्वरूपाचं आहे.

आदिम अवस्थेतील मानवाला निसर्गातील घटितांचा अर्थ लावता येत नव्हता. बेभान वाहणारा वारा, धुवाधार बरसणारा पाऊस, आग ओकणारा सूर्य... या सगळ्यांमागच्या कार्यकारण भावाचं आकलन त्याला अद्याप व्हायचं होतं. किंबहुना, पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या एकूणच पंचमहाभूतांची जाणीव त्याला व्हायची होती. परिणामी, एकप्रकारे आदिम अवस्थेतील अज्ञानातून त्याच्या मनाने काही दुष्ट आणि सुष्ट शक्तींची कल्पना केली, तसंच त्यांच्या तुष्टीकरणासाठी काही क्रियाबद्ध हालचाली करायला सुरुवात केली. आदिम अवस्थेतील मानवाची ही कृतिबद्धता म्हणजे एकप्रकारे यात्वात्मकता होती. जादू ही 'यातुविद्ये'चीच काहीशी परिणत अवस्था. किंबहुना त्याही पुढे जाऊन असं म्हणता येईल की, नंतरच्या प्रगत काळात धर्म नावाच्या संकल्पनेची जी मांडणी केली गेली, तिची मूळ अवस्था म्हणजे 'यातुविद्या' होय. स. रा. गाडगीळ आपल्या 'लोकायत' या पुस्तकात म्हणतात-'ऊन, पाऊस, अन्न, शिकार यांच्या प्राप्तीसाठी ईश्वराजवळ जाऊन प्रार्थना करण्याची, भक्तीने त्याला प्रसन्न करून घेण्याची कल्पना प्राथमिक अवस्थेतील मानवाला अज्ञातच असते. अद्याप ईश्वर-भक्ती-धर्म या संकल्पनेचा त्याच्या मनास स्पर्शच झालेला नसतो. मंत्रगानाने अगर मंत्रोच्चारयुक्त कर्माने स्वत:च्या ठिकाणचे यात्वात्मक सामर्थ्य वाढविता येते व निसर्गावर सत्ता प्रस्थापित करता येते, अशी त्याची श्रद्धा असते. या यातुविधींमध्ये ईश्वर कल्पनेला मुळीच स्थान नाही. म्हणून आदिम मानवाच्या यातुविधींना किंवा मंत्रतंत्रांना धर्म हे नाव देणे योग्य नाही. मानवी मनाच्या विकासक्रमात धर्म-ईश्वर-भक्ती या कल्पना बऱ्याच नंतर येतात. प्रारंभीच्या काळात सर्व व्यवहार यातुकल्पनेवरच अधिष्ठित झालेला असतो.'

याचा अर्थ मानवाच्या प्राथमिक अवस्थेत त्याचा धर्माशी संबंध नव्हता. तो संबंध नंतरच्या काळात म्हणजे जेव्हा मानव एका जागी स्थिर झाला, वस्ती करून राहू लागला, तेव्हा आला. या अनुषंगानेच मानवी संस्कृतीचे तीन महत्त्वाचे टप्पे मानले जातात. पहिला टप्पा, उपजीविकेसाठी आदिम मानव भटकत असल्याचा, दुसरा टप्पा कृषिसंस्कृतीचा शोध लागून मानव एका जागी स्थिर झाल्याचा, आणि तिसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे आजचा विज्ञानयुगाचा; मात्र मानवी संस्कृतीचा आदिम ते अद्यतन असा प्रवास होत असताना आणि त्यानुसार त्यांची धर्मसंस्था, धर्मव्यवस्था आकाराला येत असताना, काही गोष्टी मात्र सुप्तावस्थेत कायम राहिलेल्या दिसतात. किंवा काही गोष्टी कालौघात बदलल्या, तरी त्यांचं बाह्यरूप बदललेलं दिसतं, आंतररूप तसंच आहे. अगदी उदाहरण देऊन बोलायचं, तर आजही समाजाची साधारणपणे तीन गटांत विभागणी झालेली दिसते-आदिवासी समाज, अनागर किंवा ग्रामीण समाज आणि शहरांत राहणारा नागर समाज. आज शहरांत राहणारा समाज विज्ञानामुळे-आधुनिकतमुळे पुढारलेला असला, तरी तो आज जो धर्म मानतो, तो एकप्रकारे मानवी विकासानुसार उन्नत पावलेला धर्म आहे. याउलट पाड्या-तांड्यावर राहणारा आदिवासी आणि खेड्यापाड्यांत राहणारा ग्रामीण समाज आजही बहुतांशी आपल्या जुन्या धारणा आणि प्रेरणांना चिकटून आहे. त्यांच्या जगण्यावर आधुनिक जगाचा आणि त्याच्या धर्माचा प्रभाव पडत असला, तरी अजूनतरी त्याच्या मनाच्या अंत:स्तरात आदिम प्रेरणा मानणारा, यात्वात्मकता हाच पाया असलेला लोकधर्मच आहे आणि तो त्यांच्या प्रत्येक कृतीत भरून राहिलेला आहे. त्यामुळेच आदिवासी आणि ग्रामीण संस्कृतीतला जीवनव्यवहारच नव्हे; तर कलाव्यवहारही अद्यापि निसर्गसंवादी असतो आणि आहे. निसर्ग आणि निसर्गातील सुष्ट-दुष्ट शक्तीच त्यांच्या जगण्याच्या आणि कलेच्या आजही केंद्रस्थानी राहिलेल्या दिसतात. महाराष्ट्रातल्या विविध आदिवासी व ग्रामीण समूहांच्या जीवनशैलीचा, म्हणजेच आपल्याला अपेक्षित असलेल्या लोकसाहित्याचा मागोवा घेताना ही बाब स्पष्टपणे दृग्गोचर होते. अधोरेखित होते. म्हणजेच लोकसाहित्याचा धर्माशी संबंध आहे; पण तो धर्म, हा लोकधर्म आहे.

विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक जडणघडण आणि जीवन असलेल्या लोकसमूहांच्या मुळाशी आजही यात्वात्मकतेतून उन्नत पावलेला लोकधर्म कसा आहे, ते आदिवासी व ग्रामीण जीवनातील अनेक उदाहरणांतून सिद्ध करता येतं. आपण आता काही उदाहरणं पाहू-

उदाहरण- १. विदर्भातील गोंड-कोरकु-परधान या आदिवासी समाजात आपल्या पाड्या-तांड्यावर कुठलंही अरिष्ट येऊ नये म्हणून गावबांधणीचा विधी केला जातो. या गावबांधणीच्या दिवशी बाहेरच्या पाड्यावरचा माणूस आलेलाही चालत नाही. साधारणपणे दिवस मावळायला सुरुवात झाली की, या विधीला सुरुवात होते. पाड्यावरचे सगळेजण एकत्र जमतात. सगळी पुरुषमंडळी खोड्याळ देवाच्या नावाने जो दगड असतो, त्याच्याजवळ जातात. मग पाड्यावरचा मांत्रिक मंत्र पुटपुटत देवाची मनसणी करतो आणि सोबत आणलेल्या चार चिमण्या कापून त्यांचं रक्त त्या खोड्याळ देवाच्या दगडावर शिंपडतो. त्या रक्ताचा स्पर्श होताच, जमलेल्या पुरुषांपैकी कुणाच्या- तरी अंगात देवाचं वारं शिरतं. मग त्या

पुरुषाला साडी नेसवून त्याच्या चेहऱ्यावर खोड्याळ देवाचा मोठा लाकडी मुखवटा चढवला जातो आणि त्यानंतर मग भगत, म्हणजे मांत्रिक आणि देव यांच्यात गावाच्या भल्यासाठीची प्रश्नोत्तरं सुरू होतात.

विदर्भातील आदिवासींचा हा गावबांधणीचा विधी म्हणजे सरळसरळ यात्वात्मक विधी आहे. आदिमकाळापासून देवतांच्या तुष्टीकरणासाठी लाल आणि काळा रंग वापरला जातो. आदिम अवस्थेत लाल रंगाचं ज्ञान नसल्यामुळे तेव्हा एखादा प्राणी कापून त्याचं रक्तच शिंपडलं जायचं. देवाला दोन पायाचं-चार पायाचं देण्याची प्रथाही त्यातूनच सुरू झालेली आहे. तसंच पुरुषाच्या अंगात देव येऊनही त्याला साडी नेसवली जाते; कारण ऋतुस्रावाच्या काळात स्त्रीच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या लाल-काळ्या स्रावामुळे तिच्या ठायी निसर्गप्रेरक अशी काहीतरी अद्‌भुत शक्ती आहे, अशी आदिम समाजाची भावना होती. त्या प्रेरकशक्तीचं प्रतीक म्हणून खोड्याळ देव अंगात येणाऱ्या पुरुषाला साडी नेसवली जाते.

या आदिवासींच्या खोड्याळ देवाच्या मुखवट्याचीही कथा आहे. या मुखवट्यासाठी जे झाड तोडायचं, ते अमावस्या किंवा पौर्णिमेलाच तोडलं जातं. तसंच जे झाड तोडायचं, त्या झाडाखाली नागाचं वारूळ असणं गरजेचं असतं. यामागेही आदिम यात्वात्मक प्रेरणाच कार्यरत आहे. आदिम प्रेरणेने भूमीला स्त्रीतत्त्व आणि नागाला पुरुषतत्त्व, तसंच चैतन्याचं प्रतीक मानलं आहे. साहजिकच मग हे चैतन्यतत्त्व वारुळातून झाडात आणि झाडातून मुखवट्यात प्रवाहित होतं, अशी गोंड-कोरुकु आदिवासींची धारणा आहे. यातून आदिवासींच्या जगण्यामागे आजही आदिम काळातील प्रेरणा, म्हणजे लोकधर्म कार्यरत आहेत, हेच सिद्ध होतं.

उदाहरण- २. एखाद्या गाव पांढरीत गेला तर, विशेषत:, कोकणातल्या, तर तिथे अनेक गावांत आजही उन्हाळ्यात गावबांधणीसारखाच विधी केला जातो. त्यासाठी अंगात येणाऱ्या बायांची बैठक बोलावली जाते. त्याला ‘मांड’ असं म्हटलं जातं. या देव अंगात येणाऱ्या बायांना वाढणारी, म्हणजे घुमणारी झाडं असं म्हटलं जातं. ज्या दिवशी मांड असेल, त्या दिवशी या महिला उपास धरतात. मांड भरण्याची वेळ झाली की, गावात ढोल-सनई वाजायला सुरुवात होते. ढोल-सनईचे तीव्र सूर कानावर पडले की लगेच या महिलांचं अंग धरतं. अंग धरलं की त्या सामान्य रूपातून असामान्य रूपात प्रवेश करतात आणि असतील त्याच स्थितीत त्या देवळाकडे धावतात; कारण मांड देवळात भरतो. तिथे गावच्या पाटलांनी या वाढणाऱ्या देवांची आसनव्यवस्था केलेली असते. ही आसनव्यवस्था एखाद्या देवाच्या दरबारापेक्षा कमी नसते. त्यांच्यासाठी छान बैठक सजवलेली असते. त्यांच्या पुढ्यात सुवासिक फुलं ठेवलेली असतात. निखाऱ्यांवर धूप दरवळत असतो.

वाढणारे देव आसनस्थ झाले की, मग गावचा पाटील गावच्या अडीअडचणी या देवांसमोर ठेवतो आणि हे देव आपल्या मनानुसार त्यावर तोडगे सांगतात. हे सर्व झाल्यानंतर वाढणाऱ्या देवांची चार गटांत विभागणी केली जाते. मग देवांचे समूह गावाच्या चार दिशांना जाऊन गावाची सीमा बांधून घेतात; जेणे करून कोणतंही अरिष्ट गावावर येऊ नये. तसंच सीमा बांधून घेतल्यावर तिथे नारळ फोडून आणि अबीरगुलाल वाहून सीमेवरच्या सुष्ट-दुष्ट शक्तींना संतुष्ट केलं जातं.

या वाढणाऱ्या झाडांमागचं मनोवैज्ञानिक कारण आता उघडकीस आलेलं असलं आणि अंगात येण्याचे प्रकार कमी झाले असले, तरी ग्रामीण भागांत अजूनही अनेक ठिकाणी असे मांड भरतात; कारण त्यामागे त्या-त्या समाजाने मानलेला पारंपरिक लोकधर्म आहे. मानवाच्या उन्नती अवस्थेत देव-धर्माचा विकास व्हायला हजारो वर्षं जावी लागली. तत्पूर्वी, मानवाने आपल्या सोयीसाठी निसर्गातील सुष्ट-दुष्ट शक्तींशी सामना करण्यासाठी, त्यांच्याशी बोलण्यासाठी आपल्यातूनच


सत्ताकारणाच्या क्रूर चक्रव्यूहाचा
सामूहिक ताकदीनं
सामना करण्याचं तंत्र शिकवणारी
नवीकोरी कादंबरी

झुंड

बाबाराव मुसळे
किंमत : ₹ ५८०

ebook available



काही प्रतिनिधी तयार केले. ही वाढणारी झाडं काय किंवा भगत-मांत्रिक काय, ही त्याचीच रूपं आहेत.

आदिम काळापासून चालत आलेला यात्वात्मक लोकधर्म आजही लोकसाहित्याच्या मुळाशी कसा आहे, याची ही फक्त दोनच उदाहरणं दिली; परंतु लोकधर्म आणि लोकसाहित्याचा अन्योन्य संबंध असलेली असंख्य उदाहरणं देता येतील. किंबहुना, लोकधर्म आणि लोकसाहित्य वेगळं करताच येणार नाही. आजच्या आधुनिक जीवनाचा कितीही प्रभाव पडत असला, तरी नागरीकरणाच्या बाहेर असलेली लोकसंस्कृती ही लोकधर्मीच आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासांतर्गत येणाऱ्या आदिवासी-ग्रामीण जीवनातील लोकरूढी, लोकरीती, लोकपरंपरा आणि कृषिसंस्कृती यांचा शोध घेतला, तर लोकधर्म अद्याप शिरजोर असल्याचंच दिसेल. मग ते कुळाचार म्हणून घातले जाणारे गोंधळ-जागरणासारखे विधी असतील किंवा शेतीला सुरुवात करण्याआधी बाहेरच्याच्या नावाने अर्पण केलेलं कोंबडं असेल. आजच्या आधुनिक युगात या साऱ्या गोष्टी मागासलेल्या वाटतील, मागास विचारांच्या आहेतही; परंतु या गोष्टी पुसून टाकणं सहजसोपं नाही; कारण लोकसाहित्याचं जतन करणाऱ्या मानवी मनात त्या सुप्तावस्थेत हजारो वर्षं ठाण मांडून आहेत. आदिम अवस्थेत निसर्गाच्या आकलनाअभावी तत्कालीन मानवाने आपल्या नैसर्गिक शहाणपणाने काही ठोकताळे बांधले, त्यांचं वहन आजच्या काळापर्यंत होत आलेलं आहे. महत्त्वाचं म्हणजे आजच्या सुशिक्षित माणसाला हे सारं कितीही व्यर्थ वाटलं, काल्पनिक वाटलं, तरी लोकसंस्कृती तसं मानत नाही. तिच्या दृष्टीने ते वास्तवच असतं. इथे प्रसिद्ध दिवंगत विचारवंत-तत्त्वज्ञ मे. पुं. रेगे यांचं एक विधान पाहण्यासारखं आहे. ते म्हणतात- 'मानवी ज्ञान म्हणजे अनुभव आणि कल्पना यांचं मिश्रण असतं; पण ज्ञानात समाविष्ट झालेल्या कल्पना ह्या अनुभवाच्या कसोटीला उतरलेल्या आणि म्हणून मान्यता पावलेल्या असतात. तेव्हा कल्पनाशक्तीला मानवी ज्ञानाच्या आणि व्यवहाराच्या क्षेत्रात अनिवार्य स्थान आहे; पण मानवी जीवनात कल्पनाशक्तीला एवढेच स्थान नाही. कल्पनाशक्ती मानवाला अनुभवाच्या जोखडापासून मुक्त करते. आपल्याला कोणते अनुभव येतील, हे आपल्या हातात नसते. अनुभव आपल्याला लाभतात, ते आपल्यावर येऊन आदळतात. याउलट कल्पना मात्र मानव स्वैरपणे करू शकतो. माणसाची कल्पनाशक्ती हा त्याच्या स्वातंत्र्याचा एक घटक आहे. काल्पनिक जग निर्माण करून माणूस त्यात रमू शकतो; पण हे करताना वास्तव जग आणि काल्पनिक जग ह्यांच्यामधील सीमारेषा आपण आखलेली असते; मात्र माणसाच्या स्वातंत्र्याचा घटक असलेली कल्पनाशक्ती अनेकदा माणसाच्या गुलामीचे कारण बनू शकते. जेव्हा मी मुक्तपणे कल्पना करीत असतो, तेव्हा मी कल्पना करीत आहे, याचे ज्ञान मला असते; पण माणसाने जेव्हा एखादी गोष्ट अतिशय उत्कटपणे गरजेतून त्याने निर्माण केलेली ती कल्पना असते आणि ती त्याच्यापुढे उभी ठाकलेली असते. ती केवळ कल्पना म्हणून त्याच्यापुढे उभी नसते. कल्पना असूनही ते वास्तव आहे, असे तो मानत असतो.' (मेघ:श्याम पुंडिलक रेगे, इहवाद म्हणजे काय असेल, इहवाद आणि सर्वधर्मसमभाव)

म्हणजे आजच लोकसाहित्याच्या अंतर्गत येणारा लोकधर्म हा आदिम काळात मानवाने अनुभव आणि कल्पिताच्या आधारे तयार केलेला आहे; मात्र तो सामूहिक, अबोध मनातून प्रवाहित होत राहिलेला आहे; मात्र एवढ्या वर्षांनंतरही हा लोकधर्म कायम आहे, त्याला काही कारणं आहेत. त्यातलं महत्त्वाचं पहिलं कारण म्हणजे तो निसर्गसंवादी आहे. उदाहरणार्थ, लोकधर्मातील-लोकसंस्कृतीतील सगळे विधी किंवा लोकाचारांचा अभ्यास केला, तर त्यात निसर्गतत्त्वांनाच आवाहन केलेलं दिसून येतं. म्हणजे पावसाने ओढदिली, तर ग्रामीण भागातील स्त्री जमिनीवर सडासारवण करून, सुरेख रांगोळी काढून, एका भांड्यात पाणी ठेवून, ते आकाशीच्या देवाला दाखवते. किंवा पाऊस पडावा म्हणून गावाने मंदिराचा गाभारा पाण्याने भरणं, किंवा अगदी पूर्वी देशातील काही भागांत पाऊस पडला नाही, तर महिला शेत नांगरायच्या. मात्र नांगरण्याआधी त्या नांगराच्या फाळाची पूजा करायच्या. हा विधी म्हणजे एकप्रकारे सुफलनविधी होता. म्हणजे भूमी म्हणजे स्त्री आणि नांगर म्हणजे पुरुष. या दोन तत्त्वांच्या मीलनातून सर्जनाचा कोंभ फुटावा, अशी विनवणी वरुणराजाला केली जायची. अगदी आदिवासींच्या देवदेवता बघितल्या तरी लोकधर्माचं हे निसर्गसंवादी रूप लगेच आकळतं. आदिवासींनी हिर्व्या देव, कणसरीमाता, वाघदेव ही आपली दैवतं निसर्गातूनच उचललेली आहेत.

तसंच लोकधर्मच नाही, तर कुठल्याही धर्माचं अस्तित्व त्या धर्मातील कर्मकांडावरही अवलंबून असतं. आज जो वैदिक किंवा हिंदू धर्म आहे, त्याच्यातील मूळ कर्मकांड यज्ञसंस्था आहे. अशी कर्मकांडं लोकधर्मातही आढळतात. परंतु आदिम अवस्थेत ही कर्मकांडं म्हणजे एकप्रकारे समूहाने एकत्र येऊन केलेला नाच-गाण्याचा उत्सव असायचा. सुख-दुःखाच्या प्रसंगी एकत्र यायचं आणि गोल फेर धरून नाचायचं. गोल फेर धरला की त्याच्या गतिमानतेतून जे आवर्त तयार होतं, त्यात विश्वाची ऊर्जात्मक शक्ती सामावलेली आहे, अशी आदिम भावना होती. आजची उत्सवप्रसंगी नाच-गाण्याची परंपरा त्यातूनच निर्माण झालेली आहे. म्हणजेच जोपर्यंत कर्मकांडं लोप पावत नाही, तोपर्यंत धर्म लोप पावत नाही. महत्त्वाचं म्हणजे कर्मकांडाशिवाय धर्म असूच शकत नाही. यासंदर्भात दिवंगत अभ्यासक गणेश थिटे यांचं एक वचन उद्धृत करण्यासारखं आहे. ते म्हणतात- 'धर्माचे तीन घटक आहेत- दैवतशास्त्र, कर्मकांड आणि नीती किंवा सदाचार. कित्येकदा कर्मकांडाला

हीन लेखण्याची किंवा अनावश्यक मानण्याची प्रवृत्ती दिसते. पण धर्म कर्मकांडाशिवाय असूच शकत नाही. कर्मकांडात बदल होतात, पण त्याची जागा पूर्णपणे दुसरी एखादी गोष्ट घेऊ शकत नाही.' (गणेश थिटे, प्रस्तावना- यज्ञः आशय आणि आविष्कार)

आज अनागर जीवनशैलीत अशा कर्मकांडांचा आपल्याला सातत्याने अनुभव येतो. ही कर्मकांडं अनेकदा कालबाह्य झाल्याचंही जाणवतं. पण त्यापासून सुटका नसल्याची हतबलताही दिसते. अनेकदा श्रद्धांचं रूपांतर अंधश्रद्धेतही झाल्याचं पाहायला मिळतं. परंतु त्याविषयी कितीही प्रबोधन केलं तरी अनेकदा ते-ते समाज आपला हेका सोडायला तयार नसतात. कारण आपलं नागरी मन आधुनिक विज्ञानाच्या आधारे प्रत्येक कृतीमागील कार्यकारण भाव शोधत असलं, तरी आदिवासी किंवा ग्रामीण जनता मात्र प्रत्येक कर्मकांडामागच्या भावकोषातच अडकलेली असते. हा भावकोष त्यांच्या सुप्त मनात हजारो वर्षांपासून असल्यामुळे त्यांच्यासाठी त्याचा त्याग करणं सोपं नसतं. म्हणूनच प्रसंगी जबरदस्ती करण्याचा प्रसंग केला, तर त्यातून विपरीत घडण्याचाच संभव अधिक असतो. अशावेळी भास्कर लक्ष्मण भोळे यांनी दाखवलेला मार्गच अनुसरायला हवा. ते म्हणतात- 'धर्म आणि संस्कृती यांचे अधिक आस्थेवाईक आणि खुल्या मनाने आकलन करुन घेतल्यास लक्षात येईल की, धर्म-संस्कृती म्हणजे माणसाने आपल्या सामाजिक व भौतिक पर्यावरणाला आपल्या प्रतिभेतून दिलेला प्रतिसाद असतो. जन्मल्यापासून व्यक्तीवर अक्षरशः शेकडो मार्गांनी होणाऱ्या आणि तिला सर्वांगानी प्रभावित करणाऱ्या संस्कारांमधून तिच्या ठिकाणी श्रद्धेचा परिपोष होत असतो. रोज कानांवर आदळणारे हजारो धर्मविशिष्ट ध्वनी, आख्यायिका, प्रार्थना, मिथके, कहाण्या, पोथ्या-पुराणे, कीर्तने-प्रवचने, उत्सव-यात्रादी मेळावे इत्यादींमधून धर्माचा व्यक्तीच्या मनीमानसी शिरकाव झालेला असतो. धार्मिक संकेतांनी व विधिनिषेधांनी त्याचे वर्तन घडवलेले असते. तात्त्विक, कृतिरूप आणि सामाजिक संबंधरूप अशा तिन्ही पातळ्यांवर धर्म व संस्कृती, व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल अंश झालेली असते.' (भास्कर लक्ष्मण भोळे, धर्मनिरपेक्षतावाद्यांचे सांस्कृतिक औदासीन्य, समाजविमर्श)

याचा अर्थ धर्म आणि संस्कृतीच्या पोटात शिरून आणि कलाकलाने घेऊनच त्यातला फोलपणा आपण दाखवून द्यायला हवा. तसंच यज्ञसंस्कृतीतून उत्क्रांत झालेला विद्यमान धर्म काय किंवा लोकसाहित्याच्या मुळाशी असलेला आदिम यात्वात्मकतेतून साकारलेला लोकधर्म काय, त्याचा अतिरेक होतो, तेव्हा तोही घातकच ठरतो. म्हणूनच तर दुर्गा भागवत यांनी लोकसहित्याच्या अभ्यासकांस इशारा देऊन ठेवला आहे की-लोकसाहित्याचा कृत्रिम उमाळा अनेकदा अभिरुचीला आणि प्रगतीला मारक असतो. लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याची उजळलेली भावनोत्कट बाजूच तेवढी लोकांसमोर ठेवलेली आहे. प्रत्यक्षात लोकसाहित्याचा खूप मोठा भाग अत्यंत हिडीस, कंटाळवाणा आणि जनतेच्या बुद्धिस मागे खेचून नेणारा आहे (दुर्गा भागवत, लोकसाहित्याची रूपरेखा)

म्हणजेच लोकसाहित्याचा अभ्यासही साक्षेपानेच करायला हवा. कारण गतस्मृती कितीही चांगल्या असल्या, तरी प्रत्येकवेळी त्या रम्यच असतील असं नाही. मात्र हा अभ्यास करताना तो परंपरेच्या मुळाशी जाऊन करायला हवा, हेही तेवढंच खरं. कारण तिथेच प्रकृतीचा-प्रवृत्तीचा मूळ झरा निकोप आणि निर्मळ असतो. म्हणूनच धर्म आणि लोकसाहित्याचे आंतरसंबंध तपासताना लोकधर्म आधाराला घेतला आहे. तो घेतल्यावर लक्षात येतं की, लोकधर्माशिवाय लोकसाहित्य अपुरं आहे. कारण लोकसाहित्यातील प्रत्येक कृती-उक्तीला लोकधर्माचंच अधिष्ठान आहे!


◆◆◆


भावोत्कट आणि कामोत्कट तेलुगू शृंगारकाव्याचा
रसाळ मराठी भावानुवाद

राधिकासांत्वनम्


मुद्दुपलनी
अनु : डॉ. शंतनू अभ्यंकर
किंमत : ₹ ३३०

ebook available



# व्याल
# भारतीय मिथकातील प्राणी

केतन पुरी



भारताला हजारो वर्षांचा सांस्कृतिक इतिहास लाभला आहे. या सांस्कृतिक इतिहासाचं प्रतिनिधित्व करणारी मंदिरं भारतभरात निश्चलपणे उभी आहेत. मंदिर हा भारतीय समाजव्यवस्थेचा अविभाज्य घटक आहे. मंदिर जरी धार्मिक किंवा सांस्कृतिक घटकांचं प्रतिरूप दर्शवत असेल, तरीसुद्धा मंदिराच्या माध्यमातून तत्कालीन सामाजिक-आर्थिक-राजकीय बाजू लक्षात घेता येते. थोडक्यात, मंदिरं अबोल काळाचे बोलके साक्षीदार आहेत, असं मानलं तरी वावगं ठरणार नाही. मंदिराच्या सोबतच शिल्पाच्या माध्यमातून आपण विशिष्ट कालखंडातील लोकजीवनाचा अंदाज बांधू शकतो. जसे की- तत्कालीन वेशभूषा, केसांची रचना, अंगावर घालण्यात येणाऱ्या विविध दागदागिन्यांची घडणावळ, शस्त्रांची रचना आणि शिल्पाच्या माध्यमातून विशिष्ट प्रदेशात असणाऱ्या धार्मिक संप्रदायाचा प्रभाव... एक मंदिर आपल्याला धार्मिक, राजकीय, आध्यात्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक आणि सामाजिक समीकरणांची कल्पना देण्यासाठी पुरेसं असतं.

मंदिरांच्या अंगाखांद्यावर अनेक देव-देवतांची शिल्पं, 'रामायण-महाभारत' यांसारख्या महाकाव्यांतील गोष्टींच्या मूर्ती कोरलेल्या दिसून येतात. इथेच आपल्याला सर्वांत पहिल्यांदा 'मिथक प्राणिशिल्पांचा' परिचय होतो. मिथक प्राणिशिल्प म्हणजे, ज्यांचं या भूतलावर अस्तित्व नाही, ज्यांची केवळ कल्पना करू शकतो असे प्राणी. त्यामध्ये अनेक प्रकार आहेत. यामध्ये आपल्याला व्याल पाहायला मिळतात, मासे पाहायला मिळतात, मगर पाहायला मिळते, कासव, कीर्तिमुख, शरभ, गंडभेरुंड यांसारखे कित्येक प्राणी आपल्याला पाहायला मिळतात. मिथक शिल्पांमध्ये दाखविण्यात आलेले प्राणी मुख्यकरून सामर्थ्याचे, अफाट ताकदीचे प्रतीक म्हणून

दाखविण्यात येतात. यामध्ये सर्वांना सुपरिचित असणारा प्राणी म्हणजे ‘व्याल.’

‘व्याल’. ‘अपराजितपृच्छा’, ‘रूपमाला’, ‘समरांगण’, ‘सूत्रधार’सारख्या पुरातन ग्रंथांमध्ये ‘व्याल’ विषयी विपुल लेखन केलेलं आढळतं. ‘व्याल’ ताकदीचं, प्रचंड सामर्थ्याचं प्रतीक आहे. ‘व्याल’ या ग्रंथामध्ये आलेल्या वर्णनानुसार ‘व्याल’ ताकदवान आहे, लबाड आहे, पराक्रमाचं प्रतीक आहे. वेगाने हालचाल करण्याचं सामर्थ्य त्यांच्यात आहे. लांबलचक पसरलेली जीभ, बटबटीत मोठे डोळे, लहान; पण तीक्ष्ण भासणारे कान, जाडसर सुळे आणि धिप्पाड शरीर असणाऱ्या ‘व्याल’चं हे भयंकर, पण विस्मयचकित करणारं रूप आपल्याला मंदिरात पाहायला मिळतं. ‘व्याल’ म्हणजे एकापेक्षा जास्त प्राण्यांची समरूप प्रतिमा, ज्याला आपण Syncretic image किंवा Composite image म्हणतो. या ‘व्यालां’ चे अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये ‘गजव्याल’, ‘सिंहव्याल’ किंवा ‘शार्दूलव्याल’, ‘मेषव्याल’, ‘वृषव्याल’ यांसारख्या अनेकांचा समावेश होतो.

‘अपराजितपृच्छा’ या ग्रंथात ‘व्यालसंबंधित’ एक संस्कृत श्लोक वाचावयास मिळतो,

सिम्हव्यालम गजव्यालम अश्वव्यालम नरादिकम
वृषव्यालम मेषव्यालम सूकव्यालम च सौकरम
महिषम मूषकव्यालम कीटव्यालम च वानरम
हम्स-कुकुट्ट-मयुरम त्रिपल्ली-सर्पव्यालकम
इति षोडश व्यालानी उक्तानी मुखभेदत:
शरीरम-अहि-वद-रुपम हस्त-पाद-पुच्छ-आदिकम
व्यालान-आंतर-तो रुपम-अनेक आकारत: स्मृतम

या श्लोकातून आपल्याला सिंहव्याल, गजव्याल, मेषव्याल, वृषव्याल, सोबतच अश्वव्याल, सूकव्याल (म्हणजे कुत्रा), महिषव्याल, मूषकव्याल यांसारख्या १६ प्रकारच्या ‘व्यालां’ची माहिती मिळते.

‘सिंहव्याल’ म्हणजे सिंहाचं तोंड असलेला व्याल. ‘गजव्याल’ म्हणजे हत्तीप्रमाणे सोंड किवा हत्तीचं तोंड असलेला... मेंढ्याचं तोंड असलेला, घोड्याचं तोंड असलेला, कुत्र्याचं तोंड असलेला, असे अनेक प्रकारचे ‘व्याल’ आपल्याला दिसून येतात. मागील दीड हजार वर्षांपासून आपल्याला ‘व्यालां’चं अस्तित्व दिसतं. काही ठिकाणी तर दोनपेक्षा जास्त प्राण्यांचं एकत्रित रूप पाहायला मिळतं. म्हणजे सिंह, हत्ती आणि बैल यांच्यापासून तयार करण्यात आलेला ‘व्याल’सुद्धा आढळून येतो. त्यातल्या त्यात ‘मेषव्याल’, ‘वृषव्याल’ हे काहीसे दुर्मिळ प्रकारांतील मानण्यात येतात. भुवनेश्वरमधील ‘बैताल देऊळ’ किंवा ‘वेताळ देऊळ’मध्ये ‘मेषव्याला’चं दर्शन आपल्याला घडतं तर, खजुराहोच्या





विश्वनाथ मंदिरात ‘वृषव्याल’ अंकित करण्यात आल्याचं आढळतं.

गुप्त कालखंडापासून सगळीकडे ‘व्याल’ हा शब्द प्रचलित झाला. याच काळात ‘व्याला’ने भारतात आणि भारताबाहेर श्रीलंका व दक्षिण-पूर्व देशांमध्ये प्रवास केल्याचं पाहावयास मिळतं. चालुक्य, पल्लव, राष्ट्रकूट, चोळ राज यांनी आपल्या मंदिरांमध्ये ‘व्यालां’ना स्थान दिलं. पुढे ‘होयसळ’ आणि यादव काळामध्ये ‘व्यालशिल्पां’चं अस्तित्व आढळून येतं. विजयनगर काळात मात्र ‘व्यालशिल्पां’चं महत्त्व वाढलं. सुरुवातीच्या काळात मंदिराच्या अधिष्ठान भागात ‘व्यालशिल्पां’चं अंकन दिसून येतं. पुढे, विजयनगर काळात मात्र मंदिरांच्या खांबांवर आणि महत्त्वाच्या जागी, म्हणजे सभामंडपातसुद्धा ‘व्यालशिल्पं’ दिसून येतात. त्यांचा आकार, त्यांचं अलंकरण आणि मंदिरातील स्थान यांमध्ये आमूलाग्र बदल झाल्याचं आढळून येतं.

महाराष्ट्राचा विचार केल्यास ‘व्यालशिल्पं’ मंदिराच्या अधिष्ठान भागात, मंदिरांच्या खांबांवर एवढंच नव्हे, तर गर्भगृहाच्या द्वारशाखेवर दिसून येतात. वेरूळच्या कैलास मंदिराच्या पायथ्याला आपल्याला भव्य ‘गज-सिंहव्यालां’ची शिल्परांग दिसते. जणूकाही या ‘व्यालां’च्या पाठीवरच कैलासाचा भार तोलला आहे, असा भास होतो. गर्भगृहाच्या ‘द्वारशाखे’वर आपल्याला ‘वेलबुट्टी’, ‘नरशाखा’, ‘मैथुनशाखा’ यांसोबतच ‘व्यालशाखा’ पाहावयास मिळते. ‘समरांगण सूत्रधार’ ग्रंथामध्ये अशी ‘द्वारशाखा’ गर्भगृहाच्या दरवाज्यावर कोरल्याची नोंद दिसते. पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक आणि ओडिशा भागांमध्ये ‘व्यालशिल्पां’ना प्रचंड महत्त्व आहे. ही महाराष्ट्रात ‘व्याल’ योद्ध्याप्रमाणे दाखवण्यात येतात. कर्नाटकात ‘व्याला’वर योद्धा आरूढहोऊन युद्ध करतोय, अशा स्वरूपात कोरण्यात आले आहेत. ओडिशामध्ये सर्रासपणे ‘व्याल’ हत्तीच्या पायांखाली दाखवतात. अठराव्या-एकोणिसाव्या शतकापर्यंत या व्यालांचं अस्तित्व आपल्याला पाहायला मिळतं. या उत्तर मध्ययुगीन काळात ‘व्यालशिल्पां’ नी मंदिराची बंधनं झुगारून माणसांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग असणाऱ्या गोष्टींवर विराजमान झाल्याचं आढळतं. सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या उत्तर मध्ययुगीन वाड्यांच्या खांबांवर किंवा खिडक्यांवर ‘व्याल’ दिसून येतात.

‘व्यालशिल्पा’प्रमाणेच आणखी एक प्रसिद्ध ‘मिथकशिल्प’ म्हणजे ‘कीर्तिमुख’. ‘कीर्तिमुख’ सर्रासपणे मंदिरांच्या चौकटीवर आढळून येते. त्याची गोष्टसुद्धा फार रोमांचक आहे. त्याचं असं झालं, कीर्तिमुखनामक एक असुर शिवाची तपश्चर्या करत होता. भगवान शिवास प्रसन्न करून घेण्यासाठी त्याने घनघोर तपश्चर्या केली. शिव प्रसन्न झाले; पण इथे झाली एक गंमत. बराच काळ तपश्चर्या केल्यामुळे त्याला भयंकर भूक लागली. त्यावर भगवान शिवाने त्याला ‘तुझं शरीर पायापासून खा,’ असं सांगितलं. कीर्तिमुखाने तसं केलं; पण पूर्ण शरीर खाऊन झालं तरी भूक भागली नाही. फक्त तोंडच राहिलं. त्यावर भगवान शिवाने असा वर दिला, की माझ्या मंदिराच्या उंबऱ्यावर तू कायमस्वरूपी विराजमान हो आणि येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांचं पाप खा! अशा प्रकारे कीर्तिमुख मंदिराच्या दरवाज्यात-उंबऱ्यावर विराजमान झाले; पण कीर्तिमुख फक्त मंदिराच्या दरवाज्यात न दिसता मंदिराच्या बाह्यांगावर, अगदी शिखरावर- सुद्धा दिसून येतात. एकट्या कैलास मंदिरात पन्नासपेक्षा जास्त ‘कीर्तिमुख शिल्पां’चं अंकन आहे. म्हणजे, मंदिराची सजावट, हेही कीर्तिमुखांचं एक प्रयोजन आहे. उत्तर मध्ययुगीन काळात बांधण्यात आलेल्या मंदिरांत, विशेषतः, मराठाकालीन मंदिरांचं ‘कीर्तिमुख’ हे अविभाज्य आणि महत्त्वपूर्ण अंग आहे.

गडकिल्ल्यांवर फिरणाऱ्या भटक्यांच्या उत्सुकतेचा आणि आकर्षणाचा विषय म्हणजे ‘शरभ’. आपल्या पायांमध्ये, तोंडामध्ये आणि शेपटीमध्ये हत्तीला पकडून ठेवण्याचं सामर्थ्य बाळगणारा प्रचंड सामर्थ्यवान प्राणी. ‘शरभ’ हा शिवाचा अवतार. विष्णूने नृसिंहाचं रूप धारण करून हिरण्यकश्यपूचा संहार केला. पण, हिरण्यकश्यपूच्या क्रोधामुळे पृथ्वीचा विनाश होण्यास सुरुवात झाली. सर्व देवी-देवता घाबरून शिवाला





शरण गेले, तेव्हा नृसिंहाचा विनाश करण्यासाठी शिवाने 'शरभ'रूपी  अवतार घेतला. 'शरभरूप' म्हणजे सिंहाचं रूप. बऱ्याच शैव मंदिरांमध्ये 'शरभा'ची आराधना करण्यात येते. टीएसएच, कित्येक मराठाकालीन गडकिल्ल्यांवर 'शरभशिल्पं' दरवाज्यावर कोरलेली दिसून येतात. रायगडच्या महादरवाज्यावर तसेच नगारखान्यावर आपल्याला मोठी, सुंदर 'शरभशिल्पं' पाहायला मिळतात. 'मुरुड जंजिऱ्या'च्या 'जझिरे मेहरुब' किल्ल्यावरील 'शरभ' प्रसिद्ध आहेच. त्याच्या चार पायांमध्ये चार आणि शेपटीमध्ये एक हत्ती धरल्याचं पाहावयास मिळतं. कित्येक मराठा सरदारांच्या समाधीवर 'शरभ' अंकित करण्यात आला आहे. संगम माहुली, सातारा येथे छत्रपती संभाजीराजे यांच्या पत्नी येसूबाई राणीसाहेब यांच्या समाधीवर तसेच थोरले शाहू छत्रपती यांच्या पत्नी सकवारबाई साहेबांच्या समाधीवर 'शरभशिल्पं' पाहावयास मिळतात. या 'शरभा'ला दोन पंखसुद्धा असतात. मुळात 'शरभशिल्पा'चं पुराणकथांमध्ये दोन डोकी दोन पंख, सिंहाचे आठ पाय आणि लांबलचक शेपटी अशा स्वरूपातील वर्णन आलं आहे. 'शरभा'ला बत्तीस हात असल्याची नोंद- सुद्धा 'श्रीतत्त्वनिधी' या ग्रंथामध्ये आढळते.

भटक्यांचं आणखी एक आवडतं शिल्प म्हणजे 'गंडभेरुंड'. 'शरभा'सोबत युद्ध करण्यासाठी विष्णूने घेतलेला अवतार. एक असा पक्षी, ज्याला दोन तोंडं आहेत; पण शरीर एकच आहे. त्याच्यामध्ये असणाऱ्या अचाट सामर्थ्याच्या बळावर 'शरभा'चा त्याने पराभव केला. 'रायगड' किल्ल्यावर असणारा 'गंडभेरुंड' प्रसिद्धच आहे. त्याचबरोबर, विजयनगरसम्राट कृष्णदेवराय यांच्या बिरुदावलीमध्ये- सुद्धा 'गजोध गंडभेरुंड' ही पदवी आढळते. यावरून वैष्णव संप्रदायामध्ये असणारं 'गंडभेरुंडा'चं महत्त्व लक्षात येतं. हा 'गंडभेरुंड' सध्या 'कर्नाटक राज्य परिवहन महामंडळा'चं अधिकृत बोधचिन्ह म्हणून पाहावयास मिळतो. शिवाचा 'शरभ' हा एकच अवतार 'मिथकशिल्प' वर्गात मोडतो. तर, विष्णूचे- 'गंडभेरुंड', 'नृसिंह', 'हयग्रिव'सारखे अवतार 'मिथकशिल्प' वर्गामध्ये समाविष्ट होतात.

शिवाची एक विस्मयचकित करणारी प्रतिमा कांचीच्या एकंबरेश्वर मंदिरात आढळून येते. मंदिरातील एका खांबावर शिवाला पक्ष्याच्या स्वरूपात दर्शविण्यात आलं आहे. पण, त्या शिल्पाला चार हात आहेत. त्याच्या मागील दोन्ही हातांमध्ये परशू आणि हरिण आहे. विशेष म्हणजे, या शिवाने आपल्या चोचीमध्ये विष्णुरूपी माश्याला पकडलं आहे. 'गंडभेरुंड'चं रूप घेऊन शरभाचा अंत करू पाहणाऱ्या विष्णूचं पक्षिरूपी शिल्प आपल्याला ज्ञात आहे. पण, मत्स्यअवतार धारण करणाऱ्या शिवाच्या या रूपाविषयी मात्र नोंद सद्य:स्थितीत आढळून आली नाही.

नृसिंहाची कथा तर प्रसिद्धच आहे. कथेनुसार हिरण्यकश्यपूचा संहार करण्यासाठी विष्णूने घेतलेला अवतार, ज्यात विष्णूचं अर्ध शरीर मानवाचं तर अर्ध सिंहाचं होतं. हा नृसिंह अनेक नावांनी ओळखला जातो. लक्ष्मी सोबत असताना 'लक्ष्मी-नृसिंह', एकटा असताना 'केवल नृसिंह' तर वध करत असताना त्याच्या रूपास 'उग्र नरसिंह' या नावाने ओळखलं जातं.

विष्णूचा आणखी एक अवतार म्हणजे 'हयग्रीव'. याविषयी मात्र लोकांना फारशी माहिती नसते. हा हयग्रीव 'अश्वशीर' किंवा 'हयशीर्ष' नावानेही ओळखला जातो. याचं तोंड घोड्याचं; पण इतर शरीर मानवाचं असतं. याची कथा अशी आहे, की 'मधू' आणि 'कैटभ' नावाच्या दोन दैत्यांनी चारही वेदांचं हरण केलं. या दोन्ही दैत्यांचा जन्म विष्णूच्या कानांमधून झाला होता. यातील एक मऊ आणि एक कडक असल्यामुळे ब्रह्मदेवांनी त्यांना 'मधू' आणि 'कैटभ' ही नावं दिली. वेद परत मिळावेत म्हणून ब्रह्मदेवांनी विष्णूची प्रार्थना केली. तेव्हा विष्णूने घोड्याचं शिर असलेल्या मानवाचं रूप  घेऊन सामगायन करण्यास सुरुवात केली. त्या गाण्याचे स्वर ऐकून दोन्ही दैत्य हातांतील वेद खाली टाकून गाण्याच्या दिशेने पळू लागले. त्याचदरम्यान वेद हस्तगत करून हयग्रीवाने ते ब्रह्मदेवास दिले. वेदांचं तत्त्वज्ञान समजून घ्यायचं असेल, वेदांचा तत्त्वज्ञानी व्हायचं असेल तर हयग्रीवाचा आशीर्वाद आवश्यक असल्याचा उल्लेख आहे.

या मिथक प्राण्यांच्या अस्तित्वाचा मागोवा घेत आपल्याला 'मौर्य-शुंग' काळापर्यंत मागे जावं लागतं. बौद्धकलेमध्येसुद्धा या मिथक प्राण्यांनी आपल्या अस्तित्वाची छाप सोडली आहे. मानवी चेहरा असलेला सिंह, शिंग असलेला सिंह, हत्तीचे तोंड असलेला बैल, अर्धा मानव आणि अर्धा घोडा अशा स्वरूपातील कित्येक चित्रविचित्र प्राणी दिसून येतात. सांची, अमरावती, भारुथ, सारनाथ, नागार्जुनकोंडा

यांसारख्या कित्येक स्तुपांवर आपल्याला हे मिथक प्राणी शिल्परूपाने आढळून येतात. सांची, अमरावती या स्तुपांवर मानवी चेहरा असलेला सिंह आढळून येतो. नागार्जुनकोंडा येथील एका सिंहाच्या डोक्यावर शिंगं दिसतात आणि त्याला लगाम घालून एक व्यक्ती त्यावर स्वार झाल्याचंसुद्धा पाहायला मिळतं. एवढंच नाही, तर एका स्तुपावर चोच असलेला सिंहसुद्धा कोरलेला दिसून येतो. या मिथक प्राणीशिल्पांचं मुख्य करून तीन विभागांमध्ये वर्गीकरण केलं आहे - १) व्योमचरिन म्हणजे अवकाशातील मिथक प्राणी. २) भूचरिन म्हणजे जमिनीवरील मिथक प्राणी आणि ३) जलचरिन म्हणजे पाण्यातील मिथक प्राणी. कित्येक वेळेस आपल्याला अर्धा मानव-अर्धा पशू, अर्धा मानव-अर्धा पक्षी, अर्धा पशू-अर्धा पक्षी अशा स्वरूपाचं चित्रीकरण दिसतं. या मिथक प्राण्यांना 'इहामृग', 'किन्नर', 'सुपर्ण' या नावांनी ओळखतात; पण या सर्वांमध्ये 'व्याल' मात्र प्रसिद्ध आणि प्रचंड लोकप्रिय झाल्याचं आढळून येतं.

केवळ मंदिरंच नाहीत, तर मध्ययुगीन काळातील शस्त्रांवरसुद्धा व्याल, शरभ, गंडभेरुंडसारखे प्राणी अंकित केले आहेत. हैदराबाद येथील 'सालारजंग संग्रहालया'मध्ये 'खांडा' शस्त्राच्या मुठीवर 'व्याल' कोरण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पट्ट्याच्या खोबणीवर ज्या प्रकारे 'वराह' अंकित करण्यात आलाय, अगदी त्याचप्रकारे दख्खन भागातील अनेक पट्ट्यांवर शरभ, व्याल आणि गंडभेरुंड कोरण्यात आले आहेत. मुंबईस्थित मित्र 'किरण शिंदे' यांच्या वैयक्तिक संग्रहात असणाऱ्या पट्ट्यावर 'गंडभेरुंड' अंकित केलेले आहे. तसेच एका तलवारीवर शरभाचं अंकन दिसून येतं. पुण्यातील



सत्यजित वैद्य यांच्या संग्रहात शरभ असणारा पट्टा आणि दोन-तीन तलवारी आहेत. कीर्तिमुखाचं अंकन असणारी 'विजयनगर' काळातील तलवारसुद्धा त्यांच्या संग्रहात आहे. तसेच, त्यांच्या वाड्यातील खांबावर असणारे अठराव्या शतकातील 'व्याल' सुद्धा पाहावयास मिळतात. व्याल, शरभ, गंडभेरुंड यांसारखे मिथक प्राणी अफाट सामर्थ्याचं, अगणित ताकदीचं प्रतीक आहेत. मागील दीड-दोन हजार वर्षांपासून ही मिथक शिल्पं मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मंदिरातील शिल्पं, वाड्यातील खांब तसेच युद्धातील शस्त्रांवरसुद्धा या प्राण्यांनी मानवी आयुष्य समृद्ध केलं आहे. या मिथक प्राण्यांची ओळख ठेवणं, हेच त्यांच्या अस्तित्वाची दखल घेण्यासारखं आहे.

◆◆◆

'ईशावास्यम्' उपनिषदाचं रसाळ निरूपण
मांडणारं आणि जीवनाची लय स्पष्ट करणारं
अद्‍भुत मार्गदर्शक पुस्तक.


अस्तित्वाचा उत्सव

**ईशावास्य**

गुणवंत शाह


अनु : मृणालिनी देसाई


किंमत : ₹ ६९०





ebook available










# विश्वास पाटील
## यांची साहित्यसंपदा
















# ज्ञानेश्वरी आणि महाभारताची अभिजातता

मंजुश्री गोखले

'साहित्य' या शब्दाचा अर्थ सः हित असा आहे. अर्थात 'त्यांच्या हितासाठी' म्हणजे वाचणाऱ्याच्या हितासाठी जे लिहिलं जातं ते साहित्य आणि वाचणाऱ्याच्या हितासाठी जे लिहिलं जातं तेच साहित्य अजरामर ठरतं. कालातीत ठरतं, आणि यात प्रामुख्यानं नावं घ्यावी लागतील ती 'श्रीमद्‌भगवद्‌गीता', 'रामायण', 'महाभारत' या महान ग्रंथांची. या ग्रंथांत अध्यात्मासोबत संस्कृती, आचार-विचार यांचाही ऊहापोह आहे. वैश्विक साहित्यात या ग्रंथांना सन्मानाचं स्थान आहे. सर्व साहित्यांत, विशेषतः, भारतीय भाषांतील साहित्यांत या ग्रंथाचं, यातल्या विचारांचं प्रतिबिंब पाहायला मिळतं. संतसाहित्य तर याला अपवाद नाहीच; उलट काही-काही महान संतांच्या साहित्यात या ग्रंथांचा मागोवा, अनुकरण, भाष्य स्पष्टपणे दिसून येतं. विशेषतः, बाराव्या शतकातील संतांच्या साहित्यात ही मूल्यं स्पष्टपणे जाणवतात आणि म्हणूनच या संतांच्या साहित्यालाही एक प्रकारची ठळक अभिजातता लाभली आहे. सत्यता लाभली आहे आणि या अभिजाततेसाठी धर्म, जात, पंथ, स्त्री-पुरुष सुविद्यता यांतल्या कोणत्याच कसोटीची गरज नाही. हा मुद्दा थोडा अधिक स्पष्ट करून सांगायचा तर संत जनाबाईंचं उदाहरण आपल्याला घेता येईल.



जनाबाईंचे अनेक अभंग हे अशी अभिजातता दर्शवितात. सत्यतेची साक्ष देतात. त्या काळातील काही ऐतिहासिक पुरावे देतात. ते अभंग आज ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून विचारात घेतले जातात. याची दोन-तीन उदाहरणं दिली म्हणजे हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

जनाबाईंचा एक अभंग आहे -

*नोवरीच्या संगे वऱ्हाडिया सोहळा ।*
*मांडे-पुरणपोळ्या मिळे अन्न ॥*

जनाबाईंचा हा अभंग त्या काळातल्या लग्नाचं वर्णन करतो आणि लग्नात काय पक्वान्नं होती, याचे दाखले देतो.

जनाबाईंचा हा अभंग पाहा. हा अभंग म्हणजे मराठी माणसांवर जनाबाईंनी केलेले अनंत उपकारच आहेत.

*शालीवाहन शके अकराशे नव्वद ।*
*निवृत्ती आनंद प्रकटले ॥१॥*
*त्र्याणवाच्या साली ज्ञानेश्वर प्रकटले*
*सोपान देखिले शाहण्णवांत ॥२॥*
*नव्याण्णवाच्या साली मुक्ताई देखिली*
*जनी म्हणे केली मात त्यांनी ॥३॥*

या अभंगात संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांचे जन्मशक लिहून जनाबाईंनी मराठी माणसाला उपकृत केलं आहे. असाच एक अभंग नामदेवांच्या घरातला, कुटुंबातल्या व्यक्तींची नावं सांगणारा, तर आणखी एक अभंग त्या काळातील सर्व संतांच्या अभंगरचना कोण-कोण लिहून घेत होतं हे सांगणारा. सत्यता, अभिजातता किंवा ऐतिहासिक पुरावे देणारे दस्तऐवज हे असे. संतांनी विठ्ठलावर भाबडी भक्ती केली; पण त्याचसोबत सामाजिक भानही ठेवलं. याचेच हे पुरावे. अनेक संतांच्या अभंगांत असे दस्तऐवज सापडतात. या सर्वांनी भाबड्या भक्तीसोबत अभिजातताही जपली ती अशी.

'रामायण'-'महाभारत' हे ग्रंथ म्हणून महान आहेत; पण वास्तवात त्यातल्या घटनांची सत्यता किती आहे? किंवा 'रामायण', 'महाभारत' हे घडलेले नसून ती काल्पनिक कथाख्यानं आहेत, असा एक मतप्रवाह विचारवंतांच्यात वाहतो आहे. अर्थात, आधुनिक विज्ञान संशोधनातून याची सत्यता शोधत आहे आणि तसे काही पुरावेही विज्ञानाला सापडले आहेत, सापडत आहेत. उदा. रामसेतू किंवा श्रीकृष्णाची द्वारका; पण तरीही, 'रामायण', 'महाभारत' किंवा 'भगवद्गीता' हे ग्रंथ अभ्यासासोबतच श्रद्धेचे विषय जास्त

आहेत हेही खरं. अर्थात या ग्रंथात सांगितलेली जीवनमूल्यं ही हजारो वर्षांपूर्वी जितकी मानवी व्यवहाराशी निगडित होती, तितकीच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त वर्तमानातील मानवी आचार-विचारांशी निगडित आहेत, आणि बदलत्या काळाचा प्रभाव पाहता भविष्यात तर ती याहीपेक्षा जास्त निगडित राहतील, असं दिसतं. विचारवंत, अभ्यासक किंवा विद्रोही भूमिका घेणारे 'रामायण-महाभारता'च्या अभिजाततेबद्दल, सत्यतेबद्दल कितीही शंका घेवोत, कितीही भिन्न मतप्रवाह व्यक्त करोत; पण सामान्य जनमानसावर या ग्रंथांचा असलेला पगडा, परिणाम हा चिरंतन राहणार आहे, हे सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे. आणि यातच या ग्रंथांची अभिजातता स्पष्ट होते, दृग्गोचर होते.

'रामायण', 'महाभारत' या ग्रंथांमधून गोष्टी, कथा सांगत जीवनमूल्यं अधोरेखित केली आहेत. तर 'भगवद्गीता' हा साक्षात ज्ञानाचा खजिना आहे. यातल्या ज्ञानाचं महत्त्व लक्षात आल्यामुळेच तर ज्ञानेश्वर माउलींनी

*माझा मराठाचि बोलू कौतुके ।*
*परी अमृतातेहि पैजा जिंके ।*
*ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।*

असं सांगत अमृताशी पैज जिंकणाऱ्या मराठी भाषेत 'भगवद्गीते'वर विस्तारपूर्वक भाष्य केलं. गीतेच्या ७०० श्लोकांवर ९०३२ ओव्या लिहून गीतेतील ज्ञान, माहिती, संकेत, संदेश यांचं अभ्यासपूर्वक, विस्तारानं विवेचन केलं. भगवान श्रीकृष्णानं अर्जुनाला कुरुक्षेत्रावर सांगितलेलं ज्ञान म्हणजे गीता. हे ज्ञान, यांतील माहिती, संकेत अधिक विस्तारानं मराठी भाषेत आणताना त्यातील between the line गुह्यंसुद्धा ज्ञानेश्वरांनी उघड केली आणि मराठीत गीता अधिक स्पष्ट व अधिक सूक्ष्म झाली. या सूक्ष्मतेचे अनेक दाखले आपल्याला 'ज्ञानेश्वरीत' मिळतात. त्यांचा थेट संबंध 'महाभारता'शी लावताही येतो आणि तो सिद्धही होतो. 'महाभारता'च्या सत्यतेबद्दल शंका घेणाऱ्यांनी, 'ज्ञानेश्वरी'तले हे संदर्भ अभ्यासले, 'ज्ञानेश्वरी'मध्ये वर्णित झालेली 'महाभारता'तली सूक्ष्मता अभ्यासली, 'ज्ञानेश्वरीत'ल्या वर्णनातून दृष्टिभूत होणारी अभिजातता पाहिली तर त्यांच्या मनातील शंका दूर होतील. अर्थात, ज्ञानेश्वरांवर श्रद्धा, ज्ञानेश्वरीतील शब्दांवर विश्वास आणि त्यातल्या अभिजाततेवर, सत्यतेवर सकारात्मक निष्ठा हवी. तरच 'ज्ञानेश्वरी'मध्ये दृग्गोचर होणारी 'महाभारता'ची अभिजातता दिसेल, लक्षात येईल व अनुभवताही येईल. अर्थात त्यासाठी 'ज्ञानेश्वरी'तल्या काही ओव्या दाखला म्हणून अभ्यासाव्या लागतील-पाहाव्या लागतील.

'महाभारता'च्या मूळ कथेत समाविष्ट असलेल्या 'भगवद्गीते'ची पार्श्वभूमी अशी आहे, की कुरुक्षेत्रावर युद्धाच्या पहिल्या दिवशी अर्जुन श्रीकृष्णाला सांगतो की, 'रथ दोन्ही सैन्याच्या मधोमध नेऊन उभा कर. मला पाहायचं आहे, की कोण-कोण योद्धे आहेत ते?' अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करणारा श्रीकृष्ण रथ दोन्ही सैन्यांच्या मधोमध नेऊन उभा करतो आणि शत्रू म्हणून लढायला आलेले सगळे आपलेच लोक आहेत, हे बघून अर्जुन गर्भगळीत होतो. पितासमान भीष्म, गुरू द्रोण, कृपाचार्य यांच्याशी आपण लढायचं या कल्पनेनंच त्याच्या हातातलं धनुष्य गळून पडतं. त्यावेळी त्याला धर्म-अधर्म समजावून सांगण्यासाठी, त्याला धर्माच्या बाजूनं लढायला उद्युक्त करण्यासाठी श्रीकृष्णानं जो उपदेश केला तो उपदेश म्हणजे 'भगवद्गीता.' या प्रसंगाचं वर्णन श्रीकृष्णाच्या तोंडून आलेलं आहेच; पण 'ज्ञानेश्वरी'मध्ये ज्ञानेश्वरांनी याचं जे विस्तृत विवेचन केलंय, ते वाचल्यावरच महाभारताची अभिजातता, सत्यता आपल्या लक्षात येते. ज्ञानेश्वरांनी या प्रसंगांचं केलेलं सूक्ष्म, अतिसूक्ष्म वर्णन, त्यांनी केलेली शब्दरचना, खरंतर इतकं सूक्ष्म वर्णन 'गीते'मध्येपण नाही; पण ते 'ज्ञानेश्वरीत' अगदी तपशीलवार आहे. आणि ते इतकं तपशीलवार आणि सूक्ष्म आहे की, त्यामुळेच 'महाभारता'ची अभिजातता सिद्ध होते. स्वत: ज्ञानेश्वर माउली म्हणजे ज्ञानसूर्यच! त्यातच 'गीते'वर भाष्य करण्यासाठी त्यांनी 'महाभारता'चाही सूक्ष्म अभ्यास केला असणार. महर्षी व्यासांच्या प्रतिभेला तर प्रणाम आहेच; पण त्या महाकाव्याचा between the line अभ्यास करणाऱ्या ज्ञानेश्वर माउलींच्या दिव्य दृष्टीलाही वंदन आहे. 'भगवद्गीते'मध्ये आलेलं कुरुक्षेत्राचं आणि त्यावर उभ्या असलेल्या सैन्याचं आलेलं वर्णन आणि 'ज्ञानेश्वरीत' माउलींनी त्यावर केलेलं तपशीलवार, विस्तृत विवेचन करणारं भाष्य! हे दोन्ही आपण एकापाठोपाठ एक जर पाहिलं तर ते आपल्या लक्षात येईल.

दुर्योधनाने जेव्हा पितामह भीष्मांना 'सेनापती' म्हणून संबोधलं आणि युद्धाची सूत्रं त्यांच्या हातात दिली, त्यावेळी भीष्माचार्यांनी आनंदाने गर्जना केली आणि शंखनाद केला, हे सांगताना व्यास महर्षी म्हणतात...

*तस्य संजनयपन्हर्ष कुरुवृद्ध पितामह:।*
*सिंहनादं विनद्योच्चै: शंखं दध्मौ प्रतापवान् ।।*

अर्थ-दुर्योधनाच्या बोलण्याने हर्ष निर्माण झालेले, कौरवांत सर्वांत वडील असलेले आणि महापराक्रमी आजोबा भीष्म यांनी मोठ्याने सिंहासमान गर्जना केली आणि शंखनाद केला.

तर याचं तपशीलवार वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात,

*या राजाचिया बोला। सेनापती संतोषला ।।*
*मग तेणे केला । सिंहनादू ।।*
*तो गाजत असे अद्‌भुतू । दोन्ही सैन्या आंतु ।*
*प्रतिध्वनी न समातु। उपजत असे ।।*
*तयाची तुलगासवे । वीरवृत्तीचेनी थावें ।*
*दिव्य शंख भीष्मदेवें । आस्फुरिला ।।*
*ते दोन्ही नाद मीनले । तेथ त्रैलोक्य बधिरीभूत जाहले ।*
*जैसे आकाश का पडिले । तुटोनिया ।।*
*घडघडीत अंबर । उचंबळत सागर ।*
*क्षोभले चराचर । कांपत असे ।।*
*तेणे महाघोषगजरे । दुमदुमिताती गिरीकंदरे ।*
*तंव दळामाजि रणतुरे । आस्फुरिली ।।*

भीष्माचार्यांनी असा आरंभ केल्यावर सैन्यातील इतर वीरांनी ही रणवाद्यं वाजवायला सुरुवात केली. शंख, नगारे, ढोल, गोमुख, मृदंग ही वाद्यं एकदम वाजवली. त्याचा अतिशय भयंकर असा नाद उत्पन्न झाला.

हे सांगताना महर्षी व्यास म्हणतात...

*ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानक गोमुखाः ।*
*सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवन् ।।*

तर याचं सूक्ष्म आणि विस्तृत वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात,

*उदंड सैंघ वाजते । भयानकें खाखातें ।*
*महाप्रळय जेथे । धोकडांसी ।।*
*भेरी निशाण मांदळ । शंख काहळ भोंजळ ।*
*आणि भयासुर रणकोल्हाळ । सुभटांचे ।।*
*आवेशे भुजा त्राहाटिती । विसणेते हांका देती ।*
*जेथ महामद भद्रजाती । आवरती ना ।।*
*तेथ भेडांची कवण मातु । काचया केर फिटतु ।*
*जेणें दचकला कृतांतू । आंग नेघे ।।*
*एकां उभयाचि प्राण गेले । चांगाचे दात बैसले ।*
*बिरुदाचे दादुले ।हिंवताती ।।*

कुरुक्षेत्रावरच्या त्या भयंकर वातावरणाचं वर्णन ज्ञानेश्वर असं सूक्ष्मपणे करतात. वाटतं की हे तिथे उपस्थित असावेत. आता 'गीते'त जे वर्णन नाही, तेही ज्ञानेश्वरांनी केलं आहे. अर्जुनाच्या रथाचं वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात...

*हो का निजसार विजयाचे । की ते भांडार महातेजाचे ।*
*जेथ गरुडाचिये जावळिचे । कातले चाऱ्ही ।।*
*की पाखांचा मेरु जैसा । रहंवरु मिरवतसे तैसा ।*
*तेजें कोंदाटलिया दिशा । जयाचेनि ।।*
*जेथ अश्ववाहक आपण । वैकुंठीचा राणा जाण ।*
*तया रथाचे गुण । काय वर्णू? ।।*
*ध्वजस्तंभावरी वानरु । तो मूर्तिमंत शंकरु ।*
*सारथी शारङ्धरु । अर्जुनेंसी ।।*

आणि यानंतर ज्ञानेश्वर वर्णन करतात प्रत्येकाच्या शंखनादाचं. श्रीकृष्णाने पांचजन्य शंख वाजवला. अर्जुनाने देवदत्त शंख फुंकला. या दोन शंखांचा मिळून जो ध्वनी निर्माण झाला, त्याचं वर्णन तर ज्ञानेश्वरांनी इतकं सूक्ष्म केलंय की between the line अभ्यास काय असतो याचं प्रत्यंतर येतं. आणि महाभारतातलं कुरुक्षेत्रावरचं ते धर्मयुद्ध नजरेसमोर उभं राहतं. तो शंखांचा महाघोष असा निनादला की, हे सांगत असताना ज्ञानेश्वर वर्णन करतात...

*परि तो महाघोष थोरु । गर्जत असे गहिरु ।*
*जैसा उदेला लोपी दिनकरु । नक्षत्रांते ।।*
*तैसे तूरबंबाळ भंवते । कौरवदळी गाजत होते ।*
*ते हारपोनि नेणों केउते । गेले तेथ ।।*
*तैसाचि देखें येरें । निनादे अतिगजरे ।*
*देवदत्त धनुर्धरे । आस्फुरिला ।।*
*ते दोन्ही शब्द अचाट। मीनले एकवट ।*
*तेथे ब्रह्म कटाह शत कूट । हो पाहत असे ।।*

शंखांचा घोष असा अवकाशात भरून राहिला, की ब्रह्मांडाचे शंभर तुकडे होतात की काय, असं वाटू लागलं.

यानंतर द्रुपद, काशिपती, द्रौपदीचे पुत्र, धृष्टद्युम्न, अभिमन्यू, सात्यकी, शिखंडी या सर्वांनी शंखनाद केला. त्याचं वर्णन करताना तर ज्ञानेश्वर म्हणतात -

*तेणे महाघोष निर्धाते । शेष कूर्म अवचितें ।*
*गजबजोनि भूभारातें । सांडू पाहती ।।*
*तेथ तिन्ही लोक डळमळीत । मेरु मंदार आंदोळित ।*
*समुद्रजळ उसळत । कैलासावरी ।।*
*पृथ्वीतळ उलथो पहात । आकाश असे आसुडत ।*
*तेथ सडा होत । नक्षत्रांचा ।।*
*सृष्टी गेली रे गेली । देवा मोकळवादी जाहली ।*
*ऐशी एक टाळी पिटली । सत्यलोकी ।।*
*दिहाची दिन थोकला । जैसा प्रळयकाळ मांडला ।*
*तैसे हाहाःकार जाहला । तिही लोकी ।।*
*ते देखोनि आदिपुरुष विस्मितु । म्हणे झणे होय पा अंतु ।*
*मग लोपिता अद्‌भुतू । संभ्रम तो ।।*

आणि

*म्हणोनि विश्व सांवरले। एऱ्हवी युगांत होत ओडवले ।*
*जै महाशंख आस्फुरिले । कृष्णादिकी !!*

म्हणजे इथं ज्ञानेश्वर केवळ अर्जुनाचेच नव्हे तर श्रीकृष्णाचेही मनोव्यापार ओळखतात. महाभारताच्या सूक्ष्म अभ्यासाशिवाय हे शक्य नाही. म्हणजे महाभारत अभिजात आहे, सत्य आहे.

ज्ञानेश्वर माउलींसारखा सव्यसाची अभ्यासक असत्य कथेचा, न घडलेल्या कथांचा इतका मागोवा घेणं शक्य नाही. किंवा त्यात इतकं रमणंही शक्य नाही. आणि त्यातल्या ज्ञानाबद्दल इतकं सूक्ष्म अवलोकन करणंही शक्य नाही. जसा अध्यात्म आणि पारमार्थिक क्षेत्रात ज्ञानेश्वरांचा शब्द आणि ज्ञान हे अभिजात मानलं जातं, तद्वतच 'महाभारत' आणि 'गीते'चा त्यांनी केलेला अभ्यास हा या ग्रंथांची सत्यता सिद्ध करण्यासाठी पुरेसा आहे. 'महाभारत' हा निव्वळ काल्पनिक ग्रंथ नसून, तो एक घडलेला इतिहास आहे, हे अधोरेखित करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी केलेलं हे वर्णन पुरेसं आहे. शिवाय पुरातत्त्व खात्यानं सॅटेलाईटद्वारे केलेल्या संशोधनात द्वारकेजवळच्या समुद्रात बुडालेली श्रीकृष्णाची 'द्वारकानगरी' सापडल्याचे संकेत आहेत. म्हणजे श्रीकृष्ण साक्षात होता आणि श्रीकृष्ण ज्याअर्थी होता त्या अर्थी 'महाभारत' घडलेलं आहे, असंच हा संकेत सांगतो. रामसेतू तर सापडला आहेच. तसे 'महाभारता'चेही प्रत्यक्ष पुरावे सापडतील. आणि आमची संस्कृती किती प्राचीन आहे, याचेही दाखले त्यात मिळतील. अर्थात, संपूर्ण विश्वात वंदनीय असलेला ग्रंथ 'श्री भगवद्‌गीता', त्यात जर 'महाभारता'चे उल्लेख आहेत तर 'महाभारता'ची अभिजातता, सत्यता वेगळी सांगायची गरजच काय? आणि त्याहीपेक्षा 'गीते'चा अतिसूक्ष्म अभ्यास करून ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरी'त महाभारतातील प्रसंगांचं अतिसूक्ष्म आणि तपशीलवार वर्णन आहे, तर शंकेला जागा उरतेच कोठे ?

एखादी घटना घडली असता त्या घटनेचं अतिसूक्ष्म आणि तपशीलवार वर्णन जर त्या घटनेची सत्यता अधोरेखित करतं, तर 'ज्ञानेश्वरी'त केलेलं सूक्ष्म तपशीलासह वर्णन 'महाभारता'ची सत्यताच अधोरेखित करेल. यात शंकेला जागाच नाही. अर्थात इतिहासातल्या कुठल्याही घटनेबाबत, तिच्या आस्तित्वाबाबत शंकाच घेणारी आमची नकसखोर, शंकासुरीवृत्ती जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत सूर्य-चंद्रालासुद्धा आपल्या अस्तित्वाचे दाखले द्यावे लागतील, असं म्हटलं तर चुकीचं ठरू नये.

◆◆◆


विदेशी शेअर दलालांच्या रोचक कहाण्यांतून
शेअर बाजाराचा घेतलेला सर्वांगीण वेध








अतुल कहाते
किंमत : ₹ ७५०

ebook available

# मंजुश्री गोखले यांचे साहित्य




₹ ४५०

रामदासांचं ‘समर्थ’पण अधोरेखित करणारी कादंबरी

## समर्थ

संतांच्या मांदियाळीचा कणा असलेल्या नामदेवाचं संपूर्ण आयुष्य रेखाटणारी कादंबरी

## भक्तिचंद्र




₹ ४८०




₹ २९५

संत कान्होपात्राचं भावविश्व चित्रित करणारी, भक्तिरसानं ओथंबलेली कादंबरी

## समर्पण

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या भावविश्वाचा मागोवा घेणारी कल्पनारम्य कादंबरी

## ॥ हेचि दान देगा देवा ॥




₹ ४५०

ebook available

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

| | | | |
|---|---|---|---|
| तीन वर्षांची वर्गणी | ₹ ४५० | ₹ ६०० | पाच वर्षांची वर्गणी |
| | ○ मेहता मराठी ग्रंथजगत डिजिटल अंक ○ | | |
| तीन वर्षांची वर्गणी | ₹ ३०० | ₹ ४०० | पाच वर्षांची वर्गणी |

**तीन वर्षांना २५ % ◆ वर्गणीदारांसाठी सवलत ◆ पाच वर्षांना ३० %**

## 'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकास मिळालेले पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषद अ. स. गोखले स्मृत्यर्थ **'रत्नाकर पुरस्कार' २००९**

मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने **'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २००९**

**'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २०११**

रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्य नगरतर्फे

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०१०**


**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०११**


नंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय **'नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार २०१०'**


दिनमार्क पब्लिकेशनतर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१७'**


दिनमार्क पब्लिकेशनतर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१८'**














| ICICI Bank Ltd. | Account No. 777705292807 | IFSC/RTGS Code ICIC0006240 | SWIFT Code ICICINBBCTS | G Pay +91 94223 23039 |
|---|---|---|---|---|

Available on : Google Play Books | amazon kindle


भटक्या-विमुक्तांचे, मनाचा थरकाप उडविणारे, परिघाबाहेरचे जीवन, जातपंचायतीचे वाढते प्रस्थ, शासनाने केलेल्या उपाययोजना इ. ...भटक्या-विमुक्तांच्या जीवनावर टाकलेला संशोधनात्मक प्रकाश

# विमुक्तायन

लक्ष्मण माने

किंमत : ₹ ६६०

ebook available





भटक्या-विमुक्तांनी आंबेडकर नावाच्या निळ्या सूर्याला घातलेली काव्यरूपी आर्त साद

# क्रांतिपथ

लक्ष्मण माने

किंमत : ₹ १५०

ebook available





# महाभारतातील मिथकांशी दुर्गाबाईंचा संवाद!

डॉ. शोभा नाईक

संस्कृतीच्या स्वरूपाचं, अस्तित्वाचं, ऐतिहासिक वाटचालीचं, चारित्रिक घटकांच्या दबावांचं 'काव्यशास्त्र' शोधण्याच्या निकडीतून भारतीय विद्वानांनी प्राचीन साहित्याचं संशोधन हाती घेतलं. त्यातूनच मिथकशास्त्र ही अध्ययनशाखा त्यांनी समृद्ध केली. त्या विद्वान तत्त्वज्ञांमध्ये तेज:पुंज विदुषी म्हणून दुर्गा भागवत यांचं नाव प्रकर्षानं घ्यावं लागतं. भारतीय प्रज्ञेबरोबरच जागतिक पातळीवर भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांत, होणाऱ्या घडामोडींबाबत, दुर्गा भागवत यांनी मोठ्या आत्मविश्वासानं संचार केलेला आहे. त्यांचं बहुतांशी वैचारिक लेखन हे इंग्रजीतून आहे; पण मराठी संशोधन क्षेत्राला त्यांनी आपल्या व्यासंगशील व्यक्तिमत्त्वानं भारावून टाकलेलं आहे. त्यांचं लेखन अनेक नवनव्या दिशांनी युक्त आहे. भारतीय पौराणिक साहित्याची, लोकसाहित्य आणि विविध तत्त्वज्ञान शाखांची पाळंमुळं त्यांनी कोळून प्राशन केलेली आहेत.इ.स. १९१० ते २००० या आधुनिकतेचा घसघशीत उंबरठा देणाऱ्या महत्त्वाच्या संक्रमणकाळात दुर्गाबाई वावरल्या आहेत.रामायण, महाभारत तसेच दैवतं आणि भक्तिपंथ यांकडं पाहण्याचा एक चिकित्सक असा स्वतंत्र दृष्टिकोन त्यांनी प्रसृत केलेला आहे.

समाज, साहित्य, संस्कृती तसेच विविध कलाशाखांचं थक्क करायला लावणारं अध्ययन गाठीशी असल्यानं भ्रष्ट होऊ लागलेल्या भूमिकांवर वेळोवेळी त्यांनी धाडसी कोरडे ओढले होते हे आपल्याला ज्ञात आहेच. साहित्य ही स्वायत्त संस्था आहे, त्यावर राजकीय संस्थांनी दबाव आणण्याचा प्रयत्न करू नये, असे तर त्यांनी खडसावले होतेच; पण त्याचबरोबर साहित्याभिरुचीवर असलेला कालिदासी प्रभावही खणून काढायचा प्रयत्न त्यांनी केला होता.

'ललित वाङ्मयाचा घाट व काव्याचा सहजमधुर भाव संस्कृत काव्याच्या कालिदासी शौकिनांना इथे सापडणं दुरापास्त आहे. आणि दुर्दैवाने कालिदासी अभिरुची हीच आमच्या पुरातन संस्कृत काव्य वाङ्मयाची पारख करण्याची एकमेव मोजपट्टी ठरून गेल्यामुळे लालित्याच्या निकषाने - अभिजात सौंदर्यग्राहकतेच्या, कलात्मकतेच्या व वाङ्मयीन मूल्यांच्या निकषाने - महाभारतासारख्या अगडबंब, ओबडधोबड, उघडउघड अनेक हातांनी रचलेल्या, अनेक कालखंडांत विभागलेल्या कृतीचा आस्वाद तर राहोच; परंतु साधा परामर्शही घेणे साहित्याच्या व्यवहारी टीकेच्या चौकटीत बसण्यासारखे नव्हते.' या त्यांच्या म्हणण्यातून या प्रकारच्या रूढझालेल्या मार्गामुळे होणारे नुकसान त्यांच्या लक्षात आलेले होते असे दिसते.

महाभारताच्या काव्यसमीक्षेचे प्रतिकूल अंग डावलल्यामुळे धोरणी तत्त्वज्ञ, पंडित आणि राजकारण्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी महाभारताचा अन्वयार्थ आपले वर्चस्व अबाधित ठेवेल असाच लावला हेही त्यांनी लक्षात घेतलेलं होतं.

निधड्या, नि:स्पृह, बाणेदार प्रवृत्तीच्या ज्ञानयोगिनी दुर्गाबाई यांनी महाभारतासारख्या भारतीय संवेदन व्यवहारातील कळीच्या मिथक कथांनी ठासून भरलेल्या ग्रंथाकडे 'कलाकृती या नात्यानं पाहण्याची समीक्षाशास्त्रीय वाट 'व्यासपर्व' तसंच अन्य ललित लेखांच्या माध्यमातून निर्माण करून ठेवली हे विशेष आहे. महाराष्ट्राच्या हृदयात रुजून फुललेल्या विठ्ठलभक्तीचे, माणुसकीच्या शांती व तृप्तीनं लहडलेले मराठीत आविष्कृत झालेल्या भारतीय तत्त्वज्ञानाचे मनोहारी पदर त्यांनी 'पैस'मध्ये अतिशय देखण्या रूपात उलगडत त्यात दडलेले सुंदर अन्वयार्थ जाणीव क्षेत्राला प्रदान केलेले आहेत. त्यांच्या विलक्षण विवेचन साधणाऱ्या अंतरंगात ठासून भरलेल्या निसर्गाच्या रंगारंगांची किमया पृष्ठभागावरही कशी अवतीर्ण होते त्याची रेखाटने आपल्या 'ऋतुचक्र'मधून प्रस्तुत केली आहेत. एकूण, स्वतंत्रता, विज्ञाननिष्ठा, सूक्ष्मता, कोमलता, डोळसता, सांदर्भिक घनता आदींच्या मुशीतून साहित्यातील मिथकांचं पुनर्वाचन किती परीनं निराळ्या आनंदाचं माप आपल्या पदरात टाकतं याचा प्रत्यय दुर्गा भागवत यांच्या लेखानावाटे येतो. बाईंनी मिथकांच्या आधारावर प्रस्तुत केलेल्या त्यांच्या ललित कलाकृतींमध्ये नवी व न्याय्य अनुमाने आपण पाहतो. मुळात दुर्गाबाई व्यासाच्या महाभारतातील चित्रित मिथकांचा संवेदनशील, मनोज्ञ अंतःकरणानं समाचार घेऊ लागतात. त्यातून पडणारे अनेक प्रश्न त्या मांडू लागतात. रूढार्थानं महाभारतातील पात्रे निमूटपणे जशी विचारात घेतली जातात तशी त्या नाही स्वीकारत. व्यासांशी दुर्गाबाईंचं विलक्षण मन वाद घालू लागतं.इथंच महाभारताच्या आकलनात नव्या ठिणगीचा स्फोट होत जातो. याचा प्रत्यय 'व्यासपर्व'मधील प्रत्येक लेखातून घेता येतो. एकूण दुर्गाबाईंनी मिथकांचं विवेचन करून भारतीय प्रज्ञा सतर्क बनवली आहे.

भारतीयच काय, पण जगातील सर्वच समाजांत मिथकीय परंपरा आढळतात. भारतीय मिथकीय परंपरेत वेद वाङ्मय, महाकाव्यं, पुराणं, आख्यायिका, दैवतकथा इ. गोष्टी मोडतात. त्यातून श्रद्धा - भक्ती, ठरावीक चारित्रिक घटक, संस्कृती, पारंपरिक समजुती, रूढी, विशिष्ट प्रतिमा - प्रतीकं, म्हणी - वाक्प्रचार इत्यादी सामावलेला भाषिक आविष्कार घडवला गेलेला आहे. जेवढी समाज संस्कृती प्राचीन तेवढी ती मिथकांनी समृद्ध असते. पौराणिक मिथकांतून समाजमानस आकार धारण करत असते. विश्वनाथ खैरे यांनी नमूद केल्याप्रमाणे आपल्याला जास्तीतजास्त प्राचीन काळापर्यंत पोहोचायचे असेल तर मिथ्य कथा हीच वाट आपलीशी करावी लागते. म्हणजेच मिथक समाजात तितके भिनलेले असते. डॉ. उषा पुरी विद्यावाचस्पती यांच्या भारतीय मिथक कोश यात नमूद आहे त्यानुसार प्रत्येक समाजाची वाटचाल रूढअर्थाच्या मिथकांपासूनच पण त्यांचेच पुन्हा नवनवीन अन्वर्थ शोधत कालक्रमण करत असते. म्हणजे मुळातील मिथकांना पुढची युगं विश्लेषणांची नवी झळाई प्रदान करत असतात, हेही अगदी बरोबर आहे. दुर्गा भागवत यांच्याबाबत याचा प्रत्यय येतो. ज्या- त्या युगानं स्वतंत्र असं जागरण कमावलेलंअसतं आणि ते जागरण मिथकांना नवी-नवी विश्लेषणाची वाट देत असतं. पुष्कळदा स्वतंत्र अशा नव्या शोधांना काही वेळेला समाजमान्यता प्राप्त होऊन त्यातून नवी मिथकेसुद्धा निर्माण होत असतात. या अर्थानं 'ऋतुचक्र' हे- सुद्धा एक नवं मिथक वाटू लागतं. प्राचीन मिथकांमध्ये उदाहरणार्थ 'पैस' आणि 'व्यासपर्व'मध्ये आढळतो तसा नूतन अन्वयार्थ शोधणं आणि स्वतंत्र अनुभवविश्वातून नवनवीन मिथके जन्माला घालणं हे मानवी समाजात अव्याहत स्वरूपात वास्तविक सुरू राहिलं पाहिजे. गतिशील वाटचाल असं त्यालाच तर म्हणता येईल. प्रत्येक युग हे नवं मिथक निर्माण करण्याइतकं नेहमीच आधुनिक असतं. शिवाय जुन्या मिथकांची प्रासंगिकताही लोपत नसते. सुदैवानं दुर्गा भागवत यांसारखी विदुषी निर्माण करणारं युग तर आपण प्रत्यक्षात अनुभवलेलं आहे. मोठ्या ताकदीनं भारतीय मिथकांचं पुनर्वाचन त्यांनी आपल्या व्यासंगातून कमवलेल्या स्वतंत्र दृष्टीतून केलेलं आहे व ते आपल्या समर्थ, चौफेर आकलने देणाऱ्या अप्रतिम ललित लेखांद्वारे प्रस्तुत केलेलं आहे.

वेद वाङ्मयाबरोबरच ब्राह्मण ग्रंथ, उपनिषदे, महाभारत, रामायण तसेच पुराणकथा, जातककथा, दैवतकथा, लोककथा इत्यादींनी भारतीय मिथकशास्त्र कमालीचं समृद्ध आहे. देशभरात अनेक अभ्यासकांनी त्यावर आपापलं संशोधन प्रस्तुत केलेलं आहे; पण वर म्हटल्याप्रमाणे त्या सर्वांमध्ये दुर्गा भागवत यांनी त्याबाबत दिलेलं योगदान विशेष आहे. भारतीय लोकसाहित्य, बौद्ध साहित्य, महाभारत, भक्तिसाहित्य, दैवतकथा आदींवर त्यांनी केलेलं विवेचन साक्षेपी, व्यासंगनिष्ठ, समाजशील तत्त्वज्ञान अधोरेखित करणारं आहे.पौराणिक व्यक्तिरेखांना मानवी व्यावहारिक पातळीवर उभं करणारं आहे. भारतीय मानसिकतेच्या काव्यात्मकतेचा ऐतिहासिक आढावा घेणारं ते आहे.

दुर्गाबाई यांचं महाभारतावरील लेखन 'व्यासपर्व' मधून इ.स. १९६२ साली प्रकाशित झालं.त्यामध्ये महाभारतातील प्रमुख पात्रांवरचे दहा लेख आहेत. कृष्ण, भीष्म, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, दुर्योधन, कर्ण, युधिष्ठीर, अर्जुन, विदुर आणि द्रौपदी या दहा व्यक्तिरेखांचा दुर्गाबाई आपल्या खास शैलीवाटे विचार प्रस्तुत करतात. कृष्णाला पूर्णपुरुष ही उपाधी त्यांनी शीर्षकातच दिलेली आहे. येथील प्रत्येक लेखाचं शीर्षक जरी आपण पाहिलं तरीही त्यांच्या पौराणिक व्यक्तिरेखांकडे पाहण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण दृष्टीची कल्पना स्पष्ट होईल. 'पूर्णपुरुष कृष्ण'याचबरोबर 'मोहरीतील ठिणगी,' 'कोंडलेलं क्षितिज,' 'व्यक्तिरेखा हरवलेला माणूस,' 'एकाकी,' 'परीकथेतून वास्तवाकडे,' 'मुक्त पथिक,' 'अश्रू हरवल्यावर,' 'माणसांत

विरलेला माणूस,' 'कामिनी' ही शीर्षकं आगळ्या विवेचनाची साक्ष पटवतील. अलौकिक, अद्‌भुतरम्य पातळीवरील समजल्या जाणाऱ्या या पात्रांच्या अनुभवविश्वांना इथं सामान्य लौकिक जीवनानुभूतीची कोंदणं मिळत असलेली दिसतील.

दुर्गाबाई यांची महाभारताकडे पाहण्याची दृष्टीच अनवट आहे. लहानपणापासूनच सभोवतालानं अंतरंगात या पुराणकथा ओतलेल्या होत्याच; पण मोठेपणी सुरुवातीला संदर्भशोध या हेतूनं त्या अधूनमधून गरजेनुसार महाभारत धुंडाळत असत; पण हळूहळू त्यांना त्या कृतीच्या मानवी संवेद्याच्या काव्यमय गुंतावळी ध्यानी येत गेल्या. आणि जरी तिच्या कर्त्यानं त्याला एक इतिहास म्हटलेलं असलं तरीही त्यांनी महाभारताकडे एक श्रेष्ठ कलाकृती म्हणून पाहायला सुरुवात केली. त्यातून साकारत गेलेल्या त्यांच्या विवेचनानंतर वाचकांच्या दृष्टीस महाभारतातील नवे आयाम दिसू लागले. रूढार्थ मागे पडू लागले. त्यांना छेद जाऊ लागले. नवनव्या संवेदनव्यवहारांना त्यांनी बळकटी प्रदान केली.

महाभारताच्या कर्त्यानेच त्याला इतिहास म्हटल्यामुळे प्राचीन इतिहासाच्या सर्व शाखांचा वेध अभ्यासक त्यातून घेत आहेत, हे दुर्गाबाईंनी लक्षात घेतलेलं होतं. राजकीय, सामाजिक, भौगोलिक, वांशिक, भाषिक याबरोबरच धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान यांसह चरित्रेतिहास अशा अनेकानेक फांद्या या पुराणग्रंथाच्या आधाराने विद्वानांनी मिळवल्या, हे त्यांना दिसत होतं. शेकडो दृष्टीतून महाभारतावर विद्वान प्रकाश टाकत होते. तसं होणं अतिशय महत्त्वाचं होतंच; पण इतकं करूनही त्यामधून महाभारताच्या विलोभनीय अंतरंगाचं दर्शन घडलं असं होत नाहीय हे दुर्गाबाईंनी हेरलेलं होतं. त्यातूनच सामर्थ्यपूर्ण व सौंदर्यशाली असा महाभारताचा काव्यात्म गाभा त्यांना अस्वस्थ करत होता. कथेचा प्रबळ ओघ आणि व्यक्तिरेखांचं विलक्षण विशाल असं भारतीय परिमाण यात महाभारताच्या सामर्थ्याचा निर्वाळा असल्याचं त्यांनी लक्षात घेतलं. या सामर्थ्याबरोबरच त्याच्या त्या कठीण कवचाच्या अंतर्यामी अतिशय सूक्ष्म असा अभेद्य असा कोमलतेचा कंद, लालित्यमय काव्यात्मक स्वरूपात भरून राहिला आहे हे दुर्गाबाईंना दिसू लागलं. भव्य दगडी मूर्तीच्या तोंडावर जी कोवळ्या मानवी भावाची छटा दिसते, तीच कोवळी छटा या नाट्यपूर्ण, अतिविशाल कथेच्या अंगप्रत्यंगात भरलेली आहे, हे दुर्गाबाईंनी स्वतः अधोरेखित केलं. महाभारत हे गहन विद्यारण्य आहे. त्यात मानवी स्पंदनांची एकूणएक रूपे आढळतात. तिथे यौगिक भूमिका आहे. विदग्ध ज्ञानाचे भांडार आहे. मानवी व्यवहाराची जटिलता आहे. दैवगतीची मनाला थरकवणारी वक्रता आहे. त्यामध्ये विलक्षण गुंतागुंतीची गुंफण आहे. त्यामुळे वेगवेगळ्या व्यक्तींनी वेगवेगळ्या काळी, वेगवेगळ्या धोरणांनी त्याचा उलगडा केलेला आहे, हे पक्कं जाणत असलेल्या जोडून घेतो. व्यासानं जरी त्याला इतिहास असं संबोधलेलं असलं आणि ठरावीक सश्रद्ध आकलनंच लोकांवर ठसवली गेलेली असली तरीही महाभारताच्या पटात एक स्वतंत्र असा अवकाश दडलेला आहे. वास्तविक, तेच तर त्या कृतीचं आगळंवेगळं सौंदर्य असं म्हणता येतं. तेच काव्यात्म सौंदर्य मनात साठवत दुर्गाबाईंनी पात्रे आणि कथावकाश यांना मुक्त कंठ मिळवून दिला.

दुर्गा भागवत यांचे 'व्यासपर्व'मधील लेख म्हणजे त्यांनी केलेलं ते महाभारतावरील चिकित्सक विश्लेषण होय. एखाद्या विषयाच्या प्रांतात शिरताना त्याचा संपूर्ण मागोवा कसा घ्यायचा त्याचं त्या उदाहरण होत.स्वतःची भूमिका कमवत असताना महाभारताच्याच संदर्भातून विचार करताना त्यांनी महाभारताकडे अन्य विद्वानांनी, साहित्यिकांनी कोणकोणत्या दृष्टीतून पाहिलेलं आहे हे लक्षात घेतलेलं होतं. स्वतःची वेगळी भूमिका मांडताना आधी अन्य भूमिका कशा मांडल्या गेल्या ते समजून घेण्याची आस्था त्यांनी राखलेली होती.

भगवत्‌गीतेला धर्मग्रंथाचं स्थान आहे.अनेकांनी महाभारताकडे भगवत्‌गीतेचे कोंदण म्हणून पाहिले आहे. भारतात सुरू झालेल्या युयुत्सु राष्ट्रवादात महाभारत हे त्याच्या नावामुळेही भारतीय राष्ट्रवादाचे प्रतीक बनून बसले. गोपालनंदन यांच्याकडून उपनिषदांचे नवनीत गीतेत भरले गेले. शंकराचार्य यांनी सर्वप्रथम तिचे उद्‌गान केले. ज्ञानेश्वर यांनाही गीतेतच आपले स्फूर्तिक्षेत्र व जीवनक्षेत्र सापडले. आपापल्या परीने लोकांनी तिच्यात ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, अनासक्तीयोग शोधले. जसा यंत्रयुगाचा ताण वाढत गेला तशी गीता अधिकाधिक निकडीची म्हणून प्रसिद्ध झाली. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांच्या भयावह परिणामांतून मानवतेच्या पायाखालची वाळू सरकत निघालेली असताना अमर श्रद्धास्थाने शोधताना ज्ञानवंतांची या काळात कशी भयानक तडफड सुरू झाली याचीही नोंद दुर्गाबाईंनी दिलेली आहे. गीतेचे महत्त्व वाढत जाण्यामागची कारणमीमांसा त्यांनी याप्रकारे केलेली दिसते.

एकीकडे विनाश आणि दुसरीकडे समृद्धी यांनी संस्कृती गिळंकृत करायला सुरुवात केल्यावर अशा विपत्तीच्या वेळी पौराणिक महाभारतातील महायुद्धाच्या संदर्भातून घडवलेले दर्शन मार्गदर्शक वाटणे स्वाभाविक होते, असे त्यांनी अधोरेखित करून ठेवलेले आहे. त्यांनी आविष्कृत केलेल्या या सर्व चिंतनावरून विनाश आणि समृद्धी हातात हात घालून अवतरलेली ही अवस्था, हे प्राक्तन हाताळण्यासाठी, मार्गदर्शक सूत्रे धुंडण्यासाठी दुर्गाबाईसुद्धा कटिबद्ध झाल्याप्रमाणेच आपल्यावरील जबाबदारी पार पाडतात हे स्पष्ट आहे. राजघराण्याची विपत्तीजनक कथा आणि त्याच्या परिणामांतून उद्‌भवणारी सामाजिक अस्वस्थता या साऱ्याच्याच भानातून महाभारतातील व्यासांच्या प्रतिभेनं साकारलेलं मानवी

प्रज्ञाप्रवाहाचं आगळं दर्शन त्यांनी कमालीच्या सूक्ष्मतेनं ओंजळीत घेतलेलं आहे. मानवी मनोव्यापार आणि धर्मग्रंथांचा उद्भव यांच्यातील परस्पर संबंधांची वीण दुर्गाबाईंच्या रसज्ञ अंतःकरणानं स्वतःपुढ्यात उलगडून घेतलेली होती. गीता हा ग्रंथ मार्गदर्शन करणारा श्रेष्ठ धर्मग्रंथ कोणत्या कारणांनी ठरलेला आहे, हे त्यांना स्पष्ट झालेले होते.त्यामुळे याप्रकारे कौरव-पांडवांच्या कथेचे व त्यातील अन्य कथांचे उन्नयन होऊन गेले हे त्यांनी नोंदवून ठेवले. महाभारतातील दैवी बनून गेलेल्या पात्रांचे वस्तुनिष्ठतेने विवेचन त्यांनी केले हे विशेष आहे. त्यांच्या विवेचनामागची तत्कालीन सांदर्भिकता कशी काम करते ते पाहणे खरोखर उद्बोधक आहे. दुर्गाबाईंसारख्या संवेदनशील, नि:स्पृह, बाणेदार व्यक्तिमनात उठलेला परिस्थितिजन्य गदारोळ जाब विचारणारच! त्यामुळे आपल्या मनातील अपेक्षित वर्तन त्या-त्या व्यक्तिरेखांकडून का घडत नाही, घटनांचा तो-तो ओघ कथानकाला का लाभत नाही, असे प्रश्न त्यांच्या संवेदनशील व प्रतिभासंपन्न मनात उपस्थित होऊ लागतात. या कारणाने त्यांचा व्यासाशी विसंवाद उद्भवत जातो.सर्वांना दैवत वाटणारा श्रीकृष्ण त्यांना पूर्णपुरुष वाटतो. गुरू द्रोणाचार्य एक विफल व्यक्ती वाटतो. त्या विफलतेत अश्वत्थाम्याचे क्षितीज कोंडलेले वाटते. व्यासाच्या महाभारतात एकलव्यासाठी कोणती जागा होती, असाही त्यांना प्रश्न पडतो. त्याच्यासारख्यासाठी व्यासानी महाभारत नाहीच लिहिलेले. ते थोरांसाठी लिहिलेले कसे आहे हे खुद्द राजघराण्याचा गुरू असणारा द्रोणच दाखवून देतोय हे त्यांना दिसते! द्रोण आणि एकलव्य या कथेतून बाहेर पडू पाहणारे हे कुरूप सत्य झाकण्यासाठी व्यासाने केलेला बराच आटापिटा दुर्गाबाईंच्या नजरेतून सुटत नाही. व्याधाचे तत्त्वज्ञान पुढे ठेवण्यामागचे हे कारण त्यांनी स्पष्ट केले आहे.व्यासाचा हा एकलव्य स्वतःवर झालेल्या अन्यायाची तक्रारसुद्धा करताना दिसू नये याची नोंद त्यांनी घेतली. एखाद्या सामान्य दरिद्री ब्राह्मणाचे अनुभवविश्व उलगडावे तसे दुर्गाबाई व्यासाच्या द्रोणावर भाष्य करत जातात. व्यासाने लपवू बघितलेली सामान्य स्तरावरील गहन अनुभवांची उमटलेली चित्रे दुर्गाबाई आपल्या ओंजळीत घेऊन निरखू लागतात; पण त्यांच्या या सर्व संवादातून एकूण जीवनातील अटळ स्वरूपाच्या संघर्षांच्या कथा व्यासाला मांडायच्या होत्या हे त्यांनी चिमटीत पकडलेले महत्त्वपूर्ण तत्त्व आहे. व्यासाच्या महान प्रतिभेचे दिपवून टाकणारे सौंदर्यच दुर्गाबाईंनी या संवादी वादातून आपल्याला दर्शवले आहे.महाभारताची कथा व त्यामधील व्यक्तिरेखांचे अस्तित्व हे कसे व किती मोकळे पीठ आहे (व्यास - पीठ) व त्या मोकळ्या आकलनात व मांडणीच्या मोकळेपणातच तर खरे तुडुंब काव्यसौंदर्य ओतप्रोत भरलेले आहे. या तऱ्हेनं दुर्गाबाई यांनी आपल्या वाचकाला कायमस्वरूपी उपकृत करून ठेवलेलं आहे! 'व्यासपीठा'चा मोकळेपणा त्यांनी अलंकृत करून ठेवला आहे.

दुर्गा भागवत यांचं महाभारतातील व्यक्तिरेखनपर ललितलेखन म्हणजे व्यासाचं त्यांनी केलेलं पुनर्वाचन आहे. त्यांनी प्रस्तुत केलेल्या वाचनाच्या या मोकळ्या वाटा म्हणजे स्वातंत्र्याचा खुला आणि श्रेष्ठ आविष्कार आहे.कोणत्याही पारंपरिक, विशिष्ट भूमिकेत न अडकलेला हा आविष्कार असल्यानं तो महनीय आहे. आणि तो दुर्गाबाईंचा असल्याने चिंतनीय आहे. भीष्म ही कुरूवंशातील ज्येष्ठ व्यक्ती.ज्येष्ठापुढे तरुणांनी मान झुकवूनच राहायचं या पारंपरिक संस्काराला हलकेच बाजूला सारत त्याच्या मर्यादा दुर्गाबाईंनी दाखवून टाकल्या आहेत. व्यासांनी त्यांचं मरण रेंगाळत ठेवलं आणि उगीचच त्याच्या तोंडी शान्तिपर्वातील भाकडकथा टाकल्या असं वाटलेलं स्पष्टपणानं व्यासाला त्यांनी ऐकवलं आहे. मोक्षधर्म, राजधर्म यांचं भारूड रचताना त्यानं गणराज्याची व स्त्रियांची केलेली निंदा खटकल्याचं त्यांनी सांगितलं आहे. गणराज्यानुसार आपल्या संघांची रचना करणारा गौतम बुद्ध आणि गणराज्याची निंदा करणारा व्यासाचा भीष्म यांच्यात तुलना करून बुद्ध अधिक उन्नयन झालेला असल्याचं अधोरेखित केलं आहे.

महाभारतातील व्यक्तिरेखांचं आणि कथानकाचं वस्तुनिष्ठ आकलन मांडताना दुर्गाबाई पात्रांच्या स्वभावांच्या बैठकी अचूक हेरतात. ही सर्व पात्रं आपापल्या स्वभावानुसारच वागताहेत. सगळी हट्टी मुलंच आहेत जणू! निर्घृण व्यावहारिकपटुता म्हणजे कृष्ण, प्रतिज्ञापूर्तीचा कैफ म्हणजे भीष्म, कौरवांवर जळकू तो भीम, अर्जुन लढाऊ. चिंतन म्हणजे युधिष्ठीर, खंत म्हणजे कुंती, रूपाभिमान आणि त्रागा म्हणजे द्रौपदी तर द्वेष म्हणजे दुर्योधन आणि पीळ म्हणजे कर्ण. दुसऱ्यात स्वतःला पाहतो तो विदुर. आपले स्वभाव बदलू न शकणाऱ्या, वैविध्यानं भरलेल्या या व्यक्तिरेखांना; समाजात प्रतिष्ठा पावलेल्या नीतिमूल्यांचे अंकुश दाखवून तारण्याचा प्रयत्न व्यासानी केलेला असल्याचं दुर्गाबाई लक्षात घेतात आणि त्याच आधारावर त्या इथं हाताला घेतलेली तत्त्वज्ञानाची चौकटही तपासू लागतात तेव्हा झंकारणाऱ्या कृष्णवाणीचं सौभाग्य महाभारताला सुश्राव्य करतंय हे त्यांच्या लक्षात येतं. संसारातील दुःखतत्त्व, असारतेच्या परिसीमेवर पोहोचलेली दुर्धरता प्रकट करणारं महाभारत शोकात्मतेचं भान केंद्रस्थानी घेणारी ही संस्कृतमधील अपवादात्मक कृती आहे. आणि ती कृती दुर्गाबाईंनी अपवादात्मक पद्धतीनेच तपासू बघितली आहे. मूळ मानवी स्वभावाहून भिन्न अशा आदर्शांचं अस्तित्व व्यासप्रतिभेला कसं मान्य नाही, व्यासाला अपेक्षित असलेली करुणा, शोक वाल्मिकीच्या करुणा आणि शोकाहून कशी भिन्न आहे ते जाणून दुर्गाबाईंनी आपल्या व्यासपर्वात व्यक्तिरेखांशी मनमुक्त संवाद साधलेला आहे.

त्यांनी केलेलं कृष्णाचं विवेचन मुळातून पाहण्यासारखं आहे. अगदी प्रेमात आहेत बाई कृष्णाच्या. एकीकडं पूर्णपुरुष

आणि दुसरीकडं अनासक्त योगेश्वर म्हणतात त्याला. मुलगा, सवंगडी, भाऊ, वादक, प्रियकर, योद्धा, पती, राजा, राजकारणपटू, वक्ता, तत्त्वज्ञ या सर्व भूमिका रससिद्ध करणारा; पण शेवटी एक साधा माणूस हेच अस्तित्व रुजवणारा आहे हा कृष्ण. त्याचं सामान्य माणूसपण आतून विशाल जगात वावरणाऱ्या दुर्गाबाईंनी ख्रिस्त आणि बुद्ध यांच्याशी जोडून पाहिलेलं आहे. दुर्योधनाच्या हरवलेल्या व्यक्तिरेखेचा त्यांनी केलेला विचारसुद्धा मुळातून सविस्तर समजून घ्यावा असाच आहे. कोणतीही व्यक्ती घडते ती तिला प्राप्त झालेल्या पर्यावरणातून. दुर्योधन ही निष्पत्ती आहे ती त्याच्या अपंग माता-पिता आणि बालपणी त्याला सदा घाबरवणारा, चेतवणारा बाल भीमसेन व स्वतः दुर्योधनाचे बालमन यांची. वय वाढेल तसे ही बाल्यावस्था मागं पडायला हवी होती. त्याप्रमाणे भीम ती मागे टाकून पुढे गेला; पण दुर्योधनाला मात्र ते जमले नाही असं त्या नोंदवतात. आई-बापाची अपंग मने परिणाम साधत असतात व्यक्तिमनांवर याचं हे दुर्गाबाईंचं अधोरेखन अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

विलक्षण मानी पण लीन अशा कर्णाच्या संदर्भातील निसर्गदत्त सौंदर्य आणि निसर्गदत्त कौतुक याबाबतची मनात जागलेली हळहळ याकडे त्यांनी वेधलेलं लक्ष वाचकाला अंतर्यामी अस्वस्थ करून टाकतं. कर्ण, भीम, द्रौपदी या व्यक्तिरेखा दुर्गाबाईंना अत्यंत सुस्पष्ट आणि ललित व्यक्तिरेखा वाटतात. त्यात दुभंगलेल्या अर्जुनाचा थोडासा समावेश करता येईल असंही त्या म्हणतात. द्रौपदीला त्या 'कामिनी' असंच संबोधतात. स्त्रीजातीचं सनातन तेज आणि दौर्बल्य तिच्या रूपात व्यास मनोज्ञतेनं कसं रेखाटतात त्यावर प्रकाश टाकतात.नितांतसुंदर अशा रमणीदेहाचं वेष्टन लाभलेली अशांतता म्हणजे ही द्रौपदी. वाऱ्याच्या झोतामुळे फडफडणारी ज्योत. वारा ओसरला की विझून शांत. एरवी महाभारत घडलं ते स्त्रियांमुळे असा सर्वसामान्य प्रवाद; पण महाभारतातील नाट्य भाऊबंदकीच्या द्वेषातून निघालेलं आहे, ते नायिकेच्या प्राप्तीच्या स्पर्धेतून नव्हे, असं दुर्गाबाई स्पष्ट करतात. पांडवांची एकी टिकावी यासाठी तिला पाच भावांची पत्नी बनवलेलं आहे. व्यासानं तिची बाल्यावस्था न दाखवता एकदम यौवनात तिला जन्माला घातलं यातून त्यानं स्त्रीच्या असंकीर्ण मत्त यौवनाचं एक उत्कृष्ट प्रतीक तिच्या रूपात साकारून दाखवलं आहे. अशा द्रौपदीची पाच पुरुषांची पत्नी असणं, तिला वाटणारी कृष्णाची ओढ, कर्णावर पाकुळणारं मन या घटकांचे परंपरेनं लावलेले अर्थ बाईंनी अधोरेखित केले आहेत. वनवासात भेटायला आलेल्या कृष्णापुढे आपली व्यथा वैतागून मांडताना आपल्याला कोणीही नाही; पती नाहीत, पुत्र, आप्त, भाऊ, बाप नाहीत आणि तूही कृष्णा नाहीस या तिच्या उद्‌गारात कृष्णाविषयीची तिची प्रकटलेली अननुभूत भावना याबाबत त्यांनी विचार केलेला आहे. प्रिया, सुंदरी, पतिव्रता आणि पंडिता अशा चार भूमिकांत व्यास तिचं चित्रण करतात. तिच्या अंतरंगातली नटण्याची हौस वनवासातही ताजी राहते. तिला सहस्रदली कमळांची इच्छा होताच ती आणण्यासाठी भीम धावलेला असतो. व्यास तिला दूरची कमनीय नायिका बनवतात. सीता, सावित्रीप्रमाणे तिचा संस्कार भारतीय नारी जीवनावर उमटू नये, तिच्यातील विलक्षण शारीर चैतन्यमय स्रोत, तिची कमनीयता प्रेरक वाटू नये याचं भान व्यासानं कसं राखलेलं आहे त्याचीही चिकित्सा दुर्गाबाई करतात.

याप्रकारे दुर्गाबाईंनी संवाद साधलेल्या महाभारतातील व्यासचित्रित व्यक्तिरेखा वाचकांच्या मनात सतत नवनव्या संवेदनांचा उत्कट आविष्कार साधत राहतील.मिथकीय पातळीवरील या व्यक्तिरेखा म्हणजेच या रूढप्रवृत्ती सदैव मानवी जीवनातील सांप्रदायिकता आणि नित्य नूतनतेच्या आकर्षणातील प्रासंगिकता यांचा समतोल साधत राहतील, नवनव्या आशयांनी युक्त होत, व्यक्तिमत्त्वाचं अधिकाधिक विकसन साधत पुढं चालत राहतील असं वाटतं.


◆◆◆

मी गालिब बोलतोय...!

मानवी भावभावनांना शब्दांचं कोंदण देणाऱ्या युगकवीचा जीवनप्रवास, त्यानं सांगितला असता अगदी तसाच...

शब्बीर रोमानी
किंमत : ₹ ३००

ebook available



राजकारणाने केला बापूचा आणि त्याच्या कुटुंबाचा घात... 'प्रकाशपुत्रा'ने मात्र दाखवली सुमाला वाट... ज्वलंत विषयावरचं ज्वलंत नाटक.

# प्रकाशपुत्र

लक्ष्मण माने

किंमत : ₹ १४०

ebook available




शिक्षणाचा प्रवाह आमच्यापासून लांब... प्रवाहापर्यंत पोचलं तरी भाकरीची मारामार... का करायचं मग शिकून?

# का करायचं शिकून?

लक्ष्मण माने

किंमत : ₹ १६०

ebook available



लोकसाहित्याचा विचार सुरू झाला की ओव्या, गवळण, भारूड, उखाणे आणि लोककथांपासूनचं सगळं मौखिक लोकवाङ्मय नजरेसमोर येतं. तशीच काही नावंही समोर येतात. ज्यात पहिलं नाव असतं सरोजिनी कृष्णराव बाबर यांचं. लोकवाङ्मय म्हणजे लोकजीवनाचा समृद्ध आविष्कार. लोकसाहित्याचा एक मुख्य भाग. यात लोकसंस्कृतीला आणि लोकमानसाला जसं महत्त्व दिलेलं असतं, तसंच आपली संस्कृती संपन्न आणि समृद्ध करणाऱ्या मौखिक वाङ्मयालादेखील तितकंच महत्त्व दिलेलं असतं. हे मौखिक लोकसंचित संकलित करण्यासाठी उभी हयात खर्ची घातलेल्या सरोजिनीआक्का. गेल्या शतकातल्या एका कर्त्या सुधारकाच्या, सत्यशोधकी चळवळीत काम करणाऱ्या कृष्णराव भाऊराव बाबर यांच्या कन्या. सांगली जिल्ह्यातल्या बागणी या गावच्या. याच कामात व्यग्र असताना त्या राजकारणातही गेल्या. विधिमंडळाच्या आणि राज्यसभेच्या सदस्यही झाल्या; पण जनमानसात त्यांची ओळख राहिली ती 'लोकसाहित्याच्या संकलक' म्हणूनच.

एका सत्यशोधकी घरातला त्यांचा जन्म १९२२चा. वडील समाजसेवक आणि चळवळीचे कृतिशील कार्यकर्ते. त्यामुळं तो वारसा आक्कांना लाभलेला. त्या काळात कृष्णराव बाबरांनी आपल्या या लेकीला एम. ए. पीएच.डी. केलेलं.



त्यावेळच्या मराठा समाजात तर ते अद्‌भुतच म्हणायला हवं. सरोजिनीआक्कांना शिक्षकही तसेच तोलामोलाचे लाभले. नंतर त्या सहवासात आल्या ते दत्तो वामन पोतदार, पांडुरंग सदाशिव साने आणि नरसिंह चिंतामण केळकर यांच्या. या सगळ्यांबरोबरच त्या सामाजिक आणि राजकीय चळवळीतही सहभागी झाल्या होत्या. तिथं त्यांना सहवास लाभला तो क्रांतिसिंह नाना रामचंद्र पाटील, यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे आणि वसंतदादा पाटील यांचा.


सरोजिनीआक्कांची ही जडणघडण सुरू असतानाच त्या लोकसाहित्याकडे वळल्या. अशा लोकसंचिताचं संकलन, अभ्यास आणि संशोधन हेच त्यांचं ध्येय झालं. ते पुढं आयुष्यभर त्यांना पुरलं. त्यांनी जमा केलेलं ते लोकधन म्हणजे मराठी साहित्यातील अपूर्व लेणीच. आजही ती काळावर मात करून जनमानसात टिकून आहेत. आजच्या काळातही त्यांच्या अनेक ग्रंथांमधून आणि पुस्तकांतून ती आपल्या हाती लागतात. दसरा-दिवाळी, श्रावण-भाद्रपद, राजविलासी केवडा, जनलोकांचा सामवेद, कुलदैवत, भांगतुरा, एक होता राजा, भोंडला भुलाबाई... किती नावं सांगावीत? हे सारं धन आपल्या हाती दिलं ते त्यांच्याच अध्यक्षतेखाली असलेल्या 'महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती'नं. याशिवाय सरोजिनीआक्कांनी आपली लेखणी चालवली ती वडिलांनी चालवलेल्या 'समाजशिक्षण माले'तून. या 'माले'च्या तर त्या पाहिल्या अंकापासूनच्या संपादकच होत्या. मालेतील छोट्या-छोट्या पुस्तिकांमधून असं बरंच लोकधन त्यांनी जनसामान्यांच्या पदरात ओतलं. आता 'समाजशिक्षण माले'चे ते अंक नजरेसही पडत नाहीत. अभ्यासकांची मोठी अडचण होते. सांगली आकाशवाणीचे निवृत्त कार्यक्रम अधिकारी संजय पाटील आणि मी, 'माले'चे बहुतेक अंक मिळवून आता नव्या माध्यमात सुरक्षित करून ठेवले आहेत. अजूनही आम्ही अशा साहित्याचा शोध घेतच आहोत. हाती आलेलं ते साहित्य नुसतं पाहिलं तरी छाती दडपून जाते. सरोजिनीआक्कांनी करून ठेवलेल्या कामाला मनापासून दंडवत घालावासा वाटतो.


सरोजिनीआक्का लोकसाहित्याच्या या कामामुळं सर्वदूर गेल्या; पण त्या घराघरांत पोहोचल्या ते दूरदर्शनच्या 'सह्याद्री' वाहिनीवरील एका कार्यक्रमामुळं. कवयित्री शान्ता शेळके आणि सरोजिनीआक्का यांच्या गप्पांची ती 'रानजाई' आणि तिचा गंध इथल्या घरांच्या सोप्या-अंगणात दरवळला. सरोजिनीआक्का नव्या पिढीच्या आदराचा आणि कौतुकाचा विषय ठरल्या. त्यांनी म्हटलेली लोकगीतं आणि त्या गीतांवर त्यांनी केलेलं भाष्य यामुळं घराघरातल्या आयाबायांना ही 'आक्का' आपली वाटू लागली. अधिकच जवळची झाली. जणू तिनं त्यांच्या काळजातच घर केलं.

# लोकसाहित्याचा ठसठशीत दागिना : सरोजिनीआक्का

सदानंद कदम
















कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणप्रसाराचा वसा घेतलेले कृष्णराव भाऊराव बाबर हे खरे ज्ञानोपासक. त्यांनी आपल्या सगळ्या लेकींना लोकमत झुगारून देत शिक्षण दिलं आणि त्यांच्या लेकींनीही आपल्या वडिलांना दिलेला शब्द पाळला. आपलं सारं आयुष्य समाजकार्याला आणि लोकसाहित्य संकलनाला वाहिलं. स्वातंत्र्यचळवळीत काम करत असताना 'दिलेला शब्द' म्हणून सरोजिनीआक्का आयुष्यभर अविवाहित राहिल्या. आपल्या आवडीचं काम आणि 'समाजशिक्षण माला' हेच आपलं जगणं केलं. आपल्या आवडत्या विषयावर अशी अव्यभिचारी निष्ठा असलेली माणसं आता नजरेस तर पडत नाहीतच; पण अशी माणसं गेल्या पिढीत होती, यावर हल्ली कुणाचा विश्वासही बसत नाही. सरोजिनीआक्का तशाच होत्या. एखाद्या ठसठशीत घडीव दागिन्यासारख्या.



पुण्यातल्या 'जवाहर'मध्ये एकदा त्यांना भेटायला गेलो होतो. जन्मभर देशकार्यासाठी आणि लोकसाहित्याच्या संकलनासाठी धडपडलेला तो जीव तेव्हा अंथरुणावर झोपून होता. बोलणं तसं झालंच नाही. चार-दोन वाक्यांचा संवाद झाला असेल-नसेल. मराठमोळ्या शब्दांत बोलणाऱ्या सरोजिनीआक्कांना तसं पाहणंही जीवावर आलेलं. मी काढता पाय घेतला. सरोजिनीआक्का मनात रुतून राहिल्या त्या कायमच्या.

सरोजिनीआक्कांच्या हातून मोठं काम झालं ते लोकसाहित्याच्या संकलनाचं. त्याला शासनाचं पाठबळही लाभलं. हे लोकसाहित्य म्हणजे आदिसंतांनी, रानावनात राहणाऱ्या बाया-बापड्यांनी लावलेलं रोपटंच. आज त्या रोपट्याला अनेक धुमारे फुटलेले दिसतात. लोकगीतं, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, ओव्या, भराडी, गोंधळ गीतं, पोतराज गीतं... अशा अनेक फांद्यांनी 'लोकसाहित्या'चा तो वटवृक्ष आज बहरलेला दिसतो. तो अक्षय्य आहे. चिरंतन आहे. बदलत्या काळानुसार आणि संकेतांनुसार त्याचं बाह्यरूप जरी बदलत असलं तरी मूळ धागा टिकून आहे. तो कधी बदलत नाही आणि बदलणारही नाही. हे सारं लोकधन सरोजिनीआक्कांनी जपून आणलं आणि आपल्या पुढ्यात ठेवलं. त्यांच्यानंतर त्याचा अभ्यास आणि विश्लेषण करण्याची जबाबदारी पुढच्या पिढीतील अभ्यासकांनी पेलली; अगदी समर्थपणे. यात अग्रेसर राहिल्या दुर्गा भागवत, रामचंद्र चिंतामण ढेरे आणि तारा भवाळकर. सरोजिनीआक्का लोकसाहित्याच्या 'जाणत्या संकलक' तर ही मंडळी त्या लोकधनाचे 'अभ्यासू विश्लेषक' ठरले.

सरोजिनीआक्कांनी लोकगीतं जमवली आणि त्यांच्या चालीही आत्मसात केल्या. मौखिक परंपरेनं जपलेली ही सारी लोकगीतं म्हणजे अशिक्षितांची भावगीतंच होती, असं त्यांनी म्हटलं आहे. त्या लिहितात, 'विविध प्रकारांच्या जातिवंत स्वर-विलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षांमागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान्‌पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे ते भावगीत होय. हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसांच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्तीच.' हाल सातवाहनांच्या, पहिल्या शतकातल्या 'गाथा सप्तशती'कडं पाहिलं, की त्यांचं हे म्हणणं पटतं. लोकगीतांची ती अनेक शतकांपासूनची परंपरा सरोजिनीआक्कांनी आपल्या पुढ्यात आणून सोडली. अगदी अलवारपणे. त्याच्या मूळच्या रूप-गंधासह.

सरोजिनीआक्कांनी जशा जात्यावरच्या ओव्या गोळा केल्या, तशीच इतर स्त्रीगीतंही जमवली. त्यांचा 'मराठीतील स्त्रीधन' हा ग्रंथ प्रसिद्धच आहे. यात जशी खेळाची गाणी आहेत, तशीच लग्नातली आणि मंगळागौरीचीही आहेत. कुळाचार आहेत, तसेच उखाणेही आहेत. डोहाळे, पाळणा, माजघरातली गाणी, कौटुंबिक जीवनावरची आणि देवादिकांची गाणी यांची नुसती रेलचेल आहे. खरंतर 'उखाणे' हा लोकवाङ्मयातील एक ठसठशीत दागिनाच; पण आता तो

कानावर पडणंही मुश्कील झालंय. या उखाण्यांनी मराठी भावजीवनच नव्हे तर मराठी भाषेलाही सौंदर्य बहाल केलंय, समृद्ध केलंय. सरोजिनीआक्कांनी जमवलेले उखाणे वाचले की, लक्षात येतं ते आपल्या मराठी भाषेचं सौंदर्य आणि तिची समृद्धता. केवळ उखाण्यातल्याच नव्हे तर लोकसाहित्यात वाचायला मिळणाऱ्या अनेक शब्दांचे अर्थ लावणंही आज कठीण होतं. हे ओळखून सरोजिनीआक्कांनी 'लोकसाहित्याचा शब्दकोश'च तयार केला आहे. त्यांचं हे काम तर खूपच मोठं आहे; पण तितकंच ते आज दुर्लक्षित आहे. हा शब्दकोश केवळ लोकसाहित्यात आलेल्या शब्दांचे अर्थच देत नाही, तर तो शब्द पहिल्यांदा कुणी आणि कुठं वापरला, कोणत्या ओवीत, अभंगात किंवा लोकगीतात वापरला त्याची अवतरणंही देतो. अशा प्रकारचा हा पहिलाच आणि एकमेव शब्दकोश असावा; पण तो आज नजरेसही पडत नाही.

सरोजिनीआक्कांनी या महाराष्ट्रातली जणू मातीच उपसली होती. या मराठमोळ्या मातीतून निर्माण झालेलं लोकधन आपल्या पुढ्यात आणलं. त्याचे अनेक खंड प्रकाशित केले; पण ते आज दुर्मिळ झाले आहेत. त्यांचा चक्क काळाबाजार सुरू आहे. माझ्या माहितीतले एक जुने ग्रंथविक्रेते आहेत. ते सरोजिनीआक्कांच्या पुस्तकाच्या 'झेरॉक्स प्रती' काढून विकतात. त्याचे इतके पैसे उकळतात की, वाटतं प्रत्यक्षात सरोजिनीआक्कांनाही मानधनापोटी तेवढी रक्कम मिळाली नसेल. अभ्यासकांची होणारी ही लूट थांबावी म्हणून सरोजिनीआक्कांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांनी जमवलेलं हे सारं लोकधन पुनर्प्रकाशित व्हावं, शासनानं ते करावं म्हणून संजय पाटील यांनी खूप प्रयत्न केले. अनेकांना निवेदनं दिली; पण आश्वासनांशिवाय काहीच पदरात पडलं नाही. या साऱ्या संचितावर हक्क 'लोकसाहित्य समिती'चा का 'साहित्य संस्कृती मंडळा'चा या वादात ते घोंगडं भिजत पडलं आहे म्हणे.

सरोजिनीआक्कांनी हे सारं केलं त्याला कारण ठरले त्यांच्या घरातून झालेले संस्कार. लोकपरंपरेचे ते संस्कार म्हणजे एका अर्थानं त्यांचं लोकसांस्कृतिक भरणपोषणच होतं. त्यांनी केलेलं सगळंच लेखन 'स्त्री' आणि 'लोकसंस्कृती' केंद्रस्थानी असलेलं आहे. त्यांच्या सगळ्याच लेखनात लोकसंस्कृतीत असणारी स्त्री दिसते. सामाजिक परिस्थितीमुळे त्या स्त्रीजीवनावर असलेली बंधनं दिसतात. पारंपरिक स्त्रीजीवनाचं चित्रण आणि त्यांच्या जगण्यातला विसंवाद दाखविण्याबरोबरच त्यांनी संस्कारशील असा आदर्शवादही लोकांसमोर ठेवला. त्या सगळ्यांतून दिसते ती त्यांची भारतीय संस्कृतीविषयीची ओढ, आस्था आणि परंपरेवरचं प्रेम. या सगळ्यांशी प्रामाणिक राहून त्यांनी जीवनाचा आस्वाद घेतला आणि त्याचा आविष्कार आपल्या सगळ्या लेखनातून केला. त्यातून काही शाश्वत जीवनमूल्यं समाजजीवनात रुजवण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजाचं प्रतिनिधित्व करत समाजाला जागं ठेवण्याचं काम केलं. त्यासाठी लोकसाहित्याबरोबरच 'समाजशिक्षण माले'चा उपयोग केला. खेड्यापाड्यातील जनमानसाचा देखणा बाज लोकमानसासमोर आणून ठेवला; तोही अगदी मानानं आणि बैजवार!

माणसाच्या आदिम काळापासून उगम पावलेला आणि अव्याहत चालत आलेला लोकसंस्कृतीचा तो प्रवाह आपल्यापर्यंत आणून सोडणाऱ्या या सरोजिनी कृष्णराव बाबर. त्यांनी संकलित केलेल्या लोकधनामुळंच मराठी माणसाला आपल्या संस्कृतीचं आणि परंपरेचं दर्शन झालं. त्या संस्कृतीचा आस्वाद आणि आनंद घेता आला. नाहीतर ही समृद्ध मौखिक परंपरा काळाच्या उदरात कधीच गडप झाली असती. 'आमची मराठी ही अभिजात भाषा आहे,' असं म्हणण्याला काही आधारच राहिला नसता. सरोजिनीआक्कांनी हे सगळं संचित गोळा केलं, शब्दबद्ध केलं आणि 'लोकसाहित्य समिती'च्या माध्यमातून आपल्या हाती सोपवलं. बहुजनांच्या मुखातली ती मौक्तिकं केवळ मराठी भाषेलाच नव्हे तर, मराठी माणसालाही समृद्ध करून गेली. आजच्या अभ्यासकांनाही ती तशीच समृद्ध करून सोडतात.

एखादा जडावाचा दागिना अंगावर घातला, की लावण्यवतीचं लावण्य खुलून उठतं. तशाच या सरोजिनीआक्का म्हणजे मायमराठीचा जडावाचा घडीव जिन्नसच... तोही अगदी ठसठशीत.

◆◆◆



# रा. चिं. ढेरे लोकसंस्कृतीचा वस्तुनिष्ठ भाष्यकार

डॉ. रमेश जाधव

डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे या महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीच्या भाष्यकाराच्या नावावर आजमितीला जे शंभरहून अधिक ग्रंथ जमा आहेत, त्यापैकी सुमारे पन्नास ग्रंथ ही त्यांची स्वतंत्र निर्मिती आहे. हे सर्व स्वतंत्र ग्रंथ आणि त्यांची सर्व संपादने यामध्ये अभिजनांची संस्कृती आणि बहुजनांची लोकसंस्कृती यांच्यातील अनुबंध शोधून अवघा मराठी समाज गुण्यागोविंद्याने एकत्रित राहील-नांदेल, हाच ध्यास घेऊन त्यांची मांडणी केलेली आढळते. म्हणून ते आपल्या ‘भारतीय रंगभूमीच्या शोधात’ या प्रसिद्ध ग्रंथात मोठ्या विनयाने सांगतात, ‘धर्म, कला आणि संस्कृतीची इतर अंगे अभ्यासताना आपल्याला असे सतत जाणवत राहते, की इथे लोकपरंपरा आणि अभिजनांची विदग्ध परंपरा यांची निरंतर देवाण-घेवाण चालू आहे. विदग्ध परंपरा लोकपरंपरेतून उदय पावतात. उत्क्रांत होतात आणि लोकपरंपराही विदग्ध संस्कार स्वीकारत राहतात. आपल्या सांस्कृतिक जीवनात हजारो वर्षांपासून सातत्याने चालू असलेल्या या प्रक्रियेचे भान ठेवून जर आपण आपल्या देव-देवतांचा, व्रतोत्सवांचा, यात्रा-जत्रांचा, विधिविधानांचा, श्रद्धा-संकेतांचा आणि या सर्वांच्या साहचर्याने संचारणाऱ्या कला-क्रीडांचा आस्थेने अभ्यास चालू ठेवला तर



आपल्या प्रदीर्घ परंपरेतील अनेक कूटांवर आपण अद्भुत प्रकाश टाकू शकतो नि अज्ञाताची अनेक दालने प्रकाशित करू शकतो. हे भान अभ्यासकाने सतत जागे ठेवले की, त्याची अध्ययनदृष्टी आपोआपच बहुमुखी होत जाते, अनेक ज्ञानशाखांचा समन्वय साधून सत्यशोधनाकडे झेप घेते आणि (विशेषज्ञांच्या परिभाषेत सांगायचे झाले तर) धर्म-कलादी संस्कृतीच्या अंगाचे समाजशास्त्र मांडायला सहज समर्थ बनते.'

मराठी लोकसंस्कृतीमधील एकात्मता साधणे हाच केवळ डॉ. ढेरे यांचा ध्यास नाही. 'भारत की मौलिक एकता' सारखा अभिजात ग्रंथ लिहिणारे आणि वेद, पुराणे, भारतीय लोकभाषांमधील साहित्यमूर्ती विज्ञान, समाजशास्त्र, इतिहास लोकसंस्कृती इत्यादी विषयांना आपल्या लेखणीचा परिसस्पर्श करणारे डॉ. वासुदेव शरण अग्रवाल हा आधुनिक व्यास त्यांचे श्रद्धास्थान आणि प्रेरणास्थान होते. त्यामुळे डॉ. ढेरे भारतीय समाजाची जडणघडण म्हणजे या देशातील आदितम संस्कृती, द्रविडांची सिंधू संस्कृती आणि आर्यांची वैदिक संस्कृती यांच्यातील प्रदीर्घ काळ चालू असणारी सांस्कृतिक आदान-प्रदानाची प्रक्रिया आहे, हे मत सातत्याने मांडत आहेत. याचा अर्थ मराठी लोकसंस्कृतीच्या एकात्मतेचा ध्यास असणाऱ्या डॉ. ढेरे यांना भारतीय समाजाच्या एकात्मतेचीही तितकीच ओढ आहे.

'लौकिक आणि अलौकिक' या आपल्या छोट्याशा ग्रंथात ते 'निषादांची देणगी' या लेखात भारतीय आदिवासींचे भारतीय संस्कृतीमधील योगदान स्पष्ट करतात. बहुसंख्य भारतीयांना धर्महृद्य वाटणाऱ्या गंगामाईचे 'गंगा' हे नाव निषादांच्या आदिवासींच्या भाषेतील 'खोंग' किंवा 'किआंग' या सर्वनामापासून घेतले आहे. त्या दोन्ही शब्दांचा निषाद भाषेत 'नदी' असा अर्थ आहे, हे ते ठामपणाने सांगतात.

त्याचप्रमाणे वीस या संख्येने मोजण्याची प्रथाही निषादांचीच होय. अजूनही खेड्यापाड्यांतून तीच प्रथा आहे. मराठीतील 'अठरा विश्वे दारिद्र्य' हा वाक्प्रचार त्या गणनापद्धतीचा एक अपभ्रष्ट आविष्कार आहे. 'अठरा विसा' चुकून 'अठरा विश्वे' झाले. 'अठरा विसा' म्हणजे १८x२०= ३६० दिवस. म्हणजेच वर्षातील सर्व दिवस दारिद्र्य. भातशेती, नारळ, केळी, नागवेल, सुपारी, हळद, वांगी यांची लागवड; हत्ती माणसाळविणे किंवा कोंबड्या पाळणे या सर्वच गोष्टी हे आदिवासींचे भारतीय संस्कृतीमधील महत्त्वाचे योगदान आहे. डॉ. ढेरे यांचे हे विवेचन वाचले की, भारतीय समाजाच्या विविधतेतील एकतेचा उलगडा होण्यास विलंब लागत नाही.

**महाराष्ट्राचा देव्हारा**

अभिजन परंपरा आणि लोकपरंपरा यांचा समन्वय साधणे हाच डॉ. ढेरे यांचा सदैव ध्यास असल्यामुळे पुणे विद्यापीठाच्या साहित्यसम्राट न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमालेत दिनांक- १३ ते १६ डिसेंबर-१९७६ या दिवशी जी चार संशोधनात्मक लिखित स्वरूपातील व्याख्याने त्यांनी दिली





त्यामध्येही ते याच विचारांचा 'जागर' करताना दिसतात. तो त्यांच्याच प्रासादिक भाषेत वाचणे अधिक उद्‌बोधक ठरेल. ते लिहितात, 'मराठी संत हे प्राधान्याने सामाजिक विषमतेने पीडित बनलेल्या वर्गातून उदयास आले होते, किंवा त्या विषमतेची बोच ज्यांच्या विवेकवृत्तीत निर्माण झाली आहे, अशा अपवादभूत व्यक्तींपैकी होते. समाजाचं धुरीणत्व ज्यांच्याकडे होते ते बहुतांना दूर लोटत होते. हा शूद्र आहे, हा पतित आहे. हा अतिशूद्र आहे, हा अस्पृश्य आहे, अशी नाना बिरुदं बहाल करून बहुतांश समाजाला त्यांनी आत्मोद्धाराच्या आत्मविश्वासापासून वंचित केलं होतं. अशा विषमताग्रस्त समाजाला अशा एका विराट मातेची आंतरिक ओढलागून राहिली होती, की जी सर्वांना समानतेने जवळ घेईल. जी कुणाला दुष्ट म्हणून दूर लोटणार नाही. सर्वांचा स्वीकार करणारी, सर्वांना सावरणारी अन् सर्वांना वात्सल्याची समान सावली देणारी, सर्वांना सावरणारी अन् सर्वांना तारणारी अशी माता ही समूहमनाची आंतरिक गरज बनली होती.' वत्सल मातेविषयीच्या या आंतरिक ओढीतूनच संतांनी विठ्ठलाचं चरित्र घडवलं आहे. वैदिक परंपरेशी स्थूल संबंध राखणारा अन् अवैदिक परंपरांशी आपलं काही नातं नाही, असे भासवणारा संतांचा विठ्ठल अंतरंगदृष्ट्या मात्र बुद्धाच्या करुणेने भारलेला आहे. संतांना गवसलेला हा लोकप्रिय लोकदेव आपल्यात अनेक साधनप्रवाहांचा महासमन्वय साधीत राहिला असला तरी तो सत्याची असाधारण प्रतिष्ठा वाढवणारा आहे, हिंसेचा ठाव पुसणारा आहे अन् करुणेचा महासागर आहे. बुद्धाच्या हृदयधर्माशी जवळीक साधणारं त्याचं हे अंतरंग वत्सल मातृत्वाशी समरूप असल्यामुळे तो पुरुष असूनही संतांनी त्यालाच 'माउली' मानलं अन् स्त्री-पुरुष भिन्नतेच्या पलीकडे असणारं परिपूर्ण आदिमातृत्व त्याच्या ठायी उत्कटतेने अनुभवलं.'

### श्री विठ्ठल : एक महासमन्वय

'श्री विठ्ठल : एक महासमन्वय' हा डॉ. ढेरे यांचा गेल्या अर्धशतकातील संशोधनकार्याचा जणू कळस ठरावा. संस्कृत पुराणे, संतसाहित्य, दैवतशास्त्र, पुराणशास्त्र, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र इ. विविध शास्त्रांचा समन्वय साधत त्यांनी गेली आठ शतके मराठी लोकमानसावर अभूतपूर्व आणि अखंड मोहिनी टाकणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा जो शोध घेतला तो केवळ अद्‌भुत आणि अपूर्व मानावा लागेल. संतांपासून ते सामान्यांपर्यंत पंढरीचा विठोबा नेहमीच जिव्हाळ्याचा आणि जिज्ञासेचा विषय होऊन राहिला आहे. संत आणि सामान्यांना पंढरीच्या प्रभूबाबत जो जिव्हाळा वाटतो तो योग्यच आहे, हे तर डॉ. ढेरे यांचा हा अपूर्व ग्रंथ पटवून देईलच; परंतु त्या सावळ्या ब्रह्माबाबत जे अनेक प्रकारचे प्रश्न उभे राहतात किंवा शंका निर्माण होतात त्यांची समर्पक उत्तरे आणि निर्विवाद निरसन करण्याचे प्रचंड सामर्थ्य या 'ग्रंथराजा'च्या ठायी आहे, हे त्या ग्रंथाचे समग्र वाचन केल्यावर लक्षात येते. मग माझ्यासारख्या समाजशास्त्राच्या अभ्यासकाला पंढरीचा हा राणा विठ्ठल डॉ. इरावती कर्वे यांच्यासारख्या विदुषीचा बॉयफ्रेंड का झाला, तो त्यांना सदैव पालवीत का होता, या प्रश्नांची उत्तरे मिळण्यास विलंब लागत नाही.

डॉ. ढेरे यांच्या या ग्रंथाचे नावच मुळी 'श्री विठ्ठल : एक समन्वय' असे आहे. त्यामुळे त्यांच्या एकूण संशोधनकार्याचे अभिजन संस्कृती आणि बहुजन संस्कृतीमधील एकात्मतेचा मागोवा घेणे हे जे मध्यवर्ती सूत्र आहे, त्याची प्रचिती या ग्रंथाच्या प्रत्येक पानापानावर येते. त्यांचा हा बृहद् शोधप्रकल्प सुमारे पाच वर्षे चालू होता... त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांत अनेक शोधयात्रा केल्या. त्या शोधयात्रेत कधी अगदी निर्जल एकादशीचा त्यांना अनुभव आला, तर काही वेळा चुरमुरे-फुटाणे खात आणि वाटेवरील बस स्टॅन्डचे 'विश्रांतिधाम' करीत हा संशोधनवेडा अवलिया भटकत राहिला. त्यासाठी शेकडो शोधसाधने संकलित केली. त्यामधून हा अभिजात 'ग्रंथराज' आकाराला आला.

सामाजिक शास्त्रात संशोधकाच्या ठायी असणारी स्वसमूह श्रेष्ठतावादाची कमी-जास्त प्रमाणातील प्रवृत्ती आणि त्याचे व्यक्तिगत हितसंबंध हे दोन मोठे अडथळे संशोधनातील वस्तुनिष्ठतेबाबत येत असतातच; परंतु तिसरा एक प्रमुख अडथळा असतो तो म्हणजे सनातन मूलभूतवादी व्यक्तीचे सामाजिक परिवर्तनाच्या नेहमीच आडवे येणे हा असतो. या सर्वच अडथळ्यांवर डॉ. ढेरे यांनी आपल्या साक्षेपी आणि सहनशील या गुणांच्या आधारावर मात केली. त्यामुळेच पंढरपूरच्या मंदिरात सध्या जी विठ्ठलमूर्ती आहे, ती मूळची नसून मूळ मूर्ती सध्या 'माढा' या गावी असणाऱ्या मंदिरात आहे, हे ते ठामपणे सांगतात. हे कटू सत्य त्यांनी सांगितल्यामुळे त्यांच्यावर मारेकरी घालण्याचा प्रयत्न झाला. जाहीर सभांमधून त्यांना निमंत्रित करून त्यांचा अपमान करण्यात आला; परंतु या समन्वयवादी, सत्शील संशोधकाने हे अप्रतिष्ठेचे, अपमानाचे जहर सहज पचवून टाकले आहे. एकीकडे 'श्री विठ्ठल : एक समन्वय' या त्यांच्या 'ग्रंथराजा'ला सनातन्यांचा विरोध होत असताना दुसरीकडे त्याच 'ग्रंथराजा'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभून महाराष्ट्राच्या साहित्यिक विश्वात अपरंपार गौरव होत होता.

### लोकसंस्कृतीचा आधारवड

महाराष्ट्रातील अभिजनवर्ग बहुजनांच्या लोकसंस्कृतीचा जोपर्यंत आदर करीत नाही, त्या संस्कृतीकडे आपलेपणाच्या भावनेतून पाहत नाही, तोपर्यंत महाराष्ट्राच्या सर्वांगीण

विकासाची प्रक्रिया गतिमान होऊच शकणार नाही. या विचारांचा सदैव जागर हेच डॉ. ढेरे यांच्या संशोधनाचे आणि एकूण व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी सूत्र आहे. त्यामुळेच ते संतसाहित्य आणि लोकसाहित्य यांचा अनुबंध शोधत असताना संतसाहित्याची निर्मिती दलित साहित्याला कशी अनुकूल ठरली, पोषक ठरली याचे सुंदर, लक्षवेधी विवेचन ते आपल्या 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य' या प्रसिद्ध ग्रंथात करतात. विख्यात साहित्य समीक्षक आणि दलित साहित्याचे सहृदयी भाष्यकार प्रा. रा. ग. जाधव यांच्या मतांचा आधार घेत हे विवेचन ते करतात. संतांनी आपल्या साहित्यनिर्मितीत 'मूळचा झरा' जपला. कोणतीही कृत्रिम बंधने त्यांनी लादून घेतली नाहीत. साहित्यसौंदर्याचे पूर्वसिद्ध नमुने त्यांनी नाकारले. तिसरी गोष्ट, त्यांनी भगवद्‌गीता, रामायण, महाभारत इत्यादी ग्रंथांचा आपणास हवा तसा उपयोग करून घेतला. चौथी गोष्ट, आपले साहित्य समाजाला देत असताना त्यांनी कधी आपलेपणाने तर कधी रागावून समाजाला विश्वासात घेतले. आणि पाचवी गोष्ट, संतांनी हे सर्व करीत असताना एकाकी जीवन जगण्याची अपूर्व जिद्द दाखविली. संतसाहित्याची ही पंचशील तत्त्वे दलित साहित्याने स्वीकारली तर ही चळवळ अधिक वेग घेईल आणि खऱ्या अर्थाने लोकसाहित्याची चळवळ होईल, असा त्यांचा ठाम विश्वास आहे.

'लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा' हा डॉ. ढेरे यांचा ग्रंथ प्रत्येक वाचकाने वाचलाच पाहिजे, असे वाटते; परंतु समाजशास्त्राच्या अभ्यासकाने त्याची पारायणे करावीत अशा योग्यतेचा हा ग्रंथ आहे. या ग्रंथात ते इतिहासाचार्य राजवाड्यांच्या लोकसाहित्य अभ्यासाचा थोडक्यात मागोवा घेतात. वि. का. राजवाडे हे तर त्यांचे एक प्रभावी आणि प्रेरणादायी श्रद्धास्थान होय. डॉ. अशोक कामत यांच्यासारखा संत अभ्यासक, वि. का. राजवाडे यांच्या संतसाहित्य खंडाच्या प्रस्तावनेत डॉ. ढेरे हे राजवाडे यांचे कसे निस्सीम भक्त आहेत हे सांगून त्यांनीच आपणास इतिहासाचार्य राजवाडे यांच्या संशोधनकर्तृत्वाची आदरणीय बाजू कशी दाखवून दिली, हे प्रांजळपणे मान्य करतो. याच ग्रंथात ते मराठीमधील शिव्यांचा व समाजशास्त्रीय संदर्भांचा उलगडा करून दाखवतात. दुसरीकडे 'साने गुरुजींचे स्त्रीजीवन' या लेखात साने गुरुजींनी संकलित केलेल्या स्त्री जीवनविषयक ओव्यांवर प्रकाश टाकतात.

'लज्जागौरी' हा डॉ. ढेरे या अलौकिक शक्तीचे म्हणजेच या विश्वाला असणारे ईश्वराच्या अधिष्ठानाचे अस्तित्व श्रद्धापूर्वक स्वीकारणाऱ्या सत्शील आणि पापभीरू संशोधकाचा एक अत्यंत धाडसी ग्रंथ होय. 'लज्जागौरी' म्हणजे स्त्रीयोनीरूप देवता होय. पृथ्वी किंवा भूमातेच्याठायी असणाऱ्या सर्जनशीलतेची ही प्रतीकात्मक पूजा होय. 'लज्जागौरी' ही मातृदेवी आहे, महामाता आहे. ती स्त्रीच्या लैंगिकतेची पूजा नसून तिचे मातृत्व सन्मानित करण्याचे ते अपूर्व कर्तव्य आहे; परंतु ही पूजा बांधत असताना डॉ. ढेऱ्यांसारखा पापभीरू संशोधक आपली अपराधीपणाची जाणीव लपवू शकलेला नाही, हे जरी सनातनी टीकाकारांनी लक्षात घेतले असते तरी त्यांच्याकडून अप्रत्यक्षरीत्या का होईना, लोकसंस्कृतीचा आदर केला गेला असता.

लोकसंस्कृतीचे चिंतन, मनन आणि त्यासंबंधीचे संशोधनात्मक लेखन ही तर डॉ. ढेरे यांची देवदत्त प्रवृत्ती आणि प्रकृती असावी, असे सतत वाटत राहते. आतापर्यंत गावगाड्याबाहेरील लोकसंस्कृतीचा कोणी कधी विचारच केला नव्हता. गावगाड्याबाहेरील जग हे पूर्ण दुर्लक्षित होते. कैकाडी समाजातील एका कार्यकर्त्याचे आत्मचरित्र प्रसिद्ध होताच 'या जगाचा आम्ही कधी विचार केला नव्हता,' अशी जाहीर कबुली यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या सुसंस्कृत लोकनेत्याला द्यावी लागली होती. १९९५ मध्ये त्रिं. ना अत्र्यांसारख्या ब्रिटिश प्रशासनातील मुलकी अधिकाऱ्याने 'गावगाडा' या ग्रंथात या समाजाचा विचार केलेला दिसतो; परंतु त्यांच्या विचारात गावगाड्याबाहेरील जगासंबंधी कमालीचा तिरस्कार आणि घृणा दिसते. प्रभाकर मांडे यांच्यासारखा एखादा अभ्यासक वगळता हे गावगाड्याबाहेरील जग कधी कोणी अभ्यासकाने आपल्या अध्ययन-संशोधनाच्या कक्षेत घेतलेच नव्हते; परंतु डॉ. ढेरे यांनी आपल्या 'लोकसंस्कृतीची क्षितिजे', 'लोकसंस्कृतीचे उपासक' आणि 'महामाया' या डॉ. तारा भवाळकर यांच्या सहयोगाने लिहिलेल्या ग्रंथात या गावागाड्याबाहेरील जगाचा साक्षेपी शोध घेतलेला आढळतो. डॉ. ढेरे सांगतात, 'लोकसंस्कृती आणि तिच्या उपासकांचा परिचय घडवून देण्यात उपचाराची अलिप्तता नसून, जिव्हाळ्याची जवळीक आहे.' 'दान पावलं दान पावलं... पंढरपुरात इठ्ठोबा रायाला' किंवा 'गोविंदारामा हो, गोपाळारामा जी जी' असा गजर करीत येणाऱ्या, मोरपिसाचा मुकुट घालणाऱ्या वासुदेवाच्या योगदानासंबंधी ते मोठ्या जिव्हाळ्याने सांगतात. 'या कृष्णकथांप्रमाणेच भक्तिमहिमा सांगण्यासाठीही वासुदेव अनेक कथागीते गात असतो. तो कधी 'तुळस वंदावी वंदावी' असा गृहिणींना संदेश देईल, तर कधी 'अवो जनाबाईच्या भक्तीत देव गुंतला' अशी त्या साध्याभोळ्या जनाबाईच्या भक्तविजयाची गाथा आळवील. कधी चांगुणेच्या सत्त्वपरीक्षेची गाथा गाईल, तर कधी कबीराच्या अद्‌भुत आतिथ्यशीलतेची कहाणी सांगेल.'

असा हा लोकसंस्कृतीचा व्रतस्थ संशोधक बहुजनांच्या सर्वच सामाजिक चळवळींकडे मोठ्या आस्थेने आणि अपेक्षेने पाहत होता. त्यामुळे 'वज्रसूची'सारखे जातिभेद निर्मूलनावर प्रहार करणारे त्याला पालवीत राहतात. महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ त्यांच्या चिंतनाचा विषय होऊन राहते. शाहू छत्रपतींच्या अस्सल कागदपत्रांचे खंड त्यांना लोकराजा

शाहू छत्रपतींच्या जीवनकार्याचा वेगळ्या दिशेने अभ्यास करण्यासाठी आव्हान देत राहतात. इतकेच नव्हे तर 'शिखर शिंगणापूरचा श्री शंभू महादेव' या ग्रंथात ते शिवछत्रपतींचा कुलस्वामी श्री शंभू महादेव आणि शिखर क्षेत्रात त्याची प्रतिष्ठापना करणारे भोसले घराणे यांच्या दक्षिण संबंधाची शोधकथा सादर करतात. त्यांचा हा ग्रंथ अधिक उत्पातक्षम ठरला. चहूबाजूंनी त्यांच्यावर प्रहार झाला.


त्यांच्यावर अनेक Below the Belt (कमरेखालील वार) झाले. वसंत पळशीकरांसारख्या संशोधकांनी ढेरे सरांचे हे संशोधन पूर्णपणे अमान्य केले; परंतु ढेरे सरांनीच या ग्रंथाच्या प्रस्तावनेत अतिशय नम्रपणाने लिहून ठेवले आहे-'संशोधक-अभ्यासक-लेखक हा कोणी लौकिक अर्थाने शास्ता नसतो. त्याचे म्हणणे-लिहिणे म्हणजे राजाज्ञा नव्हे, त्याचमुळे मी येथे अखंड केलेले पूर्वग्रह हेच परमसत्य आहे, असे मानणाऱ्या सर्व क्षेत्रांतील सांप्रदायिकांचे श्रद्धास्वातंत्र्य अबाधितच आहे. माझ्या लिहिण्यामुळे ते त्यांनी सोडावे, असे मी कसे सांगेन?' ढेरे सरांची ही भूमिका जाणकार वाचक आणि सुज्ञ टीकाकारांनी लक्षात घेतली की, या ग्रंथाची उत्पातक्षमता संपण्यास विलंब लागणार नाही, असे प्रांजळपणे वाटते.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे किंवा ज्ञानकोशकार केतकर यांच्यासारख्या अभ्यासकांचे संशोधन साधनांचे संकलन करण्यात खूप वेळ काळ व्यतीत झाला. त्यामुळे त्यांच्या साहित्यनिर्मितीवर प्रतिकूल परिणाम झाला; परंतु डॉ. ढेरे या ग्रंथवेड्या अभ्यासकाकडे आजमितीला सुमारे ४०हजार ग्रंथ आहेत, नियतकालिकांचे तीन हजारांवर बांधीव खंड आहेत. त्यांचा हा अपूर्व ग्रंथसंग्रह पाहण्याची संधी मला अनेकवेळा लाभलेली आहे.

अशा या लोकसंस्कृतीच्या आधारवडाची सावली गेली २५ वर्षे मी उपभोगत होतो. त्यांच्या नव्या नव्या ग्रंथांच्या जिव्हाळापूर्ण भेटी या ज्ञानदेवांचा 'प्रसाद' म्हणून भक्तिभावाने स्वीकारत होतो. आपल्या परिवारातील एखाद्या लेखकाचे नवे पुस्तक प्रसिद्ध होत असताना त्यांना होणारा आनंद आणि वाटणारा अभिमान याची प्रचिती मी घेतली आहे. त्यांचे अकृत्रिम प्रेम आणि प्रेरणा यांचा लाभ हे मी माझे परमभाग्य मानतो. म्हणूनच ज्या लोकराजा शाहू छत्रपतींनी अभिजन संस्कृतीने आपला वर्णवर्चस्वाचा अहंकार टाकून देऊन बहुजन संस्कृतीला आपले म्हणावे, यासाठी स्वत:चे राज्यच नव्हे तर प्राणदेखील पणाला लावले, त्या लोकराजा शाहू छत्रपतींचे चरित्र सांगणारा माझा ग्रंथ डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे या ज्ञानमहर्षीला अर्पण करून त्यांच्याविषयीची जाहीर कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मी घेतली होती; कारण डॉ. ढेरे यांनी अभिजनांना बहुजनांच्या लोकसंस्कृतीकडे पाहण्याची नवी दृष्टी प्राप्त व्हावी, यासाठी आयुष्यभर जी धडपड चालविली होती ती केवळ अपूर्व आणि अजोड होती.

◆◆◆


महादेव मोरे यांची नवीन पुस्तके




सामाजिक, राजकीय, मानसिक विसंगती...
विनोदाच्या शिडकाव्याने उडतात
हास्याची कारंजी


तिंगाड

किंमत : ₹ २६०

स्त्री-पुरुष संबंधांचं
उकळतं रसायन ते
शीतल संवेदन...
एका लेखकाच्या
जीवनाचा भन्नाट प्रवास

प्रवाह

किंमत : ₹ ३००




ebook available


सर्वच चवी जिभेवर रेंगाळत ठेवणारी,
साऱ्या कुटुंबाची हवीहवीशी सखी...



# रुचिरा


भाग १ व २

## कमलाबाई ओगले




५३वी आवृत्ती

किंमत : ₹ ३९५




२३वी आवृत्ती

किंमत : ₹ २७५



# लोकसाहित्यातून लोकजागर

प्रा. सुहास निर्गुण



*झिजवते टाचा रोज... खोलवर काचा रोज...*
*रांधा वाढा उष्टी काढा, तालावर नाचा रोज...*
*रोज नवे रंग फासूनी हासतेस दुःखावर*
*स्वप्न रोज तासून तू ठेवतेस गाडाभर*
*जीव तुझा भात्यापरी रोज होई खाली-वर*
*ठिणगीला भिडणारी आग रं...*
*बाईपण भारी देवा.. बाईपण भारी रं...*

आजच्या घडीला सर्वत्र गाजत असलेलं कवी वलय मुळगुंद यांचे 'बाईपण भारी देवा' या चित्रपटातील हे गीत लोकसंगीताच्या ढंगाने पुढे जाणारे आणि लोकसाहित्याची पताका अखंड फडकत ठेवणारे म्हणून प्रातिनिधिक ठरते.

लोकसाहित्य लोकजीवनाच्या सर्वच भौतिक आणि अ-भौतिक संस्कृतीचे दर्शन घडवत असते. लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी हे दाखवून दिले आहे. मुळात समाजातल्या अनेक घटनाच साहित्याला खाद्य पुरवत असतात. लोकजीवनात जे-जे येते, त्या सर्वांचा समावेश लोकसंस्कृतीत, पर्यायाने लोकसाहित्यात होत असतो. मग स्त्रीच्या वेदना असोत, वृद्धांच्या समस्या असोत की मनुष्य पारतंत्र्यात असो, त्याला व्यक्त होण्यासाठी पहिला आधार हा शब्दांचाच घ्यावा

लागतो. तो शब्द प्रथम त्या-त्या प्रदेशातल्या बोली भाषेचा असतो आणि यातूनच मग लोकसाहित्याची निर्मिती होते. त्यामुळेच लोकसाहित्यात येणाऱ्या कल्पना, श्रद्धा, मिथके ही त्या-त्या समाजातील, लोकजीवनातीलच असतात.

**लोकरंजन आणि प्रबोधनही**

मुळात लोकसाहित्य मौखिक परंपरेने चालत आलेले असते. वर्षानुवर्षे मानवी अनुभवाचं सार सांगणारे असते. लोकजीवनाचा व लोकसंस्कृतीचा आविष्कार घडविणारे असते. ग्रामीण बोली भाषेचा सहजतेने वापर करणारे असते. लोककलांचा आश्रय घेऊन लोकरंजन करीत, लोकशिक्षण, लोकजागृती व लोकप्रबोधन करीत असते व त्यातूनच संस्कृतीचे सातत्य टिकवत असते.

**लोकशाहिरांचे योगदान**

लोकसाहित्यामध्ये खरी भर घातली ती लोकशाहिरांनी. यामध्ये शाहीर अमर शेख हे अग्रणी मानले जातात. त्याचबरोबर शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर विठ्ठल उमप, शाहीर साबळे, तसेच वेसावकर मंडळी अशी कितीतरी नावं घेता येतात. समाजातील त्या- त्या वेळच्या अनिष्ट सामाजिक-राजकीय परिस्थितीच्या विरोधात या शाहिरांनी रान उठवले आणि लोकसाहित्यात मोलाची भर घातली. खरंतर संत एकनाथ महाराज हे या सर्वांचे आद्यगुरू. त्यांचे 'विंचू चावला' हे भारूड आजच्या घडीचेही प्रतिनिधित्व करते. त्यामुळे लोकगीतं स्थलकालाच्या पलीकडची आहेत, असेच म्हणावे लागते. लोकसाहित्यात पद्याचा जरी वापर जास्त केला गेला तरी गद्याचे महत्त्व नाकारता येत नाही.

**लोकजीवन व्यापणारी लोकगीते**

मंगळागौर, भोंडले अशा धार्मिक- सामाजिक सण-समारंभापुरते मर्यादित राहिलेले लोकसाहित्य व लोककला या शाहिरांनी मुख्य साहित्याच्या जवळ आणले.

लोकसाहित्यात लोकगीते, लोकनाट्य, लोककथा, लोकरूढी, देव-देवता, जाती-जमाती, लोकश्रद्धा, लोकपरंपरा, समजुती, लोककला अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. यामध्ये लोकगीते ही प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर असलेली आणि तेवढीच समृद्ध आणि संपन्न आहेत. लोकगीते म्हणजेच लोकसाहित्य असे म्हटले तरी वावगे ठरू नये, इतक्या विपुल प्रमाणात लोकगीते आहेत. त्यातही स्त्री-लोकगीतांचा भरणा मोठ्या प्रमाणात आहे. पारंपरिक लोकजीवनाचे एकही अंग असे नाही की ज्यावर लोकगीत निर्माण झालेले नाही. लोकगीतांनी समग्र लोकजीवनच व्यापून टाकलेले आहे.

**स्त्रियांच्या जगण्याचे प्रतिबिंब**

स्त्री-गीतांत लोकमहाकाव्य, कथागीते, गाणी, ओव्या, पाळणागीते, सण-समारंभाची गाणी, फेराची गाणी, देव-देवतांची गाणी, अंगाईगीते, बडबडगीते, नृत्य- खेळगीते असे अनेक प्रकार आढळतात. स्त्री-गीतांमध्ये स्त्रियांच्या जगण्याचे संपूर्ण प्रतिबिंब दिसते. संपूर्ण दिनचर्या, लग्न, मंगळागौर, सासुरवास, लग्नाची मागणी- बोलणी, लग्नातील गाणी, डोहाळे जेवण, मुलांचा जन्म, सणसमारंभ, घरातील कामे, स्त्रियांचे कष्ट अशा साऱ्या प्रसंगांचे दर्शन स्त्री-गीतांतून घडते. स्त्री-गीते ही परंपरेने चालत आलेली असल्यामुळे ती सर्वकालिक आहेत. स्थलकालानुरूप बदलण्याची लवचिकताही आहे. स्त्री-गीतांत लोकमानसातील संकेत व्यक्त होतात.

**प्रदेशानुरूप बदल**

लोकसाहित्यातील संदर्भ प्रदेशानुरूप बदलत असतात. त्या-त्या ठिकाणच्या रूढी, प्रथा, परंपरांचा अंतर्भाव त्यात होत असतो. विशिष्ट ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीशी साधर्म्य दाखवत असतात. उदाहरणार्थ, कोळीगीते ही कोकणातील पार्श्वभूमीवर आधारित, त्यांच्या व्यवसायाशी, धार्मिक शब्दांशी निगडित असतात.

लोकनाट्य हा लोकसाहित्याचा एक प्रकार मानला जातो. वसंत सबनीस यांचे 'विच्छा माझी पुरी करा', दादू इंदुरीकर यांचे 'गाढवाचं लग्न' इत्यादी लोकनाट्यांनी तर इतिहास निर्माण केला आहे. मच्छिंद्र कांबळी यांनी त्यांच्या 'वस्त्रहरण' या नाटकातून मालवणी भाषेला मुख्य प्रवाहात आणले. त्यांची नाटके लोकनाट्याच्या धर्तीवरच आहेत.

कोकणात सादर होणाऱ्या दशावतारी नाटकाची लिखित संहिता नसते; परंतु ते कलावंत धार्मिक, पौराणिक काळातील प्रसंग घेऊन तीन-चार तास नाटक सादर करतात.

**मालवणी गाऱ्हाणा**

कोकणात कोणत्याही शुभकार्याच्या आरंभी देवाला गाऱ्हाणे घातले जाते, म्हणजेच देवाला आमंत्रण दिले जाते व कार्य निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून आळवणी केली जाते. ही गाऱ्हाणी लिखित स्वरूपात नसतात. मच्छिंद्र कांबळी यांच्या मालवणी नाटकांत अशी गाऱ्हाणी आहेत.

'चाकरमानी' नाटकातील गाऱ्हाण्याचा नमुना-

*पाच पूर्वज, बारा आकार, म्हारगिऱ्यापासून गावडे देवापर्यंत, धोंडो गुंडो म्हाराज्या!..*

*आज तू वडील देव, राईतलो गिरोबा, चौऱ्याऐंशी खेड्यांचो अधिकारी, होय म्हाराज्या!..*

*आज तू घळणीतलो बिरामन, पाननीतलो म्हापूरुस,*

*दांड्येवरचो देवचार, आठ शिमेचो समर्थ अधिकारी, कासारटाक्याचो चाळो. आज तुका मी हाक मारतंय, माझ्या हाकेक वो दी. पावसाळ्याचा पाणी पास्टाक लाव. वडाची साल पिंपळाक लावून उलटाच्या सुलटा कर! कोनाची करनी, चेटूक, जा आसात ता तुज्या पायाखाली घाल रे देवा! होय रे म्हाराजा!..*

लोकनाट्याच्या वळणाने जाणाऱ्या अशा प्रसंगात नाट्यमयता आणली जाते. अशी अनेक लोकनाट्ये व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी झाली. लोकनाट्यांमध्ये प्रादेशिक बोली भाषेचा वापर केला जातो. संदर्भही समाजातील चालू घडामोडींचे असतात.

**लोकलावंतांची गीते**

लोकगीतांमध्ये लोकसंस्कृतीच्या पुजाऱ्याची म्हणजेच लोककलावंतांची गाणी मोठ्या प्रमाणात आढळतात. उदाहरणार्थ, वासुदेवाची गाणी, गोंधळगीते, पोतराजाची गाणी, बहुरुप्याची गाणी, शाहिरी इत्यादी. लोककलावंतांची गीते पाहिल्यावर त्यांची बहुविविधता लक्षात येते. कोकणात गणेशोत्सावात गणपतीसमोर भजनमंडळी पारंपरिक भक्तिगीतांत तल्लीन होऊन जातात.

*डम डम डम डमरू वाजे*
*डमरूच्या तालावर बाप्पा नाचे*
*घण घण घण घंटा वाजे*
*घंटेच्या तालावर बाप्पा नाचे*

अशा स्वरूपाची लोकगीते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात आणि त्यावर वर्षानुवर्षे तल्लीन होऊन भजनकरी नाचत असतात.

शेतावर गेलेले आई-बाबा घरी येण्याची वाट पाहणारी लहान मुले म्हणतात,

*आराडगे मांडके सांज जावंदे*
*आई आमची बेगीन घरा येवन दे*

अशा बडबडगीतांचे निर्माते नेमके कोण, हे सांगणे कठीण आहे.

कोकणात शिमग्याचे वेळी लोककलावंत शबय (सणाच्या निमित्ताने दिले जाणारे दान) मागताना विशिष्ट गाणी म्हणतात. 'आयनाच्या बायना, दोन गोटे खायना' अशी आरोळी मारत, विशिष्ट सोंगे घेत हे लोककलावंत दारोदारी फिरत असतात. स्वातंत्र्यपूर्व काळात लोककलावंतांनी होळीच्यावेळी,

*'होळी रे होळी, पुरणाची पोळी*
*साहेबाच्या डोक्यात बंदुकीची गोळी,'*

असे म्हणत गोऱ्यासाहेबाला हाकलून देण्यासाठी जागरच मांडला होता. आजही होळी पेटताना अशा लोकगीतांचा अवलंब केला जातो.

मालवणी ही महाराष्ट्रात तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोलली जाणारी लोकभाषा. थोडासा हेल, काहीशी अनुनासिक, तरीही कडक. गोव्यातील कोंकणी भाषेच्या जवळ जाणाऱ्या या भाषेत साहित्यनिर्मिती मात्र फारच कमी झाली. मच्छिंद्र कांबळी यांच्या 'वस्त्रहरण' नाटकाने या भाषेचा गोडवा सर्वदूर पसरवला; मात्र त्यानंतर ही भाषा कोकणच्या पार्श्वभूमीवर चित्रित झालेल्या मालिकेतील किंवा चित्रपटातील एखाददुसऱ्या पात्रापुरती मर्यादित राहिली. मालवणी भाषेतील कवितांच्या बाबतीतही तसेच म्हणता येईल. तळकोकणातील खेड्यापाड्यातील समाजजीवन, तेथील रीतीभाती, लोकांची मानसिकता, लोकसंस्कृती टिपणारी लोकगीते कदाचित असतील; पण कविता फारशा लिहिल्या गेल्या नाहीत. वेंगुर्ल्यातील कवी ना. शि. परब यांच्या 'वालयचो तरवो' या मालवणी भाषेतील कवितासंग्रहाने ही उणीव भरून काढली आहे. यामधील कविता ही मालवणी मुलखाची लोकसांस्कृतिक वाटचाल रेखाटणारी आहे. त्यात मालवणी लोकजीवनाचे रेखाटन आहे. तिच्यात मालवणी मुलखातील एकूण लोकजीवन, त्यांच्या आशाआकांक्षा, श्रद्धा, त्यांचे पूर्वग्रह आणि भयगंड अधोरेखित झाले आहे.

*न्हिमार पावस लागता,*
*कलम देव भिजता*
*भिजता तसो भिजाने*
*कोल्ह्याक भाशिंग बांधाने*

मालवणी मुलखातील वेगळे वास्तव या कवितांतून व्यक्त होते.

**प्रचार आणि प्रसार**

अनेक वर्षे प्रादेशिक भागापुरते मर्यादित राहिलेले लोकसाहित्य आज महाराष्ट्रातल्या सर्व कानाकोपऱ्यांत पोहोचले आहे. दूरचित्रवाणी आणि समाजमाध्यमांनी लोकसाहित्याचा वापर सुरू केल्यामुळे लोकांमध्ये आपापल्या भाषेविषयी अभिमान जागृत झाला आणि त्याचा वापरही वाढला. साहजिकच लोकसाहित्याच्या विकासालाही चांगली संधी प्राप्त झाली. फक्त शाहीर किंवा लोककलावंतांपुरते मर्यादित असलेले साहित्य आज अभिजन वर्गापर्यंत जाऊन पोहोचले. बोली भाषेच्या वापराबरोबरच प्रसारही वाढू लागला व त्यामुळे लोकसाहित्याला अवकाश प्राप्त झाला.

◆◆◆

Master Story Teller जेफ्री आर्चर यांच्या 'द क्लिफ्टन क्रॉनिकल्स' या मालिकेचा सातवा भाग

# धिस वॉज अ मॅन

TBC-32 Book No.4

जेफ्री आर्चर । अनु. : लीना सोहोनी

किंमत : ₹ ९९०

ebook available




एका हरवलेल्या चित्राचा शोध घेता घेता अनेक रहस्यांची गुंफण अलगद सोडवणाऱ्या डिटेक्टिव विल्यम वॉरिकची अनोखी शोधकथा...


# नथिंग व्हेंचर्ड

TBC-32 Book No.3

जेफ्री आर्चर । अनु. : सविता दामले

किंमत : ₹ ५८०

ebook available







# गोष्ट एका अपूर्ण गोष्टीची

उत्कर्षा मिसाळ

एका सुंदर अथांग समुद्र किनाऱ्यालगत, एक सुंदर आलिशान राजवाडा... राजवाड्यात त्या निवांत राज्याचा निवांत राजा जो कायम रिकामा. त्याच्या अशा निवांत असण्याचंही एक कारण ते म्हणजे त्याचा स्वभाव. तापट, व्यसनी, उग्र. त्याच्या या स्वभावाचे पडसाद कायम न्यायव्यवस्थेवर आणि राज्यकारभारावर पडत; पण हल्ली प्रजा फार सुखी असे. ना कसले वाद, ना तंटे, ना कसली तक्रार, सर्वत्र सुखशांती. राजालाही कधी-कधी प्रश्न पडे, हे असं कसं?

हल्ली प्रजेला राजाची गरज नसायची, सर्व कारभार नियमितपणे चालायचे. यालाही एक कारण होतं ते म्हणजे राजकन्या सुवर्णलतिका, राजकन्येला प्रजेची अवस्था समजत होती. राज्याचा प्रधान मोठा हुशार आहे. हे जाणून तिने प्रधानाच्या मदतीने हळूहळू राज्यकारभार स्वत:च्या हाती घेतला. त्यामुळेच सारंकाही सुरळीत चालू होतं. आणि राजाला उगाच वाटायचं की प्रजा सुखात आहे.

राजाच्या नजरेआड राजकन्येनं स्वत:चं असं राज्य सुरू केलं होतं. ती कायम त्या राज्यव्यवस्थेत रमे.

शेवटी तो दिवस आला ज्या दिवशी राजाला या प्रकाराबद्दल कळलं. राजाच्या स्वभावाप्रमाणे त्याने राजकन्येला मृत्युदंड सुनावला. समस्त प्रजेसमोर राजकन्येला उभं करण्यात आलं. राजवाड्यासमोरील मोठ्या आंब्याच्या झाडाला दोर बांधण्यात आला आणि सर्वांसमक्ष राजकन्येला फाशी देण्यात आली. त्यानंतर तिला त्याच झाडाखाली पुरण्यात आलं.

हे दृश्य पाहून प्रजा हळहळली, काही लोक राजाच्या जाचाचा विचार करून घाबरू लागले आणि राज्य सोडून निघून जाण्याची तयारी करू लागले. बघताबघता काही दिवस निघून गेले. राज्यकारभार कोसळला. एकूणच राज्याची दयनीय अवस्था झाली, प्रजा त्यांचे प्रश्न घेऊन येई; परंतु त्याचं निरसन कधीही व्हायचं नाही. राजाच्या रोषापुढे उत्तर तर नाहीच; परंतु शिक्षा मात्र मिळायची.

अशा वेळी लोक हताश होऊन त्या आंब्याच्या झाडाखाली येऊन बसत, राजकन्येची न्यायव्यवस्था आठवून आपले प्रश्न मांडत आणि डोळ्यांत पाणी घेऊन निघून जात.

कालांतराने आंब्याच्या झाडाखाली बसणाऱ्यांची संख्या वाढू लागली. लोक आपले प्रश्न घेऊन येत आणि उत्तराच्या अपेक्षेने घरी परतत.

हल्ली त्यांना उत्तरं मिळू लागली होती, आंब्याच्या झाडाखाली मूक संवाद सुरू झाला होता. सकाळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं रात्री मिळूही लागली. प्रश्न-उत्तर सारं काही शब्दांशिवाय.

हल्ली आंब्याचं झाडदेखील बहरू लागलं होतं; परंतु त्याचा बहर काही वेगळा होता. दिवसा हिरवंगार असणारं झाड रात्री संपूर्ण काळंकभिन्न दिसायचं. इतकं की अवसेच्या रात्री झाड दिसेनासं व्हायचं.

एक दिवस अचानक त्याची एक फांदी राजवाड्याच्या दिशेने

वाढू लागली. ती इतकी वाढली की राजकक्षापर्यंत पोहोचून खिडकीच्या आत डोकावून पाहू लागली.

फांदी... फांदी...

हां... त्यावरून लक्षात आलं आजी काल आंब्याच्या झाडात राहणाऱ्या राजकन्येची गोष्ट सांगत होती आणि आपण मध्येच झोपी गेलो.

आमच्या आजीचा एक नियम होता. मध्येच झोपलो की शिक्षेखातर ती गोष्ट आम्हाला पुन्हा पहिल्यापासून ऐकावी लागे. अगदी रोज प्रयत्न करूनही मला या गोष्टीच्या शेवटापर्यंत जाता आलं नाही आणि माझी दिवाळीची सुट्टी संपली. आजी नेहमी म्हणायची, 'बघा हं, मी सांगितलेल्या गोष्टी पूर्ण झाल्या नाही तर तुमच्या तुम्हालाच पूर्ण कराव्या लागतील.' त्या वेळी ही इतकी मोठी गोष्ट वाटली नाही जितकी आज वाटते.

मनाशी खूप ठरवलं होतं, पुढच्या वर्षी अपूर्ण राहिलेली गोष्ट आजीकडून पूर्ण करून घेऊ; परंतु दुर्भाग्य असं की त्याच वर्षी आजी देवाघरी गेली.

काही वर्षांनी सारं काही विस्मरणात गेलेलं असताना अचानक गावी जाण्याचा योग आला, काही कारणाने गावात जाण्याची वाट बंद असल्याने आम्ही आडवाटेने जाण्याचं ठरवलं. रस्ता अरुंद असल्याने आम्ही पायी जायचं ठरवलं, बराच वेळ चालल्यानंतर गावाच्या मागे असलेल्या समुद्राची गाज ऐकू येऊ लागली, हवेत गारवा जाणवू लागला, घरचे पुढे चालत गेले आणि मी मात्र मागेच, भर उन्हाळ्यात सगळी झाडं सुकलेली असताना मध्येच एक मोठं हिरवंगार आंब्याचं झाड दिसलं. आम्ही सगळे काही वेळ त्याच्या सावलीत बसलो. सूर्य मावळतीला आला. घर काही अंतरावर असल्याने आम्ही निवांत होतो. अचानक अंधार पडला असं वाटू लागलं; पण आजूबाजूला संध्याकाळचा बराचसा संधिप्रकाश असताना झाडाखाली मात्र अंधार झाला होता. हिरवंगार वाटणारं झाड काळसर दिसू लागलं होतं. अचानक काहीतरी आठवण्याचा प्रयत्न करत असताना माझं लक्ष त्या झाडाच्या एका फार मोठ्या वाढत गेलेल्या फांदीकडे गेलं. ती फांदी एका मोठ्या जळालेल्या हवेलीच्या एका खिडकीतून आत कुठेतरी गेलेली होती. आता मात्र माझं विचारचक्र फार वेगाने फिरू लागलं, आजीचे ते शब्द आठवू लागले, 'बघा हं, मी सांगितलेल्या गोष्टी पूर्ण झाल्या नाही तर तुमच्या तुम्हालाच पूर्ण कराव्या लागतील.' ती संपूर्ण गोष्ट माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली. माझी पावलं त्या हवेलीकडे चालू लागली, तितक्यात घरचे घाई करू लागले. नाईलाजास्तव मला माझा शोध अर्धवट ठेवून घरी परतावं लागलं.

दुसऱ्या दिवशी सकाळीच मी त्या कालच्या झाडाजवळ गेले, तिथे माझ्याआधीच एक आजी येऊन बसली होती. मीही तिथे काही वेळ जाऊन बसले आणि गोष्टीत पुढे काय झालं असेल याचा विचार करू लागले. मला पडलेला प्रश्न त्या आजीला कसा ऐकू आला ते कळलं नाही; पण त्या पाठमोऱ्या बसलेल्या आजीने मला पुढची गोष्ट सांगायला सुरुवात केली.

'आजी, आता खूप बोअर झालं बाई. उरलेली गोष्ट उद्या सांग' असं म्हणत माझी नात मोबाईलवर काहीतरी ऐकत बसली, अन् मीदेखील उठून माझ्या कामाला गेले.

माझ्या आजीकडे गोष्टी सांगण्यासाठी नियम, अटी होत्या. आता या बदलत्या पिढीसमोर अशी हिंमत मी करणं अशक्य. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे गोष्ट ऐकण्यासाठी आम्ही उत्सुक असायचो. आम्ही गोष्टी ऐकल्या म्हणून सांगू शकतो; भले त्यात चार शब्द कमी-जास्त असतील; पण हादेखील एक वारसा आहे, जो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातो; पण हल्ली गोष्टींचे रंग मोबाईल आणि इंटरनेटच्या रंगांपुढे फिके वाटतात मुलांना. पूर्वी झोपण्याआधी गोष्ट ऐकण्याची प्रथाच होती जणू; आता मात्र झोप येण्यासाठी आई मुलाच्या हातात मोबाइल देऊन जाते, तेही कौतुकाने. तुमच्या या आधुनिक पद्धती पाहता तुम्ही तुमच्या पुढच्या पिढीला काय वारसा देणार याचा विचार करवत नाही. आजकालच्या मुलांना बऱ्याच गोष्टी बोअर वाटतात... त्यात 'गोष्ट' ऐकण्यासाठी हल्ली सहनशीलता लागते याचं आश्चर्य वाटतं. उत्सुकता असणं तर फार लांबची गोष्ट.

(बाकी गोष्टीमध्ये फांदीने पुढे काय केलं, हे जर मी सांगितलं, तर मिथकाची मजा कशी येणार? गोष्टीचा शेवट तुम्ही तुम्हाला हवा तसा करू शकता, ही गोष्ट तुम्ही तुमच्या मनाने रंगवू शकता...)

◆◆◆

# भक्त प्रल्हाद आणि बटाटेवडे

राजीव तांबे

बाळ प्रल्हाद 'नारायण...नारायण...' म्हणत असताना अचानक त्याचे बाबा श्री.हिरण्यकश्यपू तिथे आले.

ते आधीच वैतागलेले होते आणि त्यात मुलाची बडबड ऐकून ते आणखीनच वैतागले. डोळे बारीक करून कपाळावर आठ्या पाडत ते करवादले, ''स्टॉप इट! उगाच बोअर मारू नकोस. बंद कर तुझं तोंड.''

प्रल्हाद शांतपणे म्हणाला, ''बाबा प्लीज, असं बोलू नका! मी बोअर मारत नाहीए. मी आनंदाने नारायण...नारायण म्हणतोय. तुम्हाला का त्रास होतोय हो?''

''मला तुझं हे असलं वागणं अजिबात आवडत नाही. इट इज रिअली डिसगस्टिंग! प्लीज स्टॉप धिस इमिजिएटली! नाहीतर मी तुला शिक्षा करीन हं... जबर शिक्षा करीन!''

''ओके. काय कराल? म्हणजे कोणती शिक्षा कराल?''

''तू जर पुन्हा असली बडबड करायला लागलास तर मी तुला... मी तुला...''

''कळलं...''

''काय कळलं?''

''तुम्ही मला उचलून घेऊन माझे लाडे लाडे कराल! हो ना?''

''हॅ! लाडे लाडे नाही. तुझे बटाटेवडे करणार! तुला उकळत्या तेलात टाकणार आणि मस्त तळून काढणार... समझे?''

''वॉव! पण एका अटीवर...''

''कुठल्या?''

''बाबा, तुम्ही जर मला उकळत्या तेलात टाकून तळणार असाल ना... तर प्लीज कढई जरा मोठी घ्या हं! कारण...

कारण काय?''

''अहो, असं काय करता? कढई लहान असेल तर पाय आखडतील ना? म्हणून आधी...''

''आधी काय?''

''आधी माझं माप घ्या. माझ्या मापापेक्षा मोठी ऐसपैस कढई घ्या. त्यात चांगलं २०९ लिटर कोल्ड प्रेस्ड शेंगदाणा तेल घाला.''

''कोल्ड प्रेस्डच का?''

''कारण, रिफाइंड तेलात पाम तेल मिसळलेलं असतं. एकतर ते आरोग्याला चांगलं नाही आणि दुसरं म्हणजे...

आता दुसरं काय?''

''हे रिफाइंड तेल गरम झालं की घाणेरडा वास येतो; मला नाही आवडत ते. आपल्याला शुद्ध तेल हवं ना?''

''ओके बॉय... कोल्ड प्रेस्ड तेल आणतो.''

''मग तुम्ही चूल धडधडून पेटवा आणि...''

''हॅऽऽ हॅऽऽ हॅ! आणि मग तेल उकळलं की मी तुला उकळत्या तेलात टाकीन. मस्त खरपूस तळून काढीन.''

''येस्स! नक्की! तोपर्यंत मी 'नारायण...नारायण...' सुरूच ठेवतो. ओके?''

''एऽऽ प्रल्हादा, तू उगाच माझी टिंगल करू नकोस हं! मी तुला सीरिअसली सांगतोय. मी तुला खरोखर उकळत्या तेलात टाकणार आहे! समजतंय का तुला?''

''रिअली?''

''येस रिअली! मी तुला उकळत्या तेलात टाकणार म्हणजे... टाकणारच!''

''ओके बाबा, डोन्ट वरी. मी तुम्हाला सीरिअसलीच सांगतोय... की तुम्ही काय पण करा... मी माझं म्हणणं सुरूच ठेवणार आहे.''

''ओके! मग आता पाहाच मी काय करतो. आणि तुझी ही बडबड थांबवतो.''

श्री. हिरण्यकश्यपू कामाला लागले.

त्यांनी प्रल्हादाचं उभं-आडवं माप घेतलं.

मग प्रल्हाद आरामात झोपू शकेल, अशी अगडबंब कढई आणली.

कोल्ड प्रेस्ड शेंगदाण्याच्या तेलाचे २९ मोठे डबे आणले व कढईत ओतले.

कढईखाली भलीमोठी चूल पेटवली.

तेल सटासट गरम होऊ लागलं. तेल कडक, कडकडीत तापलं.

तेल कडकडून तापल्याने तेलातून वाफा येऊ लागल्या.

आणि हे पाहून श्री. हिरण्यकश्यपू यांचं डोकं चांगलंच भडकलं.

त्यांनी रागाने डोळे गरागरा फिरवत भक्त प्रल्हादाकडे पाहिलं.

बाळ प्रल्हाद शांतपणे 'नारायण... नारायण...' म्हणतच होता.

आता मात्र श्री. हिरण्यकश्यपूंची सटकली!

ते तरातरा प्रल्हादाकडे गेले आणि त्याला फराफरा ओढत कढईजवळ घेऊन गेले.

'हॅ ऽऽ हॅ ऽऽ हॅ' असं विकट हास्य करत त्यांनी प्रल्हादाला विचारलं, "ओऽऽए, तुझी बडबड थांबवणार की... तू तळून निघणार?"

प्रल्हाद शांतपणे म्हणाला, "बाबा, आता तर कुठे फक्त तेल तापतंय! तेल उकळलं की, मला आत टाका. आपलं तसंच ठरलंय.

उगाच घाई करू नका."

तेल तापलं तर होतं; पण उकळत तर नव्हतं! हे पाहून श्री. हिरण्यकश्यपू भयानक भडकले!

रागाने थयथयाट करत ते सेवकांना म्हणाले, "अरे राक्षसांनो, चुलीत मोठमोठी लाकडं घाला, मोठे ओंडके घाला, धडधडून आग पेटवा... तेल उकळवा."

शांतपणे बाबांकडे पाहत बाळ प्रल्हाद म्हणाला, "बाबा, आर यू क्रेझी?"

श्री. हिरण्यकश्यपू चिडून ओरडले, "म्हणजे? व्हॉट यू मीन?"

"बाबा... अहो हे अख्खं जंगल जरी तोडून चुलीत घातलं तरी तेल उकळणार नाही. उगाच त्या लाकडांची नासाडी करू नका."

"म्हणजे काय? असं कसं होईल?"

"बाबा, तेल कितीही गरम केलं तरी ते उकळत नाही! तेलाला उत्कलन बिंदूच नाही!! तेल गरम झाल्यावर त्याची फक्त वाफ होते...वाफ!"

हे ऐकताच हिरण्यकश्यपू दचकले!

स्वत:ला सावरत त्यांनी प्रल्हादाला विचारलं, "अं... हे खरं की काय?"

"बाबा, मी कधीच खोटं बोलत नाही. तेल उकळतच नाही, हे आमच्या विज्ञानाच्या पुस्तकात दिलं आहे. तुम्ही पुस्तकं वाचत नाही. विज्ञानाचा अभ्यास करत नाही. हे काही बरोबर नाही..."

बाळ प्रल्हादाला थांबवत श्री. हिरण्यकश्यपू म्हणाले, "हो रे बाळा. चुकलंच माझं. वय झालं... आणि अभ्यास करायचा राहूनच गेला."

"काही हरकत नाही बाबा, आत्ता करा! अहो, अभ्यास करायला कुठलं आलंय वय? आपण दोघं मिळून पुस्तक वाचू. एकमेकांना शिकवू. काय?"

श्री. हिरण्यकश्यपू खूश होऊन म्हणाले, "यस्स! डन!"

मग सेवकांकडे पाहत म्हणाले, "आता हे तापलेलं तेल ओतून टाका. आता मी कुणाला तळणार नाही."

हे ऐकताच प्रल्हाद जोरात ओरडला, "बाबा ऽऽ थांबा ऽऽ! थांबा! आपण तळणार आहोत... या अगडबंब कढईत आपण हजारो जणांना तळणार आहोत..."

"लहान-लहान, छोट्या-छोट्या हजारो जणांना तळणार आहोत. अगदी आत्ताच्या आत्ता तळणार आहोत...चांगलं लालेलाल, खरपूस होईपर्यंत तळणार आहोत...गरम तेल ओतू नका बाबा ऽऽ ओतू नका ऽऽ!"

श्री. हिरण्यकश्यपूंनी भीतीने थरथरत विचारलं, "कु ऽऽ कुणाला तळणार आहोत? आणि एकाचवेळी हजारो लहान, छोट्या-छोट्यांना तळणार आहोत? नको रे नको. प्रल्हादा, असं करू नकोस रे माझ्या बाळा."

श्री. हिरण्यकश्यपूंना थांबवत प्रल्हाद म्हणाला, "बाबा, मी कालच ऑर्डर देऊन ठेवली होती. इथे बाजूच्याच खोलीत ३४९९ बटाटेवडे तळण्यासाठी तयारच आहेत! आपण हे गरम तेलात तळूया. शाळेतल्या मुलांना गरमागरम बटाटेवडे वाटूया!"


श्री हिरण्यकश्यपू खूश होत म्हणाले, "व्वाऽऽव्वा! काय मस्त आयडिया आहे. रिअली अमेझिंग! कुठल्या पुस्तकात आहे, ही आयडिया?"

"बाबा, 'पुस्तकात माहिती असते आणि आयडिया डोक्यात असते' ही आपल्या भारतातली जुनी म्हण नेहमी लक्षात ठेवा."


हे ऐकताच हिरण्यकश्यपू धूम पळून गेले.

◆◆◆


## वाचकांचं उदंड प्रेम लाभलेली, मैलाचा दगड ठरलेली पुस्तकं


स्वामी



श्रीमान योगी




पावनखिंड




ययाति




कर हर
मैदान फ़तेह



महासम्राट
(खंड१) झंझावात


दोन शिंगे
असलेला ऋषी



झोंबी




वपुर्झा




संभाजी




रुचिरा भाग-१




अमृतवेल




गृहभंग




तेलगी स्कॅम




द मॅजिक ऑफ
थिंकिंग बिग



प्लेइंग इट
माय वे



मी मलाला



कुलामामाच्या
देशात



छत्रपती संभाजी
स्मारक ग्रंथ


आजचा दिवस
माझा



लज्जा


डॅम इट
आणि बरंच काही!



बाजिंद




कास्ट मॅटर्स


सुधा मूर्ती
कल्पवृक्षाची कन्या
सुधा मूर्ती
दोन शिंगे असलेला ऋषी
सुधा मूर्ती
त्रिशंकू
सुधा मूर्ती
गरुडजन्माची कथा
अश्विन सांघी
कालचक्राचे रक्षक
डॉ. एस. एल. भैरप्पा
उत्तरकांड
राधेय

# ।। पुस्तकाच्या पानांतून ।।

।। पुस्तकाच्या पानांतून ।।




# कल्पवृक्षाची कन्या

सुधा मूर्ती

अनु : लीना सोहोनी

## पांढऱ्या तळ्याची देवता

पहिल्या तीर्थंकरांना शंभर पुत्र होते. त्यापैकी पहिला पुत्र भरत याचा अयोध्येचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्यात आला तर शेवटचा पुत्र बाहुबली हा पोदनपूरचा राजा बनला.

एक दिवस राजा भरत आपल्या शस्त्रागारात पाहणी करत असताना त्याला तिथे एक फिरतं चक्र दिसलं. ते चक्र एक विशिष्ट दिशा दाखवत होतं. मग त्याने त्याच्या दरबारातील ज्योतिर्विद्या विशारदांना तिथे बोलावून घेऊन त्याचा अर्थ विचारला. त्यांनी त्याचा अभ्यास करून त्याला सांगितलं– ''एक दिवस तू सर्वसत्ताधीश होऊन संपूर्ण पृथ्वीवर राज्य करशील.''

काही काळ लोटल्यावर त्या राजज्योतिष्यांचं हे भाकीत खरं ठरणार अशी लक्षणं दिसू लागली. राजा भरताने अनेक युद्धं जिंकली आणि आपल्या राज्याचा विस्तार केला. तो जेव्हा स्वारीवर निघायचा, तेव्हा ते चक्रच त्याला योग्य दिशा दाखवायचं आणि तिकडे गेल्यावर त्याला विजय प्राप्त व्हायचा.

एक दिवस अशाच एका स्वारीवरून भरत अयोध्येस परत येत होता. आता लवकरच अवघ्या भूतलावर आपलं राज्य प्रस्थापित होण्याची वेळ जवळ आली आहे, असा विचार त्याच्या मनात येत हाता. इतक्यात त्याच्या लक्षात आलं, की ते चक्र फिरायचं थांबलं होतं.

ही कोणत्यातरी अतिशय महत्त्वपूर्ण घटनेची चाहूल असल्याचं राजा भरताच्या लक्षात आलं. त्याने देशोदेशीच्या विद्वानांना, प्रकांडपंडितांना आपल्या दरबारात बोलावून घेतलं. सर्वांनी चर्चा, विचारविनिमय करून राजाला सांगितलं, ''ते चक्र फिरायचं थांबलं आहे, त्याला तसंच कारण आहे. तुझ्या ९९ भावांनी आधी तुला शरण आलं पाहिजे. ते झाल्यानंतरच तू एक सार्वभौम राजा बनू शकशील.''

त्यामुळे भरताने आपल्या सर्व भावांना आपल्या राजमुद्रेसह एक खलिता पाठवला. त्यात त्याने आपल्या भावांना शरण येण्याचं आवाहन केलं होतं. ज्याची शरण येण्याची इच्छा नसेल, त्याने युद्धाला तयार राहावं, असा इशारा सुद्धा त्याने दिला होता. भरताच्या ९९ भावांपैकी ९८ भावांना हा खलिता मिळाल्यावर ते नाराज झाले. राज्यविस्ताराच्या हव्यासापायी आपल्या सख्ख्या भावाने आपल्याशी असं वागावं, याचा त्यांना संताप आला. परंतु भरताशी दोन हात करण्याची कुणाचीच ताकद नसल्यामुळे आपापली राज्यं त्याच्या हवाली करून ते ९८ भाऊ निघून गेले.

परंतु शेवटचा भाऊ बाहुबली मात्र भरताला शरण जाण्यास

मुळीच तयार नव्हता. तो स्वत: एक बलशाली, पराक्रमी योद्धा होता. भरताच्या खलित्याला उत्तर म्हणून त्याने निरोप पाठवला, ''हे बंधू, तू माझ्या समोर ये आणि माझ्याशी लढ. फक्त तू आणि मी– आपण दोघंच ही लढाई करू. तुझ्या आणि माझ्या निष्पाप प्रजाजनांना यात कशाला मध्ये आणायचं? आपले मतभेद आपण आपापसात लढून सोडवू.''

भरताने ते मान्य केलं. रणांगणावर दोन्ही योद्धे समोरासमोर उभे ठाकले.

दोघा भावांमधली ही चुरस तीन प्रकारे होणार होती. मल्लयुद्ध, जलयुद्ध आणि दृष्टियुद्ध. भरत आणि बाहुबली हे दोघेही तुल्यबल योद्धे होते. परंतु बाहुबली उंचापुरा आणि दणकट होता. त्याच्या शरीरयष्टीचा त्याला फायदा मिळाला. जलयुद्ध आणि दृष्टियुद्धात बाहुबलीने भरताचा पराभव केला.

बाहुबली जिंकला. आता तो अनेक देशांचा, फार मोठ्या भूप्रदेशाचा सार्वभौम राजा होणार होता खरा. पण विजयाचा हा आनंद त्याच्या मनात फार काळ टिकला नाही. तो मनात म्हणाला, ''हे काय विपरीत घडून आलं? भूप्रदेशावर राज्य करण्याच्या हव्यासापायी आम्ही सख्खे भाऊ एकमेकांचे कट्टर वैरी बनलो?'' त्याला काही हे योग्य वाटलं नाही. त्यामुळे त्याने जिंकलेलं राज्य भरताला परत केलं आणि तो स्वत: सर्वसंगपरित्याग करून ध्यानधारणेसाठी वनात निघून गेला.

कालांतराने तो दिगंबर जैन साधू बनला. त्याने आपली वस्त्रप्रावरणं, अलंकार, धन हे सर्व काही दान करून टाकलं. त्याने दिगंबर अवस्थेत कित्येक दिवस एका जागी उभं राहून




गोष्टींच्या नव्या खजिन्यासह
सुधा मूर्तींची लाडकी अनुष्का पुन्हा परत येतेय..
सुट्ट्यांच्या मौजेसोबतच
तिनं शोधलेल्या रहस्यांची रंजक सफर...

हरवलेल्या गोष्टीचे रहस्य

सुधा मूर्ती । अनु. लीना सोहोनी
किंमत : ₹ २४०

ebook available



तपस्या केली. मुंग्यांनी त्याच्या अंगावर वारुळ बांधलं. धूळ, पाऊस, ऊन, वारा या कशाचीच पर्वा न करता त्याची साधना सुरूच होती. तो अत्यंत मनोभावे, एकाग्र चित्ताने ध्यान करत असूनही मनातून दु:खीच होता. आपण आपला बंधू भरत याच्या मालकीच्या भूमीवर उभे आहोत या गोष्टीचा त्याच्या मनाला त्रास होत होता.

असं एक वर्ष लोटलं. अखेर राजा भरत लज्जित होऊन आपला भाऊ बाहुबली याला भेटायला गेला. दोन्ही भावांची भेट झाली. त्यानंतर बाहुबलीला सर्व प्रकारच्या मोहांपासून, नातेसंबंधांच्या बंधनांपासून मुक्ती मिळाली. त्याला उच्चकोटीच्या ज्ञानाचा लाभ होऊन मोक्षप्राप्ती झाली. भरताने आपला बंधू बाहुबली याचा एक भव्य पुतळा उभारला.

इतिहास मात्र याविषयी काही वेगळंच सांगतो. बाहुबली किंवा गोमतेश्वराचा हा अठ्ठावन्न फूट उंचीचा ग्रानाईटचा पुतळा एका एकसंध पाषाणातून कोरून बनवण्यात आलेला आहे. कर्नाटक राज्यातील हसन जिल्ह्यामधील श्रवणबेळगोळ या ठिकाणी विंध्यागिरी टेकडीवर हा पुतळा आहे. गंगा घराण्यातील महान जैन पंतप्रधान चामुंडाराया यांनी हा पुतळा उभारला. हा पुतळा म्हणजे सर्व सांसारिक मोहमायेपासून दूर राहण्याचं म्हणजेच वैराग्याचं प्रतीक आहे. या पुतळ्याच्या चेहऱ्यावर अतिशय शांत, समाधानी भाव आहेत. अशी शांत मुद्रा असलेल्या बाहुबलीचे फार पुतळे अस्तित्वात नाहीत. याशिवाय बाहुबलीच्या अनेक मूर्ती कर्नाटक राज्यात जागोजागी आढळतात. उदाहरणार्थ वेल्लूर, करकला, गोमातागिरी आणि धर्मस्थल. पण श्रवणबेळगोळ येथील बाहुबलीचं सौंदर्य काही वेगळंच आहे. त्यामुळेच त्याचा निर्माता चामुंडाराया हा स्वत:ला या भूतलावरील सर्वांत महान शिल्पकार मानू लागला. त्याचा अहंकार वाढीस लागून त्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. त्यानंतरच्या त्याच्या सर्वच शिल्पकृतींमधून हा बदल जाणवतो.

एक दिवस बाहुबलीच्या या पुतळ्याला दूध आणि पाण्याचा अभिषेक करायचा होता. त्यासाठी चामुंडारायाने खूप मोठ्या प्रमाणात दूध मागवलं. दुधाचा अभिषेक सुरू झाला आणि काही वेळात एक गोष्ट सर्वांच्याच लक्षात आली. बाहुबलीच्या मस्तकावर कितीही दुधाचा अभिषेक केला, तरी त्याच्या कटिप्रदेशाच्या खाली काही ते दूध पोचत नव्हतं. काय चुकत होतं तेच कळत नव्हतं. पुजाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनसुद्धा त्यात बदल होईना. अखेर हा अभिषेक अपूर्णच राहिला.

इतक्यात चामुंडारायाला तिथून एक वृद्ध स्त्री हातात दुधाचा लहानसा लोटा घेऊन जाताना दिसली. ती चामुंडारायाला म्हणाली, ''महाराज, मी घरून आणलेल्या या दुधाचा बाहुबलीला अभिषेक करू का?''

''अहो आज्जी, आम्ही इथे इतक्या मोठ्या प्रमाणावर दूध आणून आमचा अभिषेक पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करत आहोत. तुमच्या या एवढ्याशा लोटाभर दुधाने काय साध्य होणार आहे? पण ठीक आहे. तुम्हाला अभिषेक करायचा आहे ना? जा, खुशाल करा.'' तो म्हणाला.

मग ती वृद्ध स्त्री हळूहळू चालत पुतळ्याच्या जवळ गेली, लटपटत्या पायांनी शिडीवर चढून बाहुबलीच्या मस्तकापर्यंत जाऊन पोचली. हातातल्या त्या लोटाभर दुधाचा तिने बाहुबलीच्या मस्तकावर अभिषेक केला आणि काय आश्चर्य! बाहुबलीच्या संपूर्ण शरीरावरून जणू काही दुधाच्या नद्या वाहू लागल्या. पुतळ्याच्या पायाशी मोठं थारोळं जमा झालं.


ती कुणी सर्वसाधारण स्त्री नसून दैवी शक्ती आहे हे चामुंडारायाने जाणलं. त्याने तिचे पाय धरून तिची क्षमा मागितली. त्याबरोबर तिने आपलं मूळ रूप धारण केलं. ती यक्षी देवता होती. ती म्हणाली, ''बाळा, कधीही वृथाभिमान बाळगू नको. प्रत्येकाची भक्ती खरीच असते. तू पैशाने जे काही साध्य करशील, त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचं असेल तू भक्तीने जे प्राप्त करशील, ते! मला हेच तुला दाखवून द्यायचं होतं, म्हणूनच मी म्हातारीचं रूप घेऊन आले होते.''

तुम्ही जर आज श्रवणबेळगोळला भेट दिली, तर टेकडीच्या पायथ्याशी तुम्हाला एक छोटा जलाशय दिसेल. कोणे एके काळी हे तळं दुधाने भरलेलं होतं. त्यामुळेच त्याला 'बिलिया कोला' म्हणजे 'पांढरं तळं' असं नाव पडलं आहे. जवळच हातात दुधाचं भांडं घेऊन उभ्या असलेल्या आजीचा पुतळासुद्धा आहे.

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'कल्पवृक्षाची कन्या' या सुधा मूर्ती लिखित पुस्तकातून)**

◆◆◆

नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!




ebook **available on :**

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books


## टी बुक क्लब ३४

**सभासद फी ५० रु.**

सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा! या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

### टी बुक क्लब ३४मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **आयकॉन** | फ्रेडरिक फोरसाइथ | अनु. : डॉ. देवदत्त केतकर |
| **सिकॅमोर रो** | जॉन ग्रिशॅम | अनु. : सुदर्शन आठवले |
| **अ वॉन्टेड मॅन** | ली चाइल्ड | अनु. : सरिता आठवले |
| **आय ऑफ द नीडल** | केन फॉलेट | अनु. : महेश कार्लेकर |
| **यूज ऑफ फोर्स** | ब्रॅड थोर | अनु. : जयंत गुणे |
| **टर्न अ ब्लाइंड आय** | जेफ्री आर्चर | अनु. : सविता दामले |




# दोन शिंगे असलेला ऋषी

सुधा मूर्ती
अनु : लीना सोहोनी

॥ पुस्तकाच्या पानांतून ॥

## एका ताऱ्याचा जन्म

उत्तानपाद राजाला दोन राण्या होत्या, सुरुची आणि सुनीती. प्रत्येक राणीला एक मुलगा होता. सुनीतीच्या मुलाचं नाव होतं ध्रुव आणि सुरुचीच्या मुलाचं नाव होतं उत्तम.

जसजसे दिवस जाऊ लागले, तसतसं उत्तानपाद राजाचं आपल्या एका पत्नीवरचं, म्हणजे सुरुचीवरचं प्रेम वाढू लागलं. ती तरुण होती; त्यामुळे राजा दिवसातला बराचसा वेळ तिच्या महाली तिच्याबरोबर आणि तिच्या मुलाबरोबर घालवत असे. सुनीती वयाने मोठी होती. ती अत्यंत स्वाभिमानी होती. आपल्या पतीचं आपल्यावर आणि आपल्या मुलावर आता प्रेम उरलेलं नाही याची जाणीव होऊन ती व्यथित होत असे.

एक दिवस ध्रुवबाळ राजाच्या दरबारात आला. त्याने पाहिलं, तर त्याचे वडील सिंहासनावर बसलेले होते आणि त्याचा सावत्र भाऊ उत्तम त्यांच्या मांडीवर खेळत होता. त्यांच्या शेजारीच राणी सुरुचीसुद्धा बसलेली होती. ध्रुवबाळ त्या वेळी वयाने खूपच लहान होता. शिवाय त्याला आपल्या वडिलांचं प्रेम पुरेसं मिळत नव्हतं, म्हणून तो धावतच राजापाशी जाऊन म्हणाला, ''तात, मलासुद्धा तुमच्या मांडीवर बसायचं आहे.''

मग उत्तानपाद राजाने त्याला आपल्या दुसऱ्या मांडीवर बसवून घेतलं. आता राजाचे दोन्ही पुत्र त्याच्या एकेका मांडीवर बसले होते.

पण ही गोष्ट सुरुचीला मात्र मुळीच आवडली नाही. राजाने फक्त आपल्या मुलाकडे लक्ष द्यावं आणि ध्रुवबाळाकडे त्याने मुळीच पाहू नये, असं तिला वाटत होतं; त्यामुळे तिने ध्रुवबाळाला वडिलांच्या मांडीवरून खाली खेचलं आणि ती त्याला रागावून म्हणाली, ''हे बघ ध्रुवबाळा, तू तुझ्या वडिलांच्या मांडीवर बसायचं नाहीस, समजलं? ही जागा फक्त माझ्या मुलांसाठीच राखीव आहे. तुला जर तुझ्या वडिलांच्या मांडीवर बसायची इतकीच हौस होती, तर मग तू देवाकडे प्रार्थना करायची आणि माझ्या पोटी जन्म घ्यायचा. तू आता ताबडतोब इथून निघून जा बरं आणि परत लवकर इथे येऊ नकोस.''

ध्रुवबाळाने आपल्या वडिलांकडे पाहिलं पण उत्तानपाद राजाने काहीही न बोलता नुसती शरमेने मान खाली घातली. सुरुचीचं हे वागणं चुकीचं होतं याची त्याला पुरेपूर कल्पना होती. परंतु तरीसुद्धा तिला त्यावरून काही बोलण्याची त्याची हिंमतच नव्हती.

घडलेल्या गोष्टीमुळे ध्रुवबाळाचं मन दुखावलं गेलं. मग त्याने रडतरडत आपल्या आईच्या महाली जाऊन जे काही

घडलं ते सगळं तिला सांगितलं; परंतु झाल्या गोष्टीला सुनीतीचा काहीच इलाज नव्हता. 'तू आणि मी तुझ्या वडिलांना आवडत नाही' असं तरी ती आपल्या लहान बाळाला कसं सांगणार? मग ती ध्रुवबाळाला जवळ घेऊन रडू लागली आणि म्हणाली, ''बाळा, मी एक दुर्दैवी स्त्री आहे आणि यामध्ये तुझा काहीच दोष नाही. खरी गोष्ट अशी आहे की, महाराजांचं माझ्यावर प्रेम नाही आणि म्हणूनच मला वाटतं, एखाद्या पित्याने आपल्या मुलावर जसं प्रेम करावं तसं काही ते तुझ्यावर प्रेम करत नाहीत. तू माझा मुलगा असल्यामुळेच हे असं होत आहे. आता त्यांचं मन वळवणं हे केवळ भगवान विष्णूंच्या हातामध्ये आहे.''

ध्रुवबाळाने आपल्या दोन्ही हातांनी स्वतःचे निरागस अश्रू पुसले आणि तो आईला म्हणाला, ''आई, हे भगवान विष्णू कोण गं?''

त्यावर आई म्हणाली, ''अरे बाळा, ते तर आपले रक्षणकर्ते आहेत. तू जर त्यांची मनोभावे प्रार्थना केलीस ना, तर ते नक्कीच तुझ्या या प्रश्नावर काहीतरी तोडगा सुचवतील अशी मला खात्री आहे.''

''ते सर्वांच्या अडचणी सोडवतात का गं?'' ध्रुवबाळ म्हणाला. आपल्या वडिलांच्या बाबतीत हे जे काही घडत आहे, ते भगवान विष्णू कसं काय सुधारणार, हेच त्याला कळत नव्हतं.

''होय रे बाळा; पण हे बघ, तू जर ऋषी-मुनींप्रमाणे घोर तपश्चर्या केलीस ना, तरच हे शक्य आहे.'' सुनीती म्हणाली.

''मग हे ऋषि-मुनी तपश्चर्येसाठी कुठे जातात गं?'' ध्रुवबाळाने विचारलं. त्याला आता आशेचा किरण दिसू लागला होता.

''अरे बाळा, ते अरण्यामध्ये किंवा पर्वतावरच्या एखाद्या गुहेमध्ये जाऊन तपश्चर्येला बसतात.'' सुनीती म्हणाली.

''पण मग त्यांना पावसाची, थंडी-वाऱ्याची किंवा उन्हाळ्याची भीती वाटत नाही का गं?''

''अरे बाळा, परमेश्वरच त्यांचं रक्षण करतो, कारण ते त्याचीच प्रार्थना करत असतात ना? हे जे ऋषि-मुनी असतात ना, ते अत्यंत धैर्यशाली असतात बरं का. तू त्यांच्या साहसाला अजिबात कमी लेखू नकोस. त्यांच्यावर जी काही संकटं येतील, त्यांचा ते अत्यंत हसतमुखाने सामना करतात. ही गोष्ट अर्थातच अजिबात सोपी नाही; पण ती अशक्यसुद्धा नाही.'' सुनीती म्हणाली.

ध्रुवबाळाला जे काही समजून घ्यायचं होतं ते त्याने आता समजून घेतलं होतं. तो उठला आणि सुनीतीला म्हणाला, ''आई, मी आता ठरवलं आहे. मी आता भगवान विष्णूची आराधना करणार आहे. त्यासाठी मी तपश्चर्येला बसणार आहे. मला आता माझ्या वडिलांकडून काहीच नको. मला आता जे काही हवं असेल, ते मी भगवान विष्णूकडे मागेन. आता केवळ तेच माझे पिता आहेत आणि मला फक्त त्यांचीच गरज आहे. ते माझ्यावर नक्कीच कृपा करतील अशी मला खात्री आहे.''

आता आपला बाळ आपल्यापासून दूर निघून जाणार, आपण त्याला कायमचे गमावून बसणार अशी बिचाऱ्या सुनीतीला धास्ती वाटू लागली. इतक्या लहान वयात हा ध्रुवबाळ आपल्याला सोडून बाहेरच्या जगामध्ये कुठेतरी एकटा निघून जाईल, याची तिला कल्पना नव्हती. ती त्याला जवळ घेऊन म्हणाली, ''अरे ध्रुवबाळा, तू तर अजून एक लहान बाळ आहेस रे.'' असं म्हणून ती रडू लागली. ती खूप काळजीत पडली. ''अरे बाळा, तुला कित्येक योजनं चालून डोंगरात किंवा दऱ्या-खोऱ्यात जावं लागेल. तिथे तू काय खाशील? कोणते कपडे घालशील? आपल्या आईशिवाय तू एकटा कसा राहशील? तुला जर तपश्चर्या करायचीच असली तर तू इथे माझ्याजवळ बसूनच कर ना.''



ध्रुवबाळाला ते अजिबात पटलं नाही. ''आई, तपश्चर्या जर अशी घरी राहून करता येत असती, तर सगळ्या ऋषि-मुनींनीसुद्धा तसं नसतं का केलं? मला काही झालं तरी परमेश्वराला भेटायचं आहे, तर मला जाऊ दे.'' तो आपल्या आईची विनवणी करून म्हणाला.

मग तिने त्याचं मन वळवण्याचा आणखी एक प्रयत्न करून पाहिला.

पण ध्रुवाचा निर्णय झाला होता. त्याच्या सावत्र आईने त्याची हेटाळणी केली होती. त्या अपमानाचं शल्य अजून त्याच्या मनात होतं. शिवाय त्याच्या स्वतःच्या आईने त्याला ईश्वराच्या शक्तीविषयी समजावून सांगितलं होतं आणि त्यावर त्याचा विश्वास बसला होता.

मग तो आपल्या आईचा आशीर्वाद घेऊन निघाला आणि जवळच्या अरण्याच्या दिशेने चालू लागला.

वाटेमध्ये त्याला नारदमुनी भेटले. एक लहान मुलगा एकटाच भगवान विष्णूंचं नामस्मरण करत चाललेला पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनी त्या मुलाला थांबवलं आणि त्याच्याकडून सर्व हकिगत ऐकली. ध्रुवबाळाने आपल्या आईकडे परत जावं म्हणून नारदमुनींनी त्याची खूप समजूत काढण्याचा प्रयत्न केला. ते त्याला म्हणाले, ''हे बघ बाळा, तू ईश्वराचा शोध घेण्यासाठी निघाला आहेस ना? मग या कामामध्ये मी तुला मदत करतो.'' मग नारदमुनींनी त्याला एक गोष्ट समजावून सांगितली.

ते म्हणाले, ''ध्रुवबाळा, हे बघ, भगवान विष्णूंची प्रार्थना करण्यासाठी तुला अरण्यात जाण्याची काहीच गरज नाही. तू अजून खूप लहान आहेस. तपश्चर्या करायची म्हणजे नक्की काय करायचं हेसुद्धा तुला माहीत नाही. त्यापेक्षा तू भगवान विष्णूंची प्रार्थना कर. त्यांची स्तुतिस्तोत्रं गा आणि भगवान विष्णू तुझ्या आसपास असल्याची तुला प्रचिती येईल. हे बघ, ईश्वर सगळीकडे असतो. तो आपल्या हृदयात नेहमीच वास करत असतो; त्यामुळे तू ताबडतोब घरी निघून जा.''

परंतु ध्रुवबाळाला ते अजिबात पटलं नाही. तो म्हणाला, ''प्रत्येकाला देव त्याच्या त्याच्या पद्धतीने दिसतो. ईश्वरभक्तीचा प्रत्येकाचा मार्ग वेगळा असतो. परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचे अनेक मार्ग आहेत. मी माझ्यासाठी हा मार्ग निवडलेला आहे आणि त्यावरूनच मी वाटचाल करणार आहे.''

आपण ध्रुवबाळाचं मन मुळीच वळवू शकणार नाही हे नारदमुनींच्या लक्षात आलं; त्यामुळे त्यांनी त्याला त्याने निवडलेल्या मार्गावरून वाटचाल करण्यासाठी एकटं सोडून दिलं.

ध्रुवबाळ चालतच होता. अखेर तो एका घनदाट अरण्यात येऊन पोहोचला. आता त्याचा प्रवास अधिकच कष्टप्रद झाला. त्याला वाटेत वन्य श्वापदंसुद्धा सामोरी आली. आपण संकटात आहोत असं त्याला कधीही वाटलं की, तो डोळे घट्ट मिटून घेई आणि भगवान विष्णूंची प्रार्थना करत असे. 'ओम नमो


'गोपीची डायरी' आहे खास,
रंगीत चित्रांचा ल्यायलाय तिने साज.
सुधा मूर्तींची रौप्यमहोत्सवी साहित्यकृती,
वाचकांसाठी आनंदाची अनुभूती

गोपीची डायरी

सुधा मूर्ती । अनु. लीना सोहोनी
किंमत : ₹ ४९५

ebook available



भगवते वासुदेवाय ।' किंवा 'ओम नमो नारायणा ।' या मंत्राचा तो जप करू लागे.

तो अर्ध्या रस्त्यामध्ये पोहोचल्यावर वाटेत काही चोर त्याच्यासमोर आले; पण इतक्या लहान मुलाची ती ईश्वरभक्ती पाहून त्यांना असं वाटलं की, हे कुणीतरी खास दैवी शक्ती लाभलेलं बालक असावं; त्यामुळे त्यांनी त्याला काहीसुद्धा इजा केली नाही.

ध्रुवबाळ हळूहळू पण अत्यंत सावधपणे अरण्याच्या मध्याच्या दिशेने चालू लागला. वाटेत त्याला एक नदी लागली. ही नदी म्हणजे पवित्र गंगा नदी होती. सभोवतालचं वातावरण शांतीने भरलेलं होतं. ध्रुवबाळ जणू खेचल्यासारखा त्या नदीच्या काठी गेला. त्याच्या समोरच्याच बाजूला एक पर्वत होता. त्या पर्वतावर चढून त्याने ध्यान-धारणेसाठी एक जागा शोधली आणि तिथे तो तपश्चर्येला बसला.

भगवान विष्णू स्वर्गातून ध्रुवबाळाचा हा खडतर प्रवास बारकाईने पाहत होते. ध्रुवबाळाने तपश्चर्येसाठी जागा शोधली असून तो तिथे जाऊन बसल्याचं त्यांनी पाहिलं आणि ते प्रसन्न झाले. त्यांना आता राहवेना आणि ते मूर्तस्वरूपात त्याच्यासमोर प्रकट झाले. ते त्याला म्हणाले, ''बाळा, तुझ्या परमभक्तीने मी प्रसन्न झालो आहे. तुला जे काही हवं असेल, ते तू माझ्याकडे माग.''

ध्रुवबाळ अनिमिष नेत्रांनी भगवान श्रीविष्णूच्या त्या सुंदर रूपाकडे बघत राहिला. त्याची नजर त्यांच्यावरून हटेना. अखेर तो नतमस्तक होऊन म्हणाला, ''मला फक्त तुमच्या जवळ राहायचं आहे. मला बाकी काहीही नको.''

भगवान विष्णू त्याला म्हणाले, ''बाळा, कालांतराने तू मला येऊन मिळणारच आहेस; पण अजून त्या गोष्टीला खूप अवकाश आहे. एक गोष्ट तू लक्षात घे, मी सततच तुझ्या अवतीभोवती असणार आहे; पण आता मात्र तू ताबडतोब तुझ्या घरी परत जा, कारण तुझ्या नशिबामध्ये तुझ्या वडिलांच्या नगरीचा राजा होणं लिहिलेलं आहे. तू तिथे जाऊन अत्यंत न्याय्य पद्धतीने राज्यकारभार कर आणि तुझ्या प्रजेचा सांभाळ कर. तुझ्या प्रजाजनांना तू आपल्या मुला-बाळांसारखं वागव. सगळ्या जगाने तुझी आठवण काढली पाहिजे. तू इतक्या लहान वयामध्ये फार मोठं कर्तृत्व गाजवून दाखवलेलं आहेस, म्हणूनच आकाशामधील एका ताऱ्याला मी तुझं नाव देतो आहे.''

असं म्हणून भगवान विष्णूंनी आकाशात दूरवर चमकणाऱ्या एका ताऱ्याकडे बोट दाखवलं आणि ते म्हणाले, ''त्या ताऱ्याकडे बघ. आजपासून सर्व जग या ताऱ्याला ध्रुव तारा म्हणूनच ओळखेल. जगभरातील सर्व प्रवाशांसाठी हा तारा दिशादर्शक म्हणून काम करेल. तो त्यांना मार्गदर्शन करून सुरक्षित स्थळी पोहोचवेल. तू आता परत जा आणि तुझी कर्तव्यं पूर्ण कर. तुझ्या प्रजाजनांना मार्गदर्शन कर. मी सतत तुझ्याबरोबरच असेन.''

ध्रुवबाळाने भगवान श्री विष्णूंच्या चरणी लोटांगण घातलं. मग त्याने मान वर करून पाहिलं, तेव्हा भगवान विष्णू अंतर्धान पावले होते.

ध्रुवबाळ पुन्हा एकदा आपल्या घराच्या दिशेने वाटचाल करू लागला. तो जेव्हा राजधानीमध्ये येऊन पोहोचला, तेव्हा त्याने पाहिलं, तर राजधानीत बंडाळी सुरू झाली होती. उत्तानपाद राजा नेभळट होता. तो आपली राणी सुरुची हिच्या आहारी गेला होता. तिचा त्याच्यावर वरचष्मा होता, तिने ध्रुवबाळाचा छळ केला होता. या सर्व गोष्टी प्रजेने पाहिल्या होत्या आणि त्याबद्दल आपला विरोध प्रकट करण्यास सुरुवात केलेली होती. लोकांनी केलेल्या विरोधामुळे अखेर उत्तानपाद राजाला आपली चूक कळून आली.

तेवढ्यात ध्रुवबाळ राजधानीत परत येत असल्याची वार्ता त्याला समजली. मग तो आपल्या दुसऱ्या राणीकडे म्हणजेच ध्रुवबाळाची आई सुनीती हिच्याकडे गेला आणि तिच्याबरोबर ध्रुवबाळाची वाट पाहू लागला. नगरात लोकांनी गुढ्या-तोरणं उभारून ध्रुवबाळाच्या स्वागताची तयारी सुरू केली होती.

थोड्याच दिवसांत ध्रुवबाळ आपल्या आई-वडिलांना येऊन भेटला. त्याने आपल्या वडिलांना तसेच आपल्या सावत्र आईलासुद्धा क्षमा केली. त्यानंतर काही वर्षं लोटली. ध्रुवाचं शिक्षण पूर्ण झालं. त्याने राजनीती-शास्त्राचे धडे घेतले. उत्तानपाद राजाने त्याला आपला वारस नेमला. त्यानंतर कित्येक वर्षं ध्रुवाने राज्य केलं. कानपूर शहराच्या जवळ 'ध्रुव तिला' नावाचं एक ठिकाण आहे.

ध्रुवबाळाने आपल्या तपश्चर्येसाठी या जागेची निवड केली होती असं तिथले लोक मानतात.

आज आपण या जगात कुठेही प्रवास करत असलो, तरी आकाशाकडे पाहिल्यावर आपल्याला ध्रुवतारा दिसतो. त्यालाच 'ध्रुव नक्षत्र' असंसुद्धा म्हणतात. रोज रात्री आकाशात हा तारा उगवतो आणि आजही तो दिशादर्शक बनून लोकांना मार्गदर्शन करण्याचं काम करतो आहे.


**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'दोन शिंगे असलेला ऋषी' या सुधा मूर्ती लिखित पुस्तकातून)**

भारतीय बाजारपेठेवरील वसाहतवाद्यांचं आक्रमण..
तीन शतकांच्या धगधगत्या इतिहासावर
प्रकाशझोत टाकणारं संशोधन

# असा लुटला भारत

रॉय मॉक्झॅम
अनु. सरिता आठवले
किंमत : ₹ ३५०

ebook available




‘अंतर्नादा’ची किमया फार...
जीवनाला देते सार्थकता अपार

# अंतर्नाद

रमेश जोशी
किंमत : ₹ २६०

ebook available










# रणजित देसाई


## यांचे साहित्य म्हणजे वाचकांशी उच्च भावनिक स्तरावर साधलेला कलात्मक संवाद

## ॥ स्वामी ॥


## श्रीमानयोगी




राजा रवि वर्मा





राधेय





गंधाली





अभोगी




प्रतीक्षा




पावनखिंड




बाबुलमोरा



मोरपंखी सावल्या




शेकरा





समिधा




प्रपात





मेघ




माझा गाव



लक्ष्यवेध



कातळ




# त्रिशंकू

सुधा मूर्ती

अनु : लीना सोहोनी

।। पुस्तकाच्या पानांतून ।।



## सुवर्णवृक्ष

रघू हा रामाचा पूर्वज होता. तो अत्यंत शूर योद्धा आणि लोकप्रिय सूर्यवंशी राजा होता. त्याचं राज्य फार विस्तृत होतं. आजचा भारत, पाकिस्तान तसेच मध्य आशियातील काही भाग इथपर्यंत त्याच्या राज्याचा विस्तार झालेला होता. तो कधीही एखादं युद्ध जिंकून परत आला की एक यज्ञ करून त्यानंतर गोरगरिबांना पुष्कळ दानधर्म करायचा. तो कोणत्याच याचकाला कधी विमुख पाठवत नसे.

त्याच्या राज्यात कौशेट्य नावाचा एक अत्यंत गरीब पण बुद्धिमान विद्यार्थी राहत होता. त्याचे गुरुजी कोणत्याही गुरुदक्षिणेची अपेक्षा न करता त्याला विनामूल्य शिक्षण देत असत.

काही काळानंतर कौशेट्य सर्व विद्यांमध्ये पारंगत झाला. मग त्याने गुरुजींना विचारलं, ''गुरुजी, मी तुम्हाला काय गुरुदक्षिणा देऊ, तुम्ही मला सांगा.''

''वत्सा, मला तुझी संपूर्ण पार्श्वभूमी माहिती आहे,'' गुरू म्हणाले. ''त्यामुळेच तुझ्याकडून मला कसल्याही शुल्काची अपेक्षा नाही. तू एक आदर्श विद्यार्थी आहेस. तू जा आणि तुझ्या या ज्ञानाचा सगळीकडे प्रसार कर. तीच माझी गुरुदक्षिणा असं मी समजेन. बाळा, तुला माझा आशीर्वाद आहे. आता तू तुझा मार्ग शोध, नशीब काढ.''

पण कौशेट्याला ते मंजूर नव्हतं. तो म्हणाला, ''मला असं वाटतं, की गुरूकडून ज्ञानसंपादन केल्यावर जर एखाद्या विद्यार्थ्याने गुरुदक्षिणा दिली नाही, तर त्याचं शिक्षण अपूर्ण राहतं. त्यामुळे मी तुम्हाला काहीतरी तर दिलंच पाहिजे.''

गुरुजींनी पुष्कळ विरोध केला, पण कौशेट्य त्यांचं काही एक ऐकून घेण्यास तयार नव्हता. अखेर गुरुजी संतप्त होऊन म्हणाले, ''ठीक आहे. तू जर इतका हट्टीपणा करत असशील, तर मग तू मला दशलक्ष सुवर्णमुद्रा आणून दे आणि तसं करणं जर तुला शक्य नसेल, तर मग तुला ते जमणार नसल्याचं माझ्यासमोर मान्य कर, माझे आशीर्वाद घे आणि इथून निघून जा.''

त्यांचे शब्द ऐकून कौशेट्य आश्चर्यचकित झाला. आपले गुरू इतक्या मोठ्या रकमेची मागणी करतील, अशी त्यानं कधीच अपेक्षा केली नव्हती. तो काळजीत पडला. 'आता ही एवढी मोठी रक्कम मी आणू तरी कुठून?' तो स्वतःशीच म्हणाला. 'खरं तर माझे गुरू मला जायला सांगत होते. त्याच वेळी त्यांचं ऐकून मी निघून जायला हवं होतं; पण माझा अहंकार आडवा आला. आता माझ्याकडून जे काही प्रयत्न

होतील ते करणार आणि त्यांची ही मागणी पूर्ण करणार.’

मग तो गुरुजींना म्हणाला, ‘‘गुरुजी, मला आशीर्वाद द्या. मी हे पैसे मिळवून तुम्हाला आणून देईन.’’ त्यानंतर तो तेथून निघून गेला.

प्रवासात त्याला एक घनदाट अरण्य लागलं. तिथून मार्गक्रमण करत असताना आपल्या समोरच्या महाकाय कामाविषयीच तो विचार करत होता. ‘मी आता कुणाला जाऊन भेटू? कुणाचा सल्ला घेऊ?’ अशा विचारात तो पडलेला असताना अचानक त्याला रघू राजाची आठवण झाली. रघू राजा कोणत्याही याचकाला कधीच विमुख पाठवत नाही अशी त्याची ख्याती असल्यामुळे, आपल्यालाही तो रिक्त हस्ताने परत पाठवणार नाही, असा त्याचा मनोमन विश्वास वाटत होता. त्यामुळे तो रघू राजाच्या प्रासादाकडे निघाला.

कौशेट्य राजवाड्यात पोहोचताच रघू राजानं त्याचं आदरपूर्वक स्वागत करून त्याला मातीची अनेक मडकी दिली. कौशेट्य ती मडकी पाहून मनातून निराश झाला. ‘जो राजा अशी मातीची मडकी बाळगतो, तो आपल्याला दान म्हणून काय देणार?’ असा विचार त्याच्या मनात आला; परंतु राजा रघूने कौशेट्याची अत्यंत आदरपूर्वक विचारपूस केली. त्याच्या येण्याचं कारण विचारलं. तो म्हणाला, ‘‘तुम्ही एवढे मोठे विद्वान आहात. तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. तुम्हाला माझ्याकडून काय हवं, ते सांगा.’’

त्यावर जरा चाचरत कौशेट्य म्हणाला, ‘‘महाराज, मला दशलक्ष सुवर्णमुद्रा हव्या आहेत.’’

परंतु ते ऐकून रघू राजा जरासुद्धा विचलित झाला नाही. तो म्हणाला, ‘‘मी आत्ताच एक मोठा यज्ञ पार पाडला आणि त्यानंतर मला जेवढं काही दान करणं शक्य होतं, ते मी करून टाकलं. आता माझ्याकडे फक्त ही एवढी मातीची मडकी शिल्लक आहेत; परंतु तुम्ही जी इच्छा व्यक्त केलेली आहे, त्याची पूर्तता करणं हे माझं कर्तव्य आहे. त्यामुळे तुम्ही मला थोडा वेळ द्या. मी तुमच्यासाठी या पैशांची व्यवस्था करतो.’’

त्या रात्री रघू राजा बिछान्यावर पडून विचार करू लागला. ‘हे एवढे पैसे मी कुठून आणू? या बाबतीत धनसंपत्तीची देवता कुबेराची मदत घ्यावी का? परंतु मी एक राजा आहे. मी कुणाकडेही कधी कसल्याच गोष्टीची याचना करू शकत नाही. त्यामुळे कुबेरावर आक्रमण करून युद्धात त्याचा पाडाव करून त्याच्याकडून ही रक्कम हस्तगत करणं, एवढा एकच उपाय माझ्याकडे आहे.’

मग दुसऱ्या दिवशी सकाळी आपले काही निवडक सैनिक बरोबर घेऊन राजा रघू उत्तर दिशेला असलेल्या कुबेराच्या निवासस्थानाकडे निघाला. संपूर्ण रात्रभर प्रवास करून ते कुबेराची नगरी अलकावतीपाशी पोहोचले. त्यांनी नगरीच्या बाहेर मुक्काम ठोकला.


कुबेराचे दूत राज्यात सर्वत्र टेहळणी करत दिवसरात्र हिंडत असत. काही वेळातच त्याचे दूत कुबेराच्या राजवाड्यात जाऊन त्याला भेटून म्हणाले, ‘‘महाराज, आपल्या राज्यावर चाल करून येण्यासाठी रघूराजा पूर्ण तयारीनिशी आला आहे. तो गावच्या वेशीबाहेर तळ ठोकून थांबलेला आहे. त्याने एका ऋषींना दहा लक्ष सुवर्णमुद्रा दान म्हणून देण्याचं वचन दिलं आहे आणि त्यासाठी त्याला आपल्या राज्यावर स्वारी करायची आहे.’’

रघूच्या मनातला हेतू समजल्यावर कुबेराला फार नवल वाटलं. त्याने आपल्या मनाच्या सामर्थ्याचा वापर करून रघूचा ठावठिकाणा शोधून काढला. रघू त्या वेळी रानात एका शमी वृक्षाखाली झोपला होता. कुबेराने तत्काळ त्या शमीवृक्षाच्या


एल्विस कोलच्या फक्कड कारनाम्यांचा
रंगतदार प्रवास...

द मंकीज रेनकोट

रॉबर्ट क्रेस
अनु. : सुरेश देशपांडे
किंमत : ₹ ४८०



ebook available

दुसऱ्या दिवशी सकाळी झोपेतून जाग आल्यावर रघूला तो सुवर्णमुद्रांनी लगडलेला वृक्ष दिसला; परंतु ही सगळी त्या कुबेराची माया आहे, हे त्याला तत्काळ समजलं. तो आपल्या सैनिकांना म्हणाला, ''आपण ज्या कामासाठी इथे आलो होतो, ते काम झालं आहे. आता आपल्याला युद्ध करण्याची गरज नाही. आता आपण फक्त या झाडाच्या दशलक्ष सुवर्णमुद्रा तोडून घेऊ. बाकी सर्व झाडावरच राहू देत. एखाद्या राजाचं जीवन हे एका योग्यासारखं असलं पाहिजे. कोणत्याही ऐहिक गोष्टीचा मोह त्याला नसावा.''

मग दशलक्ष सुवर्णमुद्रा बरोबर घेऊन रघू आपल्या राजधानीला परतला. त्याने कौशेट्याला निरोप पाठवून ते पैसे घेण्यासाठी बोलावून घेतलं.

स्वर्गस्थ देव रघूचं हे सत्कृत्य आणि ते करण्यामागचा त्याचा हेतू बघून प्रसन्न झाले. त्यांनी त्याला भरभरून आशीर्वाद दिले.

कौशेट्याने रघू राजाकडून मिळालेली ती दशलक्ष सोन्याची नाणी आपल्या गुरुजींना गुरुदक्षिणा म्हणून दिली. गुरुजींनीसुद्धा प्रसन्न होऊन आपल्या शिष्याला आशीर्वाद दिला. ते म्हणाले, ''बाळा, तू मला गुरुदक्षिणा देऊन वचनपूर्ती केली आहेस. आता तू जगात तुझ्या ज्ञानाचा प्रसार कर. तुझी आयुष्यात खूप भरभराट होईल.''

गुरुजींनी त्याच दिवशी ताबडतोब त्या सगळ्या सुवर्णमुद्रा गोरगरिबांमध्ये वाटून टाकल्या. तो दिवस म्हणजे अश्वयुज

महिन्यातील दशमी होती. त्या दिवसापासून त्या महिन्याच्या दशमीला सोनं लुटण्याची परंपरा सुरू झाली. आज आपल्याकडे लुटण्यासाठी सोनं नसलं, तरी आपण शमी वृक्षाची पानं लुटून हा दिवस साजरा करतो. पुढे जाऊन बरोबर याच महिन्याच्या याच तिथीला प्रभू रामचंद्रांनी रावणाचा पराभव केला, तेव्हापासून या महिन्याच्या दशमीला विजयादशमी किंवा दसरा हे नाव रूढ झालं.

तेव्हापासून शमी वृक्षाला पवित्र वृक्ष मानण्यात येतं. त्यालाच लोक सुवर्णवृक्ष असंही म्हणतात.

आणखी एक आख्यायिका सांगितली जाते. पांडव जेव्हा अज्ञातवासात होते, तेव्हा आपल्या शस्त्रास्त्रांवरून आपल्याला कुणी ओळखू नये, म्हणून त्यांनी ती सगळी एका बासनात बांधून शमी वृक्षाच्या बुंध्यामध्ये लपवून ठेवली होती आणि विराटनगरात निःशस्त्र प्रवेश केला होता. अशा रीतीने अज्ञातवासात असताना हा वृक्ष पांडवांच्या मदतीला आला होता.

आज देशभरात नवरात्रीचे नऊ दिवस संपल्यावर दशमीला लोक सण साजरा करतात. या दिवशी दुर्गापूजा करण्यात येते. विजयादशमीच्या दिवशी शमी वृक्षाची पानं एका संदुकीत ठेवण्यात येतात आणि नंतर ती नातलगांमध्ये आणि स्नेहीजनांमध्ये वाटण्यात येतात. लहान मंडळी थोरामोठ्यांच्या पाया पडून त्यांना शमीची पानं देतात आणि त्यांचे आशीर्वाद घेतात.

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'त्रिशंकू' या सुधा मूर्ती लिखित पुस्तकातून)**

◆◆◆


ज्ञानाई सावित्रीबाई फुले यांच्या काव्यजाणिवा
आणि त्यांचं समग्र चिंतन यांवर
प्रकाश टाकणारं दर्जेदार चरित्र


ज्ञानाई सावित्रीबाई फुले

डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर

किंमत : ₹ २५०

ebook available






# गरुडजन्माची कथा

सुधा मूर्ती
अनु : लीना सोहोनी

॥ पुस्तकाच्या पानांतून ॥

## गजाननाच्या कथा

### बुद्धीची देवता

एक दिवस कैलास पर्वतावरील आपल्या निवासस्थानामध्ये बसून पार्वती भगवान शंकरांच्या भक्तांचं निरीक्षण करत होती. ''ही सर्व माणसं तुमचे भक्त आहेत, देवा. ते फक्त तुमचंच ऐकतात. माझं नाही.''

''नाही पार्वती, तू म्हणतेस ते खरं नाही.''

त्यावर पार्वती काहीच बोलली नाही; पण आपलंच म्हणणं बरोबर आहे, याची तिला खात्री होती.

काही दिवसांनी तिने भगवान शंकरांचं वाहन असलेल्या शुभ्र नंदीला बोलावून घेतलं. ती म्हणाली, ''हे नंदी, मी आता स्नानासाठी जात आहे. तू दरवाज्यापाशी पहारा दे आणि माझं स्नान होईपर्यंत कुणालाही आत येऊ देऊ नकोस.''

भगवान शंकर घरी आले, तेव्हा नंदी बाहेरच पहारा देत उभा होता. शंकर म्हणाले, ''पार्वती कुठे आहे?''

''देवी स्नान करत आहेत.''

त्यावर मान डोलावून शंकरांनी आत शिरण्यासाठी एक पाऊल उचललं. नंदी त्यांना अडवत म्हणाला, ''देवा, आतमध्ये देवी स्नान करत आहेत. त्यांचं स्नान पूर्ण होऊन त्या तयार झाल्याशिवाय मी कोणालाही आत सोडायचं नाही, अशी त्यांची आज्ञा आहे.''

''नंदी, तू म्हणतोस ते खरं असेलही, पण मी या घराचा स्वामी आहे. पार्वती माझी पत्नी आहे. तेव्हा मला पाहिजे तेव्हा मी या घरात जाऊ शकतो किंवा तिथून बाहेर येऊ शकतो. मला कुणीही त्यापासून मज्जाव करू शकत नाही.''

नंदीला ते पटलं. तो लगेच वाट सोडून बाजूला झाला आणि त्यानं भगवान शंकरांना आत शिरण्यास वाट करून दिली.

शंकरांना आत आलेलं पाहताच पार्वतीला कळून चुकलं, की नंदी शिवभक्त असल्यामुळे तो त्यांच्याशी एकनिष्ठ होता. म्हणूनच त्यानं भगवान शंकरांची आज्ञा पाळली; तिची नाही. तिला त्यामुळे अतीव दुःख झालं. कुणीतरी असंच आपल्याशीसुद्धा एकनिष्ठ असावं, त्यानं आपली आज्ञा पाळावी, पुढचा मागचा कसलाही विचार न करता त्यानं ती पाळावी व कधीच डावलू नये, असं तिला वाटू लागलं.

परत एकदा पार्वती स्नानाला जाण्यासाठी निघाली होती. या खेपेला दरवाज्याची राखण करण्यासाठी दुसऱ्या कुणालातरी सांगण्याऐवजी तिनं फक्त आपल्याशी एकनिष्ठ राहील, अशी एक व्यक्ती निर्माण करण्याचं ठरवलं. मग तिनं मातीपासून एका लहान बालकाची मूर्ती घडवून त्यात प्राण फुंकले. तिनं त्या मुलाचं नाव गणेश असं ठेवलं.

गणेश सजीव होताच तो पार्वतीला वंदन करून म्हणाला,

‘‘माते, मी तुझ्या सेवेसाठीच जन्म घेतला आहे. मी आज तुला कशा प्रकारे मदत करू, ते फक्त सांग.’’

पार्वती हळुवारपणे म्हणाली, ‘‘बाळा, मी घरात स्नान करणार आहे. तू इथे दाराजवळ उभा राहून पहारा दे. मी सांगेपर्यंत कुणालाही आत येऊ देऊ नको.’’

काही वेळानंतर भगवान शंकर घरी परत आले. आपल्या घराच्या दाराजवळ एक लहान मुलगा पहारा देत उभा असल्याचं पाहून ते चकित झाले.

‘‘बाळा, तू कोण आहेस? तुझे आई-वडील कुठे आहेत? तू इथे असा का बरं उभा आहेस?’’ भगवान शंकर त्याला म्हणाले.

तो मुलगा धिटाईने म्हणाला, ‘‘माझं नाव गणेश. मी पार्वतीचा मुलगा आहे.’’

परंतु शंकराचा त्याच्यावर मुळीच विश्वास बसला नाही. ते म्हणाले, ‘‘बाजूला हो आणि मला आत जाऊ दे.’’

‘‘नाही, मी असं अजिबात करणार नाही. मला माझ्या आईच्या आज्ञेचं पालन करायचं आहे. तिचं स्नान पूर्ण होईपर्यंत तुम्ही इथेच थांबा.’’

‘‘अरे बाळा, मी कोण आहे ते तुला माहीत नाही का? मी तर भगवान शंकर आहे. हे घरसुद्धा माझं आहे. तू माझ्याच घरात शिरण्यापासून मला अडवू शकत नाहीस.’’

परंतु गणेश मात्र त्यांच्या धमकावणीला अजिबात घाबरला नाही. तो त्यांच्या वाटेतून बाजूला झालाच नाही. तो पुन्हा म्हणाला, ‘‘क्षमा करा, पण माझ्या आईनं मला तुम्हाला आत सोडायला सांगेपर्यंत मी तसं करू शकत नाही.’’

गणेशाच्या तोंडचे शब्द ऐकून भगवान शंकरांना क्रोध अनावर झाला. त्यांनी पुन्हा पुन्हा गणेशाचं मन वळवण्याचा प्रयत्न केला; पण तो त्यांचं काही ऐकायलाच तयार नव्हता. त्यांनी आपल्या त्रिशूळाचा एकच वार करून त्या मुलाचं मस्तक धडावेगळं केलं. तो वार त्यांनी इतका ताकदीनं केला होता, की त्या मुलाचं मस्तक उडून थेट हिमालय पर्वतावर जाऊन पडलं.

बाहेर चाललेला मोठा गदारोळ ऐकून पार्वती घाईनं घराबाहेर आली; पण तेव्हा फारच उशीर झाला होता. हिमाच्छादित पांढऱ्या शुभ्र जमिनीवर तिच्या पुत्राचं मस्तकविरहित धड पडलं होतं. पार्वतीनं ते पाहून आक्रोश केला. ‘‘माझ्या बाळाची ही अशी अवस्था कुणी केली? हा माझा पुत्र आहे. त्याच्याशी हे असं क्रूरतेनं वागण्याचं कुणाचं धाष्ट्‌र्य झालं? ’’

एव्हाना शंकरालाही आपली चूक कळून चुकली होती. त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊ लागला. त्यानं पार्वतीचं सांत्वन करण्याचा खूप प्रयत्न केला. ‘‘मी ही फार मोठी चूक केली आहे. त्याला तू निर्माण केलं होतंस याची मला कल्पना नव्हती. मला वाटलं, तू त्याची माता असल्याचं तो खोटंच सांगत आहे. मला क्षमा कर. त्याचे प्राण परत आणण्यासाठी मी काय वाटेल ते करीन.’’

पार्वतीच्या डोळ्यांतून अजूनही अश्रू वाहतच होते. तिनं काहीही न बोलता आपल्या पुत्राच्या निश्चेष्ट देहाकडे पाहत मान डोलावली.

मग शिवानं नंदीला बोलावून उत्तर दिशेला त्या मुलाचं मस्तक शोधून आणण्यासाठी पाठवलं.

नंदीनं त्याचं मस्तक मिळवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली; पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. तो हताश होऊन शंकराकडे परत येऊन म्हणाला, ‘‘देवा, ते मस्तक कुठेच सापडत नाहीये. मी आता काय करू, ते तुम्हीच सांगा.’’

‘‘तू परत एकदा जाऊन शोध,’’ भगवान शंकर म्हणाले, ‘‘आणि तरीही तुला जर ते नाहीच सापडलं, तर मग उत्तरेकडे तोंड करून झोपलेलं जे कुणी तुला दिसेल, त्याचं मस्तक कापून माझ्याकडे घेऊन ये.’’

नंदी परत एकदा आपल्या धन्याच्या आज्ञेचं पालन करण्यासाठी बाहेर धावला. खूप शोध घेतल्यावर अखेर त्याला मस्तक उत्तर दिशेला करून झोपलेला हत्ती दिसला. त्याबरोबर एका क्षणाचाही विचार न करता त्यानं त्या हत्तीचा शिरच्छेद करून त्याचं मस्तक ताब्यात घेतलं आणि त्वरेनं भगवान शंकरांकडे गेला.


भगवान शंकर ते पाहून प्रसन्न झाले. त्यांनी ते मस्तक गणेशाच्या

मास्टर स्टोरी टेलर जेफ्री आर्चर
यांची नवी
अफलातून कादंबरी...

हेड्स यू विन

जेफ्री आर्चर । अनु. : पूर्णिमा कुंडेटकर
किंमत : ₹ ८५०

ebook available



धडाला जोडून त्यामध्ये प्राण फुंकले. जिवंत झालेल्या गणेशाचा त्यांनी आपला पुत्र म्हणून स्वीकार केला. अशा रीतीनं गणेश आणि कार्तिकेय हे दोघे एकमेकांचे भाऊ झाले.

आता गणेश आपल्या माता-पित्यांची भक्ती करू लागला. एक दिवस शंकर पार्वतीनं आपल्या दोन्ही मुलांना जवळ बोलावून घेतलं. पार्वती दोघांना म्हणाली, ''तुम्हा दोघा भावंडांमध्ये सहज गंमत म्हणून मी एक स्पर्धा लावते. तुम्हा दोघांपैकी जो कुणी पृथ्वी प्रदक्षिणा करून आधी परत येईल, त्याला आम्ही बुद्धीचं फळ देऊ.''

कार्तिकेय तत्काळ आपल्या वाहनावर- मोरावर आरूढ होऊन लगेच पृथ्वी प्रदक्षिणेसाठी निघाला. गणेशाला मात्र कसलीच घाई नव्हती. त्यानं फक्त आपल्या आई-वडिलांच्या भोवती प्रदक्षिणा घातली व त्यानंतर त्यांना वंदन करून तो नतमस्तक होऊन उभा राहिला.

पार्वती त्याच्याकडे पाहून प्रेमानं म्हणाली, ''बाळा, तू हे काय करतो आहेस? एव्हाना तुझ्या भावानं अर्धी पृथ्वीप्रदक्षिणा केलीसुद्धा असेल. तू तर या स्पर्धेत नक्कीच हरणार.''

त्यावर गणेशाने आई-वडिलांकडे इतक्या प्रेमानं पाहून स्मितहास्य केलं, की पार्वतीचं मातृहृदय उचंबळून आलं. ''काही हरकत नाही, माते. अगं, तुम्ही दोघंच तर माझं जग आहात आणि मी तुमच्याभोवती प्रदक्षिणा घातलीसुद्धा, माझा प्रवास पूर्ण झाला.''

शंकर पार्वती यांनी प्रसन्न होऊन बुद्धीचं फळ त्याच्या हाती सोपवलं.

''गणेशा, तू इतका बुद्धिमान मुलगा आहेस,'' भगवान शंकर म्हणाले, ''माझे आशीर्वाद तुझ्या सतत पाठीशी आहेत. आजपासून सगळं जग तुला बुद्धिदेवता म्हणूनच ओळखेल.''

### महाशक्तिशाली उंदीर

क्रौंच हा इंद्राच्या दरबारातील एक मान्यवर वादक होता. एक दिवस त्याला दरबारातील वादनाच्या कार्यक्रमाला पोहोचण्यास उशीर झाल्यामुळे तो लगबगीनं तिकडे निघाला होता. दुर्दैवानं या गडबडीत एका वयोवृद्ध ऋषींच्या पायावर त्याचा चुकून पाय पडला. वामदेव नावाचे ते ऋषी वेदनेनं कळवळले. क्रोधित होऊन त्यांनी त्याला शाप दिला. ''तू कायम असाच सगळीकडे घाईघाईनं पळत सुटणारा उंदीर होशील!'' ते म्हणाले.

बिचाऱ्या क्रौंचाचं रूपांतर तिथल्या तिथे डोंगरात आढळून येणाऱ्या एका भल्या मोठ्या उंदरात झालं.

एकदा उंदरात रूपांतर झाल्यावर आपल्या उचापतींनी त्यानं लोकांना अक्षरशः सळो की पळो करून सोडलं. शेतकऱ्यांच्या घरांमध्ये गुपचुप घुसून, त्यांनी काळजीपूर्वक साठवलेलं धान्य खाऊन टाकणं, कुणाच्याही नकळत आश्रमात शिरून आश्रमवासीयांना उपद्रव देणं, तिथल्या अन्नधान्याची नासाडी करणं, असे अनेक उद्योग तो करू लागला. शेवटी जेरीस आलेल्या लोकांनी गणेशाचा धावा सुरू केला. ''देवा, आता तूच या त्रासापासून आमची सुटका कर!'' अशी ते हात जोडून गणेशाची विनवणी करू लागले.

''तू एवढासा आहेस, खूप चपळ आहेस आणि पाहिजे त्या सांदीकोपऱ्यात जाऊन लपून शकतोस, याची मला पूर्ण कल्पना आहे.'' गणेश त्या उंदराला म्हणाला. ''पण म्हणूनच आज मी तुझ्याभोवती पाश टाकून तुला इथे बांधून ठेवणार आहे.'' त्याच्या बोलण्यात निर्धार स्पष्ट दिसत होता. त्यानं हातातील दोराचा काळजीपूर्वक फास बनवून त्या उंदराच्या गळ्यात अचूक टाकून त्याला जेरबंद केलं. त्यानं तो फास अलगद थोडासा आवळला. उंदराच्या रूपातील क्रौंचाला आता मानसुद्धा हलवणं अशक्य होऊन बसलं.

क्रौंच गणेशापुढे गयावया करत म्हणाला, ''देवा, मला आता माझी चूक कळून आली आहे. मी आता परत कधीही कुणालाही त्रास देणार नाही. मला तुमचं वाहन बनवा. जेव्हा लोक तुमची आराधना करतील, तेव्हा त्यांना माझ्याबद्दलही आदर वाटेल.''

''अरे, पण माझा एवढा भार तू कसा काय उचलशील?'' लंबोदर गणेशानं मिस्कीलपणे विचारलं.

''त्याची चिंता करण्याचं काही कारण नाही. तुमच्या आकाराप्रमाणे मी माझा आकार बदलेन.'' क्रौंच म्हणाला.


तीन रुग्णांच्या मृत्यूच्या संशयाची सुई आहे ॲनेस्थेसियालॉजिस्ट
डॉ. एवा लंडनकडे... तिचं व्यक्तिमत्त्व गूढ...
रेसिडेन्ट डॉक्टर नोहाचा त्या गूढापर्यंत पोहचण्याचा चित्तथरारक प्रवास


TBC-33 Book No.2

शार्लटन्स

रॉबिन कुक । अनु. : उज्ज्वला गोखले

किंमत : ₹ ७५०

ebook available





गणेशानं ते मान्य केलं.

अशा तऱ्हेनं उंदराच्या रूपातील क्रौंच गणेशाचं वाहन बनला. गणेशभक्तांच्या सोयीसाठी वाटेतले सर्व अडथळे व गर्दी टाळून तो गणेशाला इकडे तिकडे घेऊन जाऊ लागला.

## दूर्वा

फार फार वर्षांपूर्वी अनलासुर नावाचा एक असुर राहत होता. त्याच्या अंगातून अग्नीच्या ज्वाला निघत असत. तो कुठेही जायला निघाला की त्याच्या शरीरातून एक आगीचा लोळ बाहेर पडायचा. स्वतःच्या अंगच्या या शक्तीचा अनलासुर खूप जास्त गैरफायदा घ्यायचा. तो लोकांचा छळ करायचा, सर्वत्र उत्पात माजवायचा.

बघताबघता त्याचं वागणं सर्वांना असह्य होऊ लागलं. अखेर संत्रस्त झालेल्या लोकांनी गणेशाकडे धाव घातली.

''तुम्ही काही काळजी करू नका. मी त्याचा बंदोबस्त करतो.'' गणेश म्हणाला. तो अनलासुराचा शोध घेत निघाला.

गणेशाला पाहताच अनलासुरानं त्याला गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर गणेशानं स्वतःचा आकार वाढवण्यास सुरुवात केली. अखेर तो इतका मोठा बनला, की त्यानंच अनलासुराचा घास घेतला. अनलासुर गणेशाच्या घशातून खाली उतरून त्याच्या पोटात जाऊन पोहोचला. ते पाहून सर्व जण हर्षातिरेकानं नाचू लागले.

परंतु अशा प्रकारे अनलासुराला गिळंकृत केल्यानंतर जरा वेळात गणेशाचं पोट दुखण्यास सुरुवात झाली. अनलासुरानं गणेशाच्या पोटात आगीचे लोळ सोडून त्याला त्रास द्यायला सुरुवात केली होती.

आपल्या पुत्राला होणारा त्रास पाहून भगवान शंकरांनी आपल्या गळ्यातील सर्पाला गणेशाच्या उदरावर सोडलं. सर्पाच्या थंडपणामुळे गणेशाच्या पोटात उसळलेला दाह कमी होईल, असं त्यांना वाटत होतं; पण प्रत्यक्षात तसं काहीच घडलं नाही. गणेश वेदनेनं कळवळू लागला.

मग भगवान विष्णू आले. त्यांनी गणेशाच्या उदरावर कमळ ठेवलं, पण त्याच्या शीतलतेनेसुद्धा त्याला काहीच आराम पडला नाही.

त्यानंतर गंगा धाव घेऊन आली. तिचं पाणी गणेशाच्या उदरावर झुळुझुळू वाहू लागलं. ब्रह्मदेवानं अमरत्वाचं अमृत त्याला पाजलं. वायुदेवानं गणेशाच्या उदरावरून शीतल वाऱ्याची झुळूक वाहू दिली. अखेर नगाधिराज हिमालयानं आपला थंडगार हिमाच्छादित हात गणेशाच्या उदरावरून अलगद फिरवला.

पण कशानंच गणेशाला बरं वाटेना. तो अजूनही तळमळत होता. सगळे गोंधळून गेले.

दूरवरून ऋषिमुनी गणेशाकडे धाव घेऊ लागले. त्याच्या प्रकृतीला उतार पडावा म्हणून सगळे झटत होते. सर्व विद्वानांनी एकत्र जमून चर्चा केली. या परिस्थितीतून काय मार्ग काढता येईल, गणेशाच्या दुखण्यावर काय उपाययोजना करता येईल यासाठी बराच ऊहापोह सुरू झाला. अखेर सर्वांना एक तोडगा सापडला.

मग ऋषिमुनी हिमालयात गेले. ते तिथून २१ दूर्वादले घेऊन परत आले. गणेशानं त्या ग्रहण केल्यावर त्याच्या दुखण्याला उतार पडेल असं त्यांनी त्याला सांगितलं. हा पोटशूळ थांबावा म्हणून अक्षरशः काहीही करण्याची गणेशाची तयारी होती. त्यानं त्या दूर्वा लगेच खाऊन टाकल्या. त्या दूर्वांमुळे गणेशाच्या पोटातील अनलासुराचा मृत्यू झाला. अखेर वेदनांपासून त्याची सुटका झाली.

त्या दिवसापासून दूर्वा गणेशाला प्रिय झाल्या. त्यामुळे लोकसुद्धा गणेशाला पूजेच्या वेळी दूर्वा अर्पण करू लागले.

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'गरुडजन्माची कथा' या सुधा मूर्ती लिखित पुस्तकातून)**


◆◆◆

सायबर गुन्ह्यांच्या साखळीची
पोलखोल करणाऱ्या मुंबई
पोलिसांच्या धाडसाची
गुंतवून ठेवणारी कहाणी...

## झिरो डे

एस. हुसेन झैदी
अनु. : वर्षा वेलणकर
किंमत : ₹ ३३०

ebook available





ॲन्ड्र्यू शोधतोय स्वत:चा खुनी...
जोडीला नृशंस हत्याकांडातून
वाचलेल्या दत्तक मुलांची कहाणी...
उत्कंठेची चरमसीमा गाठणारी थरारक कादंबरी

## रिले

मार्क लेव्ही
अनु. : प्रा. पुरुषोत्तम देशमुख
किंमत : ₹ ४२०

ebook available






# कालचक्राचे रक्षक

## अश्विन सांघी

अनु : संकेत लाड

।। पुस्तकाच्या पानांतून ।।

मिलेशियन लॅबमधल्या एका अंधाऱ्या खोलीमध्ये नॅशनल सिक्युरिटी एजन्सीचा एक माजी कर्मचारी बसलेला होता. अनेकांना फक्त त्याचं टोपणनाव माहीत होतं-क्रॅकर. खूप बलदंड माणूस होता तो. बुटका आणि मजबूत बांध्याचा, पिळदार शरीर, गोल चेहरा आणि लालसर रंग असलेला. जगभरातल्या कोट्यवधी लोकांचे दूरध्वनी आणि इंटरनेटवरच्या दळणवळणात बाधा आणणाऱ्या एनएसएसाठी काम केल्यामुळे मिलेशियनचं काम हे त्याच्यासाठी अगदीच किरकोळ होतं. तो फक्त श्मिड्टला रिपोर्ट करायचा.

टेबलच्या दुसऱ्या बाजूला आता श्मिड्ट येऊन बसले, टेबलपुढे श्मिड्ट आणि क्रॅकर समोरासमोर बसले होते. श्मिड्ट विजयची काही छायाचित्रं पाहत होता. "त्याच्या चेहऱ्यावर बराच मार लागलेला होता," क्रॅकर म्हणाला. "तरी त्याने पोलिसांत तक्रार नाही केली. मी नवी दिल्लीच्या पोलीस विभागातल्या आपल्या माणसाला विचारलं होतं."

"किती वेळ गायब होता तो?" श्मिड्टने विचारलं.

"काही तास," क्रॅकर म्हणाला. "त्याने त्याच्या मैत्रिणीला सांगितलं की त्याच्याकडच्या सगळ्या किमती वस्तू चोरीला गेल्या, त्याला मारहाण झाली आणि एका वेअरहाउसमध्ये सोडून दिलं गेलं."

"या सगळ्याची शहानिशा केली का?" श्मिड्टने विचारलं.

"त्याला त्याच्या मैत्रिणीकडे ज्याने सोडलं त्या कॅबवाल्याला विचारलं आम्ही," क्रॅकर म्हणाला. "त्याचं पाकिट चोरीला गेल्यामुळे कॅबचे पैसे त्या मुलीनेच दिले. त्याला जिथं ती कथित मारहाण झाली त्या रस्त्यावर तीन वेअरहाउसेससुद्धा आहेत. त्यापैकी कुठल्या तरी एका वेअरहाउसमध्ये फेकलं असेल त्याला. त्याच्या जखमा खऱ्या होत्या. वेगळं काही घडलं असेल असं सांगणारे काहीच पुरावे नाहीत."

"मला पूर्णपणे पटलं नाहीये हे," श्मिड्ट म्हणाले. "तो इथे येईपर्यंत आपण आपली पाळत वाढवूया."

४८

भारतातलं एक राज्य-उत्तराखंड हिमालयाच्या पायथ्याशी वसलेलं होतं. त्याच्या उत्तर सीमेला लागून चीन आणि नेपाळ हे दोन देश होते. स्थानिकांसाठी ते उत्तराखंड नव्हतं, देवभूमी होती ती. देवांची भूमी आणि हिमालयाचं प्रवेशद्वार. आणि तसंच होतं. तिथल्या बर्फाच्छादित पर्वतांवर प्राचीन काळातली असंख्य तीर्थस्थळं पसरलेली होती. त्या सगळ्या परिसरातल्या निसर्गसौंदर्यामुळे तिथलं वातावरण जास्तच दैवी वाटायचं.

दिल्लीपासून डेहराडूनजवळच्या जॉली ग्रँट

विमानतळापर्यंतच्या विमान प्रवासाला बरोबर एक तासाचा वेळ लागला. तिथे पोहोचल्यावर विजयने लगेच सामानाच्या पट्ट्यावरून त्याची सुटकेस उचलली आणि विमानतळावरून बाहेर पडला. एक एसयूव्ही गाडी चालकासहित तिथे त्याच्या प्रतीक्षेत थांबली होती. तिथून कालीमठपर्यंतचा प्रवास सात तासांचा होता. भारत-चीन सीमेपासून कालीमठ खूपच जवळ होतं. मिलेशियन लॅबचा संशोधन प्रकल्प कालीमठाजवळच होता.

सभोवतालच्या सुंदर निसर्गाकडे विजयचं लक्ष नव्हतं. मनाने तो पूर्णपणे सुजातापाशीच होता. त्या दिवशी सकाळी त्याने तिचा निरोप घेतला, तेव्हा त्याला माहीत होतं की पुढचे तीन महिने त्याला तिच्यापासून दूर रहावं लागणार आहे. तिने त्याला घट्ट मिठी मारली. त्याला ती नोकरी स्वीकारायला लावली म्हणून तिला अपराधी वाटत होतं. ''विचित्र गोष्ट ही हे की, मी लवकरच तिथे तुझ्या जवळपासच येणार आहे.'' त्याच्यापासून दूर होत ती म्हणाली. ''उत्तराखंडातल्या काही जंगलांमधून वनस्पतींचे नमुने गोळा करण्यासाठी मला सिक्युरिटी क्लिअरन्स मिळालाय. तिथे तू इतक्या जवळ असूनही खूप लांब असणार आहेस माझ्यापासून. आणि म्हणून मला जास्त आठवण येणार आहे तुझी.''

त्याक्षणी, विजयला कळलं होतं की तो प्रेमात पडलाय तिच्या. त्याला कुठेतरी वाचल्याचं आठवलं, तुम्ही जिच्या सहवासात राहू शकाल अशी व्यक्ती मिळणं म्हणजे प्रेम नाही. तर, जिच्याशिवाय तुम्ही राहू शकत नाही अशी व्यक्ती सापडणं म्हणजे प्रेम. सुजाता शिवाय रहावं लागण्याची शक्यता निर्माण झाली आणि त्यामुळे विजयला जाणवलं की त्याला गरज आहे तिची. पण त्याचं तिच्यावर प्रेम आहे किंवा तिच्याशी लग्न करून राहिलेलं सगळं आयुष्य तिच्यासोबत घालवण्यापलीकडे त्याला दुसरं काहीच नको आहे, हे तो तिला सांगू शकत नव्हता. काहीतरी अडवत होतं त्याला.

४९

विजयची एसयूव्ही मिलेशियन लॅबच्या फाटकाजवळ पोचली तेव्हा संध्याकाळचे सहा वाजले होते. चालकाने गाडीचं दार उघडलं तसा थंड हवेचा एक झोत त्याच्या चेहऱ्यावर येऊन आदळला. थंडीच्या दिवसांत तिथलं तापमान वजा सात अंशांपर्यंत कमी झालं होतं. पण नशीबाने अजून थंडीची लाट आलेली नव्हती. तेवढाच थोडासा दिलासा होता.

हिमालयाच्या गढवाल भागात वसलेलं कालीमठ समुद्रसपाटीपासून सहा हजार फूट इतक्या उंचीवर होतं. अप्रतिम निसर्गसौंदर्याने नटलेलं होतं ते ठिकाण आणि केदारनाथच्या डोंगररांगांनी वेढलेलं होतं. केदारनाथ म्हणजे हिंदू धर्माच्या अत्यंत पवित्र तीर्थस्थळांपैकी एक ठिकाण. सभोवतालचा सगळाच परिसर तिथल्या हिमनद्यांसाठी, वॉकिंग ट्रेल्ससाठी, घनदाट जंगलांसाठी, बर्फाच्छादित पर्वतशिखरांसाठी, वसंतातल्या उष्म्यासाठी, गवताळ प्रदेशांसाठी, धबधब्यांसाठी आणि झऱ्यांसाठी ओळखला जायचा.

कालीमठाच्या उत्तरेला मिलेशियनचा पसारा होता आणि तिथे आतमध्ये गाड्या नेण्याची परवानगी नव्हती. कंपनीच्या सुरक्षा अधिकाऱ्यांपैकी एकजण कारपार्कजवळ विजयची वाट पाहत उभा होता. त्याच्या कोटावर मिलेशियनचं चिन्ह होतं- एका त्रिकोणात काढलेलं वर्तुळ आणि त्यात 'एम' हे अक्षर.

सुरक्षा अधिकारी त्याला एका पाउलवाटेवरून घेऊन गेला. जंगलातून जाणारी ती वाट मिलेशियनच्या मोठ्या फाटकाजवळ पोचली. तिथे पहारेकरी आणि रॉटविलर कुत्रेही होते. फाटकाच्या बाहेरच नटराजाची नृत्यमुद्रा दाखविणारी एक मूर्ती होती. पाईनकोनच्या आकाराच्या रचनेत शिल्पात ती मूर्ती बसवलेली होती.

कलेचा अत्यंत सुंदर नमुना होता तो. पुढे जाण्यापूर्वी विजयने क्षणभर त्या मूर्तीकडे एकटक पाहून घेतलं. सुरक्षा अधिकाऱ्याने त्याचं सामान उचललं आणि अनेक चेकपॉइंट्स पार करत प्रकल्पाच्या दिशेने घेऊन गेला. मग विजयला एक सेफ डिपॉझिट बॉक्स देण्यात आला. तिथे त्याला त्याच्या वैयक्तिक इलेक्ट्रॉनिक वस्तू ठेवता येणार होत्या. तीन महिन्यांनी घरी जाताना त्याला त्या परत मिळणार होत्या. पुढे जाताना त्याचं सामान आणि तो स्वतः दोन्हींना स्कॅन केलं गेलं. विजयचा श्वास रोखला होता. त्याच्या दंडात बसवलेल्या मायक्रोचिपमुळे धोक्याच्या घंटा वाजतील का असा प्रश्न पडला होता त्याला. पण तसं न होता तो बाहेर पडला.

तिथून विजयला एका केबल कारने स्टेशनकडे नेण्यात आलं. बऱ्यापैकी उंचीवर असलेल्या प्रकल्पात जाण्यासाठीची हवाई सुविधा होती तिथे. वरपर्यंतचं एकूण अंतर साधारणपणे दोन किलोमीटर इतकं होतं. आणि खालपासून वर पोचायला सातेक मिनिटांचा वेळ लागत होता. इतर बहुतांश केबल कारपेक्षा वेगळी असलेली ती केबल कार पूर्णपणे बंद होती. खालचा परिसर अजिबात दिसत नव्हता त्यातून.

विचित्र आहे, विजयने स्वतःशीच विचार केला. काय लपवताहेत हे लोक?

५०

प्रकल्पाच्या ठिकाणी पोहोचल्यावर लगेचच विजयला एका स्टुडिओ अपार्टमेंटकडे नेण्यात आलं. दगड, स्टील, लाकूड आणि काचेचा वापर करून बनविलेली ती जागा आधुनिक

पद्धतीने सजविलेली होती. अत्यंत आकर्षक अशी ती जागा एखाद्या आर्किटेक्चरल डायजेस्टमधल्या छायाचित्रांसारखी दिसत होती. विजयसाठी ती अगदी साजेशी होती. छोट्याशा दिवाणखान्याला लागून असलेली बेडरूम आणि तिथेच ओपन-प्लॅन किचन. दिवाणखान्याला ज्या भिंतीसारख्या मोठ्या आकाराच्या काचेच्या खिडक्या होत्या त्यांतून बाहेरच्या वनाच्छादित टेकड्या दिसत होत्या. शेकोटीशेजारच्या टेबलवर नवेकोरे नोटबुक, मोबाईल फोन आणि टॅबलेट ठेवलेले होते. सगळ्याच वस्तू पूर्णपणे चार्ज केलेल्या आणि वापरायला तयार होत्या.

दारावर हलकेच टकटक झाली. डॉ. क्लाउस श्मिड्ट दारात उभे होते. ''तुम्हाला पाहून मला आनंद झाला मिस्टर सुंदरम,'' जराही उत्साह नसलेल्या आवाजात ते म्हणाले. ''आमचा हा सुंदर परिसर तुम्हाला दाखवायला आवडेल मला. तुम्ही जॅकेट घालून या, मी बाहेर थांबतो.''

विजयने आनंदाने त्यांचं आमंत्रण स्वीकारलं. पण त्याआधी त्याने त्याच्या नवीन फोनवरून झटकन सुजाताला फोन लावला, तो तिथे पोहोचला आहे हे सांगण्यासाठी. ''मला खूप आठवण येतीये तुझी,'' सुजाता म्हणाली. विजयलाही तिला सांगायचं होतं की तिचा लग्नाचा प्रस्ताव न स्वीकारून त्याने मूर्खपणा केला आहे आणि त्याचं तिच्यावर खूप प्रेम आहे आणि त्याला तिची खूप आठवण येते. पण हे सगळं बोलण्यासाठी वेळ नव्हता. श्मिड्ट बाहेर वाट पाहत थांबले होते. एक जाडसर जॅकेट अंगावर चढवत तो त्या अपार्टमेंटमधून बाहेर पडला.

बाहेर जाताना दार लॉक करण्याची गरज नव्हती, कारण तिथे कीहोलच नव्हते. फक्त एक फिंगरप्रिंट सेन्सॉर होता जो विजयसाठी तयार केला गेला होता. मिलेशियन प्रकल्पातल्या सगळ्या दारांना फक्त बायोमेट्रिक लॉक्स होती.

५१

हजारो एकरांच्या जागेत पसरलेला मिलेशियन लॅबचा प्रकल्प म्हणजे एखाद्या सायन्स फिक्शन मुव्हीच्या सेटसारखा होता. एका भल्यामोठ्या भक्कम इमारतीमध्ये आधुनिक, उत्कृष्ट दर्जाची प्रयोगशाळा होती. पन्नास हजार चौरस फूटांच्या त्या प्रयोगशाळेत नऊ संशोधक काम करत होते. ''प्रत्येक संशोधक त्याला नेमून दिलेल्या छोट्या प्रयोगशाळेत काम करतो, जी पाच हजार चौरस फूटांची आहे,'' श्मिड्टनी सांगितलं. ''तुझ्या आधी इथे नऊ संशोधक काम करत आहेत. तू दहावा. आमची टीम आता पूर्ण झाली.''

त्या प्रयोगशाळेच्या अवतीभवती संशोधकांसाठीचे स्टुडिओ अपार्टमेंट्स, मल्टी कुझीन कॉफी शॉप आणि बार, लहानमोठ्या गरजेच्या वस्तूंचं दुकान, एक अवाढव्य ग्रंथालय, प्लश मुव्ही थिएटर आणि एक सुसज्ज हेल्थ सेंटर हे सगळं होतं.

''या, आपण ग्रंथालयात फेरफटका मारूया,'' श्मिड्ट म्हणाले. ''चार मजल्यांची ती एक स्वतंत्र इमारत होती.



समलैंगिकतेभोवतीचं अज्ञानाचं वलय दूर करत जगभरातील धर्मांचा देवदत्त पटनायक यांनी घेतलेला सांगोपांग आढावा

धर्म आणि समलैंगिकता

देवदत्त पट्टनायक । अनु. सोनाली नवांगुळ

किंमत : ₹ २२०

ebook available



आमच्याकडे लाखभरापेक्षा जास्त पुस्तकं आहेत. त्यासोबत ध्वनिचित्रफिती आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून उपलब्ध असलेलं साहित्यही आहे. चार पूर्णवेळ ग्रंथपाल इथली व्यवस्था पाहतात. त्यामुळे तुमच्या संशोधनासाठी आमच्याकडून पुरेशी मदत मिळाली नाही असं तुम्हाला कधीच नाही वाटणार.''

विजय अचंबित होऊन पाहत होता. शिमड्टच्या लक्षात आलं ते.

''आमची ही जागा हजार एकरांची आहे,'' ग्रंथालयातून निघून निवासी जागेच्या दिशेने जाताना शिमड्ट सांगू लागले, ''त्यातल्या फक्त पन्नास एकर जागेत हे तुम्ही पाहिलेलं सगळं बांधकाम केलेलं आहे. उरलेल्या नऊशे पन्नास एकर जागेत घनदाट जंगल आहे–पर्यावरणाला जपण्यासाठी आमचं योगदान.''

पन्नास एकरांत पसरलेला तो वर्क अँड स्टे प्रकल्प म्हणजे एखाद्या भल्यामोठ्या ब्लॅक फॉरेस्ट केकवर ठेवलेल्या चेरीसारखा होता. तिथल्या सगळ्या फाटकांवर सशस्त्र सुरक्षा कर्मचारी आणि कुत्र्यांचा पहारा, इलेक्ट्रिफाईड प्रवेशद्वारं, बायोमेट्रिक स्कॅनर्स आणि काही मीटर्सच्या अंतरावर बसवलेले सीसीटीव्ही या सगळ्यांमुळे तो परिसर आणखीनच जगापासून तुटल्यासारखा वाटत होता. हे इतकं सगळं दहा संशोधकांसाठी, विजयने विचार केला. मी कर्मचारी आहे इथला का कैदी? सोन्याच्या पिंजऱ्यातला पक्षी?

''मला ती मुख्य फाटकाजवळची नटराजाची मूर्ती आवडली,'' विजयने शिमड्टला सांगितलं.

''अरे वा, आवडली का तुला?'' शिमड्ट उत्तरादाखल म्हणाले. ''सीईआरएन–युरोपियन ऑर्गनायझेशन फॉर न्यूक्लियर रिसर्चमधल्या एका मूर्तीची प्रतिकृती आहे ती–फरक इतकाच की ही मूर्ती बंदिस्त आहे.''

''नटराज कशासाठी?'' विजयने विचारलं.

शिमड्टनी खिशातून त्यांचा फोन बाहेर काढला आणि विजयला त्यावरचा वॉलपेपर दाखवला.

''सीईआरएनचा संबंध गॉड पार्टिकलशी आहे-हिग्ज बोसॉन. ज्याविषयी आणखी एका विद्वान भारतीयाने भाकीत केलेलं होतं–सत्येंद्रनाथ बोस. शिवाचं नृत्य म्हणजे दुसरे काही नसून अवअणू कणांचे नृत्य आहे. गती, आकार आणि परिवर्तन.''

''निर्मिती ते विध्वंस आणि पुन्हा उलटा प्रवास,'' विजय पुटपुटला.

''नाही,'' शिमड्ट म्हणाले. ''इथे निर्मिती नाही आणि विध्वंसही नाही. फक्त दृष्टोत्पत्तीस येणे आणि लोप पावणे आहे.''

मिलेशियनच्या चहूबाजूला असलेल्या फाटकांपैकी एका फाटकाबाहेरून जाडसर जॅकेट चढविलेल्या एका माणसाने मोबाईल फोनवरून एक नंबर लावला. 'ते आलेत,' असं त्याने फोनवर सांगितलं. त्या थंड हवेत त्याच्या श्वासातून बाहेर पडलेली हवा धुक्यासारखी दिसत होती.

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'कालचक्राचे रक्षक' या अश्विन सांघी लिखित पुस्तकातून)**

◆◆◆

शारीर आजारावर मानसिक आरोग्याच्या
दिलासादायक मात्रेचा मूलमंत्र देणारं
अफलातून पुस्तक

# क्युअर्ड

डॉ. जेफ्री रेडिगर । अनु. : सुप्रिया वकील
किंमत : ₹ ५९५

ebook available




निसर्गभान आणि मानवी जाणिवांचं
दोलायमान वास्तव स्पष्ट करणारी
सुंदरबनच्या नयनरम्य काठावर
घडणारी बहुचर्चित कादंबरी...

# द हंग्री टाइड

अमिताव घोष । अनु. : सुनील करमरकर
किंमत : ₹ ५५०

ebook available






जंगली हत्तींच्या कळपाला
माणसाळणाऱ्या एका रानवेड्याची
अचंबित करणारी आत्मकथा...

# द एलेफंट व्हिस्परर

लॉरेन्स अँथनी, ग्रॅहम स्पेन्स
अनु. मंदार गोडबोले
किंमत : ₹ ५७०

ebook available






# उत्तुंग

## मृणालिनी सावंत

## ।। पुस्तकाच्या पानांतून ।।

अंतत:, कौरव आणि पांडव, दोन्ही पक्ष ज्याची प्रतीक्षा करत होते, तो मार्गशीर्ष वद्य द्वितीयेचा दिवस उगवला. उदित झालेल्या सूर्यदेवाच्या सहस्रो किरणांत कुरुक्षेत्र तळपून उठले. कुरुक्षेत्राच्या पवित्र भूमीवर वीरगती प्राप्त करून स्वर्ग प्राप्त करण्याची इच्छा करणाऱ्या लाखो योद्ध्यांनी तिथे युद्धाचा अतिविशाल पट सजवला. रणभूमीच्या दोन बाजूंना दोन्ही सेनांचे विभाग स्थिरावू लागले. युद्धेच्छू योद्ध्यांच्या आणि गज, अश्व, उष्ट्र, वृषभ अशा प्राण्यांचे कंठध्वनी कुरुक्षेत्राची धर्मभूमी आता युद्धभूमी झाल्याची घोषणा करू लागले. पूर्वरात्री निश्चित केल्याप्रमाणे व्यूहरचना करून दोन्ही सेना आपापल्या स्थानी उभ्या तर राहिल्या; परंतु अद्याप त्यांचे मुख्य योद्धे युद्धभूमीवर उपस्थित झाले नव्हते. कुरु सैन्याचे प्रमुख सेनापती पितामह भीष्मांचा तालध्वज फडकवणारा श्वेत रथ आणि द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा, दुर्योधन, दु:शासन, शकुनी यांच्या रथांनी अग्रपंक्तीतील आपापले स्थान घेतले. पण, दुर्योधनाच्या उजव्या हाताला असणारा त्याचा परममित्र अंगराज कर्ण या महत्त्वाच्या समयी त्याच्या समीप नव्हता. पूर्वरात्री कुरु शिबिरात, योद्ध्यांची श्रेणी निश्चित करताना सेनापती भीष्मांनी कर्णाला अर्धरथी ठरवले होते. त्यामुळे अत्यंत क्रुद्ध झालेला कर्ण 'जोपर्यंत भीष्म युद्धभूमीवर आहेत, तोपर्यंत मी युद्धभूमीवर पाय ठेवणार नाही' अशी प्रतिज्ञा करून आपल्या शिबिरात निघून गेला होता. भीष्म वीरगतीला प्राप्त झाल्याशिवाय तो युद्धभूमीवर दिसणार नव्हता.

पांडवसेनेच्या प्रमुख योद्ध्यांनी - धृष्टद्युम्न, भीम, अर्जुन, युधिष्ठिर, महाराज द्रुपद, महाराज विराट यांनी अग्रपंक्तीतील आपले स्थान घेताच पांडवसेनेने रणवाद्यांच्या गजरासह त्यांच्या नावाचा गगनभेदी जयघोष केला. कुरुसेनेनेही तेवढ्याच उत्साहाने आपल्या सेनापतीचा आणि मुख्य योद्ध्यांचा जयघोष केला. योद्ध्यांप्रमाणेच प्राण्यांनाही स्फुरण चढू लागले... गज चीत्कारू लागले... अश्व फुरफुरू लागले. आता केवळ युद्धारंभाची घोषणा करणारा शंखनाद शेष होता. त्यासाठी सज्ज झालेल्या धृष्टद्युम्न, भीमसेन यांना हस्तसंकेताने थांबवत अर्जुन कृष्णाला म्हणाला, ''श्रीकृष्णा, आपला रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यावर घे! युद्धारंभ झाल्यावर माझ्या गांडीव धनुष्याचे लक्ष्य आणि भक्ष्य कोणकोण होणार आहे, दुर्बुद्धी दुर्योधनाचे हित करण्याच्या इच्छेने कोणकोण माझ्याशी युद्ध करायला सज्ज झाला आहे, हे मला एकदा पाहू दे. माझ्या जीवित शत्रूंचे अंतिम दर्शन मी घेऊ इच्छितो!'' अर्जुनाच्या या बोलण्यावर कृष्णाने स्मितमुखाने अश्वांच्या वल्गा हाती घेतल्या आणि रथाला गती दिली. दोन्ही सैन्यांच्या मध्ये आणून कृष्णाने रथ थांबवला आणि तो म्हणाला, ''स्वत:च्या पावलांनी चालत

मृत्युमुखात प्रवेश करणाऱ्या तुझ्या शत्रूंना पाहून घे, पार्था!''

कौरव सैन्याच्या अग्रभागी दिसणाऱ्या पितामह भीष्म, गुरू द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा, दुर्योधन, दु:शासन यांच्यावरून अर्जुनाचे नेत्र फिरू लागले. पाहतापाहता अर्जुनाची प्रसन्न मुद्रा म्लान झाली. त्याचे मुख आणि ओठ शुष्क झाले. भालावर स्वेदबिंदू डवरून आले. हातातील नित्यविजयी गांडीव धनुष्य थरथरू लागले. अचानक अर्जुनाच्या हातातून त्याचे प्रिय, दिग्विजयी गांडीव धनुष्य गळून पडले आणि निस्त्राण झाल्यासारखा तो रथात कोसळला. दोन्ही हातांनी त्याने आपले मुख झाकून घेतले. सामर्थ्यशाली, समितिंजय पार्थाचे ते निस्तेज, निर्बल रूप प्रत्यक्ष श्रीकृष्णालाही विस्मयचकित करणारे होते. त्याने आश्चर्याने विचारले, ''पार्था, तुझे शत्रुमर्दक गांडीव तुझ्या हातातून गळून पडावे असे अचानक घडले तरी काय! युद्ध आरंभ होण्यापूर्वीच तू ते हरल्यासारखा का दिसतो आहेस? सर्वश्रेष्ठ धनुर्धरा, हे तुला शोभा देणारे नाही. चित्रयोधी अर्जुना, हा समय शस्त्र त्यागण्याचा नाही, धारण करण्याचा आहे. ऊठ, सावध हो आणि शत्रूवर प्रहार करायला सज्ज हो!''

अर्जुन नकारार्थी मस्तक हलवत म्हणाला, ''नाही, केशवा! माझ्या समक्ष माझे शत्रू नाही, माझे प्रिय आप्तजन उभे आहेत. श्रीकृष्णा, कोणी मला त्रिभुवनाचे राज्य देऊ केले, तरी त्यासाठीसुद्धा मी माझे प्रिय पितामह, पूजनीय आचार्य, माझे बंधू-बांधव, पुत्र-पौत्र यांच्यावर शस्त्रप्रहार करणार नाही. मग क्षुद्र इंद्रप्रस्थ आणि हस्तिनापूरच्या राज्याची काय कथा! स्वजनहत्या करून राज्य प्राप्त करण्यापेक्षा मी भिक्षा मागून अथवा मृगया करून उपजीविका चालवणं स्वीकार करीन. कुलविनाशाचं भयंकर पाप माझ्या हातून होणार नाही, माधवा! आततायी कौरव कुलक्षयामुळे होणारा अनर्थ जाणत नसले तरी आम्ही तर ते जाणतो. अधर्मी कौरव केवळ राज्यलोभानं आम्हाला ठार मारण्यास उद्युक्त झाले तरी धर्मशील म्हणवणारे आम्हीही राज्यलोभानं स्वजनांचा विनाश करायला सिद्ध झालो तर आमच्यात आणि त्यांच्यात अंतर ते काय राहिलं! नाही, केशवा! त्यापेक्षा शस्त्रत्याग केलेल्या मला कौरवांनी ठार मारणंही मला अधिक कल्याणकर वाटेल.''

अर्जुनाचे हे पूर्णत: अनपेक्षित भाषण ऐकून कृष्ण आश्चर्याने त्याला म्हणाला, ''पार्था, या संकटसमयी हे भलतेच विचार तुझ्या मनात आले तरी कसे! तू जे आता करतो आहेस, तसे आचरण श्रेष्ठ पुरुषांनी पूर्वी कधीही केलेले नाही. तुझे हे वर्तन दुष्कीर्तिकर आहे. हे परंतपा, कौरवांच्या भयाने तू युद्धापासून परावृत्त झालास असंच समजून सर्व जण तुझी निंदा करतील. हे क्लैब्य तुला शोभत नाही. हृदयाची ही दुर्बलता सोडून दे आणि युद्धाला सज्ज हो!''

कृष्णाच्या या फटकारणाऱ्या शब्दांनीही अर्जुनाच्या बुद्धीवर आलेले आप्त-स्वजनांच्या वधाच्या पापाचे भ्रमपटल दूर झाले नाही. तो उद्वेगाने म्हणाला, ''हे वासुदेव! माझ्या प्रिय आणि पूजनीय पितामह, गुरू द्रोणाचार्य यांच्यावर बाणप्रहार करून, त्यांच्या रक्ताने माखलेले राजभोग मी कसे उपभोगू? त्यांच्या हत्येचे पाप माथी घेण्यापेक्षा भिक्षा मागून उदरनिर्वाह करणे अधिक योग्य होईल. केशवा! शोकामुळे माझी नैसर्गिक वृत्ती नष्ट झाली आहे. माझ्या बुद्धीला दौर्बल्य आले आहे. इंद्रियांना ग्रासून टाकणारा हा शोक दूर करील असा उपाय मला दिसत नाही. श्रीकृष्णा, धर्म-अधर्म, कर्तव्य-अकर्तव्य, योग्य-अयोग्य, सर्व काही तू जाणतोस. मी तुला शरण आलो आहे. कृपा करून, निश्चितपणे जे श्रेयस्कर आहे, ते मला सांग.''

अर्जुनाच्या मनात उडालेला कर्तव्य-अकर्तव्याचा, धर्म-अधर्माचा गोंधळ कृष्णाच्या लक्षात आला. त्याने हेही जाणले की, अर्जुनाच्या या मानसिक व्याधीवर वरवरचा उपाय करून काही उपयोग होणार नाही. या द्विधा स्थितीच्या मुळाशी, खोलवर जाणे आवश्यक आहे. आश्चर्य दर्शवत तो म्हणाला, ''पार्था, ज्याच्याविषयी शोक करण्याची आवश्यकता नाही, त्याच्याविषयी तू शोक करतो आहेस आणि मोठ्या पांडित्याच्या गोष्टीही करतो आहेस, याचे मला आश्चर्य वाटते! अरे, मी किंवा तू पूर्वी नव्हतो आणि पुढेही होणार नाही, असे नाही. तसेच तुला दिसताहेत ते सर्व योद्धे पूर्वी नव्हते आणि पुढे होणार नाहीत, असेही नाही. आपण सर्व पूर्वी होतो, आता आहोत आणि पुढेही असणार आहोत.''

गोंधळून त्याच्याकडे पाहणाऱ्या अर्जुनाला तो पुढे म्हणाला, ''अर्जुना, आत्मतत्त्व हे अविनाशी आहे. शरीर धारण करणारा आत्मा एकाच शरीरात शैशव, तारुण्य आणि वृद्धत्व या अवस्था प्राप्त करतो, त्याचप्रमाणे तो दुसरा देहही प्राप्त करतो. शैशव, तारुण्य आणि वृद्धत्व या अवस्था शरीराला प्राप्त होतात, आत्म्याला नाही. जीर्ण झालेले वस्त्र त्यागून आपण नवीन वस्त्र धारण करतो, त्याचप्रमाणे आत्मा एक देह त्यागून दुसरा देह स्वीकारतो. आत्मा अजन्मा, अविनाशी आहे. स्थिर आहे. त्याला शस्त्रे तोडू शकत नाहीत, अग्नी जाळू शकत नाही, जल भिजवू शकत नाही. हा शाश्वत आत्मा कोणाला मारत नाही अथवा मरतही नाही. पार्था, आत्मा हा शरीराबरोबर जन्माला येतो आणि शरीराबरोबर मृत्यू पावतो, असे तुला वाटत असेल तरी त्यासाठीही शोक करणे उचित नाही. जो जन्माला आला त्याचा मृत्यू, आणि जो मृत्यू पावला त्याचा पुन्हा जन्म निश्चित आहे. मग अशा अटळ गोष्टींसाठी शोक का? सर्व प्राणी जन्मापूर्वी अव्यक्त, जीवनकालात व्यक्त

आणि मृत्यूनंतर पुन्हा अव्यक्त होतात. सर्व प्राणिमात्रांची ही स्थिती असल्यामुळे कोणासाठीही शोक करणे योग्य नाही.''

अर्जुनातील क्षत्रियत्वाला जागृत करण्यासाठी कृष्ण पुढे म्हणाला, ''धनुर्धर अर्जुना, तुझ्या स्वधर्माचा विचार करता, या समयी तू युद्धापासून परावृत्त होणेही उचित नाही. धर्मोचित युद्धापेक्षा क्षत्रियाला श्रेयस्कर असे दुसरे काही नाही. हे युद्ध म्हणजे तुझ्यासाठी उघडलेले स्वर्गाचे द्वारच आहे. मोठ्या भाग्यानेच क्षत्रियाला हे प्राप्त होत असते. तू जर युद्ध केले नाहीस, तर तुझ्या स्वधर्माचा लोप होईल. तुझी दुष्कीर्ती होईल आणि तू पापाचा धनी होशील. दुष्कीर्ती ही सज्जन पुरुषाला मृत्यूपेक्षाही अधिक दुःखद, अपमानकारक आहे. अर्जुना, स्वधर्मानुसार युद्ध करताना तुला मृत्यू आला तरी तू स्वर्ग प्राप्त करशील, आणि जिंकलास तर मोठ्या गौरवाने पृथ्वीचे राज्य करशील. ऊठ! जय-पराजय, लाभ-हानी, सुख-दु:ख, सर्व समान मानून युद्धाला सज्ज हो! असे केलेस तर युद्ध करूनही तुला पाप लागणार नाही. प्रिय पार्था, तुझा अधिकार केवळ कर्म करण्यावर आहे. त्या कर्मापासून प्राप्त होणारे फल तुझ्या अधिकारात नाही. म्हणून फलप्राप्तीच्या आशेने कर्म न करता, फलासक्ती त्यागून कर्म कर! कर्मच न करण्याचा आग्रह धरू नकोस. कर्माची सिद्धी अथवा असिद्धी यांच्याविषयी समान बुद्धी ठेवून कर्म कर. या समत्वालाच योग म्हणतात. समत्व बुद्धीने युक्त पुरुष पाप आणि पुण्य, दोन्हीचाही त्याग करतो. म्हणून तू समत्वरूप योगाचा अवलंब कर. त्यामुळे तू कर्म करूनही कर्मफलाच्या बंधनात पडणार नाहीस. या कौशल्यालाच कर्मयोग म्हणतात. अशा समबुद्धीने युक्त ज्ञानी जन कर्मफलाचा त्याग करून, जन्माच्या बंधनापासून मुक्त होऊन निर्विकार अशा परमपदाला प्राप्त होतात. कर्म हे प्राणिमात्राला अटळ आहे. आणि हे कर्म करण्याच्या कौशल्यालाच कर्मयोग म्हणतात. समत्वबुद्धी आणि स्थितप्रज्ञ असलेल्याला तो साधतो.''

श्रीकृष्ण आपल्या विचलित, द्विधा झालेल्या मनाला उचित, श्रेयस्करच मार्ग दाखवेल या पूर्ण विश्वासाने कृष्णाचे बोल ऐकणाऱ्या अर्जुनाने उत्सुकतेने विचारले, ''हृषीकेशा! स्थितप्रज्ञ कोणाला म्हणतात? कसा असतो तो?''

अर्जुनाचे अस्थिर मन हळूहळू मार्गावर येऊ लागले आहे, हे जाणून कृष्णाच्या गंभीर मुखावर हलकेसे स्मित तरळले. तो अर्जुनाच्या जिज्ञासेची पूर्ती करू लागला, ''नरोत्तम पार्था, मनातील सर्व वासनांचा त्याग करून जो आंतरिक आत्मसुखातच संतुष्ट असतो, त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात. दु:ख प्राप्त झालं तरी त्याला खेद होत नाही आणि सुख प्राप्त झालं तरी त्याला त्याची आसक्ती निर्माण होत नाही. जो आसक्ती, भय आणि क्रोध यांनी रहित असतो, तोच स्थितप्रज्ञ होय. कासव ज्याप्रमाणे आपले अवयव आक्रसून घेतो, त्याप्रमाणे एखादा पुरुष जेव्हा इंद्रियांच्या विषयांपासून आपली इंद्रिये आवरून धरतो, तेव्हा त्याची बुद्धी स्थिर होते. निराहारी पुरुषाचे विषय सुटले तरी त्यातील रुची सुटेलच असे नाही. परंतु, परब्रह्माचा अनुभव आल्यावर सर्व विषय आणि त्यातील रुचीही नाहीशी होते. हे कौंतेया! इंद्रियदमनाचा प्रयत्न करणाऱ्या विद्वान पुरुषाचे मनसुद्धा ही बलवान इंद्रिये बलपूर्वक विषयांकडे ओढून नेतात. इंद्रियांचे संयमन करून, त्यांना जो स्वाधीन ठेवतो, त्याची बुद्धी स्थिर होते. विषयाचे चिंतन करणाऱ्या पुरुषाचा विषयसंग वाढत जातो. या संगामुळे विषयासंबंधी काम वाढत जातो. अतृप्त कामामुळे क्रोधाचा उद्‌भव होतो. क्रोधापासून संमोह म्हणजे अविवेक, संमोहापासून स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशामुळे बुद्धिनाश आणि अंततः बुद्धिनाशामुळे सर्वनाश होतो.

''जिज्ञासू अर्जुना! ध्यानात घे की, ज्या पुरुषाचे अंत:करण त्याच्या अधीन असते, तो पुरुष प्रीती व द्वेष यापासून मुक्त झालेल्या आणि स्वाधीन असलेल्या इंद्रियांमुळे विषयांमध्ये राहूनही त्याचे चित्त प्रसन्न असते. चित्त प्रसन्न असले की दु:खांचा नाश होतो. प्रसन्न चित्तामुळे त्याची बुद्धीही स्थिर होते. जो पुरुष योगयुक्त नसतो, त्याला दृढबुद्धीची, निष्ठेची भावनाही नसते. ज्याला भावना नाही, त्याला शांती कशी मिळणार? आणि ज्याला शांती नाही, त्याला सुख तरी कुठले मिळणार? अर्जुना, प्रबल वायू जसा नौकेला जलात खेचतो, तसे विषयसुखात रममाण होणाऱ्या पुरुषाचे मनही इंद्रियांच्या पाठोपाठ खेचले जाते. परंतु, ज्याने आपली इंद्रिये विषयांपासून अलिप्त ठेवली आहेत, त्याची प्रज्ञा मात्र स्थिर होते.

''पार्था, सर्व भूतमात्र जेव्हा निद्रिस्त असतात, तेव्हा स्थितप्रज्ञ जागृत असतो आणि जेव्हा भूतमात्र जागृत असतात, तेव्हा स्थितप्रज्ञाची - योग्याची रात्र असते. कसलेही ममत्व अथवा अहंकार न बाळगता, अनासक्त होऊन व्यवहारात वागणाऱ्या पुरुषाला शांती प्राप्त होते. या स्थितीलाच ब्राह्म स्थिती म्हणतात. ती ज्याला प्राप्त होते, तो कधी मोहात पडत नाही आणि त्याला अंती मोक्ष प्राप्त होतो.''

एकाग्रतेने कृष्णाचे बोलणे ऐकणारा अर्जुन एकदम वेगळ्याच विचारात गेला. त्याच्या मनात आले, 'श्रीकृष्ण जे सांगतो आहे, ते तर त्याच्याच जीवनाचे सार आहे. तो आता मला जे सांगतो आहे, तसेच आचरण तो जीवनभर करत आला आहे. कोणतेही कर्म त्याने स्वार्थी हेतूने केलेले नाही; तर कर्तव्य म्हणून, स्वधर्म म्हणून केले आहे - फलाची आशा न करता! कसल्याही प्रसंगी विचलित न होणारा स्थितप्रज्ञ तर

जगातल्या सर्वांत मोठ्या क्रौर्याच्या
साक्षीदार ठरलेल्या दोन चिमुरड्या,
ज्यांनी सत्तरीच्या उतरत्या वयात
आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

# ऑशविट्झच्या लहानग्या पोरी

आंद्रा व तातियाना बूची
अनु. : रेश्मा कुलकर्णी-पाठारे
किंमत : ₹ २२०

ebook available





हजारो ज्यू कैद्यांच्या नजरेतला मृत्यू
कॅमेऱ्यात बंद करून
ऑशविट्झचं भयाण सत्य जगासमोर आणलं,
त्या फोटोवाल्याची अस्वस्थ करणारी कहाणी

# ऑशविट्झचा फोटोवाला

लूका क्रिप्पा, मॉरिझिओ ओनिस
अनु. : वर्षा वेलणकर
किंमत : ₹ ४८०

ebook available



तो स्वत:च आहे.'

''कसला विचार करतो आहेस, पार्था!'' या कृष्णाच्या प्रश्नाने तो भानावर आला. स्वत:च्या मनाला आवर घालत म्हणाला, ''हे हृषीकेश! कर्मापेक्षा बुद्धी श्रेष्ठ आहे, असे तुझे मत आहे तर युद्धाचे हे घोर कर्म करायला तू मला का प्रवृत्त करतो आहेस? संदिग्ध अर्थाच्या शब्दांनी माझ्या बुद्धीला भ्रमित का करतो आहेस? ज्यामुळे माझे कल्याण होईल असा निश्चित मार्ग मला सांग.''

अर्जुनाच्या मनातील शंका दूर करत कृष्ण शांतपणे म्हणाला, ''पार्था, माझे शब्द व्यवस्थित समजून घे. मी तुला जे सांगितलं त्यात काहीच संदिग्धता नाही. आरंभीच मी दोन्ही मार्ग स्पष्ट सांगितले आहेत : सांख्य विचार करणाऱ्यांसाठी ज्ञानयोग आणि कर्म करणाऱ्यांसाठी कर्मयोग! कर्माचे आचरण न केल्याने मनुष्याला कर्मशून्यत्व प्राप्त होत नाही; आणि केवळ कर्मसंन्यास केल्याने सिद्धी प्राप्त होते, असेही नाही. कोणताही प्राणी क्षणभरही कर्म केल्यावाचून राहू शकत नाही. प्रकृतीपासून उत्पन्न झालेले गुण सर्वांकडून कर्मे करवतातच. जो मूर्ख कर्मेंद्रियांचे संयमन करून, इंद्रियांच्या विषयांचे चिंतन करत राहतो, त्याला दांभिक, मिथ्याचारी म्हणतात. मनाने इंद्रियांचे नियमन करून, आसक्ती न ठेवता कर्मयोगाचे आचरण करणारा श्रेष्ठ असतो. कर्म न करण्यापेक्षा विहित कर्माचे आचरण करणे श्रेयस्कर असते. फलाच्या इच्छेने केलेल्या कर्मामुळे जीव बांधला जातो. म्हणून फलाची इच्छा न करता ईश्वरापर्यंत बुद्धीने तू कर्म कर. पार्था, मला प्राप्त करावयाचे असे त्रैलोक्यात काहीही शेष नाही. तरीही, मी कर्म करतोच आहे. मी कर्म केले नाही, तर सर्व लोक माझेच अनुसरण करतील आणि नष्ट होतील. त्यामुळे प्रजेचा विनाश केल्याचा दोष मला लागेल. पार्था, मूढलोक फलाच्या आशेने कर्म करतात. पण, जाणत्यांनी फलाची इच्छा न करता लोकसंग्रहासाठी कर्म करावे. वस्तुत:, सर्व कर्मे प्रकृतीच्या गुणांनी होत असतात. अहंकारी मनुष्य मात्र आपणच ती कर्मे केली असे मानतो. पण, गुण आणि कर्मे ही दोन्ही स्वत:हून भिन्न आहेत, हे जाणणारा ज्ञानी पुरुष त्यात लिप्त होत नाही. अर्जुना, कर्मबंधनातून मुक्त होण्यासाठी अध्यात्मबुद्धीने सर्व कर्मे मला अर्पण कर आणि फलाशा त्यागून, नि:शंक होऊन युद्ध कर. युद्ध करणे हाच तुझा धर्म आहे. स्वधर्म कितीही कठीण, सदोष वाटला तरी तो आचरणेच कल्याणकर आहे. परधर्म दिसायला कितीही सुलभ, सुखकर वाटला तरी त्याचे आचरण करणे भयावह, अनर्थकारक आहे.''

अर्जुनाचे मन अद्याप स्वजनवधाच्या मार्गाचा स्वीकार करायला सिद्ध होत नव्हते. त्याने साशंकतेने विचारले, ''हृषीकेशा! कधी कधी इच्छा नसताना मनुष्य कोणीतरी बलपूर्वक करवल्याप्रमाणे पाप का करतो?''

कृष्णाचे गंभीर शब्द अर्जुनाच्या मनाच्या सैरावैरा दौडणाऱ्या अश्वांना आवर घालू लागले, ''हे परंतपा, याला कारण रजोगुणापासून निर्माण झालेला काम आणि क्रोध आहे. धूमाने अग्नी अथवा धुलीने दर्पण आच्छादावा, वारेने जसा गर्भ वेष्टून टाकावा, त्याप्रमाणे कामाने ज्ञानाला झाकून टाकले आहे. इंद्रिये, मन यांच्या आश्रयाने ज्ञानाला झाकून टाकून हा मनुष्याला मोहात पाडत असतो. पार्था, देहापेक्षा इंद्रिये, इंद्रियांपेक्षा मन आणि मनापेक्षा बुद्धी सूक्ष्म असते. आणि या बुद्धीच्याही पलीकडे परमात्मा असतो, असे ज्ञानी म्हणतात. तर, या बुद्धीच्याही पलीकडे असलेल्या परमात्म्याला ओळखून, स्वत:ला आवरून, कामरूपी शत्रूला मारून टाक आणि स्वस्थ मनाने युद्धाला सज्ज हो!''

विचारमग्न झालेला अर्जुन कृष्णाच्या पुढच्या बोलांनी आश्चर्यचकित झाला. कृष्ण म्हणाला, ''सख्या अर्जुना, हा अतिप्राचीन कर्मयोग मी फार पूर्वी सूर्याला सांगितला होता. सूर्याने तो आपला पुत्र मनू आणि मनूने तो इक्ष्वाकूला सांगितला. परंपरेने प्राप्त होत राजर्षींना समजलेला हा योग दीर्घ काळ लोटल्यामुळे या लोकी नष्ट झाला. तोच अत्यंत प्राचीन योग आज मी तुला सांगतो आहे.''

अर्जुन आश्चर्याने म्हणाला, ''श्रीकृष्णा, तुझा जन्म तर कितीतरी अलीकडचा आणि सूर्याचा जन्म तर अतिप्राचीन- पृथ्वी निर्माण झाली तेव्हाचा! मग हा योग तू सूर्याला सांगितलास, असं कसं म्हणतो आहेस!''

प्रसन्न हास्याने कृष्णाच्या कपोलावरची खळी खुलली. तो म्हणाला, ''अर्जुना, माझे आणि तुझे अनेक जन्म होऊन गेले आहेत. मला त्यांचे स्मरण आहे, तुला मात्र नाही. मी अजन्मा आणि सर्व भूतांचा नियंता असूनही स्वप्रकृतीला स्वाधीन ठेवून आपल्या मायेने पुन:पुन्हा जन्म घेत असतो. जेव्हा-जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माचे प्राबल्य होते, तेव्हा-तेव्हा सज्जनांच्या रक्षणासाठी आणि दुर्जनांच्या विनाशासाठी, धर्माची स्थापना करण्यासाठी मी युगायुगात अवतार घेतो.

''परमेश्वराचा जन्म आणि कर्म दिव्य आहे, असे जो यथार्थ जाणतो, त्याचा देहत्यागानंतर पुन्हा जन्म होत नाही. तो मलाच प्राप्त होतो. अर्जुना, जो जसा भाव ठेवून माझ्याकडे येतो त्याला त्याच प्रकारचे फल मी देतो. ज्यांचे काम, क्रोध, भय हे दोष नाहीसे झाले आहेत, जे माझाच आश्रय करून राहिले आहेत असे ज्ञानरूप तपाने पवित्र झालेले ज्ञानी माझ्याच स्वरूपाला प्राप्त झाले आहेत.

''कर्मबंधाच्या नाशाची नव्हे; तर कर्मफलाची इच्छा करणारे

लोक मनुष्यलोकी कर्मफल लवकर प्राप्त होते म्हणून देवतांची पूजा करतात.

''पार्था, कर्मफल-प्राप्तीची इच्छा माझ्या ठायी नसल्यामुळे मला कर्म केल्याचा दोष लागत नाही. अशाप्रकारे जो मला जाणतो त्यालाही कर्माची बाधा होत नाही. हे जाणून पूर्वीच्या मुमुक्षू लोकांनी कर्म केलं, तसंच तूही कर.

''समत्व बुद्धीने कर्म करणारा जो पुरुष, कर्म आणि अकर्म यांच्याकडे समदृष्टीने पाहतो, तो सर्व मनुष्यांत ज्ञानी, योगयुक्त आणि कर्मे करणारा असतो.

''पार्था, ज्याने आपले चित्त व बुद्धी स्वाधीन ठेवून निरिच्छ होऊन सर्व संग्रह सोडला आहे, त्याने कर्मे केली तरी त्याला कर्माचा दोष लागत नाही.

''हे परंतपा, वेदांनी अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. ते सर्व कर्मापासून उत्पन्न होणारे आहेत, हे तू जाणलेस म्हणजे मोक्षाला प्राप्त होशील. ध्यानात घे, द्रव्याने साध्य होणाऱ्या यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. कारण, ज्ञानामध्ये सर्व कर्मांचा समावेश होतो.

''ज्ञान प्राप्त झाल्याने तू पुन्हा मोहग्रस्त होणार नाहीस. सर्व भूते तुला स्वत:मध्ये आणि माझ्यामध्येही दिसतील. तू जरी सर्व पाप्यांमध्ये अधिक पापी असलास तरी ज्ञानरूप नौकेच्या साहाय्याने सर्व पापरूप समुद्र पार करशील.

''प्रज्वलित अग्नी जसा काष्ठांचे भस्म करतो, तसा ज्ञानाग्नी सर्व कर्मांचे भस्म करतो. अर्जुना, ज्ञानाइतके पवित्र असे अन्य काही या जगात नाही; आणि योगाने युक्त झालेला पुरुष स्वत:च ज्ञान प्राप्त करतो. परमविश्वासू, ज्ञानप्राप्तीविषयी तत्पर आणि इंद्रिये स्वाधीन असलेल्या पुरुषाला ज्ञानप्राप्ती होते आणि ज्ञानप्राप्तीमुळे शांतीही प्राप्त होते.

''हे गुडाकेशा! अज्ञानी, अविश्वासी, संशयी पुरुषाचा नाश होतो. त्याला इहलोक, परलोक आणि मोक्षसुख प्राप्त होत नाही. ज्याने योगाने सर्व कर्मांचा संन्यास केला आहे, ज्ञानाने ज्याचे सर्व संशय नष्ट झाले आहेत त्याला कर्मबंधन उरत नाही. म्हणून, प्रिय पार्था, अज्ञानापासून उत्पन्न झालेला तुझ्या हृदयातील संशय ज्ञानरूप खड्गाने छेदून, ईश्वरार्पण करून, कर्मयोगाचा अवलंब कर आणि युद्धाला सज्ज हो!''

कृष्णाने एवढे सांगूनही अर्जुनाचे मन नि:शंक झाले नाही. तो म्हणाला, ''श्रीकृष्णा, एकदा तू कर्मयोगाची प्रशंसा करतो आहेस आणि पुन्हा कर्मसंन्यासाचीही! या दोन्हींमध्ये अधिक श्रेयस्कर काय आहे, ते तू मला सांग.''

अर्जुनाला त्याच्या स्वकर्मापासून ढळू द्यायला कृष्ण तयार नव्हता. अर्जुनाची शंका दूर करत कृष्ण म्हणाला, ''पार्था, कर्मसंन्यास आणि कर्मयोग, दोन्ही मोक्षदायक आहेत, हे सत्यच आहे. परंतु, त्यातही कर्मयोग अधिक श्रेयस्कर आहे.

''जो मनुष्य कोणाचाही द्वेष करत नाही आणि कशाचीही इच्छा धरत नाही, तो कर्मे करूनही नित्य संन्यासीच असतो. कारण, जो सुखदु:खादी द्वंद्वापासून मुक्त होतो, तो अनायासेच कर्मबंधापासून मुक्त होतो. कर्मसंन्यास आणि कर्मयोग फलदृष्टीने भिन्न नाहीत. दोन्हीपैकी कोणत्याही एका मार्गाचे आचरण केले तरी दोन्ही योगांचे फल प्राप्त होते. योगयुक्त झालेल्या तत्त्ववेत्त्या पुरुषाने 'मी काहीच करत नाही, इंद्रिये स्वत:च आपापले कार्य करत आहेत,' असे समजावे. योगी हा आत्मशुद्धीसाठी शरीराची, मनाची, बुद्धीची आणि इंद्रियांची कर्मे फलासक्ती त्यागून करत असतो. हे ज्ञानेच्छू अर्जुना, योगयुक्त झालेला पुरुष कर्मफलाची आसक्ती त्यागून अंतिम शांती प्राप्त करतो; आणि योगयुक्त नसलेला पुरुष कामामुळे फलासक्त होऊन पाप-पुण्याशी बांधला जातो. जितेंद्रिय पुरुष सर्व कर्मांचा मनाने संन्यास करून, नऊ द्वारांच्या या देहरूपी नगरात, काही न करता अथवा करविता, सुखाने पहुडलेला असतो.

''परमेश्वर कोणाचीही कर्मे अथवा कर्मफल निर्माण करत नाही. प्रकृतीच सर्व काही करत असते. परमात्मा कोणाचेही पुण्य अथवा पाप स्वत:कडे घेत नाही. ज्ञानाला अज्ञानाने आवृत्त केले म्हणजे प्राणी मोह पावतात. ज्ञानी पुरुषाची दृष्टी मात्र विद्या-विनययुक्त ब्राह्मण, गाय, हत्ती आणि श्वान या सर्वांच्या ठिकाणी समानच असते.

''पार्था, सर्व यज्ञ आणि त्यांचा भोक्ता, सर्व लोकांचा महेश्वर, भूतमात्रांचा हितकर्ता, अशा परमेश्वराला- मला- जाणणाऱ्याला शांती आणि सुख प्राप्त होते.

''इंद्रिये स्वाधीन ठेवणारा, ज्ञानी, शीत-उष्ण, सुख-दु:ख समान मानणारा, मन नित्य स्थिर ठेवणारा योगी योगयुक्त असतो. जिज्ञासू पार्था, सर्वत्र समदृष्टी ठेवणारा योगयुक्त पुरुष सर्व भूतांमध्ये आपणच आहोत आणि सर्व भूते आपल्यामध्येच आहेत असे पाहतो. तो माझ्या ठिकाणी सर्व भूतांना आणि सर्व भूतांच्या ठिकाणी मला पाहतो. असा पुरुष कधी मला अंतरत आणि मी त्याला अंतरत नाही. दोघेही एकरूप होतो.''


कृष्ण सांगत असलेला समत्वयोग आचरणात आणणे सुलभ नाही हे ध्यानात येऊन अर्जुन सचिंतपणे म्हणाला, ''मधुसूदना! तू सांगत असलेला समत्वयोग मनाच्या चंचलतेमुळे मला साध्य होईल असे वाटत नाही. वायूला बांधून ठेवणे जसे अशक्य आहे, तसेच चंचल मनाला आवरणेही दुष्कर आहे.''

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'उत्तुंग' या मृणालिनी सावंत लिखित पुस्तकातून)**


# जयसिंगराव पवार

## यांचे साहित्य






आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध




छत्रपती संभाजी : एक चिकित्सा




छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ




दादोजी कोंडदेव कोण होता?




क्रांतिसिंह नाना पाटील



मराठेशाहीचे अंतरंग




मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध




राजर्षी शाहू छत्रपती एक मागोवा




राजर्षी शाहू छत्रपती पत्रव्यवहार आणि कायदे



राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे




राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे




राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय




राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्र. ठाकरे




समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती




शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?




शिवछत्रपती : एक मागोवा




शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना



वेध अमुच्या इतिहासाचा



व्यक्तिवेध



युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी

।। पुस्तकाच्या पानांतून ।।




# राधेय

## रणजित देसाई

सकाळपासून कर्णाचे मन रात्रीच्या प्रसंगातच गुरफटले होते. दुसऱ्या कशात लागत नव्हते. सूर्योपासनेची वेळ नजीक येताच कर्णाने रथ सज्ज करण्याची आज्ञा केली. कर्ण दर्पणासमोर उभा असता मागे आलेल्या वृषालीकडे त्याचे लक्ष गेले. वृषालीने विचारले,

'काय पाहता?'

'रूप!'

'मग त्यात नवीन काय आहे!'

'वृषाली, आपलं रूप नित्य पाहत असूनही आपल्याला रूपाचा कंटाळा येत नाही. ते रूप अधिक मोहवीत जातं. उद्या हरवलेलं रूप पाहण्याचं बळ लाभेल ना?'

'काय हरवलं?'

'काय हरवत नाही? प्रत्येक दिवसाबरोबर वार्धक्य नजीक येत असतं, सूक्ष्मतेनं बळ हरवत असतं. शरीराबरोबर मनाचं बळ सरत असतं. पण दर्पणामध्ये दिसतं, ते तेच मोहक रूप! या मानवी रूपाचा जर एवढा मोह वाटतो, तर रूपाचं दैवत समजलं जाणाऱ्या त्या इंद्राचं रूप कसं असेल?'

'आपलं मन आज ठिकाणावर दिसत नाही.'

'का?' कर्णाने वळून विचारले.

'सकाळपासून आपलं लक्ष कशातच नाही. त्यात असलं बोलणं. प्रत्येक सरकणाऱ्या पळाकडं आपलं लक्ष गुंतलं आहे. नित्याच्या सूर्यपूजेला अद्याप अवधी असतानाच रथ सज्ज करण्याची आज्ञा दिलीत. आज पूजेसाठी मन अधीर झालेलं दिसतंय्.'

'खरं आहे.' कर्ण स्मितवदनाने म्हणाला, 'वसू, या पूजेसारखा भाग्यशाली क्षण नाही. देवदर्शनाची संधी कोण सोडील?'

'देवदर्शन?'

स्वत:ला सावरीत कर्ण म्हणाला,

'हो ना! नदीपात्रात उभं राहून मी सूर्यस्तुती करीत असतो, उभ्या सूर्यकिरणांचं स्नान घडत असतं, तेव्हा त्या तेजानं आपणच भारले जात आहो, असा भास होतो. ज्ञात-अज्ञातांचा विसर पडून चैतन्यरूपाचा साक्षात्कार म्हणजेच परमेश्वरदर्शन नाही का? त्या क्षणासाठी जीव उतावीळ झाला, तर नवल कसलं?'

वृषालीचा निरोप घेऊन कर्ण सूर्योपासनेसाठी महालाबाहेर पडला. प्रासादासमोर रथ सज्ज होता. कर्ण रथारूढहोताच सारथ्याने रथ हाकारला.

रथ नेहमीप्रमाणे नदीकाठापासून दूर, दाट वृक्षराईत थांबला. सारथी व रथ तेथेच थांबवून कर्ण एकटा नदीच्या दिशेने जाऊ लागला.

तळपत्या उन्हात नदीच्या दोन्ही बाजूंना रुंद वाळूकिनारे मोकळे होते. त्या किनाऱ्यांमधून वाहणारा निळाशार जलप्रवाह डोळे सुखावत होता. कुठेच मानवी जाग लागत नव्हती. नदीकडे जात असता वाळूत रुतणाऱ्या पावलांचा आवाज उठत होता. कर्ण नदीपात्राजवळ आला. त्याने आपले उत्तरीय नदीकाठावर ठेवले. आपली पादत्राणे काढून वाळूवरून चालू लागला. तप्त वाळूचा पोळणारा स्पर्श त्याच्या तळव्यांना होत होता. नदीच्या पाण्यात प्रवेश करताच त्या तापल्या पावलांना थंडावा लाभला. त्या उथळ प्रवाहातून कर्ण तसाच चालून गेला. पाणी वाढत होते. कर्णाने त्या नदीप्रवाहावर आपले अंग झोकून दिले. कर्णाचे हात जलद गतीने पाण्यावर फिरत होते. थोडे पोहून गेल्यावर तो माघारी वळला. नदीकाठावरच्या जलात तो उभा राहिला. कपाळावर आलेले ओले केस मागे परतवून, तो किनाऱ्याकडे पाठ करून उभा राहिला. जलबिंदूंनी व्यापलेला त्याचा चेहरा सुवर्णकिरणांनी उजळला. कर्णाने सूर्यवंदन केले आणि दोन्ही बाहू उंचावून सूर्योपासना चालू झाली. कर्ण एकाग्र मनाने सूर्यचिंतन करीत होता.

अपराह्ण काळी कर्णाची सूर्यपूजा संपली. उन्हाने केस कोरडे झाले होते. कर्णाने वाकून नदीचे पाणी हाती घेतले. ती ओंजळ उंचावीत असता त्याच्या मनाची अधीरता वाढत होती. त्याने हाक दिली,

'कुणी याचक आहे?'

त्या हाकेला उत्तर आले नाही.

त्या शांततेने मन विचलित झाले. त्याने परत हाक दिली.

'कुणी याचक आहे?'

'आहे!' मागून आवाज आला.

'याचका, तुझं स्वागत असो! तुला काय हवं?'

'दान!'

'कसलं? माझं पौरुष आणि धर्म यांना सुरक्षित ठेवून काहीही मागा. आपलं इच्छित पुरं केलं जाईल. मी या सूर्यदेवाला साक्ष ठेवून आपलं मनोवांछित पूर्ण करण्यास बद्ध होत आहे. त्या दानानं आपली मनोकामना पुरी होवो.'

कर्णाने ओंजळीतले जल नदीपात्रात सोडले आणि तो इंद्रदर्शनासाठी वळला.

इंद्राला वंदन करण्यासाठी जोडले जाणारे हात अडखळले. नदीतीरावर एक ब्राह्मण याचक म्हणून उभा होता. त्याची कृश शरीरयष्टी, त्याने परिधान केलेली जीर्ण वस्त्रे त्याच्या दारिद्र्याची ओळख करून देत होती.

कर्ण ते रूप पाहून अचंबला. त्याने आजूबाजूला पाहिले. दुसरे कोणी दिसत नव्हते.

'अंगराजाचा विजय असो!'

कर्णाने त्याला निरखून पाहिले, आपले हात जोडले व त्याला विचारले,

'हे विप्रा! सुवर्णालंकारांनी युक्त अशा तरुण रूपवान स्त्रिया किंवा गोधनानं समृद्ध असलेली गावं यांपैकी मी तुला काय देऊ?'

विप्र हसला.

'अंगराज, आपण दान दिलं आहे. फक्त त्या दानाचा निर्देश करणं अन् ते आपल्या हातून घेणं एवढंच राहिलंय्.'

'निर्भय मनानं मनोवांछित सांगा. ते अवश्य मिळेल. कर्णाच्या दातृत्वाबद्दल शंका बाळगू नका.'

कर्णाची दृष्टी त्या विप्राला न्याहळीत होती. कर्णाची शोधक दृष्टी टाळीत तो विप्र म्हणाला,

'अंगराज, सारीच दानं आनंददायक नसतात. काही भारी क्लेशकारक असतात.'

'अशा दानानं तुम्ही तृप्त व्हाल ना? मग आपण माझ्या यातनांची चिंता करू नका. आपणांसाठी त्या यातना मी आनंदानं सहन करीन.'

कर्णाच्या त्या निर्भय रूपदर्शनाने तो विप्र संकोचला. दानाचा उच्चार करण्याचे बळ त्याला राहिले नाही.

विप्राची ती अवस्था पाहून कर्ण मनातून आनंदला. विप्राचे बोल ऐकण्यास तो अधीर झाला असता त्याच्या कानांवर शब्द आले,

'अंगराज! मला... मला तुमची कवचकुंडलं हवीत...'

'दिली!' कर्णाने सुटकेचा निःश्वास सोडला.

विप्राच्या मुखावर स्मित उमटले; पण ते फार काळ टिकले नाही.

कर्णाच्या चेहऱ्यावरचे हास्य विरले होते. नेत्रकडांवर अश्रू गोळा झाले होते.

ते अश्रू पाहून विप्राने विचारले,

'महाराज, दानाचं दुःख होतं?'

कर्णाने अश्रू पुसले. खिन्नपणे हसत तो म्हणाला,

'कर्णाला दानाचं दुःख नाही; पण याचनेची क्षुद्रता आज जाणवली. याचनेसारखं दारिद्र्य या जगात दुसरं नाही, याचं प्रत्यंतर आज आलं. नाहीतर ऐश्वर्य आणि अधिकार यांनी संपन्न देवेंद्राला याचना करताना दरिद्री ब्राह्मणाचं रूप का घ्यावं लागलं असतं?'

तो विप्र ओशाळला. त्याने विचारले,

'आपण मला ओळखलंत?'

'आपण माझ्याकडं कवचकुंडल मागण्यासाठी येणार आहात, हे मला आधीच समजलं होतं. आपल्या दर्शनासाठी मी आतुर झालो होतो. त्यासाठी मी अधीर आहे.'

'तुला कुणी सांगितलं?'

'जसा अर्जुन आपला भक्त, तसा मी सूर्याचा.'

विप्रवेशातील इंद्राच्या मुखावर हास्य प्रगटले. कर्णाचे लक्ष इंद्राच्या पावलांकडे लागले होते.

त्या काष्ठवत पावलांचे रूप बदलले. विप्राने नेसलेल्या अंतरीयाचे पीतांबरात रूपांतर झाले.

कर्णाची दृष्टी उंचावत होती.

हिरण्यवर्णीय दीर्घबाहू इंद्राचे वज्रधारी रूप पाहून कर्ण तृप्त झाला. कर्णावर छाया पसरली. गार वाऱ्याचा झोत अखंड वाहू लागला. कर्णाने वर पाहिले. आकाशात एक कृष्णमेघ त्या दोघांवर सावली धरून उभा होता. अत्यंत आदरयुक्त भावाने कर्णाने इंद्राला वंदन केले.

'कल्याण असो! राधेया, कवचकुंडलं देणार ना?'

कर्णाने आपल्या कवचाकडे पाहिले. कर्ण अद्यापि पाण्यात उभा होता. तो पाण्यातून बाहेर आला. किनाऱ्यावर उत्तरीय होते. रथ, सारथी, शस्त्र सारे दूर वृक्षराईत होते.

कर्णाची अडचण इंद्राच्या ध्यानी आली. इंद्राने आपला उजवा हात पुढे केला. त्या हातावर एक धारदार शस्त्र होते.

कर्णाने ते हाती घेतले. कर्ण त्या शस्त्राकडे पाहत होता.

'कर्णा, विचार कसला?'

कर्णाने इंद्राकडे पाहिले. तो म्हणाला,

'देवा, मी एक सामान्य मानव. सूतकुलात वाढलेला. पूर्वपुण्याईची खूण सांगणारी एवढी एकच खूण- कवचकुंडलं. एवढंच माझ्या जीवनातलं दैवी लेणं. ते आज जाणार, याची खंत वाटत नाही; पण ते जात असताना, त्याबरोबरच उरलेलं हे मानव रूप, ते विरूप होणार नाही ना, अशी भीती वाटते. आपण साक्षात रूपाचं दैवत. आपण समोर असता ज्याचा मला सदैव अभिमान वाटतो, असं माझं रूप, ते या दानानं विरूप होऊ नये, असं वाटतं.'

'तथास्तु! कर्णा, तसंच घडेल! त्याबद्दल तू निश्चिंत ऐस.'

कर्णाने ते शस्त्र पेलले. इंद्र कर्णाच्या मुखाकडे पाहत होता. पण आपल्या हातांनी आपली कवचकुंडल कापीत असता त्याच्या मनोविकारांच्या दर्पणावर दु:खाची किंचितही छटा प्रकटली नव्हती, की समाधान ढळत नव्हते. कर्ण स्मितमुखच होता. कवचकुंडले कापीत असता येणाऱ्या रुधिरापाठोपाठ शरीर पूर्ववत बनत होते.

कवचकुंडले कापून होताच ती त्याने हातांत घेतली. इंद्राचे दोन्ही हात समोर आले होते. पद्मदलाप्रमाणे शोभणाऱ्या त्या सुंदर हातांवर कर्णाने शस्त्रासह कवचकुंडले ठेवली आणि कर्णाच्या डोळ्यांदेखत ती त्या हातांवरच अंतर्धान पावली.


कर्णाचे लक्ष त्या रिक्त हातांवर खिळले असता त्याच्या नेत्रांतून दोन टपोरे अश्रू ओघळले.


लक्ष्मण माने यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त
त्यांच्या कार्याचा घेतलेला
लेखरूपी आढावा

झेपलीकडील लक्ष्मण

संपादन :
डॉ. यशवंत मनोहर
डॉ. रावसाहेब कसबे
किंमत : ₹ ३२०

ebook available

‘दानाचं दु:ख वाटतं?’ इंद्राने विचारले.

नकारार्थी मान हलवीत एक नि:श्वास सोडून कर्ण म्हणाला,

‘नाही! दु:ख दानाचं नाही; माझ्या दुर्भाग्याचं दु:ख वाटतं.’

‘कसलं दुर्भाग्य?’ इंद्राने आश्चर्याने विचारले.

‘माझ्या कवचकुंडलांना आपल्या हातावर विरून जाता आलं, हे त्या कवचकुंडलांचं भाग्य. त्यांचा मला हेवा वाटला. मानवी जीवनाची सार्थकता तरी दुसरी काय असते? परमेश्वररूपात विलीन होण्याचीच ना! आपण माझी कवचकुंडलं मागितलीत; पण मला मागितलं नाहीत. त्या हातांत विरून जाण्यात केवढी धन्यता वाटली असती! कवचकुंडलं हे जसं परमेश्वरी वरदान, तसंच हे शरीरही. त्या या देहाचा आत्म्यासह स्वीकार झाला नाही, याचं दु:ख वाटतं. देवा, आपण मलाच का मागितलं नाहीत? मी माझं सर्वस्व अत्यानंदानं आपल्या चरणी वाहिलं असतं. त्यातच जीवनाची कृतार्थता मानली असती.’

अर्जुनाच्या रक्षणासाठी कवचकुंडले हरण करण्यासाठी आलेला इंद्र कर्णाच्या शब्दांनी, त्याच्या मनाच्या निर्मळ दर्शनाने विरघळला. कर्णाचे ते भाववेडे रूप पाहून इंद्राने न राहवून कर्णाला आलिंगन दिले.

त्या तेजोमय रूपाने कर्ण बद्ध असतानाच त्याच्या कानांवर शब्द आले,

‘राधेया, देवांना सारंच पेलतं, असं थोडंच आहे? तुझं निर्मळ रूप सामावून घेण्याची शक्ती माझी नाही. कर्णा, तुझं दातृत्व, तुझा सद्भाव अलौकिक आहे. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला काही हवं असेल, तर मागून घे.’

कर्णाला सूर्याला दिलेल्या वचनाची आठवण झाली; पण याचना करण्याचे धैर्य त्याला होईना.

‘काही हवं का? माग...’

कर्ण संकोचाने म्हणाला,

‘आपल्या कृपादृष्टीनं पर्जन्यवृष्टी होते. शुष्क भूमीला ओलावा मिळतो. ती धनधान्यांनी संपन्न बनते. आपली कृपादृष्टी झाली, तर काय होणार नाही? आपण कवचकुंडलं मागावयास याल, तेव्हा आपल्याकडून एखादी शक्ती मागून घेण्यासाठी मी वचनबद्ध होतो. आपल्या दर्शनानं सारे भाव हरपले. काही मागता आलं नाही. आता तो अधिकारही राहिला नाही. आपली कृपा असेल, तर आपण शत्रुनाशिनी अमोघ शक्ती मला द्या. बलवत्तर शत्रूपासून मला रक्षण प्राप्त होईल. बलिष्ठ शत्रूचा मला नाश करता येईल, द्यायचंच झालं, तर तेवढं द्या.’

‘तथास्तु! कर्णा, तुझी इच्छा पुरी होईल. आज मी माझी वासवी शक्ती तुझ्या हाती देत आहे. या शक्तीच्या साहाय्यानं तुला एकाच शत्रूचा नाश करता येईल. या शक्तीचा वापर झाला की, त्यानंतर ती पूर्ववत माझ्याकडं येईल. एवढंच सांगावंसं वाटतं की, या शक्तीचा वापर स्वार्थप्रेरित हेतूनं करू नकोस.’

कर्णाने वासवी शक्तीचा स्वीकार केला. इंद्राला नम्र भावाने वंदन केले. आशीर्वादासाठी उंचावलेला इंद्राचा हात पाहून कर्णाने नेत्र मिटले.

डोळे उघडले, तेव्हा ते दिव्य रूप नाहीसे झाले होते. आकाशातला घनमेघ लुप्त झाला होता. सूर्यकिरणांचा दाह प्रगटला होता.

कर्णाने उत्तरीय घेतले. ते अंगावर घेत असता त्याचे हात छातीवरून फिरले. काया तीच होती; पण लुप्त झालेल्या तेजाची जाणीव होत होती.

कर्ण प्रासादावर आला. कर्णाच्या मुखावर विलसणारा आनंद वृषालीला जाणवत होता. भोजन झाल्यानंतर कर्ण आपल्या महालात गेला. वृषाली कर्णाला निरखीत होती. कर्णाचा वाढलेला प्रसन्न भाव पाहून, का, कोण जाणे, तिला समाधान वाटत नव्हते. ते कर्णाच्या ध्यानी आले. वृषालीला जवळ घेत कर्णाने विचारले,

‘काय पाहतेस, वसू?’

‘काही नाही.’

‘सांग ना!’

‘सूर्योपासनेहून आपण आल्यापासून मी पाहत आहे. आपण आनंदी दिसता; पण आपल्या...’

‘रूपात काही तरी उणीव भासते, असंच ना?’

वृषालीने होकार दिला.

‘वृषाली, तुला सांगितलं, तर खरं वाटेल? आज साक्षात देवेंद्र माझ्याकडं याचक म्हणून आला होता.’

‘देवेंद्र?’

‘हो!’

‘काय मागितलं त्यांनी?’ वृषालीच्या मुखावर कौतुक प्रगटले.

‘माझी कवचकुंडलं.’

वृषालीचा भाव बदलला. तिच्या चेहऱ्यावर भीती प्रगटली. कर्णरूपाची उणीव चटकन तिच्या लक्षात आली. शरीरकांतीपेक्षा अधिक कांतीने शोभणारी कवचकुंडले तशीच दिसत होती; पण त्यांची दीप्ती लुप्त झाली होती.

‘अन् आपण ती दिलीत?’

‘कर्णानं कोणाही याचकाला विमुख पाठविलं नाही. तो तर

देवेंद्र. त्याला मी नाही कसं म्हणणार?'

वृषाली दु:खाने कर्णाला बिलगली.

'आपण त्या देवेंद्राचं काय केलं केलं होतं, म्हणून त्यानं आपली कवचकुंडलं हिरावून घेतली? कशासाठी?'

'वृषाली, देवांनासुद्धा आपल्या अधिकाराचा, शक्तीचा अहंकार असतो. जी देवांना प्राप्त नाही, अशी शक्ती मानवाजवळ असेल, तर ते कसं खपणार? कदाचित त्याचमुळं...'

'आपण इंद्राला विचारलं नाही?'

'मला दान देणं एवढंच माहीत आहे. याचकाला मी कधीही कारण विचारलं नाही.'

वृषालीचे हात कर्णाच्या विशाल छातीवरून फिरत होते- जणू हरवलेले कवच ती शोधीत होती. तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

हळुवार हाताने वृषालीची हनुवटी उंचावीत कर्णाने आपली दृष्टी तिच्या डोळ्यांना भिडवली. त्या अश्रुपूर्ण डोळ्यांचे चुंबन घेत कर्ण म्हणाला,

'वसू, तू रडतेस? माझी कवचकुंडलं गेली, म्हणून?' कर्ण हसला, 'वसू, माणसानं आपल्या बाहुबलावर आपला पराक्रम सिद्ध करावा. त्यासाठी दैवी लाभाचा आश्रय घेऊ नये. कवचकुंडलं गेली, याचा उलट तुला आनंद वाटायला हवा होता.'

'आनंद?' वृषालीने आश्चर्याने विचारले.

'होय ना! तुला आठवतं? एका अपरात्री मी जागा झालो होते. तेव्हा तू जागी असल्याचं माझ्या ध्यानी आलं. कसल्या तरी भयानक स्वप्नानं तुला जागं केलं होतं. भीतीनं विह्वल झालेली तू माझ्या जागे होण्याची वाट पाहत होतीस. ते समजताच मी तुला म्हणालो, 'एवढी भीती वाटत होती, तर तू माझ्या जवळ का आली नाहीस?' तेव्हा तू काय सांगितलं होतंस, आठवतं?'

'काय?' वृषालीने विचारले.

'तू म्हणालीस, रात्री कधी मी जागी झाले, तर आपल्याकडं यावं, असं वाटतं; पण आपल्याला बिलगण्याचं धाडस होत नाही. कारण रात्रीच्या काळोखात आपली कवचकुंडलं वेगळ्याचं तेजानं जाणवतात. त्यांची भीती वाटते... वसू, यापुढं तो दुरावा राहणार नाही. तुला केव्हाही नि:संकोचपणे मला बिलगता येईल.'

वृषालीला आपल्या मिठीत बद्ध करीत कर्ण म्हणाला,

'तुलाच काय, पण यापुढं शत्रूंनासुद्धा मनात भय न बाळगता माझ्या छातीशी भिडता येईल.'

दुर्योधनाच्या निरोपाबरोबर कर्ण हस्तिनापुरात आला.

दुर्योधन-महालात शकुनि, दु:शासन जमले होते.

कर्ण महालात जाताच दुर्योधनाने त्याचे स्वागत केले. दुर्योधन म्हणाला,

'मी तुला तातडीनं बोलावलं, त्याचं कारण समजलं?'

'नाही.'

'विराटाघरी कीचकाचा वध झाल्याचं निश्चितपणं कळलंय्.'

'वध?'

'हो! निर्घृण वध! अन् तोही गंधर्वांकरवी. विराटाच्या नृत्यशाळेत सेनापती कीचकाचा छिन्न-विछिन्न देह सापडला. रक्तामांसानं विखुरलेल्या अवयवांनी ती भूमी माखली होती. विराटाघरी सैरंध्री नामक एक रूपसंपन्न दासी होती. तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा कीचकानं प्रयत्न केला, म्हणून तिचं रक्षण करणाऱ्या गंधर्वानं कीचकाला शासन केलं.'

कर्ण विचारात गर्क होता. तो काही बोलत नाही, हे पाहून


द लीडरशिप मास्टरक्लास : नेतृत्व आणि व्यवस्थापन कौशल्याची गुरुकिल्ली

सूत्रे नेतृत्व विकासाची

एमा डी व्हिटा । अनु. : प्रमोद शेजवलकर

किंमत : ₹ २५०

ebook available



दु:शासनाने विचारले,

'अंगराज, आपण बोलत का नाही?'

'काही नाही. मी विचार करीत होतो. गंधर्वांच्या हातून असा अमानुष प्रकार होणार नाही. हे सामर्थ्य फक्त एकाचंच आहे.'

'कुणाचं?' दु:शासनाने विचारले.

'भीम!' कर्णाने सांगितले.

सारे त्याच्याकडे पाहत राहिले.

'युवराज, अज्ञातवासात राहणाऱ्या पांडवांना तू शोधतोय्स ना? मग विराटाचं घर ही एक तशी जागा आहे.'

'आम्ही तोच विचार करीत होतो.' दुर्योधन म्हणाला.

'कसला?'

'पांडवांची चिंता करण्याचं काही कारण नाही. पांडवांच्या शोधार्थ पाठवलेले दूत माघारी आले आहेत. त्यांचा कुठंही सुगावा लागत नाही. ते नि:संशय मृत झाले असावेत.'

'युवराज, एवढ्या सहजपणं पांडवांचा मृत्यू ओढवायचा नाही. तुमच्या चतुर दूतांना, भरपूर द्रव्य देऊन, चारी दिशांना पांडवांचा शोध घेत फिरू दे. अज्ञातवासातल्या पांडवांचा शोध लागला नाही, तर अज्ञातवासाचं हे वर्ष संपताच ते प्रगट होतील- युद्धासाठी.'

'ठीक आहे. मी तशी आज्ञा देतो.' दुर्योधनाने संमती दिली व त्याने सांगितले, 'राधेया, राजधानी त्रिगर्ताचा राजा सुशर्मा आलाय्. कीचकाचा वध झाल्यानं विराटराजा निराश्रय व निरुत्साही झाला आहे. त्या विराटनगरीवर चालून जावं, असं त्याचं मत आहे. राजसभेला ते मान्य आहे. भीष्म, द्रोण, विदुरांनी त्याला संमती दिली आहे. विराटस्वारीत आपल्याला विपुल धन, गोधन मिळेल अन् तो शरण येताच त्याचं बळही आपल्याला लाभेल.'

कर्णाने होकार दिला.

जास्त अवधी न दवडता भीष्म-द्रोणांसह कौरव विराट राज्यावर स्वारी करण्यासाठी ससैन्य निघाले. विराटाच्या स्वारीसाठी सैन्याचे दोन भाग केले होते. एका भागाने-सुशर्म्याने गोधन लुटावे, नंतर दुसऱ्या सैन्यभागाने उरलेले गोधन पळवावे, असे ठरले होते.

सुशर्म्याने ठरल्याप्रमाणे विराटाच्या गोपाळांस पळवून लावले आणि विराटाचे त्या भागातले गोधन घेऊन तो परतला. कौरवांच्या सेनेने गोधन पळवल्याचे कळताच विराट हतबल झाला. तो आपल्या मोजक्या सैन्यानिशी विरोधाला उभा राहिला; पण सुशर्म्याने पराभव करून त्याला पकडले. सुशर्म्याची कामगिरी पार पडताच कौरवसेनेने दुसरा लढा उभारला. विराटपुत्र उत्तराला काही सुचेनासे झाले. त्याची दयनीय स्थिती पाहून विराटाघरी आश्रयाला राहिलेले अज्ञातवासातले पांडव प्रगट झाले. तुंबळ युद्धात पांडवांनी कौरवांचा पराजय केला. विराटाला सोडवले. त्या युद्धात अर्जुनाने कर्णाचा, भीष्मांचा, द्रोणांचा पराभव केला.

पांडव प्रकट झालेले पाहताच कर्णाने दुर्योधनाला मागे फिरण्याचा सल्ला दिला. तो म्हणाला,

'युवराज, पांडव प्रकट झाले आहेत. या युद्धात जय-पराजयाचा निर्णय लावण्यापेक्षा भावी युद्धावर लक्ष केंद्रित करावयास हवं.'

दुर्योधनाने तो सल्ला मानला आणि चिंताग्रस्त मनाने कौरव हस्तिनापुरास परतले.


**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'राधेय' या रणजित देसाई लिखित पुस्तकातून)**

◆◆◆


दाऊद, अबू सालेम, छोटा राजन...
अंडरवर्ल्डमधील महत्त्वाची नावं...
त्यांच्यासारख्या गुन्हेगारांच्या जीवनाचा एका पत्रकाराने
निर्भयपणे मांडलेला लेखाजोखा

गॉडफादर्स ऑफ क्राइम

शीला रावळ
किंमत : ₹ ४२०




ebook available

।। पुस्तकाच्या पानांतून ।।

# उत्तरकांड

एस. एल. भैरप्पा

अनु : उमा कुलकर्णी




गरम पाण्यानं स्नान करून केस विंचरले, ऋषीपत्नींनी दिलेले सगळे दागिने पुन्हा परिधान केले आणि प्रसाधकेनं दाखवलेल्या आरशात स्वत:ला पाहिलं तेव्हा जाणवलं, दु:खामुळे माझं सौंदर्य कोमेजलं आहे. तिथं आधीचा सळसळणारा उत्साह नव्हता. उमलत्या फुलाचा आनंद नव्हता. एखाद्या मरणांतिक आजारातून नुकतीच उठले असावी, असा माझा अवतार दिसत होता. मनात निश्चय केला, पुन्हा कधीही असला प्राणांतिक रोग येईल असं कुपथ्य करणार नाही! लक्ष्मणाची आठवण झाली. युद्धात लढताना त्याच्या सर्वांगाला जखमा झाल्या असतील. रक्ताच्या खपल्या झाल्या असतील.

रथासोबत सरमा आली. आम्ही दोघी बसल्यावर जवनिकेनं रथ झाकण्यात आला. मला आतून बाहेरचं दृश्य दिसत होतं. लांबवर प्रेतं जाळल्याचा दुर्गंध येत होता. तिथून एका उंचवट्याच्या दिशेनं रथ निघाला. दगड एकत्र रचून काही सैनिक स्वयंपाक करत होते.

रथ थांबला. एका मोठ्या सरपणाच्या मांडवात उंच दगडावर राम बसला होता. थोडे खालच्या बाजूला लक्ष्मण-हनुमंत बसले होते. सोबत होते ते बहुधा सुग्रीव असावेत. नंतर त्याची खात्री झाली.

रथ थांबला. सरमेनं माझा हात धरून मला खाली उतरवलं. मला पाहताच रामाला वगळून बाकी सगळे उठून उभे राहिले. मला काय करावं, कुठं बसावं, की उभंच राहावं ते समजेना. मी रामाकडे पाहिलं.

रामाच्या चेहऱ्यावर स्वागताचं कुठलंच चिन्ह दिसलं नाही. लक्ष्मण मुकाट्यानं उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर राग आहे का? अजूनही राग निवळला नाही का? मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. त्याची नजर मला टाळत असल्याचा मला भास झाला.

मी सरळ रामाच्या समोर जाऊन उभी राहिले. तो अजूनही काही बोलला नाही. पार गाडून टाकणारं मौन सर्वत्र पसरलं होतं.

त्या मौनाला भेदून मीच बोलायला लागले, ''आर्यपुत्रा, जयजयकार असो! जयश्री संपादन केलेल्या तुला इक्ष्वाकू कुलातल्या समस्त ज्येष्ठांचा आशीर्वाद असो!''

अशा शुभवचनांचा उच्चार करून शांततेचा भंग केला तरी तो मौन बाळगून होता. त्याच्या तोंडून पडणाऱ्या शब्दासाठी आतुर झालेले सगळेच त्याच्या चेहऱ्यावर नजर खिळवून होते. त्या अवघड परिस्थितीत पुढे काय बोलावं, ते मला सुचलं नाही. माझ्या मागे उभी असलेली सरमाही जागीच चुळबुळत असल्याचं जाणवत होतं. तिलाही काहीतरी बोलायचं असावं, पण बोलणं सुचत नसावं.

अखेर रामानं बोलायला तोंड उघडलं, ''जनकराजपुत्री..''

या संबोधनानं मी चकित झाले! 'सीते' नाही... 'प्रिये' नाही... 'भार्ये'ही नाही!

तोच पुढे बोलू लागला, ''तुला पळवून नेणाऱ्या रावणाला मारून मी माझ्या ईक्ष्वाकू वंशाचा गौरव राखला आहे. मी हे युद्ध तुझ्यासाठी केलं नाही. माझ्या वंशाची कीर्ती राखण्यासाठी केलंय. तुला शोधण्यासाठी, रावणाविरुद्ध युद्ध करण्यासाठी, त्याच्या सेनाप्रमुखांना मारण्यासाठी किष्किंधेच्या या वीरांनी साहाय्य केलं आहे. माझं काम झालं आहे. एवढा दीर्घ काल परपुरुषाच्या, त्यातही रावणासारखी कामुक अपकीर्ती असलेल्या राक्षसाच्या ताब्यात तू राहिलीस! त्यामुळे माझा तुझ्या पातिव्रत्यावर विश्वास नाही. तू आता स्वतंत्र आहेस! यानंतर तू हवं तिथं आणि हवं तसं राहू शकतेस. हवं तर तू बिभीषणाच्या आश्रयाची मागणी करू शकतेस. हवं तर भरताचा आश्रय घे. आणखी कोणाच्याही साहाय्यानं जगू शकतेस. तुझी इच्छा!''

काय बोलतोय हा? माझा राम बोलतोय हे? माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना. भोवतालचा आसमंत गरगरू लागला. डोळ्यांसमोर अंधारी दाटून मी जमिनीवर कोसळले. मागं उभ्या असलेल्या सरमेनं सावरलं नसतं, तर डोकं मागं असलेल्या टोकदार दगडावर पडून तिथल्या तिथे कपाळमोक्षच झाला असता.

कोणीही काही बोललं नाही. त्या सगळ्यांची रामाच्या बोलण्याला संमती होती का... की बोलायची भीती... की मनाची तटस्थ भावना? स्वत:ला सावरायला काही वेळ जावा लागला. युद्धात मदत करणाऱ्यांनीही फक्त याच्या त्या ईक्ष्वाकू वंशाच्या सन्मानासाठीच याला मदत केली का? की एका अभागिनीची मुक्ती त्यांना अपेक्षित होती?

स्वत:ला सावरून मी पुन्हा उठून उभी राहिले आणि बोलू लागले,

''रामा, तू एक सुसंस्कृत राजकुमार आहेस, असं समजून माझ्या पित्यानं माझा हात तुझ्या हातात दिला. अशा असंस्कृत शब्दांना तुझ्या जिभेवर कसा थारा मिळाला? तुझ्या जिभेवर रावणाचं भूत बसलंय का? माझ्या पातिव्रत्यासाठी साक्ष हवी असेल, तर तुझ्यासमोर उभ्या असलेल्या बिभीषणाच्या धर्मपत्नी सरमादेवींना विचार! तू सांगशील त्या कुठल्याही देवाची शपथ घेऊन मी माझ्या पातिव्रत्याची ग्वाही देऊ शकेन. माझे पिता जनक महाराज, माझा पती तू, कोणाची शपथ घेऊ सांग!''

त्यानं काहीच उत्तर दिलं नाही.

''बोल! बोल काहीतरी! वाचा बसली का?'' माझा आवाज माझ्या नकळत चढला होता.

''बिभीषण आणि त्याची पत्नी रावणाकडून दुखावले आहेत. मी युद्ध करून रावणाचा वध केला. त्यामुळे ते माझ्याकडून उपकृत आहेत. त्यांच्या साक्षीला अर्थ नाही. त्यामुळे संदर्भानुसारच साक्ष मानावी लागते. इथं तर रावणाचं चरित्रच साक्षीला आहे! त्याची ख्याती अशी होती, की हाती लागलेल्या स्त्रीला तो क्षणभरही सोडायचा नाही; हे सगळ्या जगालाच ठाऊक आहे! यावर जास्त बोलून काहीही उपयोग नाही.''

यावर काय बोलावं, ते मला सुचलं नाही. संतापानं अंगाची लाही होत होती. संताप? कोणावर? ध्यानी-मनी चिंतन करून मनात ज्याच्या रूपाचं चिंतन केलं, यानं धनुष्यभंग करावा म्हणून सगळ्या देवांना सांकडं घातलं, अग्नीच्या साक्षीनं ज्याचा हात धरला, क्षणोक्षणी ज्याला आईच्या प्रेमाचं स्वरूप म्हणून प्रेम करत राहिले, ज्याचा सहवास मिळावा म्हणून त्याच्या पाठोपाठ वनवासात आले, वनात वाट्याला आलेले सगळे कष्ट हसत हसत सोसले, राक्षसाकडचा बंदिवासही ज्याच्या ध्यानाच्या जोरावर काढला, मोठमोठ्या आमिषांना पायदळी तुडवून ज्याची वाट पाहिली आणि आज माझ्या सगळ्या निष्ठांवर पाणी टाकणाऱ्या या रामावर, की या असल्या रामासाठी एवढं सगळं भोगणाऱ्या माझ्यावर?

चढ्या आवाजात मी म्हटलं, ''रामा, क्रूर आहेस तू! राक्षस रावणापेक्षा क्रूर! आता मी अग्नीच्या साक्षीनंच माझी शुद्धता दाखवून देईन!''

त्यानंतरच्या सगळ्या घटना माझ्या नकळत घडत गेल्या. सैनिकांसाठी चुली पेटवून स्वयंपाक करत असलेल्यांकडे मी गेले, ''दादा, या क्षणी एका संस्कारासाठी एका प्रेतावर अग्निसंस्कार होतील एवढ्या आकाराचं एक सरण उभं करून द्या! तिथं बसलेल्यांच्या समोर रास रचून द्या. आग पेटवा. मी रामाची पत्नी सीतादेवी. ऐकताय ना? आग चांगली धगधगू दे!''

खरोखरच त्या सगळ्यांनी एक माणूस जळेल एवढं सरपण एकत्र केलं आणि रामाच्या समोर ते नीट रचलं. आग पेटली. एक माणूस पूर्णपणे भस्मसात होईल एवढ्या उंचीच्या ज्वाळा लपलपू लागल्या. मी हात जोडले आणि देवलोकात असलेल्या अग्निदेवाला ऐकू येईल अशा स्वरात म्हटलं, ''अग्निदेवा, या जगातल्या समस्त मानवाच्या पाप-पुण्याला तूच साक्षी आहेस! मी तुला शरण आले आहे. मी शुद्ध असेन, तर तू मला जाळणार नाहीस, अशी श्रद्धा माझ्या मनात आहे. मनात जरी मी अशुद्ध वागले असेन तर तू मला क्षणार्धात भस्म कर!''


मी अग्नीला प्रदक्षिणा घालू लागले. एक प्रदक्षिणा घालून

इस्लामाबादमध्ये वास्तव्य करून
पाकिस्तानचा आँखो देखा हाल माध्यमांतून
मांडणाऱ्या मीना मेनन यांचं
लक्षवेधी अनुभवकथन

# रिपोर्टिंग पाकिस्तान

मीना मेनन
अनु. : मुक्ता देशपांडे
किंमत : ₹ ६००

ebook available





व्यापक ग्राउंड रिपोर्टच्या
माध्यमातून मांडली गेलेली
बदलत्या काश्मीरची वस्तुनिष्ठ कहाणी

# लाल बर्फाचे खोरे

जीतेंद्र दीक्षित
अनु. : पराग पोतदार
किंमत : ₹ ३५०

ebook available



मी अग्नीला साष्टांग नमस्कार केला. तशीच दुसरी प्रदक्षिणा घालू लागले.

अचानक पावलांचा धपधप आवाज आला. कुठून तरी लांबून. माझं सगळं लक्ष साक्षी देवतेकडे होतं. जेमतेम चार पावलं चालले असेन, कुणीतरी पुरुष धावत जवळ आला. माझे दोन्ही दंड धरून मला ओढतच सभेपुढे उभं करून म्हणाला,

''दादा, तुझी बायको उद्विग्न मानसिक स्थितीत आहे, हे तुला समजत नाही काय? अग्नी निष्पापाला जाळू शकणार नाही, अशा पुराणातल्या भ्रमाच्या मन:स्थितीत ती आहे! तू तुझ्या पत्नीच्या पातिव्रत्याविषयी शंका घेतलीस! पण तशीच शंका तिनं घेतली तर तुझ्याकडे काय उत्तर आहे? लक्ष्मण-सुग्रीव-हनुमंत साक्षी आहेत, असंच सांगशील ना? आणि त्यावर जर ती म्हणाली, लक्ष्मण तुझा धाकटा भाऊ आहे, सुग्रीव तुझ्याकडून उपकृत आहे आणि हनुमंत तुला स्वामी मानतात, तर तू काय उत्तर देणार आहेस? तुझ्या या मूर्खपणाच्या बोलण्यामुळे ती अग्नीत भस्मसात होऊन आत्महत्या करते आहे! समोर धगधगतेय ती सत्यासत्यता न पाहता जवळ येणारं सारं काही भस्मसात करणारी आग! तू मंत्रांमध्ये पठण करतोस, ती अग्निदेवता नाहीये! तिच्या या असल्या आत्महत्येनं आपल्या ईक्ष्वाकू वंशाच्या कीर्तीत भर पडणार आहे का?''

राम काहीच बोलला नाही. आता माझाही धीटपणा वाढला. अजूनही लक्ष्मणानं माझा दंड सोडला नव्हता. आता मी भानावर आले होते.

लक्ष्मण पुढं म्हणाला, 'इंद्रियांच्या जालात अडकून कळूनसवरून व्यभिचार केलेल्या अहल्येला क्षमा करण्यासाठी तू त्या लहान वयात गौतमऋषींसारख्या तपस्वींना धर्मसूक्त सांगितलंस! आता आपण निष्कलंक असल्याचं शपथेवर सांगणाऱ्या, साध्वी सरमेची साक्ष सांगणाऱ्या तुझ्या पत्नीला तर कोणी क्षमा करायचाही प्रश्न नाही! असं असताना तू तर विश्वासही ठेवायला तयार नाहीस! काय झालंय तुला? तुझी मती ताळ्यावर आहे की नाही?''

रामानं मान खाली घातली.

काही क्षण वाट पाहून लक्ष्मण आवाज खाली आणत दृढस्वरात म्हणाला, ''तुम्ही दोघांनी अग्निसाक्षीनं एकमेकांचा हात हातात घेतलाय. इथं प्रज्वलित झालेल्या या अग्नीच्या साक्षीनं प्रदक्षिणा घाला आणि पुन्हा एकदा त्याच साक्षीनं एकमेकांचे हात हातात घ्या!''

रामानं खाली घातलेली मान वर केली नाही. काही क्षण वाट पाहून लक्ष्मण रामापाशी गेला आणि त्याचा दंड धरून त्याला हाताला धरून खाली घेऊन आला. रामही निमूटपणे त्याच्याबरोबर आला, दुसऱ्या हातानं माझा दंड धरून आम्हा दोघांनाही अग्नीच्या पुढ्यात उभं केलं. रामाच्या हातानं माझा हात धरायला लावला. आम्हा दोघांना तसंच धरून त्यानं आमच्याकडून तीन प्रदक्षिणा घालवून घेतल्या.

&

दिवस-रात्री ग्रासलेल्या पीडेतून सुटका झाली होती. नावेतून परतीचा प्रवास सुरू झाला होता. लंका देश मागं पडत चालला होता. पण दुसरा तीर नजरेला पडत नव्हता. माझीही तीच अवस्था असल्यामुळे माघारी वळल्याचा आनंद नव्हता. हनुमंत एका खडकावरून दुसऱ्या खडकापर्यंत पोहत येत असल्याचं दिसत होतं. त्यांच्या मागे राम-लक्ष्मण आणि किष्किंधेचे शेकडो सैनिक. युद्धाच्या आणि खाण्या-पिण्याच्या सामानासह येणाऱ्या नावा माझ्यामागून येत होत्या. भरती नसली, तरी मोठाल्या लाटा माझ्या नावेलाही दोलायमान करत होत्या. भोवतालच्या अथांग सागरात मी एकटीच आहे, अशी भावना मनात भरून राहिली होती. सोडवून घेऊन जाण्यासाठी आलेल्यापैकी कोणाचाच माझ्याशी काही संबंध नाही. शत्रूच्या कारागृहात बंदिस्त असलेल्या आपल्या वंशाच्या कीर्तीला सोडवलंय, आणि म्हणून राम अभिमानानं ताठ मान करून चालला आहे!

काठावर येताच सैनिकांनी सारं सामान तिथं असलेल्या बैलगाड्यांमध्ये भरलं आणि सगळे चालू लागले. मीही चालू लागले. पायांमध्ये बळ नव्हतं. तशीच पावलं उचलून पुढं ठेवू लागले. वाटलं, सांगावं- मी चालू शकत नाही..पण कोणाला सांगायचं? रामाला? नको! आपले कष्ट मोकळेपणानं सांगावेत असा मोकळेपणा नात्यात राहिला नव्हता. पाय ओढत चालत राहिले. मनात येत होतं, अशीच कोलमडून पडले तरी कोण अश्रू ढाळणार आहे? असं झालं तर बरंच होईल!

माझ्या मागून तोही माझ्या वेगाला जुळवून घेत पावलं टाकत होता. पण 'सीते, जपून! तिथं काटे आहेत...इथं धोंडा आहे...माझा हात धर..हा आधार घे..' असं, पूर्वीसारखं सांगत नव्हता! एवढ्या माणसांत अशी मदत करायची लाज? नाही, ठाऊक आहे मला! त्यानं म्हटलं, तरी मी आधार घेणार नाही, हे त्यालाही ठाऊक आहे!

लक्ष्मण तर कुठंच दिसत नव्हता. वनवासात असताना सतत माझ्यापुढे हातात शस्त्र धरून रक्षणासाठी सज्ज असायचा. भोवताली एवढे सैनिक असताना आपल्या रक्षणाची काय आवश्यकता, अशी त्याची भावना असेल काय? कुठं तरी सैनिकांच्या समवेत चालतोय.

हनुमंत जवळ आले. त्यांनी मला थांबायला सांगितलं.

म्हणाले, ''माते, तुझा डावा हात पुढे कर. नाडी पाहतो. मला काहीसं वैद्यक शास्त्राचं ज्ञान आहे.'' नाडीवर बोट ठेवून डोळे मिटून अनुभवल्यावर म्हणाले, ''अशक्तपणा आहे. पायी चालू नये. एखाद्या गाडीची व्यवस्था करतो, थांब!''

''नको, मी वनवासाच्या व्रतात बद्ध आहे. वाहनप्रवास निषिद्ध!'' मी म्हटलं.

''तुझ्या वनवासाची कथा मला लक्ष्मणाकडून समजली आहे! वनवास व्रताचा खरा संबंध फक्त तुझ्या पतीला आहे. तू आणि लक्ष्मण स्व-इच्छेनं आला आहात. शिवाय रोग आणि आजारपणात व्रतामधूनही अपवाद करायची मुभा असते. वैद्याची सूचना सगळ्या नियमांच्या पलीकडची असते.''

मला पुढं काही बोलायची संधी न देता त्यांनी सामान उतरवून एका बैलगाडीची व्यवस्था केली, त्यात मऊ गवत पसरलं आणि त्यात माझी झोपायची व्यवस्था केली. गाडीच्या हेलकाव्याबरोबर मला झोप आली.

थोडी झोप झाल्यावर मला आपसूक जाग आली. मी उठून बसले. पडदा बाजूला केला. मला जाग आलेली पाहताच हनुमंत माझ्या गाडीच्या पाठोपाठ चालू लागले. युद्धाचा तपशील सांगू लागले. सुग्रीव आणि राम-लक्ष्मणाच्या स्नेहाविषयी सांगू लागले.

सुग्रीवाचा थोरला भाऊ वाली. त्यानं धाकट्या भावाच्या संपूर्ण राज्यासहित त्याच्या पत्नीचं- ताराचंही अपहरण करून सुग्रीवाला देशभ्रष्ट केलं होतं. तेव्हा सुग्रीवानं एका गुहेत स्वत:ला लपवून जीव वाचवला. एक दिवस अचानक त्यानं या दोन भावंडांना पाहिलं. यांच्या वीर लक्षणानं प्रभावित होऊन त्यानं या दोघांची मदत मागितली. आपल्याप्रमाणेच पत्नीचं अपहरण झाल्यामुळे कष्टी झालेल्या सुग्रीवाला पाहून रामाच्या मनात अनुकंपा निर्माण झाली. त्यानं सुग्रीवाबरोबर एक करार केला, 'तुझ्या भावाला मारून तुझं राज्य आणि पत्नीला मिळवून देईन, नंतर तूही माझ्या पत्नीला शोधून माघारी आणायला मदत केली पाहिजे!- मग शत्रू कितीही बलशाली असू दे!'

याला सुग्रीवानं लगेच मान्यता दिली. अग्नीची प्रतिष्ठापना करून त्या अग्नीसमोर दोघांनीही वचन घेतलं. रामाच्या सूचनेप्रमाणे सुग्रीवानं वालीला आव्हान दिलं, 'पुरुष असशील तर बाहेर ये आणि माझ्याशी युद्ध कर!' वाली आपल्या अंगरक्षकांबरोबर बाहेर आला. सुग्रीवानं त्याला युद्धात गुंतवून ठेवलं. टपून बसलेल्या रामानं नेम धरला आणि एकाच बाणात वालीला भुईवर लोळवलं. राज्य सुग्रीवाचं झालं.

''तेवढ्यात पावसाळा सुरू झाला. आमच्या दक्षिण भारतात पावसाळा चार महिने चालतो. प्रवास करणं कठीण असतं. राम-लक्ष्मण त्या वेळी ऋष्यमुख गुहेत राहिले. त्याच काळात मी रामांकडून वेदपाठ शिकलो.''

पावसाळा संपल्यावर कुठल्या दिशेनं शोध घ्यायचा, यावर विचार सुरू झाला. सुग्रीवानं विचार केला, त्याचा भाऊ वाली हाही लंपट राजा. तशाच प्रकारची आवड असलेला आणखी एक राजा किष्किंधेच्या जवळपास आला, की याला भेटत असल्याचं सुग्रीवाला ठाऊक होतं.

''समान सद्गुणींचा जसा स्नेह वाढतो, तसाच- त्यापेक्षा जास्त, समान दुर्गुण असलेल्यांचाही वाढतो ना! रावणालाही अशा प्रकारचं व्यसन होतं. त्यामुळे हे अपहरण त्यानंच केलं असलं पाहिजे, असा अंदाज बांधून सुग्रीवानं दक्षिण दिशेला नील, जांबुवंत, सुगोत्र, शरारी, शरगुल्य, गज, गवाक्ष, गवय, सुषेण, ऋषभ, मईंद, त्विविद, विजय, गंधमादन, उल्कामुख, असंग, वालीचा मुलगा अंगद अशा सगळ्यांना धाडून दिलं. या सगळ्यांचा मला नायक नेमलं. इतरांना पूर्व-पश्चिम-उत्तर दिशांनाही धाडलं. पण आमचा समूह अत्यंत प्रबुद्ध होता. आम्ही सगळ्या दक्षिणेकडच्या देशांचा बारकाईनं शोध घेतला. अखेर लंकेकडच्या समुद्रतटावर जाऊन पोहोचलो. पुढचं तुला ठाऊकच आहे....''

दहा-पंधरा दिवस गेले, तरी लक्ष्मण मला एकदाही भेटला-बोलला नाही. एवढ्या गर्दीत तो मला दिसलाही नव्हता. मीच त्याला शोधून काढून त्याच्या पुढ्यात उभी राहिले आणि 'असा का वागतोयस...' म्हणून विचारलं तर? आगीत प्रवेश करू पाहणारीला वाचवलं! या कारणासाठी कधी नव्हे ते थोरल्या भावाशी भांडला! त्याला खाली मान घालायला लावून आम्हा दोघांना अग्निसाक्षीनं पुन्हा एकत्र आणणारा! तरी माझं अंतर्मन स्पष्टपणे सांगत होतं, त्यानं मला क्षमा केलेली नाही! त्याचा संताप निवला नाही. दोन वर्षं झाली तरी! मीच त्याच्यासमोर उभी राहून...नको..

निरोप पाठवून बोलावून घेतलं तर? तरीही नाही येणार तो! मी त्याच्यासमोर..तेही एवढ्या माणसांच्या गर्दीत...अवघड होईल..एवढंच नव्हे, शरम वाटेल. त्याच्या-माझ्यातच जे घडलं, ते मी चार-चौघात कशी नेऊ? हं आता सुचतंय. धाकटा संतापी भाऊही माझ्या नवऱ्याप्रमाणे 'आम्ही तुझ्यासाठी युद्ध केलं नाही.. आमच्या वंशासाठी केलं...' म्हणाला तर? लक्ष्मणानं थोरल्या भावाला माझ्याविरुद्ध काय सांगितलंय कोण जाणे! मी आपणहोऊन जाऊन का हा प्रश्न विचारू?

लक्ष्मणा, तू माझा धाकटा दीर आहेस. माझी पावलं मांडीवर घेऊन मनापासून त्यात रुतलेले काटे तू असंख्य वेळा

काढलेस! विसरलास का? बोलून मनातला सल काढून टाकायची संधीही मला का तू देऊ नयेस?

प्रवासभर दररोज रात्री मला आणि रामाला एका नव्या कुटिरात झोपायची व्यवस्था करत होते. त्यात गवताची शय्या तयार करून देत होते. दोघं एकाच कुटिरात झोपत होतो; पण संवाद नव्हता. होमाच्या उंचीच्या नव्हे, प्रेताला जाळणाऱ्या चितेएवढ्या अग्नीच्या साक्षीनं हस्तांचं पुनर्मीलन झालं, पण मनांना एकत्र आणण्यासाठी आवश्यक तो संवाद सुचत नव्हता. तो मौन राहत होता. कदाचित त्याला आपण बोललेल्या शब्दांसाठी शरम वाटत असेलही. म्हणून हा बोलत नसेल का? रात्री बऱ्याच वेळा कूस पालटल्यामुळे येणाऱ्या गवताच्या आवाजाची मलाही चाहूल लागत होती. कधी मनात येत होतं, मी आपण होऊन बोलू का? पण नको वाटत होतं. काही बोलायची इच्छाच मरून गेली होती. त्यामुळे मीही डोळे मिटून तशीच पडून राहत होते. कधी डोळा लागायचा, मधूनच जाग यायची, नंतर मात्र झोप यायची नाही. पण उगाच कूस पालटून मला झोप लागली नाही, हे त्याला दाखवून द्यायचीही तयारी नव्हती. दिवसभर माझ्यासाठी गवताचं आच्छादन असलेली सवारीची गाडी असली, तरी त्याला मात्र अनवाणी पायी चालणं आवश्यक होतं. घोडे असले तरी अजून याचे वनवासाचे नियम होतेच ना! हा चालत असताना धाकटा भाऊ तरी कसा घोड्यावर बसेल? 'स्वयंम हिंसा आणि अवलंबितांची हिंसा हेच व्रत आहे तुझं!' हे लक्ष्मणाचं बोलणं पदोपदी आठवत होतं.

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'उत्तरकांड' या डॉ. एस. एल. भैरप्पा लिखित पुस्तकातून)**


◆◆◆


भटक्या-विमुक्तांच्या शोषणावर, वर्णव्यवस्थेवर, सरकारच्या अनास्थेवर परखड भाष्य करणाऱ्या भाषणांचा संग्रह

भटक्याचं भारुड

लक्ष्मण माने

किंमत : ₹ २७०





ebook available

भटक्या-विमुक्तांच्या भळभळत्या जखमांचं आणि त्यासाठी उभारलेल्या चळवळीचं अभ्यासपूर्ण विश्लेषण

बंद दरवाजा

लक्ष्मण माने

किंमत : ₹ ३३०




ebook available

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब






चालू बुक क्लबचे सभासदत्व **५० रु.** भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील.

## टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

१०० रु. भरून आधीच्या टी बुक क्लबमधील कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाच वेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त.

## टी बुक क्लब ३३ सभासद फी ५०रु.


सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा! या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

### टी बुक क्लब ३३मधून प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **द रॅकेटिअर** | जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाथरकर | ₹ ६६० |
| **शार्लटन्स** | रॉबिन कुक | अनु. उज्ज्वला गोखले | ₹ ७५० |
| **द मंकीज रेनकोट** | रॉबर्ट क्रेस | अनु. सुरेश देशपांडे | ₹ ४८० |
| **आइस स्टेशन झेब्रा** | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अनिल काळे | ₹ ५५० |
| **हेड्स यू विन** | जेफ्री आर्चर | अनु. पूर्णिमा कुंडेटकर | ₹ ८५० |

### टी बुक क्लब ३३मधून प्रकाशित होणारे पुस्तक

| | | | |
|---|---|---|---|
| **दि सिक्रेट फ्रेंड** | ख्रिस मुनी | अनु. प्रकाश गोगटे | -- |




# कुरुक्षेत्रानंतर...

महाश्वेतादेवी

अनु : वर्षा काळे

।। पुस्तकाच्या पानांतून ।।

## पंचकन्या

धर्मयुद्ध संपलं, रणभूमी धगधगत्या चितांनी पेटून उठली. कौरव आणि पांडवांच्या मृत वीरांचे विधिवत अंत्यसंस्कार होत होते. जसजशा चितांच्या ज्वाळा भडकू लागल्या तसतसं दाटीवाटीनं दूर उभ्या असलेल्या शोकाकुल स्त्रियांच्या घोळक्याचं हृदयभेदी आक्रंदन मन हेलावून टाकत होतं. त्यांच्या त्या सुतकी विलापातून फक्त 'हाय! हाय!' असं एकच रुदन ऐकू येत होतं.

या आक्रंदणाऱ्या स्त्रिया राजघराण्यातल्या नव्हत्या, त्या राजप्रासादातील सेविका किंवा दासीही नव्हत्या. आजूबाजूच्या छोट्या छोट्या राज्यांतून आलेल्या पायदळातल्या शेकडो सैनिकांच्या, पादातिकांच्या कुटुंबातल्या त्या स्त्रिया होत्या. रोजच्यारोज अशा सहस्त्रावधी सैनिकांचं शिरकाण झालं होतं. युद्धात रथी-महारथी योद्ध्यांचं संरक्षण करणं हे त्यांचं काम होतं. पण त्यांना साधी चिलखतंही देण्यात आली नव्हती. त्यामुळेच ते प्रचंड संख्येने मृत्युमुखी पडले होते.

योद्ध्यांच्या अंत्यसंस्कारांच्या वेळी घिरट्या घालणाऱ्या मांसभक्षी पक्ष्यांनी कुरुक्षेत्राचं आकाश झाकोळून गेलं. आसमंत सडलेल्या शवगंधाने कोंदटून गेला. तेलात भिजवलेल्या लाकडांच्या सरणांवर सडणाऱ्या प्रेतांचे उंचच उंच ढीग टाकण्यात आले. अशा चितांच्या रांगाच रांगा सर्वदूर पसरल्या होत्या. त्या पेटवण्यात आल्या होत्या. चिता अनेक दिवस जळत राहिल्या.

चिता धगधगतच राहिल्या. विलाप करणाऱ्या त्या स्त्रिया अंधारात लुप्त होईपर्यंत हळूहळू मागे सरत गेल्या. युद्धाचा अविभाज्य भाग असलेला गणिकांचा तळ आता ओस पडला होता. या स्त्रियांनी त्याच ओसाड राहुट्यांचा आश्रय घेतला की त्या सरळ नाहीशा झाल्या? कोणालाच माहिती नव्हतं.

चिता जळत ठेवून शवांच्या हाडामांसाची पूर्ण राख होईल याची निश्चिती करण्यासाठी युद्धकाळात चांडाळ नेमण्यात आले होते. ते चांडाळही भयभीत होऊन क्षितिजापार घुमणारा आक्रोश ऐकत होते. त्या आक्रंदनाचे उमाळे जणू उफाळलेल्या शोकसरितेवर उसळणाऱ्या भरती-ओहोटीच्या दु:खद लाटांसारखे रात्रीच्या गर्भात विलीन होत होते.

प्रत्यक्ष युद्धात चांडाळांना काहीच काम नसतं. युद्ध संपल्यावर ते येतात. मागील काही सप्ताह ते लाकडं गोळा करत होते. यावेळी सरणासाठी खूप लाकडं लागणार याची त्यांना कल्पना आली होती. त्यांना माहीत होतं की सरते शेवटी अगणित, अनामिकांच्या जळलेल्या चिता पाणी टाकून

त्यांनाच विझवाव्या लागणार होत्या. पण यावेळी हे काम काही त्यांनी पार पाडलं नाही.

अखेर 'नदीचा पूरच हा अग्नी शमवू दे' असं म्हणत त्यांनी तिथून काढता पाय घेतला.

इतका वेळ अभेद्य भासणारी अंधाराची भक्कम भिंत एव्हाना शकलं होऊन पडू लागली होती. तशा तिथं थांबलेल्या त्या स्त्रिया उठल्या आणि चालू लागल्या.

त्या पुन्हा राजधानीच्या बाहेरच्या परिसरात निघून जात होत्या. सर्वांगावर काळी वस्त्रं परिधान केलेल्या स्त्रियांचा भूपटल व्यापून सरकणारा जथ्थाच जणू उगवत्या सूर्याला दिसला. कुरुक्षेत्राची भूमी दहनाच्या आगीत होरपळून पाषाणासारखी टणक झाली होती. सर्वत्र झळा भडकलेल्या. विस्तीर्ण दहनभूमीवर त्या झळांचे आवरण धुक्यासारखं भरून राहिलं होतं.

नगराबाहेर पाच स्त्रिया एकमेकांना बिलगून उकिडव्या बसून होत्या. पाठीवर गाठ मारलेल्या काळ्या काचोळ्या त्यांनी वक्षावर बांधल्या होत्या. कमरेला गुंडाळलेल्या संपूर्ण काळ्या अंशुकाच्या पदरानेच त्यांनी आपलं डोकं झाकलं होतं.

राजघराण्यातील अंत:पुराची प्रमुख दासी मद्रजा नव्या दासींच्या शोधात बाहेर आली होती. अंत:पूर आता असंख्य तरुण विधवांनी भरून गेलं होतं. इथून पुढे त्यांच्या आयुष्यातला सर्व भोगविलास हिरावला जाणार होता. त्या फुलांच्या सुगंधी माळा, त्वचेसाठी चंदनाची उटी, कुमकुम, सुगंधित तेलं या सर्वांना त्यांच्या आयुष्यात कायमचा प्रतिबंध होता.

आचार्य त्यांना वैधव्यातील कठोर नियम शिकवण्यात गर्क झाले होते. शोकाच्या आघाताने स्तंभित झालेल्या त्या तरुण विधवा मुकाटपणे उपचारांची पूर्तता यंत्रवत करत होत्या.

मद्रजा स्वत: कुरुजंगल क्षेत्रातून आली होती. त्याच प्रदेशातून त्या पाच स्त्रिया आलेल्या आहेत हे मद्रजाने एका कटाक्षातच ओळखलं. त्यांच्याकडे पाहत ती म्हणाली, ''तुम्ही तर अजून लहानच दिसता.''

त्या स्त्रिया गप्पच होत्या.

''परत जाताय का?''

''धरणीच्या उदरात सर्वकाही राहू शकतं असं म्हणतात...'' त्या म्हणाल्या, ''... पण हे खरं नाही गं. ती तर आग ओकतेय. कठीण पाषाण झालीय ती.''

''इतकं सगळं घडल्यावर...''

''परतीची वाटही खूप दूरची आणि कठीण आहे. वीस दिवस झाले... आता सहन होत नाही.''

मद्रजा त्यांचे पाय, खांदे, बाहू निरखत होती. त्या खरंच किशोरवयीन होत्या. पण त्यांच्या शरीराला कष्टाची सवयही दिसत होती.

''सम्राज्ञी आर्या सुभद्रा या त्यांच्या तरुण विधवा सुनेसाठी, उत्तरेसाठी स्त्रियांच्या शोधात आहेत''

''दासी? सेविका?''

''ती शोकाने वारंवार मूर्च्छित होते. ती अगदी अबोल झाली आहे. त्यातच ती गर्भवतीही आहे.''

''मग?''

''या सगळ्या विध्वंसात...''

''विध्वंस? कसला विध्वंस? आणि काय ग म्हातारे, हा काही निसर्गाचा प्रकोप होता का? भावाभावांच्या युद्धांत कित्येक महान नृपवर सहभागी झाले. काहींनी एकाचा पक्ष घेतला तर काही दुसऱ्याला जाऊन मिळाले. भावाने भावाला मारलं एवढ्यापुरतंच हे नव्हतं. भांडणं, मत्सर, शत्रुत्व आम्हालाही माहिती आहे. पण सिंहासनासाठी असं युद्ध? याला धर्मयुद्ध म्हणायचं? पवित्र युद्ध? याला फक्त लालसेचं युद्ध म्हण!''

''बरं बाई, मी मान्य करते. आता तरी माझ्याबरोबर चला.''

''दासी म्हणून काम करणं, दासी बनून जगणं आम्हाला मान्य नाही.''

''नाही, नाही. तुम्ही उत्तरेच्या सख्यांप्रमाणे रहा.''

...आणि याच भावनेने त्या पंचकन्या उत्तरेकडे आल्या. व्याकुळतेने सुभद्रा त्यांना म्हणाली, ''ओळखीच्या व्यक्ती पाहून ती आक्रसून दूर जाते. शोकाच्या आघाताने ती अगदी अबोल झाली आहे. तुम्ही लोकवृत्तातून, सर्वसामान्यांच्या जगातून आला आहात. तिच्या सहवासात रहा, तिची सोबत करा.''

''आम्हाला काम काय करावं लागेल?''

''काही विशेष नाही. फक्त उत्तरेच्या इच्छेप्रमाणे वागा. ओह! माझं गरीब बिचारं लेकरू ते. पूर्ण प्रफुल्लित, टवटवीत कमळासारखी होती ती आणि आता! दु:खाची क्रूर धग लागून पार कोमेजून गेली आहे.''

उत्तरा स्तब्ध, नि:शब्द बसली होती. कपाळाला थोड्या आठ्या घालून ती बाहेर आकाशाकडे एकटक पाहत होती.

''दु:खाने तिला दगड केलंय.''

''हो, आर्या, आम्हाला दिसतंय ते.''

''तुम्ही कुरुजंगलच्या कन्या आहात ना?''

''कन्या, सुना. हो, पण कुरुजंगलच्याच.''

इतक्यात इतर महाराज्ञींचेही सदनात आगमन झाले. द्रौपदीने विचारलं, ''तुमची नावं?''


''मी गोधुमी. ही माझा हात पकडलेली गोमती, ती




प्रथितयश साहित्यकार, राजकारणी, पत्रकार, इतिहासकार, कवी
यांच्या सहवासातील आठवणींचा भा. द. खेरांनी
रेखाटलेला ललितरम्य आलेख

## स्मृतियात्रा

₹ ३५०




₹ २६०

## सूर भरला अंतरी

सूर भरला अंतरी

भा. द. खेर यांच्या नादमय लेखणीतून
उतरलेली विख्यात संगीतकारांची व्यक्तिचित्रे

# भा.द. खेर

## यांचे साहित्य



ebook available

इंदिरा गांधी, ना. सी. फडके आदी नामवंतांच्या
भा. द. खेरांना लाभलेल्या सहवासातून
दरवळलेला 'स्मृतिसुगंध'




## स्मृतिसुगंध


₹ २५०

ebook available

भा.द. खेर यांच्या स्मृतिगंगेतून
साकारलेली नामवंतांची व्यक्तिचित्रे

## स्मृतिगंगा

₹ २६०



भुवयांमधे लाल तीळ आहे नां, ती यमुना. हनुवटीवर बोट ठेवून उभी आहे ती वितस्ता आणि ही वितस्ताची धाकटी बहीण विपाशा.''

अकस्मात उत्तरा बोलती झाली. ''ही तर सगळी नद्यांची नावं. किती छान! आर्या! कोण आहेत या?''

''तुझ्या सख्या प्रिये. त्या तुझ्यासोबत राहतील. तू जे सांगशील ते ते करतील.'' द्रौपदी आत्यंतिक मृदुतेने म्हणाली.

आणि अशा प्रकारे त्या पंचकन्यांचा अंत:पुरातील उत्तरेच्या कक्षात प्रवेश झाला.

काही काळातच त्यांच्यात एक अतूट नातं तयार झालं. त्यांच्याशी बोलण्यात, गप्पा मारण्यात उत्तरा हळूहळू मोकळी आणि हलकी होऊ लागली. गेले कित्येक दिवस ती नि:शब्द, अचेतन झाली होती. जणू काळात गोठून गेल्यासारखी. कोवळं यौवन, त्यांत गर्भधारणा आणि त्यातच अभिमन्यूचा मृत्यू ती स्वीकारूच शकत नव्हती.

किती चिंतातुर होत्या तिच्या सासवा! द्रौपदी, सुभद्रा आणि सगळ्याजणी अत्यंत काळजीत होत्या. जर उत्तरेला मुलगा झाला तर तो सम्राट होणार होता. उत्तरेचं चैतन्य टिकणं त्यामुळे अत्यंत महत्त्वाचं बनलं होतं. पण ते कसं शक्य होतं? ना ती कुकुलं बाळ होती ना ती अल्लड बालिका होती. अल्प काळासाठी का होईना तिनं पुरुषाचं प्रेम अनुभवलं होतं.

पंचकन्यांना भेटल्यावर प्रत्येक वेळी उत्तरेच्या सासवांना दिलासा मिळे. विश्वास बळावे. त्यामुळे का होईना त्यांची काळजी थोडी कमी होई. कुंतीला हे वृत्त कळलं की ती म्हणे, चांगलं झालं. त्या पाचही जणी अगदी वेगळ्या जगातल्या आहेत. उत्तरेचं मन त्यांच्या सान्निध्यात खचितच हलकं होणार होतं.

आणि काळाच्या ओघात घडलंही तसंच. उत्तरा त्यांच्याशिवाय क्षणभरही राहू शकत नव्हती. त्यांनी नदीतून तिच्या स्नानासाठी पाणी आणल्यावरच ती स्नान करत असे. तिच्या सासवा म्हणत, ही पद्धत अगदी आरोग्यदायी आहे. गर्भात वाढणाऱ्या अर्भकासाठी हे चांगलं आहे. अनेक प्रकारचे उपदेश. गर्भवतीनं हे सर्व ऐकणं आणि त्याचं पालनही करणं अपेक्षित होतं.

गोधुमी गालावर बोट ठेवायची आणि आश्चर्य व्यक्त करायची, ''इतक्या सगळ्या सासवा! तुम्ही लक्षात कशा ठेवता?''

''तुमच्यात कसं असतं मग?''

''प्रत्येकीला एकच सासू. अर्थात, जर एखाद्या पुरुषाने एकापेक्षा अधिक विवाह केले तर गोष्टच वेगळी. त्यावेळी त्याच्या मुलाच्या बायकोला दोन सासवा असू शकतात.''

''हो. आहेत खरं मला खूप सासवा. त्याव्यतिरिक्त कौरवांच्या विधवाही आहेत. त्यांची गणना तुला करायला हवी.''

''त्याही सासवा आहेत?''

''अर्थात.''

''सोडा हे सगळं! हे खरंच अति होतंय! हे कोडं सोडवायचा प्रयत्न करा पाहू.''

पायाविना पळतं
कानाविना ऐकतं
नेत्रांविना पाहतं
सांगा पाहू असं काय असतं?

''नाही, मला नाही येत.''

सगळ्याजणी हसल्या आणि म्हणाल्या, ''माणसाचं मन! ते कुठेही जाऊ शकतं. सर्व ऐकू शकतं आणि त्याला काहीही कळू शकतं. जरी तुम्ही तुमचे नेत्र मिटले तरी तुमच्या मनाला सगळं काही स्पष्ट दिसतं.''

''अरे! किती खरंय!'' उत्तरा लहान मुलीप्रमाणे टाळ्या वाजवत हसत सुटली.

यमुना प्रेमळपणे तिला न्याहाळत होती, ''राजवधू! खरं तर तू लहानशी बालिकाच आहेस!''

''ए, मला आणिक एक सांग ना. आणिक एक.''

गोमती हातवारे करत आविर्भावात म्हणाली.

''ठीक आहे. ऐका तर मग.''

पहिला जन्म जलात होई
दुसरा जन्म भुईवरी

''थांब, थांब. मला जरा विचार करू देत!''

''मोती! वेडाबाई मोती! प्रथम तो पाण्याच्या आत शिंपल्यात जन्म घेतो आणि धरणीवर शिंपला अलग करून उघडला जातो तेव्हा त्याचा पुन्हा जन्म होतो.''

उत्तरेच्या हसण्याच्या आवाजाने सुभद्रा एकदम सुखावली होती. मद्रजाने त्यांना आणलं होतं म्हणून तिनं मद्रजाला रत्नजडित कंकण देऊन गौरवलं होतं.

मद्रजा म्हणाली, ''ती गोधुमी खूप हुशार आहे. त्या सगळ्याजणी तिचं ऐकतात.''

''ऐकू देत. मी त्यांच्यावर अलंकारांचा वर्षाव करीन! तू पण त्यांना त्या जे मागतील ते देत जा.''

त्यांनी रंगीत सुताच्या लडी मागितल्या. गवत आणि वेली कापून आणून त्यांनी स्वत:च्या कुशल बोटांनी हसत, खेळत, गप्पा मारत टोपल्या, चटया आणि दोऱ्या विणल्या.

त्यांच्या त्वचेचा रंग पिकलेल्या गव्हासारखा होता. नेत्र निळसर होते आणि आपल्या तांबूस केसांची त्या घट्ट वेणी बांधत. त्या फक्त काळी वस्त्रं परिधान करीत. उंबरठ्याच्या आत असताना त्या पंचकन्या डोक्यावर पदर घेत नसत. पाणी भरायला जाताना मात्र त्या केसांवरून काळ्या अंशुकाचा पदर ओढत असत. पितळेच्या कळशीला घासून सोन्यासारखी झळाळी आणून त्या पाणी भरत. चंदनमिश्रित सुवासिक आयुर्वेदिक तेलाने उत्तरेच्या त्वचेचं मर्दन करत. त्यांच्या स्पर्शाने तिचा थकवा जाई. मग अंघोळीनंतर ती तिच्या मंचकावर लोळत राही.

दिवसाच्या या प्रहरी सुभद्रा आपल्या सुनेची सोबत करायला येत असे. यावेळी त्या पंचकन्या भोजनाकरता जात असत. त्यानंतर त्या अंत:पुरातल्या उद्यानात बसत. तिथलं हिरवं गवत पाचूसारखं चमकत असे. फुलांनी डवरलेल्या माधवी लतावेलींनी वेढलेले डेरेदार आम्रवृक्ष उद्यानात ठिकठिकाणी होते. त्या स्त्रिया त्यांची ओली वस्त्रं उन्हात वाळत टाकत. आपले ओले केस मोकळे सोडून वाळवीत, त्या एकत्र बसून गप्पा मारत.

अशावेळी उत्तरा वैषम्याने म्हणे, ''त्या माझ्याशी कधीच असं बोलत नाहीत.''

''त्यांना तू कितीही आवडत असलीस तरी त्या तुझ्याशी मनमोकळेपणाने वागू शकत नाहीत.''

''मलाही तसंच वाटतं.''

आज त्या स्त्रिया रिंगण करून बसल्या होत्या. आपल्या धुतल्या केसांतून स्वत:ची बोटे फिरवत होत्या. आकाशाकडे पाहत त्या कुठलीशी धून गुणगुणत होत्या.

उत्तरा त्यांच्याकडे पाहतच राहिली.

उत्तरेकडे बघता बघता सुभद्रेच्या अंतरात, भिरभिरणाऱ्या ढगांप्रमाणे, भरकटलेले विचार येत जात होते. ह्या क्षणी युधिष्ठिर सम्राट होता. कौरवांवर मिळवलेला विजय, निर्णायक आणि क्रूर होता. कौरवांच्या स्त्रिया विनाशाच्या त्या आघातातून सावरल्या नव्हत्या.

कुंती प्रायश्चित्त घेतल्याप्रमाणे गांधारी आणि धृतराष्ट्राची सेवाशुश्रूषा करत होती. सेवा करताना कुंतीचे हात क्षमायाचकाप्रमाणे भासायचे. तिनं तिच्या पुत्रांचा विजयी उन्माद पाहिला होता. एखाद्या तटस्थ, दुरून पाहणाऱ्या स्वयंनिर्वासित प्रेक्षकासारखा!

कौरवांचा नि:पात झाला होता. त्यांच्या वैधव्य आलेल्या भार्या, नि:शब्द छायेगत श्वेत वस्त्रं परिधान करून त्यांची निर्बंधयुक्त नित्यकर्मं पूर्ण करत होत्या. अनंत उपवास, पूजा, ब्राम्हणांना गोदान! ऐन तारुण्यातच त्यांचं आयुष्य जणू रिक्ततेच्या अधीन झालं होतं. त्यांच्यासमोर त्यांचं उर्वरित आयुष्य अंतहीन वाळवंटासारखं पसरलं होतं; पदोपदी शोकाग्नीने होरपळत ते अधिकाधिक विस्तारत चाललं होतं.

युधिष्ठिर सम्राट झाल्यावरही द्रौपदी कौरवांच्या कपट, क्रौर्य आणि अघोरीपणाबद्दल कडवट शब्दांत बोलत राही.

एक दिवस कुंती खालच्या सुरात पांचालीला म्हणाली, ''आता तरी गप्प बस. तू खरंच अनंत अन्याय आणि अपमान सोसलेस. त्या अपमानाच्या सूडाग्नीने संपूर्ण कौरव वंशाला निर्वंश केलंस. पण तू तुझ्या हृदयावर हात ठेवून मला एक सांग. तुझा सूड अजून शमला नाही का? सगळे कौरव पुरुष मृत्यू पावले आहेत. ज्यांनी त्यांचे पती, पुत्र गमावले, त्या सर्वस्व हरवलेल्या कौरवांच्या स्त्रियांकडे तू कधीतरी पाहिलंस का? मला सांग, त्यात त्यांचा काय अपराध?''

यावर द्रौपदीनं मौनच पाळलं.

''त्यांच्याप्रती थोडीतरी कणव, थोडी दया बाळगण्याचा प्रयत्न कर. त्यांच्याबद्दल थोडासा जिव्हाळा वाटू दे. त्यामुळे तुझंच मन बघ कसं कोमल होईल.''

पण नाही, असा विचार करणंही द्रौपदीसाठी दुरापास्त होतं. पण अलीकडे ती मितभाषी झाली होती, जवळजवळ मूकच. तिनं स्वत:ला मौनाच्या आवरणात कोंडून घेतलं होतं.

सुभद्रा तिचे अश्रू आवरू शकत नव्हती. ती कपाळ आपटून विलाप करू लागे, ''काय हे विपरित दैव! पुत्र मेले आणि पिता जिवंत आहे. सुना विधवा झाल्या आणि सासवांचे सौभाग्य अबाधित आहे.''

गांधारीचे शब्द मनावर सारखे आदळत राहत. तिनं कृष्णवसुदेवाला या भ्रातृहत्येच्या युद्धासाठी कारणीभूत ठरवलं होतं. सुभद्रा पुटपुटली, ''आर्या गांधारीचं म्हणणं सत्य होतं. या रानटी युद्धास कारणीभूत ठरल्याच्या पापाबद्दल संपूर्ण यादव वंशाचा नाश होईल. ती म्हणाली, गतवैभव कधीच परत येणार नाही. इथून पुढे इतिहास फक्त मृत्यू आणि विध्वंसाचाच सांगितला जाईल.''

सुभद्रा शक्य तेवढा काळ उत्तरेसोबत घालवायचा प्रयत्न करत होती. अभिमन्यूचा मृत्यू झाला होता. सुभद्रेच्या पतीची अद्यापही तिला सोबत होती आणि उत्तरेच्या गर्भात अभिमन्यूचा वंश वाढत होता.


तिला वाटे, जर कन्या असेल तर चांगलंच होईल. पुत्र असेल तर तो मात्र पुन्हा युद्धावरच जाईल. पण राजघराण्याच्या अनुभवी म्हाताऱ्या सुईणीचं म्हणणं होतं, ''तिच्याकडे पाहून तुम्हाला नातूच होणार असं दिसतं. जर माझी भविष्यवाणी खरी ठरली तर मला सुपीक भूमीचा एक तुकडा मिळावा ही अपेक्षा आहे. मला माझ्या आयुष्याची उर्वरित वर्षं मुलांच्या आणि

जुलमी इंग्रजी सत्तेलाही भयग्रस्त करत,
१८५७च्या उठावात स्वातंत्र्याच्या
स्वप्नांची पेरणी करणाऱ्या
नानासाहेब पेशव्यांच्या जीवनाची रंजक कहाणी.

# वादळवारा

मनोहर माळगांवकर
अनु : भा. द. खेर
किंमत : ₹ ४९०

ebook available





पन्नास वर्षांहून अधिक काळ
वाचकांना मोहित करणारी
मनोहर माळगांवकर यांची
अभिजात साहित्यकृती...
संक्रमणावस्थेत असलेल्या महाकथा...


# इथे थबकली गंगामाई

मनोहर माळगांवकर
अनु : श्री. ज. जोशी
किंमत : ₹ ४५०

ebook available




तथाकथित नैतिकतेला छेद देणारं लोकजीवनातलं धक्कातंत्र
अलगद वाचकांपुढे सादर करणारी सशक्त कादंबरीमाला...




## एकाकी सुगी

पेरुमाल मुरुगन
अनु : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके
किंमत : ₹ २७०

ebook available




## अर्धनारी

पेरुमाल मुरुगन
अनु : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके
किंमत : ₹ २७०

ebook available

नातवंडांच्या सान्निध्यात घालवायची आहेत.''

सुभद्रा आपल्या विचारचक्रातून बाहेर येत उत्तरेला न्याहाळू लागली. उत्तरेला झोप येत नव्हती. ती गवाक्षातून बाहेर टक लावून पाहत होती.

''प्रिये, काय पाहतेस गं?''

''गोधुमी आणि त्या साऱ्याजणी. त्या किती वेगळ्या आहेत आर्या!''

''प्रजा आणि राजा समान कसे असू शकतील?''

''त्या पाचजणी आहेत, पण नेहमी एकत्र असतात. एकत्र झोपणं, उठणं, जेवणं, न्हाणं, सगळं मिळून करतात. प्रात:काळी त्या मला आवर्जून उद्यानात नेतात. गवतावर अनवाणी चालायला सांगतात. मला वस्त्रांच्या घड्या घालायला सांगतात. तुळशी वृंदावनाला पाणी घालायला सांगतात. का माहीत आहे का तुम्हाला?''

''का प्रिये?''

''त्यांच्यातल्या गर्भवती स्त्रिया लोळत, विश्रांती घेत बसत नाहीत. त्या दिवसभर घरातली लहान सहान कामं करत राहतात. त्या म्हणतात, गर्भधारणा हा निसर्गाचा नियम आहे. स्त्री गर्भवती आहे म्हणून तिनं स्वत:च्या शरीराचं कोडकौतुक करावं असं नाही. मी हालचाल करत राहिले तर प्रसूती सोपी जाईल असं त्या म्हणतात.''

''मलाही माझी सुईण असंच सांगत असे.''

''त्या पाचजणी कशा सारख्या आपापसात बोलत असतात ना!''

''माझ्या मुली, त्यांचं आयुष्य खूप वेगळं आहे, त्यांची भाषाही वेगळी आहे. त्यांच्या बोलीभाषेत बोलल्यानं त्यांना कदाचित मोकळं वाटत असेल.''

''त्या रोज कुठलं बरं गीत गातात? मी ते समजून घ्यायचा खूप प्रयत्न करते, पण मला फक्त त्यातून हाय हाय एवढंच लक्षात येतं.''

''त्या गात नसतात बाळा, त्या विलाप करत असतात. तुला त्या काय म्हणतात ते लक्षात येतं का?''

''तुम्हाला त्यांची भाषा कळते?''

''आपल्या बऱ्याचशा दासी नेहमीच त्या प्रदेशातून येतात. त्यामुळे मला थोडी थोडी त्यांची बोली समजते. तो विलाप आहे.''

''पण त्या तर गात असतात...?''

''मृतांसाठी विलापही गाता येतो. तुला त्यातले शब्द कळतात का?''

''नाही, आर्या.''

''त्यांचे पतीही युद्धात मारले गेले आहेत.''

''हे माहिती नाही.''

''ते शेतकरी होते. ते पिवळाधम्मक गहू, उत्तम प्रतीची ज्वारी, तेलबिया, पालक, आलं, हळद, ऊस आणि बरंच काही पिकवत होते.''

सुभद्रेला आठवलं, त्यांना कधी धान्य विकत घ्यावंच लागत नसे. कुरुजंगलची मातीच सुपीक होती.

''तरीच, त्याही तेच म्हणत होत्या.''

''बोलावणं आलं की त्यांचे पुरुष युद्धावर जात, लढत, पण परत येत. यावेळी मात्र एकही जण परतला नाही. म्हणून त्या ही सुतकगीतं गात आहेत.''

हाय हाय ग बाई हाय हाय हाय हाय
रान सोनेरी गव्हाचं; त्यात नांगर नाही शिरला
बैल जुपून नांगराया; आज कुणी नाही उरला
हाय हाय ग बाई हाय हाय हाय हाय
बळदात वाट पाही; गव्हातीळाचं बियाणं
त्याला वाटं रुजावं; कोंब हिरवं फुटावं; ल्यावं सुगीचं ग लेणं
हाय हाय ग बाई हाय हाय हाय हाय
कोण गेलं गावावरी; असं सावट टाकून
दिवा लावंना कुणीही; खोपं गेली झाकोळून
हाय हाय ग बाई हाय हाय हाय हाय
दुखं दाटलं दाटलं; लेकरांच्या डोळयांत
आयांच्या लोचनात; बायांच्या पापण्यांत
हाय हाय ग बाई हाय हाय हाय हाय
या युद्धानं ग झाली; झाली गावांची स्मशानं
हाय हाय ग बाई हाय हाय हाय हाय

उत्तरा बुचकळ्यात पडून सुभद्रेकडे पाहत राहिली.

''पण आर्या! ज्या कुणी या धर्मयुद्धात आपल्या प्राणांची आहुती दिली, त्या सर्वांना दिव्यलोकाची, स्वर्गाची प्राप्ती होणं हे विधिलिखितच होतं नां? त्यांचे पती स्वर्गात नाही गेले का?''

''कुणास ठाऊक? खरंतर मी काही सांगू शकत नाही.''

''आश्चर्यच आहे! या पाचजणी इथं का बरं आल्या असतील?''

सुभद्रा संभ्रमितपणे म्हणाली, ''कदाचित त्या नवविवाहिता असतील. कदाचित त्या दूर उभं राहून युद्ध पाहायला आल्या असतील किंवा त्या त्यांच्या पतींची कलेवरं शोधायलाही आल्या असतील कदाचित!'' राजवृत्तातले लोक जनवृत्तातल्या सर्वसामान्य लोकांचं काय होतं असेल हे जाणून घेण्याचा प्रयत्न तरी कधी करतात का?

''त्यांचे पती...स्वर्गात गेलेच नाहीत?''

''मला माहीत नाही प्रिये. स्वत:च्या मनाचा या विचाराने गोंधळ उडवू नकोस. तुझ्या या अशा अवस्थेत...''

''आर्या! त्या म्हणतात ते सत्य आहे का?''

''काय म्हणतात त्या?''

''त्या म्हणतात, चिता अनेक दिवस धगधगत होत्या. त्यामुळे धरणी जळून तप्त झाली होती आणि भाजून पाषाण झाली होती.''

''असेलही तसं.''

''त्यांना नदीवर जायला मोठा वळसा घालून जावं लागतं. नदीकडे जाणाऱ्या सरळ मार्गावर त्यांचे पाय भाजतात.''

सुभद्रेचे डोळे शुष्क होते. पण ती थरथरत होती. ती अत्यंत हळुवारपणे म्हणाली, ''आता शांत झोपी जा प्रिये. थोडावेळ विश्रांती घे.''

पूर्वी उत्तरा झोपू शकत नव्हती. दिवा मालवला की ती दचकून जागी होई. तिच्या स्वप्नात अभिमन्यूचा रक्तबंबाळ मृतदेह येई आणि त्याच्या जखमा ती तिच्या अंशुकाच्या पदराने वारंवार पुसत राही.

आता ती रात्रभर झोपू शकत होती. त्या पंचकन्या तिच्याजवळ धरणीवरच गोधडी अंथरून झोपत असत. गोधुमी कूससुद्धा बदलत नसे. त्यांचे पतीही मृत्युमुखी पडले होते. तरीही त्यांना झोप लागत असे.

उत्तरा झोपेतच बरळत होती. ''तुमची नावं किती सुंदर आहेत... नदीवरून नाव, धान्यावरून नाव.''

गोधुमी विचार करत होती. उत्तरेला मुलगा होईल की मुलगी? मुलाचं नाव काय ठेवलं जाईल?

तिनं उत्तरेला विचारलं होतं. ''तुम्ही तुमच्या मुलाचं नाव काय ठेवणार?'' उत्तरा म्हणाली, ''ते माझ्या मनावर नाही.''

''मग कोण ठरविणार?''

''ओह! नामकरण हा एक विधिवत उपचार असतो. पूजा, यज्ञ, होमहवन असे विधी होतील. कुलातील ज्येष्ठ पुरुष एकत्र बसून चर्चा करतील. पुरोहित राशी-नक्षत्रांचा अभ्यास करतील. आचार्य जन्मपत्रिका आणि कुंडली तयार करतील. तेव्हाच सर्वजण बाळाचं नाव निवडतील.''

''बाप रे! तुमच्या चालीरीती किती वेगळ्या आहेत!''

''हे सगळे विधी आहेत. तुमच्यात नाही असे विधी होत?''

''अर्थात आमच्यातही आहेतच. बाळाची धान्यतुला करण्यात येते. आजी-आजोबांपैकी कोणीतरी नाव निवडतं. बाळाचं जावळ काढतात. सूर्याच्या उन्हानं तापवलेल्या पाण्यानं त्याला न्हाऊ घालतात. वादक वाद्य वाजवतात. स्त्रिया गातात. मग मामा बाळाला उजव्या हाताच्या करंगळीने तूप आणि खीर चाटवतात.''

''आणि मग?''

''बाळाला पाजून झोपवलं जातं. गावजेवण दिलं जातं. मग सगळे गातात आणि आनंदोत्सव साजरा करतात.''

''स्त्रियासुद्धा?''

''अर्थात. स्त्री, पुरुष, वृद्धही! तुला माहीत आहे माझं नाव गोधुमी का ठेवलं ते? माझा रंग अगदी तयार गव्हासारखा होता. त्यामुळे आजी म्हणाली, आपण हिला गोधुमी म्हणू या!''

''खरंच, मला कशाबद्दल काहीच माहिती नाही! स्त्री-पुरुष एकत्र गात आहेत. किती रम्य कल्पना...''

गोमतीने मान वळवली आणि स्वत:शीच बोलू लागली, आमची गावं कशी आहेत कोण विचार करतं? जेव्हा गव्हाच्या ओंब्या भरू लागतात, तसे पक्षी येऊ लागतात. दिवसभर लहान मुलं हाळ्या देऊन पाखरांना हाकलत. पक्ष्यांना घाबरवण्यासाठी आम्ही पेंढ्यांपासून मोठमोठाली बुजगावणी बनवत असू.

विपाशा म्हणाली, ''पुरुष रात्रभर शेताची राखण करतात.''

''का?''

''कारण हरणं उभी पिकं चरायला येतात. त्यामुळे पिकांची राखण करावी लागते.''

''मी या सगळ्याबाबत अनभिज्ञच आहे...''

''तू खरंच वेडाबाई आहेस, हो ना? जर शेतकऱ्यांनी कर म्हणून धान्य दिलं नाही तर राजघराण्याची कोठारं रिकामीच राहिली असती.''

''बावरून पळणारी हरणं. किती विलोभनीय दृश्य असेल ते!''

वितस्ता म्हणाली, ''फक्त पुरुषच नाही तर स्त्रियाही शेताची राखण करतात. माझ्या आईनेही एकदा भाला फेकून हरीण मारलं होतं. खरंच माझ्या आईच्या अंगी खूप बळ आहे. ती एकटीच दगडी जातं उचलू शकते.''

''पण भाला... ते तर पुरुषांचं शस्त्र...''

गोमती थोड्याशा विषादाने हसली, ''राजकुमारी, ते पायदळाचं शस्त्र आहे आणि पायदळात फक्त शेतकरीच तर असतात.''

छोट्याशा मातीच्या पक्ष्याचे पंख कोरण्यात व्यग्र असलेली वितस्ता म्हणाली, ''भाला स्त्रियांचंही शस्त्र आहे.''


वितस्ताची बोटं नेहमी व्यस्त असत. ती नदीकाठची

ताजमहालाच्या सौंदर्याला
नव्या रहस्याची किनार...
उत्कंठा आणि अद्‌भुताच्या अनुभूतीत
गुंतवणारं अफलातून कथानक...

## राझ महाल

नील नेथन
अनु : गौरी देशपांडे
किंमत : ₹ ४५०

ebook available




मराठी चित्रपटसृष्टीवर
अनेक दशकं अधिराज्य गाजवणाऱ्या
महेश कोठारेंचा कौटुंबिक आणि
धडाकेबाज व्यावसायिक जीवनप्रवास.

## डॅमइट आणि बरंच काही

महेश कोठारे
किंमत : ₹ ८९९

ebook available



चिकणमाती आणून त्यापासून वेगवेगळी लहान लहान खेळणी बनवत असे. पक्षी, घोडे, हरणं, रथ, पुरुष, कडेवर मुलं घेतलेल्या माता. त्या खेळण्यांना तप्त सूर्यप्रकाशात भाजवून रंगवे. ती उत्तरेच्या मुलासाठी छोटी छोटी खेळणी बनवत होती.

गोमती पुन्हा एकदा म्हणाली, ''पायदळी सैनिकांकडे शस्त्रास्त्रं नसतात, चिलखत नसतात, धनुष्य नसतात, बाणही नसतात. त्यांचे एकमेव हत्यार म्हणजे भाला.'' बोलत असतानाही गोमतीचे नेत्र स्थिर, खालीच खिळलेले असायचे. तिची दृष्टी नेहमी अभ्राखाली असल्यासारखी असे. जणू एखाद्या गडद पटलात झाकल्यासारखी. तिच्या मनात काय चाललंय हे कुणालाही समजू शकत नसे. गहिऱ्या आणि अपरिमित हिमालयातल्या खोल सरोवरांसारखे तिचे नेत्र वाटत. स्थिर आणि शांत असलेल्या अशा या हिमसरोवरांचा तळ मानवी आकलनापलीकडचा असतो. बालपणी उत्तरेने तिच्या दाईकडून या सरोवरांबद्दल ऐकलं होतं.

''स्त्रियांना भाला वापरता येतो?''

''आमच्या प्रत्येक घरात भाले आहेत. पुरुष युद्धावर गेले की आम्ही स्त्रियाच घरांचं रक्षण करतो.''

''पण वितस्ताच्या आईने हरीण मारलं? किती वाईट!''

गोधुमी म्हणाली, ''त्यात वाईट वाटण्यासारखं काय आहे, राजकन्ये? राजप्रासादातल्या रंधनगृहांत रोज हरणाचं मांस शिजवलं जातं. पायताणं, आसनं बनवण्यासाठी हरणाचं कातडं वापरलं जातं. म्हणूनच आम्ही हरणांची पारध करतो. पक्ष्यांची सुद्धा करतो. त्यांचं मांस खातो.''

''असं आहे तर... पाहिलंस ना मी कसे काहीही प्रश्न विचारत राहते. कारण मला खरंच कशाचंच काही माहीत नाही... कृपया माझ्यावर रागावू नका हं.''

त्यांचं संभाषण ऐकत उभी असलेली मद्रजा म्हणाली, ''तुम्ही त्यांच्या सोबत इतक्या का मिळून मिसळून राहता? त्यामुळे त्या उद्धट होत चालल्या आहेत. मी आर्याला तुमच्यासाठी नव्या दासी आणायला सांगणार आहे.''

''नाही!''

''आधीच तुम्ही गर्भवती आहात आणि त्यातून नुकतंच आलेलं हे वैधव्य. अशावेळी...''

''चालती हो इथून!''

'वैधव्य' या शब्दामुळे ती रागाने बेभान व्हायची. कौरवांच्या श्वेत वस्त्रातल्या त्या विधवा तिला आठवल्या, की ती भयकंपित होत असे. दर्पणातले स्वत:चे प्रतिबिंबही तिला अपरिचित वाटे. ती हसायची, खेळायची, बृहन्नडेकडून नृत्य शिकायची त्याला किती बरं काळ लोटला? क्षणार्धात संतापणारी, बाहुलीसाठी तलम रेशमी वस्त्रं आणायचा हट्ट धरून आदळआपट करणारी ती उत्तरा हीच होती का?

वाऱ्यावर नृत्य करत असताना त्या उत्तरेच्या मोकळ्या कुंतलांच्या बटा तिच्याभोवती इतस्तत: उडत असत. त्या उत्तरेला झोपाळ्यावर प्रहरन्‌प्रहर झोके घेत राहायला आवडे. ती अष्टौप्रहर सख्यांबरोबर उद्यानात खेळत राही. ती उत्तरा गर्द रंगाची चोळी, घागरा आणि ओढणी नेसत असे.

आताची ही उत्तरा श्वेत वस्त्र परिधान करत होती. त्यात अनलंकृत उत्तरेचे केस तिच्या खांद्यावर निर्जीवपणे लटकत असत. तिचे डोळे, तिचे ओठ हसणंच विसरून गेले होते. आता तिची पावलं भेदरल्यासारखी, घुटमळल्यासारखी पडत असत. तिला किती काळ जगावं लागणार होतं? किती काळ ते आरशातलं अनोळखी प्रतिबिंब तिचा पिच्छा पुरवणार होतं?

जन्मानंतर फारतर वर्षभर तिचं मूल तिच्यासोबत राहणार होतं. त्यानंतर मात्र मुलाच्या संगोपनाची जबाबदारी दाईवर सोपवली जाईल. राजवंशातल्या अपत्यांना त्यांच्या माता वाढवत नाहीत.

त्यानंतर सुरू होतील संस्कार आणि विधी, आत्मवंचना आणि आत्मक्लेश!

फक्त सहा महिन्यांचं वैवाहिक जीवन. किती क्षणभंगुर होता तिचा आनंद! सुकुमार वर आणि सुकुमार नववधू. नवपरिणिता म्हणून सासरी गृहप्रवेशाच्यावेळी कोण कोडकौतुक झालं होतं तिचं! वधूवरांना स्वत:च्या मांडीवर घेऊन कुंती तेव्हा म्हणाली होती, ''लहानपणी मला मातीच्या बाहुल्यांशी खेळायला आवडे. त्या माझ्या बाहुल्याच जणू जिवंत होऊन आल्यासारखं वाटतंय.'' उत्तरा सगळ्यांचीच लाडकी होती.

ती स्वत:शीच पुटपुटली, किती आनंदमयी विवाह सोहळा होता तो!

आता हे सगळं केवळ स्वप्नाहून अधिक काही नव्हतं. लहानपणी ऐकलेल्या एखाद्या परिकथेसारखं.

लग्नमंडप कसा एखाद्या उत्सवासारखा नटला होता. ते मधुर संगीत! राजप्रासादाबाहेर जणू भटक्या तांड्यांची जत्रा भरल्यासारखी होती. चमकदार वस्त्रं घालून ते स्त्री-पुरुष आनंदाने नृत्य करत होते. बांबू नृत्य व बांबूवरच्या कसरती सुरू होत्या. कोणी अस्वलं नाचवत होते तर कुणी लाखेच्या बांगड्या वाटत होते. जणू काही एखादा आनंदमेळाच!

लग्नमंडपात होम सुरू होता. घृतात भिजवलेल्या काष्ठांना होमाग्नीचा स्पर्श होताच हवेत तेज उसळत होतं. राजवंशातल्या स्त्रिया रांगेत बसल्या होत्या. पांडवांच्या पट्टराणीवर, द्रौपदीवर उत्तरेची दृष्टी खिळली होती. तिचं आचरण, तिची मोहकता आणि सौंदर्य इतरांना लाजवेल असं होतं.

हे सगळं उत्तरेच्या आयुष्यात खरंच घडून गेलं होतं का?

तिच्या उद्यानातल्या तळ्यात हंस राजर्षींच्या तोऱ्यात विहरत असत. उत्तराही कधी काळी तिच्या पित्याच्या घरी अशीच स्वच्छंदी आणि तोऱ्यात राहत होती का?

एक स्वप्न, सगळं फक्त एखादं स्वप्न! तिच्या पित्याच्या घराच्या छतावरून ती दूरदूर विस्तीर्ण पर्वतरांगा पाहू शकायची. त्या देशात टेकड्या आणि वाळवंट, जंगलं आणि नदीनाले होते... भटके व्यापारी तांडे होते. उंटांच्या पाठीवर वस्तू लादून ते गांधार, केकेय, तक्षशिला, त्रिगर्त यासारख्या प्रदेशातून येत. भटके मांत्रिक, गारुडी, नट, कठपुतळ्यांचा खेळ करणारे सर्वत्र फिरत असत. ते चमत्कारिक गोष्टी सांगत आणि गाणी गात गात आपल्या कठपुतळ्यांना नाचवत असत.

ते आनंदी दिवस आता अगदीच स्वप्नवत झालेत. अचानक तिला राग आला. जवळच उभ्या असलेल्या मद्रजाला तिनं आज्ञा दिली, ''त्या इथंच राहतील.''

मद्रजा खूप काळापासून राजघराण्याच्या अंत:पुराची प्रमुख दासी होती. अधिकार गाजवणं तिच्या अंगवळणीच पडलं होतं. पांडवांच्या राण्यांना त्यांनी काय करावं आणि काय करू नये हे सांगण्याचीही तिला सवय होती.

''त्या तुम्हाला अस्वस्थ करत आहेत.''

''नाही. त्या नाही करत. अस्वस्थ करतोय हा नीरव सुतकी राजप्रासाद...''

''कसलं सुतक! आऽऽह अभिमन्यूविगता, ज्यांनी ज्यांनी त्या सत्याच्या युद्धात आपल्या प्राणांची आहुती दिली ते सर्व थेट दिव्यलोकी गेले आहेत. तिकडे स्वर्गात किती आनंदोत्सव सुरू असेल! जरा कल्पना करा.''

गोधुमी म्हणाली, ''खरंच! तू तुझ्या डोळ्यांनी स्वर्गातून रथ उतरताना पाहिलेस, हो ना? स्वत:च्या कानाने आनंदाचे चित्कार ऐकलेस ना?''

''असं कसं होऊ शकतं?''

''किमान रथ तरी? स्वर्गातून उतरणारे...?''

''चालू दे तुझं! त्यावेळी मी आत होते...''

''मग हे सगळं का बोलतेस?''

''प्रत्येकाला माहीत आहे हे सत्य आहे.''

''मद्रजा किती हा निर्लज्जपणा. तू कुरु-जंगलातली स्त्री आहेस! तरीही राजवृत्तातल्या लोकांसारखी बोलतेस?''

''मी लहान होते तेव्हा त्यांनी मला इथे आणलं. त्यात नवल ते काय? त्यांना नेहमी आम्हीच सापडतो. राजप्रासादातील गृहकृत्यांसाठी दासी, रंगमहालासाठी वारांगना, सैनिकांसाठी वेश्या. जशा आता तुम्ही मुली!''

''नाही. आम्हाला तुझ्यासारखं आणलेलं नाही. आम्ही राजवृत्तात विलीन होण्याची कल्पनाही करू शकत नाही. शेतकरी कुटुंबात आमचा विवाह झाला आहे. आमच्या पतींना युद्धात पाठवण्यात आलं. पादातिक सैनिक मोठ्या संख्येने मारले जातात हे आम्हाला माहीत होतं. आम्ही काही अंतरावरून युद्ध पाहत असू. प्रत्येक दिवशी युद्ध संपल्यावर रात्रीच्या भयाण अंधाराच्या गाभ्यात, हातात मातीच्या पणत्या, पलिते किंवा देवदाराची लाकडं पेटवून आम्ही आमच्या पतीचा मृतदेह शोधायला जात होतो. आमचे पती, आमचे भाऊ, आमचे मेव्हणे... आणि - ऐक मद्रजा'' गोधुमी म्हणाली, ''दिव्य लोकांतून कोणतेही रथ खाली आले नाहीत. ते कुणीही स्वर्गात गेलेले नाहीत. याच धर्मयुद्धात लढता लढता पायदळी सैनिक मृत्युमुखी पडले. त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी कोणतेही अंत्यसंस्कार केले गेले नाहीत.''

''तरी तुम्ही पाचजणी इथे आलात.''

''आम्ही घरी जाऊच शकत नव्हतो.''

गोधुमीच्या शब्दामागची गर्भित हिंस्र धार उत्तरेला जाणवली. एकदा अभिमन्यूनं तिला सांगितलं होतं. वाहत्या नदीच्या पृष्ठाखाली अजून एक सुप्त प्रवाह असतो. एक जबरदस्त अंत:स्रोत जो आदिम आणि रानटी असतो. नाहीतर अवाढव्य हत्तीलाही नदी त्याचे पाय खेचून कशी काय वाहून नेऊ शकते?

उत्तरेने अचानक आर्ततेने विचारले, ''का गोधुमी? तुम्ही परत का जाऊ शकत नाही?''

''राजकन्ये! परत जाण्यासारखं आता आमच्याकडे काय उरलंय? अहिछत्र, मत्स्य, कुरुजंगल, कोसल, त्रिगर्त, द्वैतवन, पांचाल, प्रच्छ या प्रदेशातून सर्व पादातिक सैनिक येतात. आम्ही कुरुजंगलातून आलोय. हाय! इतरत्र काय काय झालं असेल ते आम्हाला माहीत नाही. वर्षभर भरून वाहणाऱ्या नद्यांमुळे संपन्न झालेली आमची शेतं पिकांशिवाय पडीक पडलीत. प्रत्येक दिवशी युद्धवीरांनी पायदळातल्या सैनिकांचं सामूहिक शिरकाण केलं. आमचे पुरुष एकजात जथ्थ्यानं मारले गेले,'' गोधुमी उत्तरली.

वितस्ता जणू त्यांच्या गाण्याच्या दुसऱ्या कडव्यातल्या ओळी म्हणतेय असं वाटू लागलं. ''गावातल्या एकाही घरात दिवा पेटलाच नाही. घर सोडताना आम्ही गुरांची दावी सोडून दिली... ते नक्कीच वन्य श्वापदांच्या भक्ष्यस्थानी पडले असतील...''

विपाशा म्हणते, ''गावातल्या एकाही झोपडीत पीठ दळलं जात नसेल. लोण्यासाठी कुणाही स्त्रीने ताक घुसळलं नसेल. तेलबियातून तेल काढलं जात नसेल. गावातले सगळे ध्वनी शांत झाले असतील.''


यमुना म्हणते, ''नदीकिनारी कुणाही स्त्रीने वस्त्रं धुऊन

अस्तित्वाच्या दैनंदिन लढायांवर
प्रकाशझोत टाकत भारतीय लोकशाहीच्या
यशापयशाचा सांगोपांग आलेख मांडणारं
प्रभावशाली पुस्तक

# लोकशाहीच्या हत्येसाठी

देबाशीष रॉय चौधरी, जॉन कीन
अनु : उत्पल व. बा.
किंमत : ₹ ४६०

ebook available




डान्सबारध्ये एका वेळी ८४ लाख
उडवणारा तेलगी ते संपूर्ण यंत्रणेला
भ्रष्टाचाराने पोखरणारा घोटाळेबाज...
तेलगी महाघोटाळ्याची पोलखोल करणारा एका
शोधपत्रकाराचा थक्क करणारा आँखोदेखा हाल...

# तेलगी स्कॅम

संजय सिंह
अनु. : मंजिरी धामणकर
किंमत : ₹ २९५

ebook available



वाळवली नसतील. आयांनी आपल्या मुलांना न्हाऊ-माखू घातलं नसेल.''

गोमतीचा आवाज शोकाने कठोर झाला होता. ती म्हणाली, ''सवाष्णी नववधूंच्या अंघोळीसाठी नदीवर पाणी भरायला जाताना गाणी म्हणत नसतील.''

त्या पंचकन्या जणू एका सुरात बोलल्या, ''आम्ही कुठे जाणार होतो?''

''माझ्यासोबत रहा,'' उत्तरा त्यांच्याकडे एकटक पाहत म्हणाली.

गोधुमीने दु:खाने मान हलवली. ती म्हणाली, ''हे तर मौन भवन आहे.''

''मौन?''

''इथे जे काही होतं ते सगळं अंत:पुराबाहेर होतं. पूजा, होम-हवन, यज्ञ. बाहेरच्या जगात किती घटना घडत आहेत. तिथं नुसती वर्दळ आणि धांदल उडत असेल. इथे मात्र तुम्ही श्वेत वस्त्रातल्या विधवा भुताच्या सावलीसारख्या वावरता. आम्हाला याचं आश्चर्य वाटतं, तुम्ही कधीच हसत नाही, मोठ्याने बोलत नाही, लगबगीने आत-बाहेर वावरत नाही?''

''नाही.''

सुभद्रा आत येऊन त्यांच्याजवळ बसते. ती म्हणते, ''राजवृत्तातल्या विधवांनी आर्या कुंतीने दाखवलेल्या मार्गाचं अनुसरण केलं पाहिजे. या इहलोकात विधवांना आनंदी राहण्याचा अधिकार नाही. तुम्ही पाचजणी आता जाऊ शकता.''

''नाही आर्या! नाही. त्या माझ्या सभोवती असतात... तेव्हा मला वाटतं...'' स्वत:च्या अशा आर्त किंचाळण्याचं स्वत: उत्तरेलाही आश्चर्य वाटलं. तिला रडूच कोसळलं, ''मला वाटतं मी जिवंत आहे!''

सुभद्रेने तिला जवळ घेतलं. तिचं मस्तक हळुवारपणे थोपटलं आणि तिला शांत केलं.

''मद्रजाने मला आज्ञा करता कामा नये!''

''ती नाही करणार. उगी उगी, तू आधी शांत हो बघू प्रिये. तुझ्या गर्भात बाळ वाढतंय...''

''ही शांतताच मला गुदमरून टाकतीय.''

''शांत हो प्रिये.''

काळजाला घर पडल्याप्रमाणे उत्तरा स्फुंदून रडू लागली आणि हळूहळू जरा शांत झाली. सुभद्रेच्या मनात मात्र क्षोभ माजला होता. कुणाला यासंबंधी विचारावं? आणि विचारावं तरी काय?

अत्यंत तणावाने तिनं आर्जव केलं, ''मुलींनो!''

''काय आर्या?''

''कृपा करून तिला अजून व्याकूळ होऊ देऊ नका. तिचं बाळ... त्याला खूप सोसावं...''

ही कृष्णवसुदेवाची लाडकी बहीण सुभद्रा बोलत नव्हती, तर एक सर्वसामान्य चिंतातुर आई बोलत होती.

''आम्ही लवकरच निघून जाऊ आर्या. खरं तर आम्ही आधीच गेलो असतो; पण कुरुक्षेत्राची रणभूमी ओलांडणं अद्यापही अशक्य आहे. अनेक चिता इतक्या दिवस जळल्याने भूमी भाजून खडकासारखी टणक होऊन आग ओकत आहे. पायांना चटके बसत आहेत. अशी होरपळणारी भूमी पार करत आम्ही किती दूरपर्यंत चालू शकू?''

मद्रजा म्हणाली, ''यांच्यासारख्या कित्येकजणी वेशीबाहेर उघड्यावर राहत आहेत.''

''फक्त माझ्या सुनेला अस्वस्थ करू नका गं.''

हे म्हणताना इतर कोणत्याही सर्वसामान्य स्त्रीसारखं सुभद्रेचं ऊर भरून आलं होतं. पाचही जणींनी एकमेकींकडे दृष्टिक्षेप टाकला. उसासा सोडत त्यांनी मान हलवली आणि वळून त्या निघाल्या.

सुभद्रा म्हणाली, ''मी थांबते तिच्यासोबत.''

त्या पंचकन्या जणू एकच व्यक्ती असल्याप्रमाणे विचार करत असत. त्या इतक्या जवळ आल्या होत्या, की एक शब्दही न उच्चारता त्या एकमेकींना जाणू शकत होत्या. फक्त डोळ्यांनीदेखील त्या आपसात बोलत. त्या परस्परांकडे पाहत आणि त्यांना सारं काही समजत असे.

त्यांनी उत्तरेला विचारलं, ''आता तुला बरं वाटतंय ना?''

''हो.''

''बघ या कडेवर मुलं घेतलेल्या मातांच्या मृत्तिका किती सुंदर आहेत. वितस्ताने घडवल्यात त्या.''

वितस्ता म्हणाली, ''मला इथली कुंभारांची वस्ती माहीत असती तर मी या सगळ्या भट्टीत भाजून आणल्या असत्या. भाजलेल्या लालसर मातीवर हे रंग अधिक खुलतात.''

''तू तुझ्या घरीही अशाच बाहुल्या बनवायचीस?''

''हो आणि लहान मुलांना खेळायला देऊनही टाकायची.''

''त्यांना किती आनंद होत असेल नाही?''

उत्तरेच्या लोचनात लहान बालकाची निरागसता उतरली. वितस्ता म्हणाली, ''तुझ्या बाळालाही आनंद होईल या मृत्तिकांशी खेळताना.''

''तुम्ही सगळ्याजणी... तुम्ही कधीच...''

पंचकन्यांनी नकारार्थी माना डोलवल्या. त्यांची कथाच विचित्र होती. त्या सगळ्याजणींचं लग्न एकाच दिवशी झालं होतं. त्या सासरी आल्या त्याच दिवशी तरुण पुरुषांना युद्धावर

धाडण्याची आज्ञा करणाऱ्या शंखतुताऱ्या दुमदुमल्या होत्या. युद्धाच्या सज्जतेला आरंभ झाला होता.

यमुना शांत स्वभावाची, मितभाषी होती. ती म्हणाली, ''पुरुष पुढे जातात. नंतर आम्हालाच सगळं सांभाळावं लागतं.''

''तुम्ही तुमच्या गावात असता तर आता काय करत असता?''

''झोपडी, अंगण स्वच्छ करत असतो. सरपण गोळा करत असतो. नदीवर पाण्याला गेलो असतो.''

''मला हे आयुष्यच माहीत नाही.''

''तुम्हाला हे माहिती असणं कसं शक्य आहे, राजकुमारी?''

''तुम्ही काम करतानाही गाणी गाता का?''

''हो, प्रिये!''

''मी कधीच खेडं पाहिलेलं नाही. पण भटक्यांचे तांडे फिरत फिरत येत असत. गायक, कठपुतळीचा खेळ करणारे, नृत्य करणारे नेहमी येत असत. मला खूप आवडायचं त्यांची गाणी ऐकायला...नृत्य पाहायला... पण हे सारं माझ्या लग्नाच्या आधी.''

त्या स्त्रियांनी एकमेकींकडे पाहिलं. त्या तिला म्हणाल्या, ''तुमच्या धात्रीने, दाईने तुम्हाला लहानपणी कुठल्या गोष्टी सांगितल्या? त्या आठवतात का तुम्हाला?''

''नेहमी नाही, कधी कधी. तुम्ही तुमच्या आयुष्याबद्दल बोलता तेव्हा कधीतरी आठवतं... मला ते सगळं खूप अनोळखी वाटतं... पण मला खूपच थोडी माहिती...''

''तुला आमच्या लोकांबद्दल ऐकायचंय?''

''ते काय करतात?''

त्या स्त्रियांनी उत्तरेच्या प्रश्नाने आश्चर्यचकित होऊन हातच वर केले.

''अजून काय! ते गोष्टी सांगत, गाणी गात त्यांची दैनंदिन कामं करतात.''

किती विचित्र परिकथा! असं दिसतंय की यांच्या सासवा सुद्धा दूध, दही, ताक घुसळून लोणी आणि तूप काढतात.

त्या केस विंचरतात. मुलींच्या आणि सुनांच्या केसांना तेल लावून त्यांच्या वेण्या घालतात. नातवंडांना कथा सांगतात.

''तुम्ही नगरात येता की नाही कधी?''

''नाही प्रिये. नगर आम्हाला आणि आम्ही नगराला ओळखत नाही आणि आता तर... कुणीच पुन्हा इथे येणार नाही.''

''का?''

''केवढं पाशवी युद्ध. केवढा मोठा विध्वंस. यापुढे कुणाला नगरात यावं वाटेल? तूच सांग इतकं भयंकर युद्ध तेही आपापसांत. हे घोर पाप नाही का?''

''पण ते धर्मयुद्ध होतं. सत्यासाठी युद्ध!''

''धर्मयुद्ध!''

गोधुमी आर्त कणवेने म्हणाली, ''किती शेकड्यांनी विधवा! किती घरं, ज्यात मातांनी त्यांचे पुत्र गमावले.''

''हो...आर्या गांधारींनी या वृद्धावस्थेत शंभर पुत्र गमावले...माझ्या सासवाही गमावून बसल्या त्यांची...''

अचानक गोधुमी म्हणाली, ''ऐका, ऐका! हा चातकच साद घालत आहे, हो ना?''

सगळ्याजणी कानात प्राण आणून ऐकू लागल्या. उत्तरेलाही पक्ष्याची साद ऐकू येत होती. पण कोण जाणे कोणता पक्षी? खूप दुरून एक लुप्त होत जाणारा ध्वनी.

''हा चातकच आहे खरा. बरोबर?''

''चातकानं साद घातल्यावर काय घडतं?''

गोधुमी विचारात भरकटून गेली होती, फार दूर, अगदी त्या न दिसणाऱ्या पक्ष्यापर्यंत. ती स्वप्नाळू आवाजात म्हणाली, ''चातक फक्त पावसाचंच पाणी पितो... त्याला नक्कीच पावसाळी ढगांची चाहूल लागली असणार म्हणून तो साद घालतोय.''

''आणि मग?''

''आता पाऊस येईल.''

''आणि पाऊस पडल्यावर?''

''पृथ्वीची तहान शमेल. ती तृप्त होईल. कुरुक्षेत्र थंड होईल. उष्णतेच्या झळा खाली बसतील. कदाचित आणि कदाचितच एखादे दिवशी तिथंही हिरवं गवत पुन्हा अंकुरेल.''

आणि मोठा गडगडाट करत पाऊस आला. बेफाम उतावीळपणे वर्षाव करत कोसळू लागला. अंत:पुराच्या उद्यानातील वृक्ष त्या सरींमधे न्हाऊन निघाले.

मद्रजा म्हणाली, ''विद्वानांनी सांगितलंच आहे. अशा युद्धानंतर असा पाऊस येतोच.''

काही दिवस संततधार पाऊस पडल्यावर, दग्ध धरित्रीला शांत केल्यावर, ढगांनी हळूहळू पूर्वेकडे मोर्चा वळवला.

यमुना कुजबुजली, ''आता त्यांना जिथं जिथं जंगल मिळेल तिथं तिथं ते बरसतील.''

मद्रजा म्हणाली, ''पावसाने भरलेले ते ढग पाहा. ते पूर्वेकडे आर्या चित्रांगदाच्या प्रदेशाकडे सरकत आहेत. नक्कीच वर्षाऋतूची ही खूण आहे.''

पाऊस संपल्यावर त्या पंचकन्या उत्तरेसमोर गेल्या आणि म्हणाल्या, ''आता धरती शीतल झाली आहे. राजकन्ये, आता आम्हाला निघायला हवं.''

''तुम्ही काय म्हणता आहात?''

मद्रजा धावत आर्या सुभद्रेला आणायला गेली. येता येता तिनं आर्या द्रौपदीलाही निरोप दिला. बघता बघता साऱ्या अंत:पुरात हे वृत्त पसरलं. एकामागोमाग एक सगळ्या राण्या तिथं आल्या. उत्तरेने सुभद्रेचा पदर घट्ट धरला.

''त्या निघून चालल्यात?''

''खरंच तुम्ही परत जाताय?''

''हो, आर्या. आता पृथ्वी शीतल झाली आहे. आता आम्ही तिला पार करून पलीकडे चालत जाऊ शकतो.''

उत्तरेने विचारलं, ''पण तुम्हाला कशासाठी जायचं आहे?''

गोधुमी म्हणाली, ''आम्हाला लग्नं करावी लागतील.''

''लग्नं करावी लागतील? पण तुम्ही तर...''

''आमचे पती पादातिक होते. युद्धानंतर प्रत्येक दिवशी संध्याकाळी आम्ही त्यांचे मृतदेह शोधत शोधत फिरलो. शेवटी अठरा दिवसांनंतर महात्मा विदुरांनी... सगळ्या पादातिकांचं सामूहिक दहन केलं. अनेक चिता पेटल्या... सगळी धरती भाजून खडकासारखी कठीण झाली, तप्त धग...''

''म्हणून तर तुम्ही इथे आलात, हो ना!''

''आम्ही त्या धगधगत्या धरतीला ओलांडून जाऊ शकत नव्हतो. नगरकुसाबाहेरील भाग आमच्यासारख्या अनेक स्त्रियांनी भरून गेला होता. आम्ही ओळखीचे चेहरे शोधत होतो... आणि मद्रजाने आम्हाला इथे आणलं.''

''पण आता तुम्ही का जाताय?''

त्या पंचकन्यांनी हात जोडले आणि त्या म्हणाल्या, ''आमच्यात विधवा झाल्यावर आमचे लग्न आमच्या दिरांशी लावतात. आमच्या जनवृत्तातल्या समाजात अशी परंपराच आहे.''

''पण तिथं तरुण पुरुष उरलेत तरी का?''

''आम्हाला माहीत नाही. पण आता पाऊस पडून गेलाय. शेतं नांगरटीशिवाय पडीक असतील. आणि गावं विराण झाली असतील. आम्हाला गेलंच पाहिजे.''

''मूर्ख मुलींनो! कोण तुमच्याशी लग्न करेल?''

''आम्हाला माहीत नाही, आर्या सुभद्रा. पण कोणी ना कोणी करेलच. या महाभयंकर आपत्तीनंतरही रोज सूर्य उगवतोच ना? इतक्या भयावह युद्धानंतरही निसर्ग स्तब्ध राहिलेला नाही.''

द्रौपदीने एक दीर्घ श्वास घेतला. अंत:पुरातल्या त्या नीरव शांततेत त्याचा ध्वनी स्पष्टपणे ऐकू आला. अचानक सगळ्यांची दृष्टी अचंबित होऊन त्या पंचकन्यांकडे वळली.

खऱ्या अर्थाने आजवर कुणी त्यांच्याकडे पाहिलं होतं? त्यांचं अस्तित्व असून नसल्यासारखंच होतं; पण आता अचानक त्यांच्या अस्तित्वाला सर्वांच्या दृष्टीत मूर्त रूप आलं होतं, मान्यता मिळाली होती.

व्यवस्थित विंचरून घट्ट वेणी बांधलेले त्यांचे दाट काळे केस, काळ्या वस्त्रांत झाकलेले त्यांचे अंगप्रत्यंग, वक्षांवरच्या काळ्या काचोळ्या, त्यांची घाटदार, पिळदार मान, खांदे, हात, बोटं, पाय सारं काही त्यांच्या कष्टांची साक्ष देत होते.


''जर आम्ही गेलो नाही तर आमची शेतं पडीक राहतील. आमच्या गुरांची निगा राखली जाणार नाही. परत गेल्यावर


राजू फिरकेने आपल्या गावाच्या कोरोनामुक्तीसाठी
केलेल्या वैज्ञानिक प्रयत्नांची यशोगाथा...
कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील विज्ञान कादंबरी

रफिणू

डॉ. संजय ढोले

किंमत : ₹ २२०



ebook available

आम्ही सर्व मिळून आमच्या मृतजनांच्या चिरशांतीसाठी आवश्यक विधिकार्य पार पाडू शकू. मग आमच्यातली वडील माणसं लग्नं ठरवतील. आम्हाला पतींची गरज आहे. आम्हाला मुलं हवी आहेत. कुजबूज, हास्यगुंजनाचे ध्वनी गावांनाही ऐकायचे असतात. आम्ही जीव निर्माण करू. हेच आम्हाला निसर्गाने शिकवलं आहे.''

''परंतु...''

''आर्या सुभद्रा, जीवनासाठी हे आवश्यक आहे. आदरणीय राजमाते! आयुष्य जिथवर आहे तिथवर पूर्णत्वाची मागणी करतं. आमच्यात ज्या विधवा पुनर्विवाह करतात, त्यांच्या कुटुंबात त्यांचा आदर केला जातो. त्या त्यांच्या पतींच्या बरोबरीने नांगरटीपासून सुगीपर्यंत आणि धान्य बळदात साठवण्यापर्यंत सगळी कामं करतात. त्या कधीच जीवनाच्या गरजा नाकारत नाहीत. म्हणून त्यांचं अस्तित्व मौनात बुडालेल्या, कोंडलेल्या पिशाच्चांच्या सावलीसारखं उरत नाही. आधी आम्हाला पती होते. आता नाहीत. आमच्या रडण्याने ते परत येणारही नाहीत. आमचे पती लढले आणि राजाच्या युद्धात मरण पावले. त्यांच्यासाठी दिव्यलोक नाही. तो तर फक्त राजवृत्तासाठी आहे.''

''ज्यांनी कुणी त्यांचं आयुष्य धर्मयुद्धासाठी दिलं त्यांना स्वर्गप्राप्ती होईल मुलींनो.''

''ते आमच्यासाठी धर्मयुद्ध नव्हतं. भावांनी भावांना मारलं, काकांनी पुतण्याला मारलं, शिष्यानं गुरूला मारलं. ही तुमची धर्माची कल्पना असेल, आमची नाही.''

वितस्ताने मातीच्या खेळण्यांनी भरलेली, गवताने विणलेली टोपली उत्तरेच्या पायांवर ठेवली आणि म्हणाली, ''प्रिये, रडू नकोस. तुझं मूल या खेळण्यांशी खेळेल आणि कधीतरी जर तुला कुठेतरी जाताना दिसलं, की पिकानं डवरलेल्या शेतावर पक्षी घिरट्या घालताहेत, गावातल्या स्वयंपाकघरांतून धूर निघतोय किंवा कधी कुठे समूहांनी आळवलेल्या गाण्यांच्या ताना तुझ्या कानांवर पडल्या तर लक्षात घे, की ती निश्चित आमचीच भूमी असेल''

त्यांनी सर्व राण्यांसमोर नतमस्तक होऊन अभिवादन केलं. सम्राज्ञी द्रौपदी पुढे आली. त्यांच्या डोक्यावर आशीर्वादासाठी हात ठेवत म्हणाली, ''जा जा, तुमच्या पूर्णत्वाकडे जा!''

मग तिनं विचारलं, ''तुम्ही उत्तरेचं बाळ पाहायला याल का?''

''हो, आम्ही निश्चित येऊ आणि उद्यानात बसून बाळासाठी गाणीही गाऊ.''

त्या जाण्यासाठी वळल्या. द्रौपदीचा गळा भरून आला. ती म्हणाली, ''तुम्हाला शांती लाभो, समाधान लाभो. रोजच्या जीवनाच्या जगात तुम्ही परत जावं.''

पंचकन्या प्रासादाबाहेर चालत निघाल्या. गोधुमी वळून म्हणाली, ''तुझ्या स्नानाचं पाणी तयार आहे, प्रिये!''

उत्तरेने खेळण्यांची टोपली उचलली आणि स्वत:शी चिंतन करत म्हणाली, तुम्ही सगळ्या सुखात राहा.

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'कुरुक्षेत्रानंतर' या महाश्वेतादेवी लिखित पुस्तकातून)**

◆◆◆



दारिद्र्य, गुन्हेगारी आणि वंचनांच्या कात्रीत सापडलेला
असतानाही शिक्षणाची वाट अंगीकारून
जगण्याचा आदर्श उभा करणाऱ्या लेखकाचं
हृदयस्पर्शी आत्मकथन

आता मव्हं काय!

डॉ. देविदास तारु
किंमत : ₹ ३००

ebook available






# महाभारतातील पितृवंदना

दिनकर जोषी

अनु : सुषमा शाळिग्राम

## ।। पुस्तकाच्या पानांतून ।।



## ।। दुरात्मा दुर्योधन ।।

रामायण, भागवत आणि महाभारत ह्या तीन पुराणकथांतील खलनायक कोण असा प्रश्न विचारला तर क्षणाचाही विलंब न लावता सर्वजण एकच उत्तर देतील — रावण, कंस आणि दुर्योधन! पण ह्या तिघांनाही रूढ अर्थाने खलनायक म्हणता येणार नाही. शक्तिसामर्थ्य आणि बुद्धितेज ह्या बाबतीत त्यांच्या कुणाही समकालीनांपेक्षा — त्या त्या कथेच्या नायकांपेक्षाही - ते कणभरही उणे नाहीत. तिघांनीही आपल्या काळात प्रजेवर जुलूम केलेला नाही; किंबहुना त्यांच्या काळात प्रजेला सुशासनाचाच अनुभव आला आहे. त्यांनी यज्ञ केले आहेत, दानधर्म केले आहेत आणि असे असूनही त्यांना 'खलनायक' बनवणारे काही तरी त्यांच्यात होते. (खरे पाहता, परंपरागत खलनायकाचे अवगुण ह्या तिघांत नाहीत त्यामुळे त्यांना 'खलनायक' न म्हणता 'प्रतिनायक' म्हणणे अधिक योग्य आहे.) — त्यांना खलनायक ठरवणारी एकच कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे अहंकार! मनुष्यमात्रात थोडाफार अहंकार असतोच परंतु हे तिघे असे आहेत की समोर सर्वनाश उभा ठाकला आहे, डोळ्यांना स्पष्ट दिसतो आहे, महाकाळाचे दर्शन घडत आहे हे कळूनही ते अहंकारातून मुक्त होऊ शकत नाहीत. अहंकार त्यागण्यापेक्षा सर्वनाश होऊ देणे त्यांना मान्य आहे. अहंकाराच्या प्रचंड व्यापकतेचेच हे लक्षण आहे. असला अहंकार जोपासत एखादा कुणी अडाणी मृत्यूलाही कवटाळायला तयार झाला तर ते एकवेळ क्षम्य आहे; पण ही पात्रे तर ज्ञानी आहेत, समर्थ आहेत. त्यांच्या आजूबाजूला एकापेक्षा एक महान व्यक्तिमत्त्वे आहेत, तरीही ते आपला अहंकार सोडत नाहीत आणि सर्वनाश ओढवून घेतात ह्याला 'नशिबाचे खेळ' म्हटले पाहिजे.

दुर्योधन आणि भीम दोघेही एकाच दिवशी जन्मले आहेत. (आदिपर्व - १२२/१९) गांधारीचा गर्भ दोन वर्षांपर्यंत तसाच राहिला. दरम्यान, युधिष्ठिराच्या जन्माची बातमी हस्तिनापुरास पोचली आहे. त्यानंतर गांधारीने रागावून टाकून दिलेल्या गर्भाचे महर्षी व्यासांनी शंभर तुकडे केले आणि ते तुपाने भरलेल्या कुंभात ठेवले. पुढच्या वर्षी त्या कुंभांवर पाणी शिंपडल्यानंतर त्यामधून गांधारीच्या शंभर पुत्रांचा जन्म झाला. शंभरांपैकी सर्वांत प्रथम दुर्योधन जन्मला कारण तो ज्या कुंभात होता तो कुंभ सगळ्यांत आधी उघडला गेला. युधिष्ठिर आणि भीम ह्यांच्यातही फक्त दोन अडीच वर्षांचेच अंतर होते हेही ह्या कथानकावरून कळते.

दुर्योधनाच्या जन्मावेळी अमंगल, अपशकुन झाले आणि

हा पुत्र कुलनाशक होईल असे भाकित ज्योतिषांनी केले. अन्य नव्याण्णव पुत्रांना वाचवण्यासाठी ह्या एका पुत्राचा त्याग कर असे विदुराने धृतराष्ट्राला सुचवले होते. धृतराष्ट्राला मात्र सुरुवातीपासूनच ह्या पुत्राबद्दल स्नेहच नव्हे तर भरपूर मोहही होता. त्यामुळे, 'सर्वनाश व्हायचाच असेल तर होवो पण ह्या पुत्राला मी टाकणार नाहीच' असे तो म्हणतो.

दुर्योधनाच्या जन्माबद्दल विचार करताना लक्ष वेधून घेणाऱ्या एक-दोन गोष्टींचीही दखल घेतली पाहिजे. कौरवात म्हणजे धार्तराष्ट्रांत दुर्योधन सर्वांत मोठा म्हटला जातो, परंतु मुळात तसे नाही. गांधारीची गर्भवती अवस्था आणि प्रत्यक्षात त्या पुत्रांचे जन्म ह्यात जवळजवळ चार वर्षे गेली. ह्या दरम्यान राजा धृतराष्ट्राच्या सेवेत असलेल्या शूद्रा दासीला राजापासून एक पुत्र - युयुत्सू - झाला आहे. म्हणजे धृतराष्ट्राच्या पुत्रांना कौरव म्हटल्यास कौरव एकशे एक आहेत आणि सर्वांत ज्येष्ठ बंधू युयुत्सू आहे. ह्या घटनेच्या बरोबरीनेच पांडुपुत्रांचाही विचार केला पाहिजे. पाच पांडवांपैकी एकही पांडु-पुत्र नाही; कुंतीला मिळालेल्या वराच्या परिणामस्वरूपी ह्या सर्वांचे जन्म झाले आहेत. हे वरदान आणि कुंती ह्याच दोन गोष्टी लक्षात घेतल्या तर पांडव सहा आहेत. कुंतीला तिच्या कुमारी अवस्थेत झालेला कर्ण हा सुद्धा पांडूचा 'क्षेत्रज' पुत्रच म्हटला जाईल. ह्या सहाजणांमध्ये कर्ण ज्येष्ठ बंधू आहे. अशा तऱ्हेने दोन्ही पक्षात, जो ज्येष्ठ बंधू आहे तो अस्वीकृतच राहिला आहे, उपेक्षित आहे. ह्याला काय म्हणावे? शिवाय, ज्येष्ठ कौरव युयुत्सू महायुद्धात पांडवांकडून लढला आणि ज्येष्ठ पांडव कर्ण त्याच युद्धात कौरवांकडून लढला ही गोष्टही लक्षणीय आहे.

दुर्योधन कळत्या वयाचा झाल्यापासून 'हस्तिनापूरचा युवराज आणि भावी सम्राट आपणच आहोत' असे खात्रीपूर्वक धरूनच चालला आहे असे वाटते. त्याच्या बाळपणी पांडव तर अरण्यात वाढत होते. त्यामुळे त्यांच्याबद्दल तो अनभिज्ञ असण्याची शक्यता आहे. कदाचित राजा धृतराष्ट्राचीही अशीच समजूत असावी की, पांडू विधिपूर्वक सिंहासनावर बसला असला तरी आता तो वनातून कधीच परत येणार नाही आणि त्याची मुले एकतर वनवासी बनून राहतील अथवा त्यांचा जन्म शंकास्पद असल्याने हस्तिनापुरात त्यांचा स्वीकारच होणार नाही. अशा परिस्थितीत हस्तिनापूरचे सिंहासन कायदेशीरदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या आपलेच आहे अशी धृतराष्ट्र आणि दुर्योधन, दोघाही पितापुत्रांची दृढ समजूत होत गेली असण्याची शक्यता आहे.

कालांतराने, पांडवांचे हस्तिनापुरात आगमन झालेच. भीष्म, द्रोण, कृपाचार्य इत्यादींनी त्यांचा पांडुपुत्र म्हणुन विधिवत् स्वीकारही केला. अरण्यवासी ऋषी स्वत: त्यांच्याबरोबर आल्याने त्यांचा स्वीकार न करण्याचा प्रश्नच उरला नाही! धृतराष्ट्राने वरकरणी त्यांना आनंदाने आपले म्हटले असले तरी अंतर्यामी तो चिंतित झाला असावा हे जास्त संयुक्तिक वाटते. आपले स्थान आणि प्रतिष्ठा ह्यामुळे पांडवांचे आगमन धृतराष्ट्राला मोठ्या गौरवाने स्वीकारावे लागले. एव्हाना दुर्योधन बाळपण ओलांडून तारुण्यात पदार्पण करत आहे. युधिष्ठिराचा स्वीकार म्हणजेच भविष्यकाळातल्या संभाव्य प्रतिस्पर्ध्याचा स्वीकार! म्हणजेच हस्तिनापूरच्या युवराजपदी आणि भावी सम्राटपदी दुर्योधनाला कायमचा नकार! दुर्योधनाला हे कसे सहन व्हावे? 'पांडवांचे शत्रू' असेच ज्यांच्याकडे नेहमी पाहिले गेले ते कर्ण आणि शकुनी अजून ह्यात कोठेच नाहीत. एवढ्यातच पांडवांना नष्ट करून टाकण्याची कुटिल कारस्थाने रचायला दुर्योधनाने एकट्या हातीच सुरुवात केली आहे. जलविहाराच्या नावाने भीमाला बुडवण्याचे कारस्थान, विष घातलेले लाडू खाऊ घालून भीमाला मारण्याचे कारस्थान तसेच शेवटी लाक्षागृहाचे षड्‌यंत्र, ही सर्व कारस्थाने दुर्योधनानेच रचली आहेत. भीम हेच पांडवांचे खरे सामर्थ्य आहे असे मानून भीमाचा नाश करण्यातच त्याला स्वारस्य आहे.

पांडवपक्षातील भीम आणि अर्जुन शक्तिसामर्थ्यात आपल्यापेक्षा खूप वरचढ आहेत हे सत्य स्वीकारण्याचा दुर्योधनाचा स्वभावच नव्हता. भीम गदायुद्धात निपुण असला तरी आपणही गदायुद्धात कुठेच कमी नाही ही दुर्योधनाची समजूत अगदीच चुकीची नव्हती. महायुद्धाच्या शेवटच्या दिवशी भीम आणि दुर्योधन ह्यांच्यात अंतिम गदायुद्ध झाले त्यावेळी भीम थकून गेला होता आणि पराभवाच्या टोकावर होता हे सर्वश्रुतच आहे. त्यावेळी कृष्णाच्या सूचनेनुसार भीमाने गदायुद्धाचे नियम मोडून दुर्योधनाची मांडी फोडली नसती तर युद्धाचा निकाल कदाचित वेगळाच लागला असता; परंतु अर्जुनाच्या शस्त्रविद्येचा मुकाबला करू शकेल असा कुणीच कौरवपक्षात नव्हता. कर्णाला आपल्याकडे आणून दुर्योधनाने ती उणीव भरून काढली. द्रोणाचार्यांनी आयोजित केलेल्या परीक्षेच्या वेळी एक अपरिचित अनाहूत धनुर्धर म्हणून कर्ण रंगमंचावर आला, परंतु दुर्योधनाला तो अपरिचित नव्हताच. आचार्य द्रोणांकडे शिक्षण घेणाऱ्या कुमारांच्या बरोबरीने द्रोणपुत्र अश्वत्थामा आणि सूतपुत्र कर्णही होते! त्यामुळे कर्णाची शक्ती दुर्योधन ओळखून असणारच! रंगमंचावर कर्णाने अर्जुनाच्या बरोबरीने किंबहुना त्याहूनही अधिक उठून दिसणारा पराक्रम केला त्याच क्षणी अर्जुनाच्या तोडीस तोड धनुर्धराची कौरवपक्षातील उणीव भरून काढण्याची संधी दुर्योधनाला लाभली. 'कर्ण सूतपुत्र आहे आणि अर्जुन राजकुमार आहे' ह्या


सरळमार्गी माल्कमच्या आयुष्यात
आलेलं थरारनाट्य, त्यावर
बुद्धिकौशल्य व चातुर्याने केलेली मात
याचा रोमांचक प्रवास

TBC-33 Book No.1

# द रॅकेटियर

जॉन ग्रिशॅम
अनु : अशोक पाथरकर
किंमत : ₹ ६६०

ebook available




आभासी जगातला रोमॅण्टिसिझम आणि
वास्तव जगातलं क्रौर्य यांचा थरकाप उडवणारा
मिलाफ मांडणारी थरारक कादंबरी

TBC-32 Book No.6

# आय कॅन सी यू

करेन रोझ
अनु. : पराग पोतदार
किंमत : ₹ ९९५

ebook available



कृपाचार्यांच्या आक्षेपाच्या उत्तरादाखल त्याने कर्णाला तत्काळ आपल्या पक्षात घेऊन त्याला 'अंग देशाचा राजा' घोषित करून टाकला. आता कर्ण 'सारथी' नव्हता; आता तो राजा होता म्हणजेच अर्जुनाच्या बरोबरीचा होता एवढेच नव्हे तर आता तो दुर्योधनाचा मित्रही होता.

एक कोडे मात्र उलगडत नाही. ह्यावेळी धृतराष्ट्र राजा आहे, विधिवत् राजा झालेल्या पांडूच्या अनुपस्थितीत तो हे राजपद सांभाळत आहे, राज्याचे सर्वेसर्वा आणि समर्थ ज्येष्ठ, पितामह भीष्म आहेत. अशा परिस्थितीत, 'एक राजकुमार' ह्याहून अधिक काहीच नसलेला दुर्योधन, ही सर्व वडीलधारी माणसे प्रत्यक्ष हजर असताना हस्तिनापूरच्या राज्याचा एक भाग — अंगदेश — कर्णाला कसा काय देऊ शकतो? त्याला तर यौवराज्याभिषेक सुद्धा झालेला नाही तरीही स्वत:च राजा असल्यासारखे तो हे करतो असे वाटते. त्याने स्वत:ला राजाच काय, खुशाल इन्द्रही मानावे; पण धृतराष्ट्र आणि भीष्म ह्यांनी ते का स्वीकारावे हे न उलगडलेले कोडे आहे. मोहामुळे धृतराष्ट्र एक वेळ गप्प राहील — दुर्योधनाचा भावी अधिकारच जपला जात आहे असा काही तरी हिशोब त्याच्या मनात असावा — परंतु भीष्मांनीही या सर्वस्वी अनुचित गोष्टीला मूक संमती का द्यावी, ते कळत नाही. पुढे द्रौपदीवस्त्रहरणाच्यावेळी कुरुसभेमध्ये भीष्मांनी धारण केलेल्या मौनाची पुष्कळ चर्चा झाली आहे, पण रंगमंचावरील हे मौन महाभारताच्या अभ्यासकांनी निमूटपणे का स्वीकारले ते मात्र समजत नाही. अशा तऱ्हेचे अनधिकृत पाऊल उचलतानाच दुर्योधनाला रोखले असते तर कदाचित कुरुकथाही वेगळीच झाली असती! ही घटना घडल्यावर ठीक एक वर्षानंतर युवराजपदी युधिष्ठिरालाच अभिषेक झाला आहे आणि हस्तिनापूरच्या विभाजनानंतर पांडव इंद्रप्रस्थाला गेले तेव्हा युवराज युधिष्ठिर इंद्रप्रस्थाचा राजा झाला; पण हस्तिनापूरचा राजा धृतराष्ट्रच राहिला आहे. त्यानंतरही कधी दुर्योधनाला यौवराज्याभिषेक झाल्याचा कुठेही उल्लेख नाही. अशाप्रकारे शेवटपर्यंत दुर्योधनाला 'एक राजकुमार'याहून अधिक काहीच विशेष स्थान मिळालेले नाही.

युवराजपदी युधिष्ठिराची स्थापना म्हणजे अर्थातच दुर्योधनाच्या एकूण एक स्वप्नांचा करुण अंतच! ही स्वप्ने जर खरी करायची असतील तर पांडवांचा विनाश करण्यावाचून गत्यंतरच नव्हते. दुर्योधनाच्या साथीला आता कर्ण असल्याने तो आपले बलाबल पांडवांच्या बरोबरीनेच नव्हे तर त्यांच्यापेक्षा वरचढ असेच मानत होता. युधिष्ठिर युवराज झाल्यामुळे आता युद्ध करून पांडवांचा नाश करणे जवळजवळ अशक्यच होते त्यामुळे दुर्योधनाने लाक्षागृहाचे कारस्थान रचले. पांडव लाक्षागृहात राहायला गेले तरच हे कारस्थान यशस्वी होणार! दुर्योधनाच्या सांगण्यावरून पांडव तेथे गेले नसते, म्हणून मग वारणावत नगरीच्या सौंदर्याची अत्यंत प्रशंसा करून धृतराष्ट्राकरवी त्याने पांडवांना ह्या सुंदर नगरीत काही काळ आमोद-प्रमोद करण्यासाठी जाण्यास सुचवले. धृतराष्ट्राची सूचना म्हणजे आज्ञाच असे मानून पांडव तेथे गेले. आधीच निर्माण करून ठेवलेल्या लाक्षागृहात राहिले, परंतु दुर्योधनाच्या दुर्दैवाने तेथून सुरक्षितपणे निसटले. अर्थात, पांडव बचावले आहेत हे सत्य हस्तिनापुरात कुणालाच ठाऊक नव्हते. दुर्योधनही निश्चिंत झाला होता. खरी गोष्ट फक्त विदुर आणि भीष्मांनाच माहीत होती.


पांचालनरेश द्रुपदाच्या राजकन्येचे स्वयंवर वारणावताच्या घटनेनंतर योजले गेले. ही राजकन्या मिळवण्याच्या हेतूने दुर्योधन आपला मित्र कर्ण ह्याच्यासह तेथे गेला. राजकन्या जिंकण्याच्या परीक्षेत दुर्योधन सफल झाला नाहीच उलट, तापसवेषधारी अर्जुनाने त्यात यश मिळवले, द्रुपद आणि कृष्ण ह्यांच्यासारख्या समर्थांच्या साहाय्यासकट पांडव प्रकट झाले!

दुर्योधनाच्या अहंकाराला हा आघात पचवणे म्हणजे लहानसहान गोष्ट नव्हती. पुन्हा एकदा दुर्योधनाच्या डोळ्यांदेखत पांडव विजयी ठरले. दुर्योधन जाहीरपणे पराजित झाला. एवढे पुरेसे नव्हते म्हणून की काय पांडव द्रौपदीसह हस्तिनापूरला परत आले आणि ह्यापुढे पांडुपुत्र आणि धार्तराष्ट्रांत काही बखेडा उद्‌भवूच नये म्हणून पितामह भीष्मांनी हस्तिनापूरच्या राज्याची वाटणीच करून टाकली. ही वाटणी मान्य करणे दुर्योधनाला कर्मकठीण वाटणारच! पण तेव्हा परिस्थितीच अशी होती की, ही वाटणी स्वीकारण्यावाचून गत्यंतरच नव्हते. पुढे अनेक वर्षांनंतर महायुद्ध दाराशी येऊन ठेपले असताना, शिष्टाईसाठी आलेल्या कृष्णापुढे, दुर्योधनाने इतकी वर्षे मनात खोलवर दडपून ठेवलेली ही गोष्ट उसळी मारून, अंत:करण फाडून वर येते. तो म्हणतो, ''कृष्णा, राज्याची वाटणी होऊ देणे ही माझी मोठीच चूक होती. आता ती चूक सुधरवली गेलीच आहे तर पुन्हा एकदा पांडवांना राज्य देऊन टाकण्याची चूक मी कदापि करणार नाही.''

पांडवांनी इंद्रप्रस्थ वसवले आणि राजसूय यज्ञ केला तेव्हा तेथे भीष्मादींच्या बरोबर दुर्योधनही गेला होता. इंद्रप्रस्थात पांडवांची अलोट संपत्ती आणि अपार सत्ता पाहून तो व्यथित झाला आहे. समग्र आर्यावर्ताच्या राजांनी ज्या तऱ्हेने भेटी-उपहार अर्पण करून पांडवांचे वर्चस्व स्वीकारले त्यामुळे त्याचा द्वेष अधिकच वाढत गेला. त्याच्या अहंकाराला हे सर्व असह्य झाले. मयासुराने रचलेल्या पांडवांच्या राजमहालात पाण्याला जमीन आणि जमिनीला पाणी समजून चालल्याने त्याची जी

# सेरदार ओस्कान

यांनी खुसखुशीत, छोट्या-छोट्या गोष्टींतून मांडलेलं
आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान...




## रुमी: आनंदघन

अनु : प्रमोद नाईक
किंमत : ₹ २४०




## उजळ जगण्याचा दीप

अनु. : अजित व्यं. कुलकर्णी
किंमत : ₹ २५०

ebook available

# सेरदार ओस्कान

यांनी खुसखुशीत, छोट्या-छोट्या गोष्टींतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान...




## अमर हृदय

अनु : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके
किंमत : ₹ ३५०

## ऑक्टोबर रेन्स




अनु. : मुग्धा गोखले
किंमत : ₹ २५०

ebook available

थट्टा झाली त्यामुळे तर तो व्यथितच नव्हे तर अत्यंत हताश झाला. अशी सत्ता आणि इतकी संपत्ती आपण कधीच मिळवू शकणार नाही ह्या विचाराने त्याला आपले जीवन व्यर्थ वाटू लागले. त्याच्या लेखी जीवनाचा अर्थच मुळी 'पांडवांच्या वरचढ असणे' एवढाच होता. पांडवांची संपत्ती नष्ट करण्याचा काहीच उपाय त्याच्यापाशी नव्हता. त्यामुळे शेवटी मृत्यूला जवळ करणे श्रेयस्कर असे वाटून तो शकुनीला म्हणतो, ''मामा, हे सारे मला मिळवता येण्यासारखे नसेल तर मग मी मरून जावे हेच बरे!'' दुर्योधनाचे आत्यंतिक निराशेचे बोल ऐकून शकुनीने त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पांडवांबद्दलची द्वेषभावना सोडून देऊन, हस्तिनापूरच्या अक्षय संपत्तीचा संतुष्टपणे उपभोग घेत राहण्याचा सल्ला त्याने दुर्योधनाला दिला. तरीही आपल्या भाच्याची अत्यधिक निराशा आणि वाढती दुर्दशा पाहून, पांडवांशी द्यूत खेळावे हे त्यानेच सुचवले. आपण द्यूतकलेमध्ये पारंगत असल्याची त्याची खात्री होतीच शिवाय, युधिष्ठिर स्वत:लाही द्यूतात प्रवीण मानून खेळल्याविना राहणार नाही हे सुद्धा शकुनी बरोबर ओळखून होता. राजा धृतराष्ट्राच्या आज्ञेविना द्यूताचे आयोजन अशक्यच होते; त्यामुळे मग राजाचीही समजूत पटवून द्यावी लागली. आरंभी धृतराष्ट्राने विरोध केला तो केवळ तोंडदेखला विरोधच आहे. युधिष्ठिराचे राज्य हिरावून घेण्याची संधी दिसली की धृतराष्ट्राच्या तोंडाला पाणी सुटतच होते. अशा रीतीने, द्यूताची तयारी झाली आणि युधिष्ठिराला निमंत्रण गेले.

द्यूताचा निकाल अंदाजाप्रमाणेच लागला. युधिष्ठिराने आपले सर्वस्व गमावले. एकदा पराजय होऊनही युधिष्ठिर पुन्हा दुसऱ्यांदा खेळलाच आणि एकाच डावात समग्र राज्य आणि तेरा वर्षांचा वनवास पणाला लावून तो डावही हरला. पहिल्यावेळी हरल्यावर द्रौपदीवस्त्रहरणाचा ओंगळ प्रसंग घडला त्यावेळी दुर्योधनाच्या अंतरातील मुळापासूनचे सगळे मालिन्य बाहेर पडले आहे. द्रौपदीला स्वयंवरात प्राप्त करण्याची त्याची इच्छा होती, ती निष्फळ ठरली. शक्ति-प्रदर्शनात पांडव त्याच्यापेक्षा श्रेष्ठ ठरले होते. राजसूय यज्ञ त्याचेच प्रतीक होता. त्यामुळे द्यूतसभेतील विजय हा त्याला सर्वोच्च क्षण वाटणे स्वाभाविक होते. भीष्म, गांधारी, विदुर, द्रोणाचार्य, कृपाचार्य - कुणालाच त्याने जुमानले नाही आणि द्रौपदीची अवहेलना केली एवढेच नव्हे तर आपली मांडी उघडी करून तेथे बसण्यासही सांगितले. त्यावेळी वडीलधाऱ्यांची मर्यादा पाळण्याचेही भान त्याने राखले नाही. द्वेष आणि अहंकार कसे विवेकहीन असतात त्याचेच हे उदाहरण आहे. दुर्योधनाच्या ह्या अविवेकामुळेच भीमाची प्रतिज्ञा जन्माला आली आणि महासंहाराच्या अंतिम, घृणास्पद दृश्याची निर्मिती सुद्धा मांडी उघडी करून दाखवण्याच्या क्षणीच झाली.

दुर्योधनाच्या रोमरोमात भिनलेला हा पांडवद्वेष आणि अहंकार त्याच्या एकूणच अस्तित्वाला कुठवर व्यापून उरला होता त्याचे हीनतम प्रदर्शन अजून व्हायचे शिल्लक होते. ज्या पांडवांची संपत्ती पाहून दुर्योधन स्वत: दु:खी झाला होता तेच पांडव कंगाल, दरिद्री झाल्यावर त्यांच्यामोर आपल्या सत्ता-संपत्तीचे प्रदर्शन करण्याकरिता त्याने घोषयात्रेचे निमित्त केले. खरे तर आता पुढील तेरा वर्षे त्याला पांडवांपासून कसलेच भय नव्हते; पण द्वेष आणि ईर्षा ह्या अमंगल प्रवृत्तीच अशा आहेत की त्या कुणाला कधीच शांती लाभू देत नाहीत. घोषयात्रा ह्याचेच उदाहरण आहे.

द्वैतवनात राहत असलेल्या पांडवांपुढे आपली थोरवी दाखवायला निघालेल्या दुर्योधनाला चित्रसेन गंधर्वाने वाटेतच लढाईत पराभूत करून कैद केले. त्याच्याबरोबर असलेल्या कर्णालाही पराजित करून पळवून लावले. दुर्योधनावर कठीण प्रसंग ओढवला होता. लढाईत वाचलेले त्याचे काही सैनिक द्वैतवनातल्या युधिष्ठिराला शरण गेले. युधिष्ठिराच्या सांगण्यावरून अर्जुनाने चित्रसेनाशी लढून त्याचा पराभव केला आणि बंदिवान अवस्थेतच दुर्योधनाला युधिष्ठिरापुढे हजर केले. इंद्रप्रस्थास दुर्योधन स्वत:च्या अंतरात पेटलेल्या आगीत जळत होता; परंतु येथे ज्या पांडवांना तुच्छ लेखण्यासाठी तो निघाला होता त्याच पांडवांच्या आश्रयाला त्याला यावे लागले होते. युधिष्ठिराने त्याला जीवदान दिले आणि मान खाली घालून दुर्योधनाला हस्तिनापुरास परतावे लागले.

पांडवांची नुसती समृद्धीसुद्धा ज्या दुर्योधनाला असह्य झाली होती तो दुर्योधन इतका मोठा अपमान सहन करणे कसे शक्य होते? त्यावेळी त्याला जगणे व्यर्थ वाटले होते तर आता अधिकच निरर्थक न वाटते तरच नवल! अन्नपाणी वर्ज्य करून आत्महत्या करण्याचा आपला निश्चय त्याने व्यक्त केला. 'अशा अपमानित अवस्थेत हस्तिनापुरात प्रवेश करण्याऐवजी मी आत्महत्या करतो, माझ्याऐवजी आता दु:शासनच हस्तिनापुरास जाईल' असे तो म्हणाला. ह्यावेळी कर्णाने त्याचे सांत्वन केले आहे. कर्ण म्हणतो, ''दुर्योधना, शत्रूवर विजय मिळवण्यासाठी तरी जिवंत राहणे आवश्यक आहे. तुला जर मरायचेच असेल तर मग विजय मिळवण्याचा प्रश्नच कुठे उरतो?'' कर्णाने समजावल्यावर दुर्योधन हस्तिनापूरला परतला आणि त्याची निराशा दूर करण्यासाठी पुढे कर्णाने त्याच्या हातून वैष्णव-यज्ञ करवला. दुर्योधनाला खूष करण्यासाठी त्याने कित्येक राजांना हरवून, दुर्योधनाची सर्वश्रेष्ठता सिद्ध करण्याचा विनाकारणच प्रयत्न केला.

बळेबळे सिद्ध केलेल्या ह्या विजयालाच वास्तव मानून

आपल्या जुन्याच ईर्षेच्या जगात पुनश्च रमायला दुर्योधनाला प्रयास पडले नाहीत. ह्यानंतरचा दुर्वास ऋषींचा प्रसंग म्हणजे तर दुर्योधनाच्या अंगी भिनलेल्या हीनपणाचे उत्तम उदाहरण आहे. दुर्वास ऋषी दुर्योधनाचे अतिथी बनून आले आहेत. ज्यांचे आदरातिथ्य करणे म्हणजे महाकठीण काम अशा ह्या महाक्रोधी अतिथीला दुर्योधन आपल्या स्वार्थाखातर प्रसन्नही करून घेतो. हीन स्वभावाचा माणूस ईर्षेपोटी, गरज पडल्यास किती विनम्र बनू शकतो तेच येथे दिसते. सहजासहजी प्रसन्न न होणारे दुर्वास ऋषी दुर्योधनावर प्रसन्न झाले त्यावेळी दुर्योधनाने ह्या अतिकोपिष्ट ऋषींकडून जे वचन मागितले ते म्हणजे हीनतेची परिसीमा आहे. त्याने दुर्वासांपाशी काय मागावे? त्याने मागितले - दुर्वासांनी आपल्या शिष्यांसह पूर्व कल्पना दिल्याविना, अचानक, पांडवांचे अतिथी बनून त्यांच्याकडे सर्वांसाठी भोजन मागावे. ते सुद्धा केव्हा? द्रौपदीसकट सर्व पांडवांचे जेवण उरकल्यानंतरच तेथे जाऊन ही मागणी करावी! अशावेळी द्रौपदी सर्वांच्या जेवणाची तत्काळ व्यवस्था करू शकणार नाही आणि हे तापट ऋषी पांडवांना नक्कीच शाप देतील अशी दुर्योधनाची अटकळ होती. कृष्णाच्या मदतीमुळे ऋषींच्या ह्या संभाव्य शापातून पांडव वाचले आणि दुर्योधनाचा हिशोब पुन्हा एकदा चुकला. ईर्षेने पेटलेला माणूस कुठल्या थराला जाऊ शकतो, किती क्षुद्र, हीन बनू शकतो तेच ह्या प्रसंगाने दाखवून दिले आहे. एकदा अहंकार दुखावला गेला की भलीभली समर्थ माणसेही आपली द्वेषबुद्धी कह्यात ठेवू शकत नाहीत आणि इतक्या खालच्या पातळीवर उतरतात.

**दोन**

द्यूताच्या अटीअनुसार पांडवांनी तेरावे वर्ष अज्ञातवासात काढायचे होते. ह्या काळात दुर्योधनाने त्यांना शोधून काढल्यास पुन्हा एकदा बारा वर्षे अरण्यवास आणि तेराव्या वर्षी अज्ञातवास त्यांना भोगावा लागणार होता. साहजिकच, तेराव्या वर्षी पांडवांना शोधण्यासाठी दुर्योधनाने आकाश-पाताळ एक केले तरीसुद्धा विराट नगरीत गुप्तवेशात लपलेले पांडव त्याच्या हाती लागले नाहीत. दुर्योधनाच्या एकाही हेराला किंवा मित्राला पांडवांचा सुगावा लागला नाही, तेव्हा घटकाभर दुर्योधनाला असेही वाटून गेले की पांडव नक्कीच मृत्यू पावले असावेत. पांडवांना शोधून काढण्याच्या कामी लावलेल्या आपल्या यंत्रणेच्या अपयशाची त्याला शंकाही येत नाही. अहंकारी माणूस आपल्या कोणत्याही गोष्टीत किंवा व्यवस्थेत दोष असेल अशी कल्पना करू शकत नाही. दुर्योधनानेही हीच बालिश वृत्ती दाखवली आहे. आपण शत्रूला शोधण्यासाठी जसा डोळ्यांत तेल घालून प्रयत्न करत आहोत तसाच, शत्रूही आपल्या तडाख्यात न सापडण्याचा आटोकाट प्रयत्न करत असेल, आपल्या सवाई जागरूक असेल अशी शंकाही त्याच्या मनात डोकावत नाही. आपण एखाद्याला पकडू शकत नसलो तर सर्वांत पहिला तर्कशुद्ध अर्थ असाच निघतो की शत्रूही सावध आहे, जागरूक आहे. पण अहंकारी माणूस अशा पद्धतीने विचार करू शकत नाही.

त्यानंतर मात्र, विराटनगरीहून आलेल्या बातम्यांनी दुर्योधनाला विचार करायला भाग पाडले. आपली विचार पद्धतीच चुकीची होती हे त्याच्या ध्यानात आले. विराटनरेशाचा मेहुणा कीचक मल्लयुद्धात प्रवीण म्हणून प्रख्यात होता, त्या कीचकाचा कुण्या अज्ञात गंधर्वाने मल्लयुद्धात वध केल्याचे ऐकल्यावर मात्र दुर्योधनाने सयुक्तिक विचार केला आहे. कीचकाशी मुकाबला करू शकतील असे फक्त तीनच मल्ल तेव्हा आर्यावर्तात होते. एकतर स्वत: दुर्योधन आणि दुसरे दोघे बलराम व भीम! अज्ञात गंधर्वाच्या नावाने बलराम हा वध करणार नाही, म्हणजे हे कृत्य भीमाचेच असणार! शिवाय, कीचकवधाशी सैरन्ध्री नावाच्या रूपवान दासीचे नावही जोडले गेले होते. ही सुंदर दासी म्हणजे द्रौपदी आणि अज्ञात गंधर्व म्हणजे भीम ह्याबद्दल दुर्योधनाच्या मनात किंचितही शंका उरली नाही. आता फक्त त्याला पकडून त्याची ओळख पटवून द्यायचा काय तो प्रश्न शिल्लक होता. एवढे केले की तो आणखी तेरा वर्षे निश्चिंत झाला असता. ह्यात नैतिकदृष्ट्या किंवा नियमानुसारही काहीच गैर नव्हते. दुर्योधनाचा तो अधिकारच होता. विराटनगरीवर आक्रमण केल्यास तेथे गुप्तवेषात लपलेला अर्जुन त्या हल्ल्याचा प्रतिकार केल्याविना राहणार नाही हा त्याचा तर्कही वाजवी होता. विराटाच्या गायी पळवून नेण्याचे कृत्य खरे तर कुरुकुलाला शोभण्यासारखे नव्हते परंतु लुटारूपणाच्या ह्या कृत्यामागे अर्जुनाचा पाठलाग करण्याची संधी साधून त्याला शोधून काढण्याचा उद्देश होता. गायी पळवणे केवळ निमित्तमात्र होते.


अंदाज केल्याप्रमाणेच घडले. दुर्योधनाने आपल्या सैन्यासह — त्यात भीष्मांपासून अश्वत्थाम्यापर्यंत सगळेच होते - विराटनगरीच्या वेशीपासून गायींचे कळप हाकलत नेले आणि बृहन्नला वेषातील अर्जुनाने त्यांचा पाठलाग केला. अर्जुनाची ओळख पटली खरी परंतु तमाम महारथींसह साऱ्या कौरवसैन्याला मूर्च्छित करून तो गायी परत घेऊन गेला. हाच तो अर्जुन असे सिद्ध करण्याच्या अवस्थेत कुणीच नव्हते. तरीसुद्धा नंतर दुर्योधनाने आग्रहच धरला परंतु त्याचे म्हणणे गणिती हिशोबाच्या एका चुकीमुळे अवैध ठरलो. भीष्मद्रोणांनी खात्रीपूर्वक हिशोब मांडून म्हटले की तेरा वर्षे आता पूर्ण झाली आहेत आणि पांडवांना शोधून ओळख काढले तरीही द्यूतातील अट आता त्यांना लागू पडत नाही. दुर्योधनाचा आणखी एक

आई... नवरा असूनही झाली विधवा...
मातृत्वाचा वसा मात्र जपला...
एका आईच्या जीवनाचं बहुपदरी भावनाट्य

# द मदर

पर्ल एस. बक
अनु. : भारती पांडे
किंमत : ₹ ३००

ebook available




रशिया-अमेरिका शीतयुद्धातील
हेरगिरीवर आधारित
उत्कंठावर्धक कहाणी

TBC-33 Book No.4

# आइस स्टेशन झेब्रा

ॲलिस्टर मॅक्लीन
अनु. : अनिल काळे
किंमत : ₹ ५५०

ebook available



प्रयत्न वाया गेला.

ह्यानंतर पांडवांना त्यांचे राज्य परत करण्याचा मुद्दा उपस्थित झाला. वनवासाची तेरा वर्षे पूर्ण केल्यामुळे द्यूतात ठरल्याप्रमाणे इंद्रप्रस्थाचे राज्य त्यांना सुपूर्द करणे आवश्यक होते; पण दुर्योधन त्या गोष्टीला कबूल व्हावा कसा? ह्या तेरा वर्षांच्या काळात तो अधिकच सज्ज झाला आहे. भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र इत्यादी अतिवृद्ध झाले आहेत. दुर्योधनाच्या बाजूस कर्ण, शकुनी, दु:शासन वगैरेंचे सामर्थ्य आहे. आता पांडवांचे राज्य परत करायचे म्हणजे त्याने इतकी वर्षे जी धडपड केली ती व्यर्थच गेली म्हणायची! काय वाटेल ते होवो, पांडवांना इंद्रप्रस्थाचे राज्य परत द्यायचे नाहीच असा त्याने दृढनिश्चयच केला आहे. इंद्रप्रस्थ म्हणजे मुळात हस्तिनापूरच्या साम्राज्याचाच एक भाग होता आणि ज्येष्ठ धार्तराष्ट्र ह्या न्यायाने हस्तिनापूरच्या समग्र राज्यावर दुर्योधनाचाच अधिकार असू शकतो. समेटाचा संदेश घेऊन शिष्टाईसाठी आलेल्या कृष्णापुढेही दुर्योधनाने असाच दावा केला. आपल्यावरील दोषारोप उडवून लावण्यासाठी तो म्हणतो, ''द्यूत खेळायला युधिष्ठिर आपल्या स्वत:च्या मर्जीने आला होता. त्याला खेळायला कुणी भाग पाडले नव्हते. माझ्यातर्फे शकुनी फासे टाकेल हे सुरुवातीलाच ठरले होते. ते जर सुसंगत नव्हते तर युधिष्ठिराने खेळायचेच नव्हते. शकुनी आपल्या कौशल्याने एकेक डाव जिंकत होता तरी युधिष्ठिर कशाला पुन्हा पुन्हा खेळत राहिला! प्रश्न उरला इंद्रप्रस्थ परत करण्याचा. हे इंद्रप्रस्थ पांडवांना दिले हेच मुळात चुकीचे होते. ती चूक आता सुधारण्यात गैर काय आहे?''

दुर्योधनाच्या स्वभावातील अहंकार आणि असूया पाहता येथवरचे त्याचे म्हणणे त्याच्या स्वभावाला साजेसेच होते असे मानले तरी त्यानंतर, शिष्टाईसाठी आलेल्या कृष्णाला कैद करून पांडवांना असहाय करून टाकण्याचा जो बेत करतो त्यातून स्वत:चे हिताहित न समजणाऱ्या असंतुलित मनाचेच दर्शन घडले. वेडापिसा झालेला माणूस जसे काय वाटेल ते करू लागतो तशी वृत्ती येथे दिसते. त्याची ही योजना तो प्रत्यक्षात आणू शकत नाही हे त्याचे सुदैवच! कृष्ण, भीष्म, द्रोण, गांधारी आणि धृतराष्ट्र सर्वजण जेव्हा होणाऱ्या सर्वनाशाची जबाबदारी त्याच्यावरच असेल असे म्हणतात तेव्हा इतर सर्व तर्कांना आणि विधानांना पूर्णविराम देत तो म्हणतो, ''तुम्ही काहीही म्हणा, ईश्वराने मला जसा घडवला तसा मी हा असा आहे आणि तसाच वागतो आहे!'' (उद्योगपर्व - १४०/४०) ह्या ठिकाणी दुर्योधनाच्या तोंडचा म्हटल्या गेलेल्या एका श्लोकाचा मोठमोठ्या विद्वानांनी आणि अभ्यासकांनी वारंवार उल्लेख केला आहे. हा श्लोक सुपरिचित आहे.

जानामि धर्मं न च मे प्रवृत्ति: ।<br>
जानाम्यधर्मं न च मे निवृत्ति: ।।

'धर्म काय आहे ते मी जाणतो; पण आचरू शकत नाही आणि अधर्म काय तेही मी जाणतो; पण त्यागू शकत नाही.'

महाभारतात दुर्योधनाचा हा श्लोक अजिबात नाही. शोधूनही सापडत नाही. ज्या पद्धतीने कथेकऱ्यांनी आणि तथाकथित विद्वानांनी निव्वळ अनधिकृतपणे युधिष्ठिराच्या तोंडी 'नरो वा कुंजरो वा' ही उक्ती घातली आहे तशीच ही उक्ती आहे. दुर्योधनाने जर असे म्हटले असेल तर त्याला महाभारतातील एकूण एक पात्रांपैकी सर्वाधिक प्रामाणिक म्हटले पाहिजे कारण तो स्पष्टपणे आपल्या मर्यादांचा स्वीकार करतो आहे. दुसरी सगळी पात्रे आपापल्या अधर्माचरणावर धर्माचरणाची झूल पांघरण्याचा आटोकाट प्रयत्न करतात, ह्या श्लोकात तर दुर्योधनाने आपल्या मर्यादा प्रामाणिकपणे स्वीकारल्या आहेत.

युद्धाच्या सुरुवातीला, आदल्या दिवसाच्या सायंकाळी दुर्योधन शकुनिमित्र उलूकाहाती पांडवांना जो संदेश पाठवतो तो अनावश्यकच आहे कारण संजय आणि श्रीकृष्ण अशा संदेशांची देवाणघेवाण करून चुकले होते आणि तरीही युद्ध टाळता आले नव्हते. उलूकाचे दूतकर्म ह्याच्या अगदी उलट तऱ्हेचे आहे. दुर्योधन उलूकाकरवी आपल्या वीरतेचे वर्णन करवतो. 'हजारो अर्जुन आणि शेकडो कृष्णांसह तुम्ही कुणीच मला युद्ध करण्यापासून थांबवू शकणार नाही' अशी बालिश बढाई मारतो. युधिष्ठिराला तो निरोप पाठवतो, ''द्यूतात पराजित झालास, पत्नीही गमावलीस, तुझ्या डोळ्यांदेखत तुझ्या पत्नीला आम्ही भरसभेत ओढून आणले, वनवास भोगलास आणि शेवटी विराटाचा दासही झालास. आता तरी मर्द हो!'' पोकळ वल्गनांव्यतिरिक्त ह्यात अधिक काही नाही.

शेवटी युद्ध झालेच. युद्धाच्या कोणत्याच टप्प्यात दुर्योधनाला वीरपुरुष म्हणता येण्यासारखे नाही. तो पराक्रमी आहे, शूर आहे, आवेशाने लढला आहे, शस्त्रास्त्रात प्रवीण आहे हे खरे; पण तो कुठेही भीष्मद्रोणच काय पण अर्जुन, भीम वा कर्णाच्या तोडीचा वाटत नाही. ह्या अठरा दिवसांत तो पुष्कळ वेळा धृष्टद्युम्न, नकुल, सात्यकी, घटोत्कच किंवा अभिमन्यूच्या हातूनही पराजित झाला आहे. भीष्मांना आणि नंतर द्रोणांना त्याने सेनापतिपद सोपवले आहे; पण ह्या दोघा वडीलमाणसांच्या मनात पांडवांबद्दल सदिच्छा आणि कोमल भावना आहेत हे त्याला ठाऊक आहे. म्हणूनच, आधी भीष्मांना आणि नंतर द्रोणांना 'तुम्ही आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी लढत नाही आणि पांडवांचा नाश करत नाही', असे वारंवार म्हणतो. सगळे सैन्य ज्यांच्या ताब्यात दिले आहे त्यांच्यावरच जर

अविश्वास असेल तर युद्ध कधी जिंकता येत नाही. दुर्योधन कठीण परिस्थितीत सापडला आहे. भीष्मद्रोणांना सेनापती केल्याविना चालणार नाही; पण त्यांच्यावर पूर्ण विश्वासही नाही. अशा अविश्वासाला सबळ कारणही आहे. सत्य आणि न्याय पांडवांच्या बाजूला आहे आणि आपण त्यांचा वध करू शकणार नाही असे भीष्मद्रोणांनी पुष्कळदा म्हटलेच आहे.

दुर्योधन समजून घेण्यासाठी अठरा दिवसांच्या ह्या युद्धातील दोन घटनांची नोंद घेतली पाहिजे. एकदा सात्यकी आणि दुर्योधन समोरासमोर आले आणि त्यांच्यात तुंबळ युद्ध झाले. त्यावेळी विरागीपणे दुर्योधन सात्यकीला म्हणतो, ''सात्यकी, आपण आधी मित्र होतो, आता शत्रू होऊन परस्परांचा वध करण्यासाठी लढत आहोत. धिक्कार असो आपल्या क्षात्रधर्माचा, ज्याला जीवनापेक्षा मृत्यू प्रिय आहे! संपत्ती आणि भूमीसाठी आपण हे काय करत आहोत!'' ह्या उद्गारांकडे निव्वळ स्मशानवैराग्य म्हणून बघता येणार नाही. असे उद्गार उगाच निघत नाहीत. विशेषत: दुर्योधनासारख्या व्यक्तीच्या बाबतीत तर नसतातच. त्याच्या मनात आधीपासूनच अशी भावना नक्कीच घोळत असणार; पण त्याच्या अहंकारामुळे त्या भावनांना त्याने कधी व्यक्त होऊ दिले नसेल. युद्धाच्या भीषणतेमध्ये आणि स्वजनांच्या मृतदेहांच्या ढिगामध्ये हा सुद्धा एक प्रकारचा अर्जुनाच्यासारखाच विषाद आहे. अर्जुनाचा विषाद योग बनू शकला कारण त्याला कृष्णाचा संस्पर्श झाला, दुर्योधनाच्या विषादाचे उगमस्थान विशुद्ध नसल्याने तो व्यर्थ ठरला.

दुसरा प्रसंग आचार्य द्रोण पडल्यानंतर कर्णाच्या सेनापतिपदाखाली युद्ध सुरू असतानाचा आहे. युद्धाचे पंधरा दिवस पूर्ण झाले आहेत. भीष्मद्रोणांच्या पतनानंतर कर्ण कितीही शौर्याने वा आवेशाने लढला तरी युद्ध विजयात परिवर्तित करण्याची आता कर्णाची कुवत नाही ही गोष्ट अश्वत्थाम्याच्या लक्षात आली आहे. पराजय निश्चित असताना, अहंकार दूर ठेवून समेट करण्यातच शहाणपणा आहे असा सल्ला युद्ध सुरू असतानाच तो दुर्योधनाला देतो. पांडवांना देणे न देणे दूरच राहो, हस्तिनापूर पांडवांकडून वाचवून परत मिळविणे महत्त्वाचे आहे आणि असे करण्यानेच महामृत्यूपासून सर्वांना वाचवता येईल ही गोष्ट अश्वत्थामा दुर्योधनाला प्रत्ययकारीपणे समजावतो. मात्र दुर्योधन त्याचे सांगणे मान्य करत नाही. भीमाबद्दलचे त्याच्या मनातील प्रचंड वैर तो व्यक्त करतो आणि एक तर विजय किंवा मग सर्वनाश हे दोनच पर्याय पुढे ठेवतो.

अखेरीस सर्वनाशच झाला.

कर्णाच्या वधानंतर युद्ध केवळ नावापुरतेच उरले होते. तरी शल्याच्या सेनापतिपदाखाली ते आणखी एक दिवस लांबले. अठराव्या दिवसाच्या शेवटी उरलेसुरले कौरव सैनिक पळून तरी गेले अथवा शरण तरी गेले. शल्यवधाबरोबर युद्धाचा अंत झाला. भीमाने नव्याण्णव भावांना मारले होते आणि एकमात्र दुर्योधन अजून वाचला होता. त्याच्या पक्षाचे आता फक्त तिघेच उरले होते - अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा. ह्यापुढे आपण आता वाचू शकत नाही, जिंकू शकत नाही आणि लढूही शकत नाही हे भयानक सत्य लक्षात आल्यानंतर दुर्योधन रणभूमीच्या बाहेर एका सरोवराच्या पाण्याखाली लपून बसला. असे लपून बसणे भ्याडपणाच आहे, जीव वाचविण्याचा एक दुर्बल प्रयत्न आहे.

तरीही, दुर्योधन जिवंत असेपर्यंत पांडव विजयी झाले असे कसे म्हणता येईल? दुर्योधनाला शोधत शोधत श्रीकृष्णासह


नियतीचे फासे, कधी पडतात उलटे... पण नियती आणि मूल्यं यांच्यातील संघर्षात जिंकतं कोण? विजय, नीला, अरविंद की निर्मला?... भावनिक संघर्षाचं चित्रण करणारी उत्कंठावर्धक कादंबरी

विजय

भा. द. खेर

किंमत : ₹ २५०

ebook available



पांडव ह्या सरोवराकाठी येऊन पोहोचले. काठावर उभे राहून युधिष्ठिराने दुर्योधनाला दूषणे देत म्हटले, ''अरे दुर्योधना, इतक्या आप्तेष्टांना मृत्यूच्या तोंडी ढकलून आता स्वत:चा जीव वाचवायला असे पाण्याच्या तळाशी लपून बसताना तुला लाज कशी वाटत नाही? तू स्वत:ला अमर आणि अपराजित म्हणवत होतास ना? मग ये आता बाहेर आणि तुझ्या सगळ्या वल्गना खऱ्या करून दाखव!''

ह्यानंतरचे संवाद दुर्योधन, युधिष्ठिर आणि श्रीकृष्ण, तिघांच्याही व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकतात. युधिष्ठिराच्या प्रश्नाला दुर्योधनाने पाण्याखालूनच दिलेले उत्तर एवढ्या करुणगंभीर प्रसंगातही करमणूक करणारे आहे. एखाद्या भित्र्या पोराने भ्याल्यावर आपल्या डोक्यावरून पांघरुण घेऊन उत्तर द्यावे तसे दुर्योधन म्हणतो, ''मी काही तुम्हाला भिऊन येथे लपलो नाही. खूप थकून गेल्यामुळे मी येथे विश्रांती घेत आहे; तुम्हीही आता जा आणि आराम करा.'' ह्यानंतरही युधिष्ठिर त्याला दूषणे देतोच आहे. तेव्हा दुर्योधन म्हणतो, ''आता ह्या पृथ्वीवर राज्य करण्यासारखे उरलेच काय आहे? पृथ्वीवरचे वैभव, उत्तमोत्तम माणसे, सगळ्याचा नाश झाला आहे. तसे तर आजही मी एकट्या हाती तुम्हा सगळ्यांचा नाश करून विजय मिळवू शकतो; पण एखाद्या विधवेसारख्या झालेल्या ह्या पृथ्वीचा उपभोग घेण्यात मला आता स्वारस्य उरले नाही. युधिष्ठिरा, तू आणि तुझे भाऊ, तुम्हीच ह्या पृथ्वीवर राज्य करा. जा मी ती तुम्हाला देऊन टाकतो. ह्यापुढे मी अरण्यात जाऊन मृगचर्म पांघरून तपस्या करेन.'' अहंकारी मनुष्य दुबळा झाला तरी त्याचा अहंकार त्याला कोणत्या दिशेने फरफटत नेतो त्याचे उत्तम उदाहरण असल्यासारखी दुर्योधनाची ही वाक्ये आहेत. दुर्योधनाची बडबड ऐकून युधिष्ठिर म्हणतो, ''तुझ्यात अजून सामर्थ्य असेल तर बाहेर येऊन तुला हवे ते शस्त्र निवड. तू मागशील तो रथ आणि शस्त्र मी देतो. आम्हांला सगळ्यांना जिंकून घेण्याची तू बढाई मारतोच आहेस; पण आमच्यापैकी एकाला जरी तू द्वंद्वयुद्धात हरवलेस तरी, घे, मी तुला वचन देतो की ह्या पृथ्वीचे राज्य तुला परत मिळेल.''


ह्याक्षणी दुर्योधन बाहेर येण्याचाच काय तो अवकाश होता! बाहेर येऊन त्याने भीमाखेरीज इतर कुणाही पांडवाला गदायुद्धाचे आव्हान दिले असते तर दुर्योधनाचा विजय निश्चित होता. मग युधिष्ठिराने दिलेल्या वचनानुसार, पांडवांच्या विजयाचे पाहता पाहता पराजयात रूपांतर झाले असते. दुर्योधनाला ही उत्तम संधी होती. त्याने ती ताबडतोब अमलात आणायला हवी होती; पण कृष्णाने परिस्थिती तत्काळ ताडली. दुर्योधनाचा स्वभाव नीट ओळखून असणाऱ्या कृष्णाने भीमाला म्हटले, ''भीमा, धृतराष्ट्राच्या नव्याण्णव पुत्रांना तू मारलेच आहेस. आता ह्या शंभराव्या धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाला मारून आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा क्षण येऊन ठेपला आहे. तुझ्या हल्ल्यापुढे त्याचा निभाव लागणार नाही. चढव हल्ला आणि दुर्योधन मेलाच म्हणून समज.'' कृष्णाच्या ह्या बोलण्याचे समर्थन करत भीम म्हणाला, ''दुर्योधनाला आज माझी गदा भारी आहे. आज माझ्या हातून त्याचा मृत्यू अटळ आहे.'' कृष्ण आणि भीमाचा हा संवाद म्हणजे दुर्योधनाच्या अहंकाराला आव्हानच आहे. हे संभाषण ऐकताच दुर्योधनाचा दुखावलेला अहंकार असा काही भयंकर उसळी मारून आला की परिणामाचा विचार केल्याविनाच त्याने भीमाला गदायुद्धाचे आमंत्रण दिले. नकुल, सहदेव अथवा अन्य कुणालाही आव्हान देऊन तो अगदी सहज जिंकला असता. त्याने तसे केले नाही ह्यात वीरतेचा फारसा भाग नव्हता. पाण्याखाली लपून बसला तेव्हाच वीरता लोप पावली होती. आता ह्या क्षणी ज्या व्यवहारचातुर्याची गरज होती ते चातुर्य ना युधिष्ठिराने दाखवले ना दुर्योधनाने! हस्तिनापूरच्या गादीचे हे दोन्ही वारस प्रतिस्पर्धी ऐन कसोटीच्या क्षणी सारखेच निष्फळ ठरले आहेत.


श्रीपती आणि रुक्कीचं जुळलं सूत छान... या प्रकारानं उठलं रान..
'झंगाटा'नं या मग गाजवलं गाव

झंगाट

महादेव मोरे

किंमत : ₹ २३०




ebook available

दुर्योधनाशी धर्मयुद्ध करून त्याला पराजित करणे भीमाला शक्य होणार नाही अशी शंका कृष्णाने युद्धाच्या आरंभीच व्यक्त केली आहे. गदायुद्धात दुर्योधन अधिक प्रवीण, अधिक अनुभवी होता. भीमाची ताकद जास्त होती. युद्धात केवळ शक्ती नव्हे तर अनुभव आणि कौशल्य जास्त महत्त्वाचे असते. महायुद्धाच्यावेळी कुणाचाच पक्ष न घेता, तटस्थ राहून, तीर्थयात्रेला गेलेला संकर्षण बलराम नेमका आत्ता परत येऊन पोहोचला होता आणि हे युद्ध पाहत होता. कृष्णाच्या मनातील शंका खरीच होती. युद्ध खूप वेळ चालले. भीम थकत चालला आणि दुर्योधनाचा वरचष्मा होत असलेला सर्वांना दिसून येत होता. युद्ध असेच सुरू राहिले तर दुर्योधन नक्कीच जिंकेल अशी भीती वाटू लागली होती. त्यावेळी कृष्णाने भीमाला अर्जुनामार्फत इशारा केला, ''भीमा, दुर्योधनाची मांडी फोडण्याची तुझी प्रतिज्ञा विसरला नाहीस ना?'' मांडीवर प्रहार करणे निषिद्ध होते. भीम पराभवाच्या टोकावर उभा होता. शेवटचा निकराचा प्रहार करण्यासाठी दुर्योधनाने उडी घेतली त्याचवेळी भीमाने त्याच्या मांडीवर घाव घातला. असा हल्ला दुर्योधनाला अपेक्षित नव्हता. तो भूमीवर कोसळला. जमिनीवर पडलेल्या दुर्योधनावर शेवटचा जिव्हारी घाव घालत भीमाने त्याच्या मस्तकावर लाथ मारली. मरणाच्या उंबरठ्यावर असलेल्या दुर्योधनाला भूतकाळातील कटू आठवणी काढून तो घालूनपाडून बोलू लागला. भीमाच्या ह्या अधर्माचरणाने संतापलेल्या बलरामाने भीमाला मारण्यासाठी आपले शस्त्र उगारले तेव्हा कृष्णाने त्याला शांत करत म्हटले, ''आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी हे अधर्माचरण करणे भीमाला प्राप्तच होते. त्याने प्रतिज्ञा पूर्ण केली नसती तर तो खोटारडा ठरला असता. प्रतिज्ञापालनासाठी अशा अधर्मावाचून इलाजच नव्हता.'' ह्यावेळी अखेरीस दुर्योधन म्हणतो, ''मरणाचा मला खेद नाही. मी जीवनाचा भरपूर उपभोग घेतला आहे. मी अध्ययन केले, शासन केले, यज्ञ केले, दाने दिली आणि जिवंत शत्रूच्या मस्तकावर पाय देऊन उभा राहिलो. भीमाचा विजय धर्माचा विजय नाही. मी तुमच्या अधर्मामुळे हरलो आहे. रणभूमीवर पडलेल्या देहाला स्पर्श करण्याचे काम कावळ्या-गिधाडांचे असते; ते काम भीमाने केले आहे.'' दुर्योधनाचे हे बोलणे जणू निसर्गाला मान्य असावे तसा, महाभारतकार म्हणतात, शीतल वारा वाहू लागला, पुष्पवृष्टी झाली, इंद्रनील आकाश चमकू लागले आणि संगीताच्या सुरावटींसह अंतरिक्षात उभे असलेले देवगण 'धन्य! धन्य!' असे पुकारू लागले. दुर्योधनाचा हा शेवट पांडवांना लज्जित करणारा आहे.

हा क्षणिक उद्रेक होता. अजून दुर्योधन मरण पावला नव्हता. शेवटचे श्वास मोजत पडलेल्या दुर्योधनाला तसेच सोडून पांडव आपल्या शिबिरात निघून गेले. त्यारात्री अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा - जगले वाचलेले हे तिघे कौरव सेनानी मरू घातलेल्या राजापाशी पोहोचले. आम्ही तिघेच युद्ध सुरू ठेवू असे त्यांनी राजाचे सांत्वन केले. दुर्योधनाचा दुखावलेला अहंकार पुन्हा उफाळून आला. त्याने ह्या प्रस्तावाचे आनंदाने स्वागत केले आणि अश्वत्थाम्याला सेनापतिपदही दिले. ज्या राजाच्या हातात पाणी घेण्याइतकेही सामर्थ्य उरले नव्हते त्या राजाने सेनापतीची नेमणूक केली! सेनापती अश्वत्थाम्याने त्याच रात्री पांडवांच्या शिबिरात घुसून द्रौपदीचे पाच पुत्र आणि पांडव सेनापती धृष्टद्युम्न झोपेत असतानाच त्यांची कत्तल केली. आपण मिळवलेल्या ह्या यशाची खबर सांगायला ते दुर्योधनाकडे आले. दुर्योधन अखेरच्या घटका मोजत होता. तरीही अश्वत्थाम्याने द्रौपदीची मुले आणि धृष्टद्युम्नाला निर्घृणपणे मारून टाकल्याची बातमी ऐकून तो अतिशय खूष झाला. सर्वनाशाच्या अखेरच्या क्षणीही तो म्हणतो, ''अश्वत्थामा, तू आज माझ्यासाठी जे केलेस तसे तर ह्यापूर्वी पितामह भीष्म, आचार्य द्रोण अथवा पराक्रमी कर्णही करू शकले नव्हते! तू धन्य आहेस! आता मी निश्चिंतपणे मरतो. आता आपण स्वर्गातच भेटू!'' ह्या शब्दांसह दुर्योधनाने प्राण सोडला. दुर्योधनाच्या प्राणत्यागाबरोबरच युद्ध समाप्त झाले. दोन्ही पक्षांतील अठरा अक्षौहिणी सैन्यापैकी आता कौरव पक्षात तीन आणि पांडवपक्षात सात जण एवढेच उरले होते!


मनुष्य एकदा अहंकार आणि असूयेसारख्या विकारांच्या आहारी गेला की, स्वत:चाच नव्हे तर दुसऱ्यांचाही नाश कसा ओढवून घेतो ह्याचे दुर्योधन हे ज्वलंत उदाहरण आहे. ह्या विनाशकारी विकारांवर नियंत्रण करण्याऐवजी त्यात धृतराष्ट्राच्या पुत्रमोहाची भरच पडली ही महाभारताची शोकांतिका आहे. दुर्योधनाने आपल्या शासनात कुठे उणीव येऊ दिली नव्हती. तो विद्वान होता आणि धर्माबद्दल अनभिज्ञही नव्हता. तो मुत्सद्दी होता; पण अहंकार आणि ईर्षा हे अवगुण त्याच्यावर स्वार झाले होते त्यामुळे त्याचे इतर गुण झाकले गेले आणि शेवटी तो खलनायक ठरला.

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'महाभारतातील पितृवंदना' या दिनकर जोषी लिखित पुस्तकातून)**

◆◆◆

ती आली, तिने पाहिले, पण ती जिंकणार त्यापूर्वी, त्याची आई तिच्या मनसुब्यांना सुरुंग लावते आणि मग सुरू होते कुरघोड्यांची एक चित्तथरारक कथा

## द गर्लफ्रेंड





मिशेल फ्रॅन्सेस
अनु : उज्ज्वला गोखले
किंमत : ₹ ७००

ebook available

पौगंडावस्थेतल्या अल्लडपणातून घडलेल्या गुन्ह्यांचा शोध काढताना एल्विस कोल आणि ज्यो पाइकनं वापरलेल्या शोधतंत्रांची रंजक कथा...

## द वॉन्टेड




रॉबर्ट क्रेस
अनु. : सुरेश देशपांडे
किंमत : ₹ ४१०

ebook available


आयडॉक या ॲपची निर्मिती...
त्यामुळे ओढवलेला सहा रुग्णांचा मृत्यू...
याबाबत एका रेडिऑलॉजिस्टने
केलेल्या संघर्षाचं उत्कंठावर्धक चित्रण

TBC-32 Book No.2

# सेल

रॉबिन कुक
अनु : डॉ. अजेय हर्डीकर
किंमत : ₹ ७००

ebook available




स्वत:च्याच खुनाचा बनाव रचला ॲमीने..
तिच्या नवऱ्याला, निक्‌ला अडकवण्यासाठी...
निक्‌ही देऊ पाहत होता शह... ॲमी-निक्‌च्या
परस्परांवरील कुरघोड्यांचं रंगतदार, थरारक चित्रण


# गॉन गर्ल

गिलियन फ्लिन
अनु. : सई साने
किंमत : ₹ ७५०

ebook available



।। पुस्तकाच्या पानांतून ।।




# सचित्र रामायण

डॉ. वृषाली पटवर्धन

सुमंत्राला अयोध्येला पाठवून राम, सीता आणि लक्ष्मण पवित्र गंगानदीच्या किनारी आले. पुढे वनवासात जाण्यासाठी त्यांना ही नदी पार करून पैलतिरी जाणं गरजेचं होतं. रामानं इकडेतिकडे पाहिलं. त्याला किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर एक नावाडी आपली नाव घेऊन बसलेला दिसला. त्यानं नावाड्याला बोलावलं आणि तिघांना नदी पार करून पलीकडच्या तीरावर सोडण्याची विनंती केली.

नावेतून लोकांना या तीरावरून त्या तीरावर घेऊन जाणं हा तर नावाड्याचा रोजीरोटीचा धंदा होता. पण त्यानं रामाला ओळखलं. रामाला वाकून नमस्कार करून तो म्हणाला, "देवा, तुम्ही कोण आहात हे मला माहीत आहे. तुमच्याच पायाच्या स्पर्शानं शिळा झालेली एक बाई पुन्हा जिवंत झाली, हे मी ऐकलंय. तुमच्या पायात दैवी शक्ती आहे. माझी होडी साधी लाकडाची आहे. तुम्ही त्यात पाय ठेवल्यावर ती काही वेगळीच झाली तर? ही होडीच माझ्या घरादाराचं पोषण करायचं साधन आहे. मला क्षमा करा. मी आपल्याला पैलतिरी नेऊ शकत नाही.'' नावाड्याचं बोलणं ऐकून राम हसला. "अरे भाऊ, मी, माझी पत्नी सीता आणि बंधू लक्ष्मण यांना नदी पार करून जाणं गरजेचं आहे. कृपा करून तू आम्हाला मदत कर.'' - रामानं त्याला पुन्हा विनंती केली. नावाड्यानं क्षणभर विचार केला आणि तो म्हणाला - ''महाराज, मी तुम्हाला माझ्या होडीतून घेऊन जाईन. पण माझी एक अट आहे. तुम्ही होडीत बसण्याआधी तुमचे पाय धुवेन. मगच तुम्ही होडीत बसावं. नाहीतर तुमच्या पायावरच्या धुळीनं माझ्या होडीचं रूप बदलून ती एखादी बाई व्हायची!" त्याचं बोलणं ऐकून तिघांना खूप हसू आलं. राम म्हणाला, "तुला जर तसं वाटत असेल, तर तू माझे पाय धू. आणि मग आम्हाला घेऊन जा. झालं समाधान ?" हे ऐकून नावाडी धावत गेला आणि एका लाकडी भांड्यात गंगेचं पाणी घेऊन आला. रामासमोर गुडघे टेकून बसला.

मोठ्या प्रेमानं हळुवारपणे त्यानं रामाचे पाय धुतले. आपल्या उपरण्यानं पाणी टिपून घेतलं. रामाचे पाय धुण्याचं भाग्य आपल्याला लाभलं याचा त्याला खूप आनंद झाला. अगदी धन्यधन्य वाटलं. स्वर्गलोकातून हे दृश्य पाहणाऱ्या देवांनासुद्धा नावाड्याच्या दुर्लभ भाग्याचा हेवा वाटला. रामाचे पाय धुतल्यानंतर नावाड्यानं तिघांनाही नावेत बसायला साहाय्य केलं.

त्या तिघांना कुठलाही त्रास होऊ नये, उलट नावेत बसल्याचा आनंद व्हावा यासाठी नावाडी अगदी काळजीपूर्वक नाव हाकत होता. नाव दुसऱ्या तीरावर लागल्यावर नावाडी आधी उतरला आणि त्यानं तिघांना नावेतून उतरायला मदत



केली. रामाच्या पायावर डोकं ठेवून आशीर्वाद घेतला.

रामाचा भक्त असलेल्या त्या नावाड्याचं सीतेला कौतुक वाटलं. तिनं प्रसन्न होऊन त्याला मौल्यवान अंगठी देऊ केली. पण त्यानं नम्रपणे ती भेट नाकारली. तो म्हणाला, "सीतामाई, मला आपल्या तिघांची सेवा करायचं भाग्य लाभलं. आपला माझ्यासाठी याहून मौल्यवान काय असणार? मला दुसरं काही नको. आपली कृपा असावी.'' असं म्हणून पुन्हा एकवार तिघांना वंदन करून तो नाव घेऊन निघाला. राम-लक्ष्मणानं पवित्र गंगेत स्नान केलं. गंगामातेनं तिघांनाही पुढील वनवासासाठी आशीर्वाद दिला. आता राम-सीता-लक्ष्मण पुढे निघाले. लवकरच गंगेचा किनारा मागे पडला. दाट अरण्य सुरू होणार हे पाहून राम लक्ष्मणाला म्हणाला, ''लक्ष्मणा, आता तू पुढे राहा. सीता मधे असेल आणि मी तुमच्यामागे.'' दोघांच्यामध्ये सीतेनं असणं रामाला सुरक्षित वाटत होतं. जंगली श्वापदांपासून सीतेचं रक्षण करण्याचा तोच एक मार्ग होता. डोंगर, दऱ्याखोऱ्या-झाडंझुडपं यातून तिघं मार्ग काढत होते.

काट्याकुट्यांनी भरलेल्या जमिनीवर तिघांनी आजवर कधीच पाऊलही ठेवलं नव्हतं; पण 'हे आपलं प्रारब्ध आहे', असं समजून तिघांनी हे वनवासी आयुष्य स्वीकारलं. मजल दरमजल करत ते भारद्वाज ऋषींच्या आश्रमात पोहोचले. तिथं ऋषींनी अत्यंत प्रेमानं त्यांचं स्वागत केलं. त्यांची सगळी हकिकत ऐकून घेतली. सारी परिस्थिती त्यांच्या लक्षात आली.

ते म्हणाले, "रामा, या वनात तुमच्यासाठी सुरक्षित जागा एकच आहे चित्रकूट पर्वत. तिथे तुम्ही राहावं.'' रामानं त्यांचा सल्ला मानला आणि तिघं चित्रकूट पर्वताच्या दिशेनं निघाले. इकडे सुमंत्र मोठ्या जड अंतःकरणानं अयोध्येत पोहोचला. सुमंत्राला एकटंच आलेलं पाहून महाराज दशरथ आणि रामाची आई कौसल्या यांच्या हृदयाचा बांध फुटला. अत्यंत दुःखी होऊन दशरथानं विचारलं, ''सुमंत्रा, तू एकटाच कसा परत आलास? माझा लाडका राम कुठे आहे? तो नाही आला तुझ्याबरोबर? अरे, माझ्या रामाशिवाय मी कसा जगू? सांग सुमंत्रा, माझ्या रामाला तू कुठे सोडून आलास? कुठं आहे माझा राम?" कौसल्या मातेच्या डोळ्यांतून तर अश्रूंचा जणू पूरच वाहत होता - ''सुमंत्रा, मला माझ्या रामाकडे घेऊन चल. मीसुद्धा त्याच्याबरोबर वनात राहीन. माझा राम मला सोडून त्या वनात कसा राहील? माझा लक्ष्मण आणि सीता कसे आहेत? ती तर अगदीच लहान पोर आहे रे-''कौसल्येला शोक अनावर झाला होता.

''महाराज, महाराणी! रामानं मला तुमच्याबरोबर राहायला, तुमची काळजी घ्यायला सांगून परत पाठवलंय. कैकेयी मातेची इच्छा पूर्ण करण्यासाठी तो आता पुढची चौदा वर्षं वनवासात राहणार आहे.'' हे ऐकून कौसल्या माता

ओक्साबोक्सी रडू लागली. महाराजा दशरथ तर हे ऐकून जमिनीवरच कोसळले. मस्तक दोन्ही हातात धरून ते विलाप करू लागले. ''भूतकाळातील घटनांचे परिणाम वर्तमान काळावर होतातच. त्यांच्यापासून कोणाचीही कधीही सुटका होत नाही, हे आता मला कळून चुकलं आहे. तरुणपणी माझ्या हातून घडलेल्या एका भयंकर पापाचीच ही मला शिक्षा मिळते आहे.'' महाराणी कौसल्येला महाराज काय बोलताहेत हे कळेना. मंत्री सुमंत्रालाही महाराजांच्या जीवनात ही कुठली घटना घडून गेलीये हे समजेना. दोघंही दशरथाकडे बघू लागले. दशरथ म्हणाला, ''माझ्या तरुणपणातली ही घटना आहे. मी उत्तम धनुर्धर होतो आणि मला शिकारीचा छंद होता. वनात जाऊन शिकार करणं मला आवडायचं. वनात एखाद्या प्राण्याला प्रत्यक्ष न बघता त्याच्या फक्त आवाजाच्या दिशेनं अचूक तिरंदाजी करण्यात मी पटाईत होतो. नुसत्या आवाजाच्या दिशेनं बाण मारून मी नेमकं सावज टिपत असे. एकदा असाच मी शिकारीला गेलो होतो. रात्र झाली होती. सगळीकडे अंधार पसरलेला होता. मी सावजाच्या शोधात होतो.

आला असावा, असं समजून मी त्या आवाजाच्या दिशेनं बाण मारण्यासाठी धनुष्यावर बाण चढवला. प्रत्यंचा ओढली - माझा बाण सूं-सूं करत गेला आणि त्यानं सावजाचा वेध घेतला आणि मला एका मुलाची किंकाळी ऐकू आली-म्हणजे? मला तर काहीच कळेना-मी धावत तिकडे गेलो नदीकाठी एक मुलगा पडलेला होता-माझा बाण त्याला लागला होता. तो शेवटच्या घटका मोजत होता. त्याचं नाव होतं श्रावण. त्याचे आईवडील अंध होते. तो त्यांना कावडीत बसवून स्वतः तीर्थयात्रेला घेऊन चालला होता. त्यांना तहान लागली म्हणून पाणी आणण्यासाठी तो नदीकाठी आला होता, असं त्यानं सांगितलं. नेमका त्याच्याच पात्राचा आवाज ऐकून मी बाण सोडला आणि बाणानं त्या श्रावणबाळाचा वेध घेतला. 'माझ्या तहानलेल्या आई-बाबांना एवढं पाणी नेऊन द्या' असं बोलून त्यानं प्राण सोडला.

मी ते पाण्याचं पात्र घेऊन त्याच्या आई-वडिलांकडे गेलो. माझी चाहूल ऐकून त्यांना वाटलं त्यांचा बाळच आला आहे. मी न बोलता त्यांना पाणी दिलं. 'बाळ, तू

बोलत का नाहीस? आमच्यावर रागावला आहेस का?' असं त्यांनी विचारल्यावरमात्र मी त्यांना खरं काय घडलं ते सांगून टाकलं. त्यांची क्षमा मागितली. पण त्या दुःखी, अंध म्हाताऱ्या आईवडिलांनी मला शाप दिला. म्हणाले, ''आम्ही जसे मुलाच्या वियोगानं मरत आहोत, तसाच तुलाही तुझा मुलगा सोडून जाईल. तूही पुत्रवियोगानं मरशील!'' राजा दशरथ सांगत राहिला, ''त्या क्षणापासून त्यांच्या शापानं माझी पाठ सोडली नाही. क्षणभरही मी त्यांचं बोलणं विसरू शकलो नाही आणि आज त्यांची शापवाणी खरी ठरली. माझ्या लाडक्या रामाशिवाय मी कसा जगू? आता माझं मरण मला दिसतंय.'' कौसल्या आणि सुमंत्रानं दशरथाला शांत करण्याचा प्रयत्न केला. दोघं राजाला त्याच्या महालात घेऊन गेले.

काही वेळानं राजा ओरडू लागला, ''कौसल्ये, माझ्या डोळ्यापुढे अंधारी येतेय. मला काहीही दिसत नाहीये. मीपण श्रावणाच्या आई-वडिलांसारखा अंध होणार. माझा राम माझ्याकडे परत येणार नाही का?



तो मला वाचवणार नाही का? राम! राम! राम! राम! राम!'' असं म्हणतम्हणतच दशरथानं अखेरचा श्वास घेतला. सगळ्या राजवाड्यात ही दुःखद वार्ता पसरली. सारी अयोध्या नगरी शोकसागरात बुडून गेली. महाराणी कौसल्या तर कोलमडून पडली. आधी पुत्रवियोगाचं दुःखं आणि आता हा पतिवियोगाचा दुःखाचा डोंगरच जणू तिच्यावर कोसळला होता. दशरथाच्या मृत्यूची वार्ता ऐकून महर्षी वसिष्ठ तिथे पोहोचले. आपल्या आजोळी गेलेल्या भरत आणि शत्रुघ्नालाही निरोप धाडला गेला. त्यांना आणण्यासाठी दूत पाठवले गेले. अयोध्येत काहीतरी दुःखद घटना घडली असावी, अशी त्यांना शंका आली. ते दोघं लगेच अयोध्येत आले. भरत त्वरेनं आपल्या आईच्या - महाराणी कैकेयीच्या महालात गेला. तिला वंदन करून त्यानं वडिलांबद्दल विचारलं. आपल्या वडिलांच्या मृत्यूची वार्ता ऐकून भरताला धक्काच बसला. तो मोठ्याने आक्रोश करायला लागला. थोडं सावरल्यावर त्यानं आईला रामाबद्दल विचारलं. कैकेयीनं घडलेल्या सगळ्या गोष्टी भरताला सांगितल्या. ''भरत बाळा, मी रामाला चौदा वर्षं वनवासात धाडलं आहे. आता तूच या अयोध्येचा राजा होणार आणि मी राजमाता!'' कैकेयीचं हे बोलणं ऐकून भरत अतिशय संतापला. तो म्हणाला, ''माते, तू हे काय केलंस? सत्तेच्या हव्यासापायी तू माझ्या पित्याचा जीव घेतलास! तुला 'आई' म्हणायची मला शरम वाटते. या क्षणापासून तुझा-माझा संबंध संपला!'' असं म्हणून तो त्वेषानं राजवाड्यातून बाहेर पडला. अयोध्येचा राज्यकारभार सांभाळण्यासाठी रामाला परत घेऊन येण्याची आणि अयोध्येच्या राजसिंहासनावर बसवण्याची आपल्या वडिलांची इच्छा पूर्ण करण्याची त्यानं शपथ घेतली नव्हे अशी प्रतिज्ञाच केली!

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'सचित्र रामायण' या डॉ. वृषाली पटवर्धन लिखित पुस्तकातून)**

◆◆◆

बच्चेकंपनीच्या मेंदूला खुराक देत
गुंतवून ठेवणाऱ्या जेफ्री आर्चर
यांच्या तीन रंगतदार बालकथा

## बाय रॉयल अपॉइन्टमेन्ट
## विली आणि खुनी किपर
## विलीची चौकोनी जगाची सफर

जेफ्री आर्चर
अनु : लीना सोहोनी
किंमत : ₹ ४५०

ebook available





गोष्टी छोट्या छोट्या छान...
गोष्टींच्या शेवटी संकल्प नीतिमान...
चित्रं आहेत सुंदर, देखणी...
कुमारांसाठी अनोखी पर्वणी

## छोटीशी पाऊलवाट
### व इतर गोष्टी

ज्ञानदा नाईक
किंमत : ₹ २९५

ebook available



गोष्टी छोट्या छोट्या छान...
गोष्टींच्या शेवटी संकल्प नीतिमान...
चित्रं आहेत सुंदर, देखणी...
कुमारांसाठी अनोखी पर्वणी




# राजवाडा आणि वन
## व इतरगोष्टी


ज्ञानदा नाईक
किंमत : ₹ २९५




# खरा गुरु कोण?
## व इतरगोष्टी

ज्ञानदा नाईक
किंमत : ₹ २९५

ebook available




# सचित्र महाभारत

डॉ. वृषाली पटवर्धन

।। पुस्तकाच्या पानांतून ।।

द्रोणाचार्यांच्या नकळत आणखी एकजण त्यांच्याकडून धडे घेत उत्तम धनुर्धर होत होता. त्याचं नाव 'एकलव्य'. द्रोणाचार्यांच्या ज्या आश्रमात राजपुत्र कौरव-पांडव युद्धकलेचं शिक्षण घेत होते, त्या आश्रमाजवळच तो राहत असे.

गेले काही दिवस द्रोणाचार्य शिष्यांना शिकवत असताना लहानगा एकलव्य बघत होता. एके दिवशी तो आईला म्हणाला, "आई, आचार्य द्रोणांकडून धनुर्विद्या शिकण्याची माझी इच्छा आहे. तू मला त्यांच्याकडे घेऊन जाशील?''

"नाही रे बाळा. हे शक्य नाही. आपण नीच जातीतले आहोत; त्यामुळे ते तुझा शिष्य म्हणून स्वीकार करणार नाहीत. त्यांच्याकडून धनुर्विद्या शिकायचं स्वप्न पाहू नकोस राजा!'' त्याच्या आईनं त्याची समजूत घातली; पण एकलव्यानं मनाशी पक्कं ठरवलं होतं-'त्यांनी मला शिष्य मानलं नाही म्हणून काय झालं? मी तर त्यांना 'गुरू' मानलं आहे ना!'-एकलव्य मनाशीच म्हणाला. त्यानं गुरू द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा तयार केला आणि तो आपल्या घराजवळच्या झाडाखाली ठेवला. रोज सकाळ-संध्याकाळ तो आपल्या गुरूंच्या प्रतिमेची पूजा करत असे आणि त्या प्रतिमेसमोरच 'जणू तेच शिकवताहेत' असं मानून, स्वतःच धनुर्विद्येचा अभ्यास करत असे.

तो झाडामागे लपून द्रोणाचार्य शिष्यांना कसं आणि काय शिकवतात, ते पाहत असे. एकलव्य अत्यंत बुद्धिमान होता. त्यानं लवकरच सगळं कौशल्य आत्मसात केलं. स्वतः द्रोणाचार्य जसे बाण सोडत, तसेच बाण एकलव्य सोडू शकत असे. त्यानं स्वत:च ही विद्या आत्मसात केली होती; पण तो मात्र त्याचं श्रेय द्रोणाचार्यांनाच देत असे. तो स्वतःला त्यांचा शिष्य मानत असे.

एके दिवशी अद्भुत घटना घडली. द्रोणाचार्य आणि अर्जुन एकलव्याच्या घराजवळूनच जात होते. दुपारची वेळ होती. सगळीकडे सामसूम होती. बहुतेक जण वामकुक्षी घेत होते. अचानक, एका कुत्र्याच्या जोरजोरात भुंकण्यानं त्या शांततेचा भंग झाला. जवळपासच कुठेतरी एकलव्य धनुर्विद्येचा सराव करत होता. त्या कुत्र्याच्या सततच्या भुंकण्यानं तोही वैतागला आणि कुत्र्याला मुळीसुद्धा इजा होणार नाही असा बाण त्यानं कुत्र्याच्या उघड्या तोंडात सोडला-तेही त्याच्यासमोर न जाता-नुसत्या त्याच्या आवाजाच्या दिशेनं अचूक बाण सोडून! त्या बाणानं कुत्र्याचं तोंड मिटलं गेलं-हे सगळं द्रोणाचार्य आणि अर्जुनानं बघितलं. ते चकित झाले.

'एखादा कसलेला धनुर्धरच असा बाण सोडू शकतो- कोण असेल हा?' द्रोणाचार्य म्हणाले. त्यांनी त्या धनुर्धराचा शोध घ्यायला सुरुवात केली.

तरुण एकलव्याला धनुर्विद्येचा सराव करताना त्यांनी पाहिलं. एकलव्याचं त्यांच्याकडे लक्ष गेलं. तो धावत त्यांच्याकडे गेला. त्यांना वंदन केलं-''गुरुदेव, आपलं स्वागत आहे,'' तो म्हणाला. या अनोळखी तरुणानं आपल्याला 'गुरुदेव' म्हणावं याचं द्रोणाचार्यांना आश्चर्य वाटलं. ''बाळा, तू मला गुरुदेव का म्हणतो आहेस?" त्यांनी विचारलं.



“कारण, मी आपल्याकडूनच धनुर्विद्या शिकलो आहे” एकलव्यानं नम्रपणे उत्तर दिलं. “पण मी तर तुला कधीच शिकवलेलं नाही” ते म्हणाले. “तुम्हीच शिकवलं आहे गुरुदेव” एकलव्य हसून म्हणाला.

द्रोणाचार्य आणि अर्जुनाला तो गुरू द्रोणाचार्यांच्या पुतळ्यापाशी घेऊन गेला. एकलव्यानं कुत्र्याला मारलेला ध्वनिवेधी बाण पाहून, तो तर अर्जुनाहूनही श्रेष्ठ धनुर्धर असल्याचं द्रोणाचार्यांच्या लक्षात आलं होतंच. ते चिंतेत पडले. 'या मुलानं असेच आणखी काही धडे घेतले, तर हा धनुर्विद्येत अर्जुनालाही मागे टाकेल; पण या पृथ्वीवर अर्जुनापेक्षा दुसरा श्रेष्ठ धनुर्धर झालेला मला चालणार नाही. मी तसे होऊ देणार नाही. '

गुरू द्रोणाचार्य चाणाक्ष आणि मुत्सद्दी होते. अर्जुनाच्या मार्गातून एकलव्याला दूर करण्यासाठी त्यांनी एक चाल करण्याचं ठरवलं- “एकलव्या, मी तुझा गुरू आहे असं म्हणतोस. मग मला काही गुरुदक्षिणा देशील की नाही?" त्यांनी हसून विचारलं. हे ऐकून एकलव्याला खूप आनंद झाला. ‘‘गुरुदेव, आपण मला शिष्य

मानलंत हे माझं परमभाग्य आहे. गुरुदक्षिणा म्हणून आपण जे मागाल ते मी देईन.” अत्यंत नम्रपणे तो म्हणाला.

"असं? मग तुझ्या उजव्या हाताचा अंगठा गुरुदक्षिणा म्हणून मला दे - ‘‘ द्रोणाचार्यांनी मागणी केली. हे ऐकून अर्जुनाला धक्का बसला. 'या मुलानं जर त्याच्या उजव्या हाताचा अंगठा कापून दिला, तर तो धनुष्य-बाण कसा चालवणार?' त्याच्या मनात आलं; पण नेमकं हेच तर गुरू द्रोणाचार्यांना हवं होतं.

या गुरुदक्षिणेचे परिणाम काय होतील, हे एकलव्यालाही कळत होतं; पण आपल्या गुरूंबद्दल त्याच्या मनात अपार प्रेम, आदर आणि कृतज्ञता होती; त्यामुळे द्रोणाचार्यांनी त्याच्या उजव्या अंगठ्याची मागणी केल्याबरोबर, त्यानं तत्क्षणी उजवा अंगठा कापला आणि आपल्या गुरूंच्या पायाशी ठेवला. “गुरुदेव, हा माझा उजव्या हाताचा अंगठा गुरुदक्षिणा म्हणून मी आपल्याला अर्पण करत आहे‘‘ वीर एकलव्य म्हणाला. त्याच्या या अपूर्व त्यागाचा साक्षीदार होता, श्रेष्ठ धनुर्धर अर्जुन! एकलव्याच्या या त्यागाचं प्रत्यक्ष देव-देवतांनीही कौतुक केलं. खरंतर आपल्या या निरागस शिष्याकडून अशी विचित्र, मुलखावेगळी गुरुदक्षिणा घेताना गुरू द्रोणाचार्यांना अपराधी वाटत होतं; पण त्यामुळे आपल्या सर्वांत प्रिय शिष्याचं-अर्जुनाचं 'सर्वश्रेष्ठ धनुर्धर' म्हणून असलेलं स्थान अबाधित राखता आलं, या गोष्टीचं त्यांना जास्त समाधान वाटलं.

**(‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ प्रकाशित ‘सचित्र महाभारत’ या डॉ. वृषाली पटवर्धन लिखित पुस्तकातून)**

◆◆◆

# दिनविशेष

## १६ नोव्हेंबर २०२३ ते १५ जानेवारी २०२४ दरम्यानचा दिनविशेष
## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**१७ नोव्हेंबर - रत्नाकर मतकरी यांचा जन्मदिन**
रत्नाकर मतकरी लिखित १७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३०१०/- । सवलत किंमत २२६४/-

**१७ नोव्हेंबर - मोहना जोगळेकर यांचा जन्मदिन**
'रिक्त' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- सवलत किंमत १६९/-

**१९ नोव्हेंबर - जॅक शॅफिर यांचा जन्मदिन**
'भल्या दिलाचा माणूस' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-

**२१ नोव्हेंबर - मंजुश्री गोखले यांचा जन्मदिन**
मंजुश्री गोखले लिखित १०पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३२५०/- सवलत किंमत २४१३/-

**२४ नोव्हेंबर - डेल कार्नेगी यांचा जन्मदिन**
डेल कार्नेगी लिखित ६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२२०/- सवलत किंमत ७९९/-

**२४ नोव्हेंबर - अरुंधती रॉय यांचा जन्मदिन**
'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज', 'द मिनिस्ट्री ऑफ अटमोस्ट हॅपिनेस', 'आजादी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२२५/- । सवलत किंमत ७९६/-

**२४ नोव्हेंबर - सुधीर गाडगीळ यांचा जन्मदिन**
'लाइफ-स्टाइल' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२० - । सवलत किंमत १४३/-

**२६ नोव्हेंबर - वीणा देव यांचा जन्मदिन**
'स्वान्सीतील दिवस' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- सवलत किंमत २४९/-

**२६ नोव्हेंबर - मुंबई ॲटॅक दिन**
'२६/११ मुंबईवरील हल्ला' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २९५/- सवलत किंमत १९९/-

**२६ नोव्हेंबर - अनंत भोयर यांचा जन्मदिन**
'आभाळझुंज', 'हराळी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३२९/-

**२८ नोव्हेंबर - विश्वास पाटील यांचा जन्मदिन**
'बंदा रुपाया', 'क्रांतिसूर्य', 'नागकेशर', 'नॉट गॉन विथ द विंड', 'संभाजी', 'गाभुळलेल्या चंद्रबनात', 'आंबी', 'पानिपतचे रणांगण (नाटक)', 'महासम्राट : झंझावात', 'महासम्राट : रणखैंदळ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४४२०/- । सवलत किंमत ३३६३/-

**३० नोव्हेंबर - आनंद यादव यांचा जन्मदिन**
आनंद यादव लिखित ३४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७०१०/- । सवलत किंमत ५१९२/-

**३० नोव्हेंबर - मार्क ट्वेन यांचा जन्मदिन**
'हकलबेरी फिनची साहसं', 'टॉम स्वॉयरची साहसं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ४७९/-

**३० नोव्हेंबर - योजना यादव यांचा जन्मदिन**
'मरी मरी जाय सरीर' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १४०/- सवलत किंमत १०५/-

**३० नोव्हेंबर - संजीव परळीकर यांचा जन्मदिन**
'चार जबरदस्त फंडे', 'चार शब्द द्यावे घ्यावे', 'केल्याने होत आहे रे...' 'पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र', 'पुढाकार घ्या', 'विक्रीकौशल्य शिका', 'याला जीवन ऐसे नाव', 'झटपट व्यक्तिमत्त्व विकास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८६०/- सवलत किंमत ५६९/-

**३० नोव्हेंबर - हॅरिएट लर्नर यांचा जन्मदिन**
'द डान्स ऑफ अँगर', 'द डान्स ऑफ डिसेप्शन', 'द डान्स ऑफ इन्टिमसी', 'द मदर डान्स' पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०२०/- । सवलत किंमत ६९९/-

**खालील संचांवर १ ते १५ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१ डिसेंबर - अर्न्स्ट टोलर यांचा जन्मदिन**
'तुरुंगातील पत्रे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/-  सवलत किंमत १०९/-

**१ डिसेंबर - हिमसागर ठाकूर यांचा जन्मदिन**
'महागाई एक चक्रव्यूह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

**३ डिसेंबर - जागतिक अपंग दिन**
'दिव्यगुणी', 'लाइफ विदाउट लिमिट्स', 'रुक जाना नहीं...', 'चाकाची खुर्ची', 'आंधळ्याचे डोळे, 'तिबेटच्या वाटेवर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १७७५/- । सवलत किंमत १०६५/-

**४ डिसेंबर - निक व्होयचिच यांचा जन्मदिन**
'लाइफ विदाउट लिमिट्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-

**६ डिसेंबर - मिनेक शिप्पर यांचा जन्मदिन**
'नेव्हर मॅरी अ वुमन विथ बिग फीट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४२९/-

**७ डिसेंबर - विला कॅथर यांचा जन्मदिन**
'देवाची माणसे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-

**९ डिसेंबर - सोनिया गांधी यांचा जन्मदिन**
'निमित्ता निमित्ताने...' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

**११ डिसेंबर - ओशो यांचा जन्मदिन**
ओशो लिखित ३३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ५८८०/- । सवलत किंमत ३८६९/-

**११ डिसेंबर - देवदत्त पट्टनायक यांचा जन्मदिन**
'धर्म आणि समलैंगिकता' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १६५/-

**१३ डिसेंबर - मेरी ॲन शाफर यांचा जन्मदिन**
'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-

**१५ डिसेंबर - गीता फोगाट यांचा जन्मदिन**
'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-

**१५ डिसेंबर - सुरेश पाटील यांचा जन्मदिन**
'दाह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-

**१५ डिसेंबर - ग्रेचेन रुबिन यांचा जन्मदिन**
'आनंदतरंग' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

**खालील संचांवर १६ ते ३१ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन**
'मैत्री अशी आणि तशी', 'वर्क लेस, डू मोअर' या पुस्तकांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत ३९९/-

**१६ डिसेंबर - विजय दिवस**
'परमवीर चक्र' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १२९/-

**२० डिसेंबर - मॅथ्यू ग्लास यांचा जन्मदिन**
'एन्ड गेम', 'अल्टिमेटम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५४९/-

**२० डिसेंबर - प्रतिमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'रुजवाई' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

**२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन**
'संस्कार', 'अवस्था' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १९९/-

**२३ डिसेंबर - किसान दिवस**
'आधुनिक द्राक्ष लागवड', 'विपुलाच सृष्टी', 'केल्याने होत आहे रे', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग', 'शेती करू फायद्याची', 'बोन्साय', 'घरातील बाग', 'छंद बागेचा', 'कॉर्पोरेटला रामराम शेतीला सलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १९०५/- । सवलत किंमत १३३४/-

**२४ डिसेंबर - मधुवंती सप्रे यांचा जन्मदिन**
'ध्यासपर्व' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६२/-

**२४ डिसेंबर - सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन**
'गज़ल', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'पृथ्वीवर माणूस उपराच', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७८०/- । सवलत किंमत ४९९/-

**२४ डिसेंबर - भारतीय ग्राहक दिन**
'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या सर्व पुस्तकांवर (प्रत्येकी १ प्रत) ४०% सवलत.
ही सवलत नेट १५००/- व अधिकच्या खरेदीवर लागू.
(ही सवलत फक्त २४ डिसेंबर या एक दिवसासाठी आहे.)

**२५ डिसेंबर - प्रज्ञा ओक यांचा जन्मदिन**
'बुक मार्क' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-

**२५ डिसेंबर - ख्रिसमस**
बालसाहित्याच्या १५००च्या खरेदीवर ४०% सूट
(ही सवलत फक्त २५ व २६ डिसेंबर या दोन दिवसांसाठी आहे.)

**२८ डिसेंबर - बाबा आमटे यांचा जन्मदिन**
'अमरगीत' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

**२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन**
' 'स'सुखाचा', 'तो आणि ती', 'तुला आठवताना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६०२/-

**२८ डिसेंबर - डेव्हिड ॲलन यांचा जन्मदिन**
'गेटिंग थिंग्ज डन' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-

**२९ डिसेंबर - भावेश भाटिया यांचा जन्मदिन**
'रुक जाना नही' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४५/-

**३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन**
'आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध', 'छत्रपती संभाजी : एक चिकित्सा', 'मराठेशाहीचे अंतरंग', 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे', 'शिवछत्रपती एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास', 'समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती', 'क्रांतिसिंह नाना पाटील', 'वेध अमुच्या इतिहासाचा', 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ', 'व्यक्तिवेध : शरद पवार ते गोविंद पानसरे', 'युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी', 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना', 'राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय', 'दादाजी कोंडदेव कोण होता?' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६६३५/- । सवलत किंमत ४७७७/-

**३१ डिसेंबर - मेगन चान्स यांचा जन्मदिन**
'द स्पिरिच्युॲलिस्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-

**खालील संचांवर १ ते १५ जानेवारी २०२४ दरम्यान खास सवलत**

**१ जानेवारी - मायकेल गेट्स गिल यांचा जन्मदिन**
'हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१९/-

**१ जानेवारी - तान त्वान एंग यांचा जन्मदिन**
'द गिफ्ट ऑफ रेन' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २२९/-

**१ जानेवारी - पॉल कार्सन यांचा जन्मदिन**
'बिट्रेयल' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-

**१ जानेवारी - ॲनी बरोज यांचा जन्मदिन**
'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-

**१ जानेवारी - नादिया मुराद यांचा जन्मदिन**
'द लास्ट गर्ल' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४६०/- । सवलत किंमत ३२५/-

**१ जानेवारी - सॅम ख्रिस्टर यांचा जन्मदिन**
'द स्टोनहेंज लेगसी' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-

**३ जानेवारी - ग्रेटा थुनबर्ग यांचा जन्मदिन**
'ग्रेटाची गोष्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १२५/- । सवलत किंमत ८९/-

**३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन**
'ए कॉल टू ऑनर', 'जिना' या पुस्तकांवर विशेष सवलत
मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ४७९/-

**३ जानेवारी - राजेंद्र खेर यांचा जन्मदिन**
'बिंदू सरोवर', 'उदयन' या पुस्तकांवर विशेष सवलत
मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ४४९/-

**३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती**
'महात्मा (जोतिराव फुले)', 'मी मलाला', 'स्टोन्स इन्टू स्कूल', 'थ्री कप्स ऑफ टी', 'ज्ञानाई सावित्रीबाई फुले' या पुस्तकांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १६९५/- । सवलत किंमत १००५/-

**४ जानेवारी - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'मराठी भाषा उद्गम व विकास' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत १९९/-

**७ जानेवारी - शोभा डे यांचा जन्मदिन**
'सिलेक्टिव्ह मेमरी', 'स्पीड पोस्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८२०/- । सवलत किंमत ५५०/-

**८ जानेवारी - स्टीफन हॉकिंग यांचा जन्मदिन**
'जॉर्ज ॲन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स', 'जॉर्ज ॲन्ड द ब्ल्यू मून', 'जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाइम', 'जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २६७०/- । सवलत किंमत १८७०/-

**८ जानेवारी - मार्क व्हिक्टर हॅन्सन यांचा जन्मदिन**
चिकन सूप मालिकेतील ६१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १३३१०/- । सवलत किंमत ९३१७/-

**९ जानेवारी - विल्बर स्मिथ यांचा जन्मदिन**
'द सेव्हन्थ स्क्रोल' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २७९/-

**९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन**
'एक दिवस', 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २४९/-

**१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन**
'आल्फ्रेड रसेल वॅलेस', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'असे घडले सहस्रक', 'असे शास्त्रज्ञ असे संशोधन', 'ज्ञानदीप', 'फार फार वर्षांपूर्वी', 'जिज्ञासापूर्ती', 'ज्याचं करावं भलं', 'पर्यावरण प्रदूषण', 'रोबॉट फिक्सिंग',

'शास्त्रज्ञांचे जग', 'स्वप्नचौर्य', 'तरुणांनो होशियार', 'वसुंधरा', 'वेध पर्यावरणाचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३५९०/- । सवलत किंमत २१५४/-

**११ जानेवारी - अनू अगरवाल यांचा जन्मदिन**
'अनू'प या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

**११ जानेवारी - वि. स. खांडेकर यांचा जन्मदिन**
एकूण ११९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत १७,६००/- । सवलत किंमत १२,७२७/-

**१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद जयंती व जागतिक युवा दिन**
'आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'चिकन सूप टीनएज सोल', 'चिकन सूप टीनएज सोल भाग २', 'चिकन सूप टीन एज सोल भाग ३', 'मैत्री अशी आणि तशी', 'स्वामी विवेकानंद', 'टीनएजर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २२४५/- । सवलत किंमत १३४७/-

**१२ जानेवारी - मृणालिनी गडकरी यांचा जन्मदिन**
'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३०९/-

**१४ जानेवारी - डेव्हिड कर्कपॅट्रिक यांचा जन्मदिन**
'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २२९/-

आमच्या लेखकांच्या जन्मदिनानिमित्त
तसेच दिनविशेषांवर आधारित विषयांवरील
पुस्तकसंचांवर विशेष सवलत
◆ **किमतींमध्ये बदलाची शक्यता** ◆

अधिक माहितीसाठी संपर्क :
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२
Whatsapp No. : ९४२०५९४६६५
Website : www.mehtapublishinghouse.com
**FREE SHIPPING**


नेताजी पालकर यांचा
विजापूरच्या तटबंदीवर थेट हल्ला,
पावनखिंडीतला थरार,
सुरतेची महालूट,
तीस हजार मोगली फौजेचे
उंबरखिंडीत केलेले नि:शस्त्रीकरण,
शाहिस्तेखानाला वेसण, कुडाळचे महायुद्ध आणि
सागराच्या पोटातले सिंधुदुर्गनिर्मितीचे अचाट स्वप्न!
पस्तिशीच्या उंबरठ्यावर शिवरायांनी उडवलेली


महासम्राट

विश्वास पाटील

₹ ६२५

# रणखैंदळ





मिथकं कधीच लोप पावत नाहीत,
हेही त्यांचं एक वैशिष्ट्य आहे.
या तोंडून त्या तोंडी जाताना
त्यांवर अनेक पुटं चढत जातात
आणि एक काळ असा येतो की,
आधुनिक काळाशी जोडून घेताना
हे पापुद्रे ओरबाडून काढले जातात
आणि त्यातून
आणखी एक मिथक तयार होतं.

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
माडीवाले कॉलनी पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२,
२४४६०३१३, २४४६३०४८
Email: mmgj@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.